म. ग्रं. सं. ठाणे
य भू-प्रवास
क. ४८९



REFBK-0015042

कारखानीस

# जागृत आफ्रिका

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
दा. क्र. ५५०८२

लेखिका
सौ. सरला कारखानीस

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे.
अनुक्रम ................ दि: ..................
................................ नों. दि: ..................

अभिनव प्रकाशन, मुंबई १२

किंमत साडेचार रुपये

प्रकाशक :
वामन विष्णु भट,
अभिनव प्रकाशन,
७, अंबा सदन, जेरबाई वाडिया रोड,
परळ, मुंबई १२.

पहिली आवृत्ति : एप्रिल १९६५

मुखपृष्ठ : बाळ ठाकूर

मुद्रक :
सौ. उषा ज. नागपूरकर,
श्री मुद्रण मंदिर,
५८०, सदाशिव पेठ, पुणे २.

६५३८२
१८।३।६९.
४८९

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
ग्रंथालय
समृद्धी योजना
* १९७० *



मोरोक्को
सहारा
अल्जेरिया
तुनिशिया
लिबिया
इजिप्त
मौरितानिया
सेनेगल
माली
निगर
गांबिया
गिनी
नायजेरिया
घाना
टोगोलँड
लायबेरिया
चाद
सूदान
कॅमेरून
गॅबन
कांगो
युगांडा
केनिया
सोमाली
टांगानिका
न्यासालँड
अंगोला
उत्तर ऱ्होडेशिया
दक्षिण ऱ्होडेशिया
नैऋत्य आफ्रिका
बेचुआनालँड
मोझांबिक
दक्षिण आफ्रिका
स्वाझीलँड
बासुतोलँड
मालागासी

[illegible] ०५३२२ [illegible] [illegible]
४८९ [illegible] ९८।३।०९

# अनुक्रमणिका


| | | |
|---|---|---|
| | प्रास्ताविक | ४–५ |
| १. | दक्षिण आफ्रिकेचें प्रजासत्ताक | ९ |
| २. | नैर्ऋत्य आफ्रिका | २५ |
| ३. | बेचुआना-लँड | २८ |
| ४. | बासुतो-लँड | ३१ |
| ५. | स्वाझि-लँड | ३३ |
| ६. | दक्षिण ऱ्होडेशिया | ३५ |
| ७. | उत्तर ऱ्होडेशिया ( झांबिया ) | ४२ |
| ८. | न्यासा-लँड ( मालवी ) | ४८ |
| ९. | मोझांबिक | ५४ |
| १०. | अंगोला | ६० |
| ११. | मलागासी ( मादागास्कर ) | ६७ |
| १२ | टांगानिका | ६९ |
| | झांजिबार-पेम्बा वगैरे | ७५ |
| | केनिया | ७८ |
| | युगांडा | ८५ |
| | ऱ्वांडा-उरुंडी | ९२ |
| १७. | कांगो ( लिओपोल्डव्हिला ) | १०० |
| १८. | कांगो प्रजासत्ताक ( ब्राझाव्हिला ) | ११९ |
| १९. | गॅबन | १२४ |
| २०. | मध्य आफ्रिकन प्रजासत्ताक | १२६ |


REFBK-0015042

| | | |
|---|---|---|
| २१. | चाद | १२८ |
| २२. | कॅमेरून्स संघराज्य | १३० |
| २३. | निगर प्रजासत्ताक | १३४ |
| २४. | अप्पर व्होल्टा | १३६ |
| २५. | दाहोमी | १३७ |
| २६. | टोगोलॅंड | १३९ |
| २७. | आयव्हरी कोस्ट | १४२ |
| २८. | माली प्रजासत्ताक | १४४ |
| २९. | गिनी | १४६ |
| ३०. | गिनी ( पोर्तुगीज ) | १५० |
| ३१. | सेनेगाल | १५१ |
| ३२. | गॅंबिया | १५३ |
| ३३. | मौरितानिया | १५५ |
| ३४. | सिएरा लियोन | १५७ |
| ३५. | लायबेरिया | १६३ |
| ३६. | घाना | १६५ |
| ३७. | नायगेरिया | १७६ |
| ३८. | सोमालिया लॅंड | १८३ |
| ३९. | इथिओपिया | १८७ |
| ४०. | सुदान | १८९ |
| ४१. | इजिप्त | १९१ |
| ४२. | लिबिया | १९८ |
| ४३. | ट्युनिशिया | २०१ |
| ४४. | अल्जेरिया | २०४ |
| ४५. | मोरोक्को | २१२ |
| ४६. | उपसंहार | २१९ |

# प्रास्ताविक

आफ्रिकेंतील राष्ट्रांच्या स्वातंत्र्य-लढ्यांचा इतिहास अद्यापहि अगदीं ताजा आहे. गेल्या दहा वर्षांत आफ्रिकेंतील अनेक राष्ट्रांनीं स्वातंत्र्य हस्तगत केलें आणि आज ३६ स्वतंत्र आफ्रिकी राष्ट्रें संयुक्त राष्ट्र-संघाची सभासद आहेत. परंतु आफ्रिकेंतील स्वातंत्र्य-संग्राम अद्याप पूर्ण झालेला नाहीं. साम्राज्यशाहीच्या विनाशाच्या ह्या काळांत कांहीं साम्राज्य-वादी देश अद्यापहि सत्ता सोडण्यास तयार नाहींत; ते शस्त्रास्त्रांच्या जोरावर तेथील उठाव नष्ट करूं पहात आहेत; आणि आफ्रिकी जनता त्यांचा प्रतिकार करीत आहे, स्वतंत्र होण्याचा जन्मसिद्ध हक्क मिळविण्यासाठीं लढत आहे. आफ्रिकेंतील इतर कांहीं राष्ट्रांतील स्वातंत्र्य-लढ्यांचें स्वरूप आणखीनच निराळें आहे. त्यांच्यावर परदेशांतून साम्राज्यवाद्यांची सत्ता चालत नाहीं. परदेशी लोक तेथेंच जाऊन ठाण मांडून बसले आहेत आणि त्यांनीं अल्पसंख्य गोऱ्या लोकांची हुकूमशाही त्या राष्ट्रांतून स्थापन केली आहे.

आफ्रिकेंतील स्वातंत्र्य-लढे हे असे विविध प्रकारचे आहेत. कारण आफ्रिकेंतील निरनिराळ्या प्रदेशांवर निरनिराळ्या साम्राज्यवादी सत्तांनीं ताबा मिळविला होता. महाराष्ट्रावर पोर्तुगीजांनीं, मध्यप्रदेशावर फ्रेंचांनीं, उत्तर प्रदेशावर ब्रिटिशांनीं—इ. इ. प्रकारें आपल्या भारतांत झालें असतें तर जसा अनावस्था प्रसंग ओढवला असता, तशी अवस्था आफ्रिकेंत झालेली आहे. त्या भिन्नभिन्न साम्राज्यसत्तांनीं त्यांच्या ताब्यांतील राज्यांत भिन्नभिन्न प्रकारची राज्यव्यवस्था निर्माण केली; आपली संस्कृति त्यांच्या-वर लादण्याचा प्रयत्न केला, त्यांची संस्कृति नष्ट केली; त्यांना अविकसित ठेवलें; दारिद्र्य, रोगराई, अज्ञान, यांचें त्यांना वरदान दिलें आणि तेथील अमाप नैसर्गिक संपत्तीची अमानुषपणानें लूट केली. प्रसिद्ध अमेरिकन लेखक **मार्क ट्विन** यानें "विषुववृत्तावरील प्रवास" या पुस्तिकेंत म्हटलें

आहे : “ अनेक देशांतून आम्ही रानटी ( समजल्या जाणाऱ्या ) लोकांना साखळदंडानें बांधलें आहे, आणि त्यांना उपाशी मारलें आहे. ........ आपण त्यांची व त्यांच्या बायकामुलांची शिकारी कुत्रे व बंदुका घेऊन शिकार केली आहे.........जगांत अनेक विनोदी समज आहेत आणि ‘ इतर रानटी लोकांपेक्षां आपण कमी रानटी आहोंत ’, हा युरोपियन लोकांचा असाच एक गैरसमज आहे. ”

तो काल आतां संपला आहे, संपत आला आहे; पण त्याचे अवशेष आहेतच. उदाहरणार्थ, दुर्दैवी कांगोवर आज देखील परकीय सत्तांचें आक्रमण चालूं आहे.

ह्या सर्व इतिहासाची महान गाथा थोडक्यांत वाचकांपुढें ठेवण्याचा प्रयत्न ह्या पुस्तकांत करण्यांत आला आहे. साम्राज्यपूर्व काळांतील आफ्रिकेच्या संस्कृतीचा व जीवनाचा अल्प परिचय “ आफ्रिका ” ह्या पुस्तकांत मी करून दिला आहे, त्याच्या पार्श्वभूमीवर हें पुस्तक वाचणें अधिक उपयुक्त ठरेल.

याशिवाय आणखी एक प्रश्न राहतो. स्वातंत्र्य प्राप्तीनंतर ह्या राष्ट्रांतून काय चाललें आहे ?—हा प्रश्न फार महत्त्वाचा आहे. अनेक वर्षांचा मागासलेपणा नाहींसा करून जगांत हिंमतीनें पुढें येण्याचे प्रयत्न यांपैकीं कांहीं राष्ट्रें करीत आहेत. त्यांच्या प्रयत्नांची दिशा या पुस्तकांत वाचकांना मिळेल, परंतु त्यांचा विस्तारानें व खोलवर अभ्यास मात्र पुढें केव्हांतरी स्वतंत्रपणें करावा लागेल.

आफ्रिका खंडांतील राष्ट्रांची स्वातंत्र्यपूर्व काळांतील परिस्थिति, स्वातंत्र्य-लढे व नवीन राजवटी यांचें स्वरूप विशद करणारें हें पुस्तक सर्वांना आवडेल अशी आशा आहे.

—*सरला कारखानीस*

# स्वराज्यांतील नामसंक्रमण

आफ्रिकेंतील राष्ट्रांना साम्राज्यवाद्यांनीं नांवें दिलीं होतीं. स्वतंत्र झालेल्या आफ्रिकी राष्ट्रांपैकीं कांहींनीं हीं नांवें बदलून नवीं नांवें पुढीलप्रमाणें धारण केली आहेत. आतां हीच नांवें रूढ होत आहेत.

| जुनें नांव | नवें नांव | पुस्तकांतील पृष्ठ क्रमांक |
|---|---|---|
| (१) **उत्तर ऱ्होडेशिया** | **झांबिया** | **४२** |
| (२) **न्यासालँड** | **मालवी** | **४८** |
| (३) **मादागास्कर** | **मलागासी** | **६७** |
| (४) **तांगानिका-झांझिबार संघराज्य** | **तान्झानिया** | **७५** |
| (५) **गोल्ड कोस्ट** | **घाना** | **१६५** |

## महत्त्वाच्या दुरुस्त्या

| पान | चूक | दुरुस्त |
|---|---|---|
| ४८ प्रारंभ | ब्रिटिश सत्तेखालील देश | गाळून टाकावे |
| ६९ प्रारंभ | आफ्रिकी १५ लक्ष | आफ्रिकी ९४ लक्ष १५ हजार |
| ११४ परि. २ | २२ मे १९६५ | २२ मे १९६० |
| १२३ | चार | चाद, |
| १७४ | आफ्रिकेच्या लोकसंख्येच्या | परतंत्र आफ्रिकेच्या लोकसंख्येच्या |
| २०५ भाग २ | १९४८ मध्यें | १८४८ मध्यें |

दा. नं. १५०८२

# १ : दक्षिण आफ्रिकेचें प्रजासत्ताक

## ( Republic of South Africa )

**प्रांत**—केप प्रांत, नाताळ, ऑरेंज फ्री स्टेट व ट्रान्सवाल.

**लोकसंख्या**—१ कोटी ६० लक्ष.

**बांटू** १ कोटी १० लक्ष, **युरोपियन्स** ३० लक्ष, **संमिश्र** १५ लक्ष व **भारतीय** ५ लक्ष.

**राजधानी**—केपटाऊन व प्रिटोरिया.

**राज्य**—वंश-भिन्नतेवर आधारलेली युरोपियन लोकांची हुकूमशाही.

**मुख्य धंदा**—हिऱ्यांच्या, सोन्याच्या व कोळशाच्या खाणी.

## १

आफ्रिका खंडाच्या अगदीं दक्षिण टोंकाला असलेलें हें राज्य आज जगांत अत्यंत कुप्रसिद्ध झालेलें आहे. आफ्रिका खंडांतील अनेक राष्ट्रें स्वातंत्र्याच्या व लोकशाहीच्या मार्गानें प्रगति करीत असतांना ह्या राज्यांत मात्र अल्पसंख्य गोऱ्या लोकांची हुकूमशाही चालू आहे. तिनें निर्माण केलेला समाज व त्याचें स्वरूप यांच्या परिचयास आतां प्रारंभ करूं या.

केप प्रांत, नाताळ, ऑरेंज फ्री स्टेट व ट्रान्सवाल ह्या चार प्रांतांचा समावेश ह्या राज्यांत होता आणि म्हणून त्यास पूर्वी " द. आफ्रिकेचें संघराज्य " म्हणत असत; आतां तें " द. आफ्रिकेचें प्रजासत्ताक " ह्या नांवानें ओळखलें जातें.

केप कॉलनीची हवा अत्यंत आल्हाददायक असून तेथें द्राक्षें व नारिंगें यांच्या मोठमोठ्या बागा आहेत. पीच, पिअर, प्लम, अक्रोड, बदाम व

वॉलनट इत्यादि फळांचेंहि उत्पादन तेथें मोठ्या प्रमाणावर होतें. द्राक्षा-पासून तयार करण्यांत आलेली उंची दारू आणि ताजीं फळें येथून ब्रिटनला व युरोपमधील इतर देशांत रवाना होतात. फळें ताजीं राहावींत म्हणून बोटींतून रेफ्रिजरेटर्स वापरण्यांत येतात. **केपटाऊन** हें राजधानीचें शहर असून राज्याचें प्रमुख बंदर आहे.

केपटाऊनच्या उत्तरेकडे चढ सुरू होतो. ह्या उंचवट्याच्या प्रदेशांतहि हवा अतिशय आरोग्यदायक आहे. येथें मेंढ्या पाळण्याचा धंदा अवाढव्य प्रमाणावर चालतो. एकेक कुरण १०, १० हजार एकरांचें आहे. मेंढ्यां-पासून मांस, दूध व लोकर मिळते.

उत्तरेस ऑरेंज नदी ओलांडली कीं **किंबर्ले** शहर लागतें. जगांतील हिऱ्यांची सर्वांत मोठी खाण ह्या शहरांत आहे. खाणींत अर्थातच बांटू निग्रो काम करतात.

ऑरेंज नदीला वॉल ही उपनदी मिळते. तिच्या पूर्वेकडे **जोहान्सबर्ग** शहर आहे. येथें जगांतील पहिल्या क्रमांकाची सोन्याची खाण आहे. ह्या खाणींचा टापू ८० मैलपर्यंत पसरलेला आहे.

जोहान्सबर्गच्या उत्तरेस **प्रिटोरिया** हें शहर आहे. प्रिटोरियापासून ३० मैलांवर हिऱ्यांची मोठी खाण आहे. ह्याच्या सभोंवारच्या प्रदेशांत कोळशाच्या व सोन्याच्या खाणी आहेत.

राज्याच्या पूर्वेस किनाऱ्याला लागून नाताळचा प्रांत आहे. किनाऱ्या-जवळ उंसाचे मळे व साखरेचे कारखाने आहेत आणि दर्बान हें बंदर आहे.

केपटाऊन व प्रिटोरिया हीं दोन शहरें द. आफ्रिका राज्याच्या राजधान्या आहेत. पार्लमेंटची बैठक केपटाऊनमध्यें भरते.

ह्या प्रदेशांतील मूळची वस्ती आफ्रिकन निग्रोंची, त्यांना बांटू म्हणतात. हे लोक मोठे हुशार व कर्तबगार आहेत. युरोपियन साम्राज्यवाद्यांची नजर आफ्रिकेकडे वळल्यानंतर डच लोकांनीं येथें तळ ठोकला. बांटू व डच यांची जी संमिश्र प्रजा जन्माला आली त्यांना तेव्हां बोअर्स ( शेतकरी ) म्हणत. त्या बोअर लोकांबरोबर ब्रिटिशांनीं ( १८९९ ते १९०२ पर्यंत ) युद्ध करून हा प्रदेश आपल्या साम्राज्यांत सामील केला. तेव्हांपासून ब्रिटिश लोकांची वस्ती मुख्यतः केप व नाताळ या प्रांतांतून आहे आणि बोअर लोकांचे

वंशज, ज्यांना आतां आफ्रिकानेर म्हणतात त्यांची वस्ती – मुख्यतः ऑरेंज फ्री स्टेट व ट्रान्सवाल ह्या उत्तरेकडील प्रांतांत आहे. नाताळमध्यें ब्रिटिशांनीं लावलेल्या उंसाच्या मळ्यावर काम करण्यासाठीं त्यांनीं आपल्या हिंदी साम्राज्य-प्रदेशांतून हिंदी मजूर १८६० पासून आणण्यास प्रारंभ केला. तेव्हांपासून तेथें हिंदी लोकांची वस्ती झाली आहे. अशा रीतीनें, दक्षिण आफ्रिका राज्यांत बांटू, हिंदी, आफ्रिकानेर, ब्रिटिश व संमिश्र वर्गांचे लोक राहतात. राज्याची लोकसंख्या १ कोटी ६० लक्ष असून त्यांतील १ कोटी १० लक्ष बांटू, १५ लक्ष संमिश्र ( बांटू व युरोपियन्स यांच्या संकरांतून जन्माला आलेले ), ५ लक्ष हिंदी मिळून १ कोटी ३० लक्ष गौरेतर ( Coloured ) आणि १८ लक्ष आफ्रिकानेर ( डच ) व १२ लक्ष ब्रिटिश मिळून ३० लक्ष गोरे लोक राहतात.

आफ्रिकेंतील इतर कोणत्याहि राज्यापेक्षां युरोपियन लोकांची वस्ती ह्या राज्यांत जास्त असून सर्व सत्ता व संपत्ति त्यांच्या हातांत आहे. १९०९ मध्यें ब्रिटिश पार्लमेंटनें कायदा करून त्यांना " स्वराज्य " दिलें. १९६१ पर्यंत हें राज्य ब्रिटिश राष्ट्रकुलांत सामील होतें; पण राष्ट्रकुलांतील सर्व सभासद राष्ट्रांनी ह्या राज्यांतील वंशभेदावर आधारलेल्या हुकूमशाहीवर कडवी टीका केल्यामुळें तें राष्ट्रकुलांतून बाहेर पडलें. " संयुक्त राष्ट्रसंघा "नें ( यूनोनें ) दिलेले कोणतेहि आदेश तें मानीत नाहीं. अशा रीतीनें तेथें अनिर्बंध हुकूमशाहीची राजवट चालू राहिली आहे.

## २

ह्या राज्यांत युरोपियन लोकांखेरीज कोणालाहि मतदानाचा हक्क नाहीं. **आफ्रिकानेर** लोकांच्या पुढाकाराखालील **नॅशनॅलिस्ट पार्टी** आणि **ब्रिटिश** वर्चस्वाखालील **युनायटेड पार्टी** ह्या दोन पक्षांमध्यें अनेक वर्षें चाललेल्या संघर्षाचा शेवट १९४८ च्या निवडणुकांत होऊन तेथें नॅशनॅलिस्ट पार्टीचें कट्टर वंशद्वेषी सरकार **डॉ. मालन** यांच्या पुढाकाराखालीं स्थापन झालें. त्याच पक्षाची राजवट अजूनहि तेथें चालू असून आतां **डॉ. व्हरओर्ड** हे तिचे पुढारी व द. आफ्रिकेचे पंतप्रधान आहेत. युनायटेड

पार्टी ही तेथें " विरोधी पक्ष " म्हणून काम करीत असली तरी वर्ण-भेदाच्या धोरणावर दोन्ही पक्षांचें जवळजवळ मतैक्य आहे. नॅशनॅलिस्ट पार्टी ही अधिक कडवी व कट्टर आहे इतकेंच. धोरणांत मूलतः फरक नसला तरी ह्या दोन पक्षांची आणि त्यांना पाठिंबा देणाऱ्या डच-भाषिक व इंग्लिश-भाषिक लोकांची सत्तेसाठीं सतत चढाओढ चालू असते.

वंशद्वेषाच्या धोरणाचा सतत पुरस्कार व अंमल चालवून युरोपियन लोकांनीं द. आफ्रिकेंतील **९० टक्के जमीन** आपल्या मालकीची करून घेतली आहे. राज्यांतील मोठमोठ्या मळ्यांचे, कुरणांचे व बागांचे मालक असलेले डच आफ्रिकानेर नॅशनॅलिस्ट पार्टीचे आधारस्तंभ आहेत आणि युरेनियम व कोळशाच्या आणि सोन्याच्या व हिऱ्यांच्या खाणींचे मालक असलेले ब्रिटिश युनायटेड पार्टीचे आधारस्तंभ आहेत. पिळवणूक कायम चालविण्यासाठीं व टिकविण्यासाठीं संपूर्ण वंशभेदाचें व फारकतीचें धोरण कांहींसें अवास्तविक व अव्यवहार्य ( Impracticable ) आहे अशा मतांचा शिरकाव आतां ह्या भांडवलदारी-मक्तेदारी गटांत होऊं लागला आहे. येथील खाणींतून **१५० कोटी रुपयांचें** ब्रिटिश **भांडवल** असून त्यावर दर वर्षीं १५ टक्के, म्हणजे **२३ कोटी रुपये नफा** मिळतो. ११०० कोटी रु. नफा ७५ वर्षांत भांडवलदारांनीं वसूल केला आहे.

नॅशनॅलिस्ट पार्टीचें सरकार ज्या धोरणानुसार काम करतें त्याला " apartheid " ( अपार्टेड ) म्हणतात. ह्या धोरणाचा मुख्य गाभा म्हणजे गोऱ्या लोकांना व काळ्या लोकांना एकमेकांपासून संपूर्णपणें दूर ठेवायचें.

अर्थात् दूर ठेवण्याचें धोरण कसोशीनें पाळलें तर गोऱ्यांच्या भागांतील सर्व कामें त्यांनाच करावीं लागलीं असतीं आणि काळ्यांच्या सावलीलासुद्धां उभें राहायचें नाहीं ही त्यांची प्रतिज्ञा व हें त्यांचें तत्त्वज्ञान अमलांत आलें असतें. पण तसें करण्याची त्यांची ताकद नसल्यामुळें दक्षिण आफ्रिकेच्या राज्यांत त्यांनीं एक मोठा विचित्र समाज निर्माण करून ठेवला आहे. वंशभेदावर आणि वंशद्वेषावर आधारलेल्या ह्या समाजरचनेचें स्वरूप नीट स्पष्टपणें पाहिलें पाहिजे.

# ३

आफ्रिकन लोकांसाठीं जी जमीन वेगळी काढून ठेवली आहे, तिला Native Reserves (**राखीव जमीन**) म्हणतात. १ कोटी ६० लक्ष लोकसंख्येपैकीं १ कोटी ३५ लक्ष लोकांसाठीं सुमारें ९ टक्के जमीन राखीव ठेवण्यांत आली आहे. ही जमीन सोडून दुसरी कोणतीहि जमीन विकत घेण्याचा काळ्या लोकांना हक्क नाहीं, असा कायदा आहे. त्यामुळें आफ्रिकन लोकांना दाटीदाटीनें राहणें अगर देशोधडीस लागणें ह्याखेरीज तिसरा पर्याय उरला नाहीं. यामुळें जोहान्सबर्ग व प्रिटोरिया येथील खाणींत काम मिळविण्यासाठीं हजारों तरुण लोक सारखे त्या शहरांकडे जात असतात; आणि तरीसुद्धां राहिलेल्या लोकांसाठींहि राखीव जमिनीवर पोटापुरतें अन्न उत्पन्न होऊंच शकत नाहीं. तेथें राहणाऱ्या लोकांपैकीं ⅔ लोकांजवळ पुरेशी ( कुटुंबाला पुरेल इतकी ) जमीन नाहीं.

ह्या राखीव वस्त्यांतून बुटक्या गोल आकाराच्या झोपड्या असतात. वस्तीभोंवतीं कांटेरी कुंपण असतें. शहरांपासून दूर; रेल्वे, रस्ते व वाहतुकीचीं साधनें जेथपर्यंत पोहोंचलेलीं नाहींत अशा निकृष्ट दर्ज्याच्या विभागांतून मुख्यतः ह्या वस्त्या आहेत. यांत राहणाऱ्या लोकांना जवळ "पास" असल्याशिवाय बाहेर राहतां येत नाहीं. त्यांना राज्याबाहेर जाण्यासाठीं पासपोर्ट कधींच मिळत नाहीं. आधींच हें जिवन जवळ जवळ गुलामीचें पण सध्यां त्यातील "स्वातंत्र्य" आणखीनच कमी करण्याकडे सर्व उपाय योजले जातात. ह्यांपैकीं बऱ्याच वस्त्यांना "नगर-कायदा" ( Urban Areas Act ) लागू करण्यांत आला आहे. ह्या कायद्याचा अर्थ असा कीं, येथें राहणारे सर्व लोक "तात्पुरते रहिवाशी" आहेत. म्हणजे पूर्वी बाहेरच्या जगांत राहायला व जायला पास लागत होता आतां ह्या "राखीव" तुरुंगांतून राहण्यासाठींसुद्धां पास लागतो. रात्रीं पोलिसांच्या "रेड्स" येतात आणि सर्वांना हैराण करण्यांत येतें.

सर्व आफ्रिकेंतील काळोख जर कोठें असेल तर तो ह्या ठिकाणीं भरलेला आहे.

जोहान्सबर्गला जाणाऱ्या लोकांचीहि एक निराळीच कहाणी आहे. तेथें

मजूर " फार " वाढूं नयेत म्हणून काळजी घेण्यांत येते. कारण सर्वच तरुण शहरांत कामाला जाऊं लागले तर युरोपियन लोकांच्या शेतांवर काम कोण करणार ? त्यांच्या फळबागा कोण पिकवणार ? त्यांच्या मेंढ्यांच्या कळपांची, आणि दूधदुभत्याची निगा कोण राखणार ? तेव्हां गोऱ्या लोकांच्या शेता-मळ्यांवर व कुरणांवर स्वस्त मजूर मिळावेत म्हणून शहरांतील मजुरांना तेथून हांकलून लावण्यांत येतें.

उदाहरणार्थ, जोहान्सबर्गमध्यें काम करणाऱ्या ज्या आफ्रिकन लोकांना वर्षाला १८२ पौंडांपेक्षां कमी वेतन मिळतें – आणि बहुतेकांना कमीच मिळतें– त्यांना शेतावर काम करण्यासाठीं जायला सांगतात. त्यांनीं नकार दिला तर त्यांना " शहराबाहेर जा " असा हुकूम दिला जातो. तो माणूस आपल्या गांवीं गेला तर तेथें त्याला काम नसतें. तो एखाद्या शेतामळ्यावर राहिला तर त्याला मिळेल ती मजुरी घेऊन काम करावें लागतें. तें नाहींच परवडलें तर तो परत जोहान्सबर्गला जातो आणि तेथें " बेकायदेशीर "पणानें राहतो. वाटेल तेव्हां पोलिस त्याला पकडतात आणि तुरुंगांत टाकतात; म्हणजे त्याला फुकटाफाकट युरोपियन लोकांच्या शेतामळ्यांत कामाला पाठवितात. असे सुमारें ४-५ लाख " बेकायदेशीर " लोक जोहान्सबर्ग ह्या सुवर्ण-नगरींत आहेत !

पोलिस व गोरे मळेवाले "शेतकरी" यांच्यांत एक नव्याच धर्तीचा करार झालेला आहे. ह्या मळेवाल्यांना " **खासगी तुरुंग** " काढण्यास परवानगी देण्यांत आलेली आहे. १९५२ पासून असे तुरुंग ह्या मळेवाल्यांच्या खेड्यांतून काढण्यांत आले आहेत. सरकारनें हे तुरुंग भरगच्च भरलेले ठेवले पाहिजेत, ह्या अटीवर ५-६ मळेमालक एक तुरुंग काढतात. त्यांतलि प्रत्येक गुन्हेगारानें– म्हणजे शहरांतील " बेकायदेशीर " कामगारानें – मळ्यांत दररोज केलेल्या कामाबद्दल सरकारला दररोज १ शि. ९ पेन्स मळेवाले देतात. त्याबदली इतक्या कमी मजुरींत मळेवाल्यांना मजूर मिळतात. आणि ह्या मजुरांना अर्थात् कांहींच मिळत नाहीं.

## ४

आतां " सोन्याच्या द्वारके "ची कहाणी ऐकूं या. आपल्या राखीव

वस्तीमधून जवळच्या बाजारांत रोजच्या गरजेच्या वस्तु विकत घेण्यासाठीं जाणारा प्रत्येक स्थानिक रहिवाशी तेथें लावलेलीं मोठीं मोठीं चित्रें व पोस्टर्स पाहतो. त्यावर "सोन्याच्या नगरींत या आणि श्रीमंत व्हा." "लष्करांत सामील व्हा आणि जग पाहा" अशा आकर्षक जाहिराती असतात. नाहीं तरी प्रत्येक तरुणाला आपल्या वस्तींतील दरिद्री जीवनाचा कंटाळा आलेलाच असतो आणि तो काम मिळविण्यासाठीं जोहान्सबर्गचा मार्ग आक्रमण करण्याचा विचार रात्रंदिवस करीतच असतो. त्या टिकाणीं जाऊन "नशीब काढल्याखेरीज" कोणत्याहि निग्रोचें तारुण्य पूर्ण होत नाहीं.

सोन्याच्या व हिऱ्याच्या खाणींसाठीं असंख्य मजुरांची सतत आवश्यकता असते. दक्षिण आफ्रिकेंतील प्रत्येक भागांतील तरुण तर तेथें जातातच पण ऱ्होडेशिया व पोर्तुगीज वसाहतींतील मजूरहि सतत तेथें शिरकाव करून घेत असतात.

सोन्याच्या खाणींतील काम अत्यंत कष्टाचें असतें. बहुतेक खाणी खोल असतात आणि तेथील उष्णतेमुळें अंगाला सारखा घाम फुटतो आणि तहानेनें घशाला कोरड पडते. खाणींतील सोनें काढण्यासाठीं अवाढव्य यंत्रसामुग्री उपयोगांत आणली जाते. खाणींतील खडकांतून अति-सूक्ष्म सोन्याचे कण असतात. हे खडक सुरुंग लावून फोडतात, आणि त्यांचा चुरा करतात. निवडक चुरा यंत्रांच्या साहाय्यानें बारीक दळतात आणि त्यावर रासायनिक क्रिया करून त्यांतून सोनें काढतात. हीं सर्व कामें काळे मजूर करतात; त्यांनीं कितीहि कसबी काम केलें तरी त्यांना मजुरी मात्र बिगारी कामाचीच मिळते. देखरेख करण्याचें काम करणाऱ्या युरोपियन नोकरांना त्यांच्या ५० ते १०० पट पगार मिळतो !

राखीव वस्त्यांतील तरुण सोन्याच्या खाणींत काम करण्यासाठीं जोहान्स-बर्गला येतात तेव्हां त्यांच्याबरोबर एक वर्षाचा करार करण्यांत येतो. त्यांना राहण्यासाठीं खाणीभोंवतीं टाकण्यांत आलेल्या कांटेरी कुंपणांत जागा दिली जाते. या ठिकाणीं कॉंक्रीटचे लांबच लांब धक्के बांधलेले असतात. हेच त्यांचे बिछाने, आणि हेंच त्यांचें घर ! त्यांचीं बायकामुलें दूर राखीव वस्तींत काबाडकष्ट उपशीत असतात. आणि ते सोन्याच्या

खाणींत. ह्या मजुरांना खाण-मालक कमींत कमी पगारावर राबवूं शकतात. वर्षाचा करार संपल्यानंतर परत फिरणाऱ्या मजुराजवळ फाटक्यातुटक्या कपड्यांखेरीज कांहींच शिल्लक नसतें !

पण ह्या कुंपणाच्या नरकपुरींतून सुटका करून घेऊन कांहीं कामगार बायकामुलांसह बाहेरच्या वस्तींत राहतात. जोहान्सबर्गमध्यें अमेरिकन पद्धतीच्या उंचच उंच गगनचुंबी इमारती आहेत, गोल्फ खेळण्याचीं मोठमोठीं मैदानें आहेत, अलिशान क्लब्स आहेत, भव्य हॉटेलें व विश्रामगृहें आहेत. तेथें राहण्याचा अर्थातच काळ्या लोकांना हक्क नाहीं. ते शहरापासून दूर **सोफिया टाऊन** ह्या नांवानें ओळखल्या जाणाऱ्या झोंपडपट्टींत राहतात. डबडीं, पत्रे, विटा, दगड यांचा उपयोग करून ह्या झोंपड्या बांधलेल्या असतात आणि तेथें दाटीवाटीनें सोनें निर्माण करणारे राजे जीवन जगतात. गोऱ्यांविरुद्ध व त्यांच्या राज्यकारभाराविरुद्ध त्यांचा त्वेष इतका तप्त असतो कीं पोलिसांना ह्या वस्तींत पाऊल टाकण्याचें धैर्य होत नाहीं. काळ्यांनीं वाहनांत बसायचें नसल्यामुळें ह्या लोकांना पायदळीं कामावर जाऊन पोहोंचावें लागतें. जाण्यायेण्यासाठीं त्यांना दररोज ५, ५॥ तास चालावें लागतें.

काळ्या लोकांची सावली अंगावर पडूं न देण्याची प्रतिज्ञा केलेले इथूनचे सत्ताधारी सर्वस्वीं त्यांच्याच कष्टावर जीवन जगत असतात. त्यामुळें खाणींभोंवतालच्या कुंपणांत आणि शहराबाहेरच्या झोंपड्यांत राहणाऱ्या कामगारांखेरीज आणखी एक तिसरी काळ्या लोकांची वस्ती ह्या १०० मैलांच्या परिसरांत अस्तित्वांत आली आहे आणि ती मात्र युरोपियन लोकांच्या भव्य व राजेशाही घरांच्या आसऱ्यानेंच.

युरोपियन लोक स्वतः कोणतींच कामें करीत नाहींत त्यामुळें त्यांचीं सर्व घरगुती कामें, त्यांचे खाने व पार्ट्या, घोडे, मोटारी व मुलेंबाळें यांची तैनात फक्त नोकरचाकरच करूं शकतात आणि त्यासाठीं लागणारीं गडीमाणसें अगदीं हांकेच्या अंतरावर असावीं लागतात. त्यामुळें हे घरकामाचे गडी नाहीं म्हटलें तरी वंश-भेदाच्या व दुराव्याच्या समाजांतहि जोहान्सबर्गमधील स्वर्गतुल्य वस्त्यांतून राहतांना दिसतातच.

असा हा " अपार्टेड "चा समाज आहे. त्यांत युरोपियन लोकांखेरीज

म्हणजे डच व इंग्रज भाषिकांखेरीज-निग्रो, आशियाई व संमिश्र वंशांची राज्यांत बहुसंख्य असलेली जनता मानहानि व दडपशाहीचें जीवन जगत आहे. आपली सत्ता आणि त्यांची गुलामगिरी कायम टिकविण्यासाठीं द. आफ्रिकेच्या सरकारनें केलेले कायदे लक्षांत घेतले पाहिजेत. कायद्याचा विचार करण्यापूर्वीं हिंदी लोकांच्या परिस्थितीची थोडी जवळून पाहणी करूं या.

५

सुरुवातीला उल्लेख केल्याप्रमाणें, नाताळच्या सरकारनें त्या वेळच्या हिंदुस्थानच्या ब्रिटिश सरकारबरोबर करार करून १८६० च्या अखेरीस हिंदी मजुरांना नाताळांत बोलावून घेतलें. त्यांनीं तेथें ५ वर्षें मळ्यांत काम करावें आणि त्यांचा जाण्यायेण्याचा खर्च नाताळच्या सरकारनें करावा असें ठरलें होतें. ५ वर्षांनंतर ह्या कामगारांना स्वतंत्र व्यक्ति म्हणून तेथें राहण्याचा, जमीनजुमला घेण्याचा अगर व्यापार करण्याचा हक्क देण्यांत आला होता. कायद्याप्रमाणें ह्या मजुरांबरोबर त्यांच्या बायकाहि नाताळांत येऊन राहिल्या.

कामगारांच्या पाठोपाठ हिंदी व्यापारी व इतर व्यवसाय करणारे लोकहि आफ्रिकेच्या ह्या दक्षिणेकडील पूर्व किनाऱ्यावर येऊन उतरले. त्यांनीं नाताळांत व ट्रान्सवालमध्यें आपलें बस्तान बसविलें. अशा रीतीनें हिंदी वस्ती वाढत गेली. नाताळच्या किनाऱ्यावर १० हजार एकर जमीन उंसानें डोलूं लागली. हिंदी व्यापाऱ्यांचा व्यापारहि वाढूं लागला. युरोपियन वसाहतकारांना हें आवडेनासें झालें. १८८५ पासून हिंदी व इतर आशियाई लोकांना युरोपियन लोकांपेक्षां हीन दर्ज्याचे ठरविण्याच्या हेतूनें कायदे करण्यास प्रारंभ झाला.

ट्रान्सवालमध्यें १८८५ मध्यें हिंदी लोकांनीं विशिष्ट वस्तींत, विशिष्ट रस्त्यांवरच राहिलें पाहिजे असा निर्बंध घालण्यांत आला. ऑरेंज फ्री स्टेटमध्यें आशियांतील कोणालाहि व्यापार करतां येणार नाहीं, असा कायदा झाला आणि १८९१ मध्यें तेथील सर्व व्यापाऱ्यांना दुकानें बंद करून, काडीचीहि नुकसानभरपाई न घेतां तेथून बाहेर पडावें लागलें. १८९५ मध्यें

नाताळमध्यें राहण्यासाठीं वर्षाला ३ पौंड फी भरून परवाना काढला पाहिजे असा कायदा करण्यांत आला.

१८९६ मध्यें गांधीजींच्या नेतृत्वाखालीं ह्या परवाना-पद्धतीविरुद्ध हळू हळू असंतोष व्यक्त होऊं लागला. त्या वेळच्या परिस्थितीचें वर्णन हिंदी कॉंग्रेसचे अध्यक्ष श्री. पट्टाभि सीतारामय्या यांनीं पुढीलप्रमाणें केलें आहे :

"परवाना असल्याशिवाय आम्हांला तेथें हिंडतां येत नव्हतें, रात्रीं ९ वाजल्यानंतर रस्त्यावरून फिरतां येत नव्हतें, घाण टाकण्याच्या ठिकाणीं आम्हांला राहण्यासाठीं जागा देण्यांत आली होती, रेल्वेच्या दुसऱ्या व पहिल्या वर्गांतून प्रवास करतां येत नव्हता, ट्रॅम्समधून व फुटपाथवरून ढकलून बाहेर काढण्यांत येत होतें, हॉटेल्समध्यें जायला मिळत नव्हें आणि सार्वजनिक बागांतून हिंडायला मिळत नव्हतें, गोरे लोक आमच्या अंगावर थुंकत आणि रस्त्यांतून पाठलाग करीत; कोणताहि माणूस सहन करणार नाहीं असा आमचा अपमान केला जात होता."

यानंतर परिस्थिति अधिकच वाईट होत गेली. बोअर-युद्धानंतर अस्तित्वांत आलेल्या सरकारनें कायदे अधिक जुलमी केले. "**काळा कायदा**" म्हणजे प्रत्येकानें नांव नोंदविलेंच पाहिजे हा कायदा ट्रान्सवाल-मध्यें कडक रीतीनें लागू करण्याचे सरकारी प्रयत्न सुरू झाले. गांधीजींनीं त्याविरुद्ध सत्याग्रह सुरू केला. लोक कायदेभंग करून तुरुंगांत जाऊं लागले. इ. स. १९०० पासून सुरू झालेल्या ह्या चळवळींत दक्षिण आफ्रिकेच्या सरकारनें "हिंदी विवाह बेकायदेशीर" ठरविण्याच्या कायद्याची अंमलबजावणी सुरू केल्यामुळें, १९१० मध्यें स्त्रियाहि सामील झाल्या. माणशीं ३ पौंड कर भरण्याविरुद्धहि हिंदी लोकांचा लढा चालूच होता. या लढ्यांत न्यू कॅसलच्या कोळशाच्या खाणींतील चहाच्या व उंसाच्या मळ्यांतील २२ हजार हिंदी मजूर एकजुटीनें सामील झाले. सत्याग्रहींनीं विनापरवाना ट्रान्सवालमध्यें प्रवेश करण्यास प्रारंभ केला. सर्व तुरुंग सत्याग्रहींनीं भरून गेले तरी चळवळ चालूच राहिली. अखेर १९१४ मध्यें जनरल स्मटनें गांधीजींबरोबर तडजोड करून हिंदी लोकांच्या बऱ्याचशा मागण्या मान्य केल्या. हा करार अर्थातच नंतर मोडण्यांत आला. परंतु ह्या चळवळीनें दक्षिण आफ्रिकेच्या इतिहासांत मानाचें स्थान

मिळविलें आणि हिंदी व आफ्रिकन लोकांना धैर्य व स्फूर्ति दिली.

१९२४ मध्यें नॅशनॅलिस्ट पार्टीच्या व मजूर पक्षाच्या संयुक्त सरकारनें " **संरक्षित विभाग कायदा** " तयार केला. ह्या कायद्याप्रमाणें ठराविक विभागांतच हिंदी लोकांना व्यापार वगैरे करतां येईल असें बंधन घालण्यांत आलें आहे. १९२५ मध्यें त्या सरकारनें " **वर्ण-निर्बंध कायदा** " केला. ह्या कायद्याप्रमाणें युरोपियन लोकांखेरीज इतरांना वाफेवर व विजेवर चालणाऱ्या यंत्रांवर काम करण्यास बंदी घालण्यांत आली. ह्या कायद्याच्या विरुद्ध हिंदी राष्ट्रीय कॉंग्रेसनें आवाज उठविल्यामुळें दक्षिण आफ्रिका सरकार आणि हिंदुस्थान सरकार यांच्या प्रतिनिधींच्या साहाय्यानें हिंदी लोकांच्या हिताचें संरक्षण करण्यांत यावें असा " केपटाऊन करार " १९२७ मध्यें करण्यांत आला. पण हाहि करार पुढें द. आफ्रिकेच्या सरकारनें पाळला नाहीं. हिंदी-विरोधी अशाच प्रकारचे कायदे होतच राहिले आणि त्यांचा प्रकर्ष १९४६ च्या " घेटो कायद्यां "त झाला. ह्या कायद्यानें नाताळचे दोन भाग करण्यांत आले आणि हिंदी व इतर युरोपियनेतर लोकांसाठीं दर्बानमध्यें फक्त ३५० एकर जमीन राखून ठेवण्यांत आली. दर्बानमध्यें हिंदी लोकांची संख्या २५,००० होती आणि तितकीच इतर " काळ्या " लोकांची होती. हाच कायदा ट्रान्सवाललाहि लागू करण्यांत आला आणि ऑरेंज फ्री स्टेटमधून हिंदी लोकांना आधींच हांकलून काढण्यांत आलें होतें. ह्या कायद्यानें मूठभर हिंदी लोकांना मतदानाचा हक्क दिला पण त्यांनीं आपले प्रतिनिधि म्हणून युरोपियन लोकांनाच निवडून द्यायचें, ह्या स्वरूपांत तो दिला.

ह्या कायद्याविरुद्ध हिंदी लोकांनीं आपला असंतोष पुन्हा एकदां सत्याग्रहाचें हत्यार उचलून व्यक्त केला. बंदी असलेल्या विभागांत प्रवेश करून कायदेभंग करण्यांत आला. १९४६ पासून सुरू झालेल्या ह्या कायदेभंगाच्या चळवळींत २३०० हिंदी स्त्रीपुरुष, युरोपियन, व आफ्रिकी सत्याग्रह्यांना अटक झाली. त्यांत ट्रान्सवाल इंडियन कॉंग्रेसचे अध्यक्ष **डॉ. युसूफ महंमद दादू**, साउथ आफ्रिका इंडियन कॉंग्रेसचे अध्यक्ष **डॉ. जी. एम्. नायकर**, इंडियन वुइमेन्स ॲसोसिएशनच्या **डॉ. कैरुबाल गूनाम** इत्यादि नेत्यांना सश्रम कारावासाच्या शिक्षा झाल्या. ह्या प्रतिकारामुळें पीडलेल्या युरोपियन

लोकांनीं गुंडगिरी व दंगेधोपे सुरू केले.

अशा वातावरणांतच १९४८ सालीं नॅशनॅलिस्ट पार्टीचें सरकार डॉ. मालनच्या पुढाकाराखालीं निवडून आलें. त्याचें धोरण व कायदे यांची माहिती पुढें करून घेऊं या.

## ६

आफ्रिकेच्या राष्ट्रवादी सरकारनें केलेल्या प्रत्येक कायद्याचा हेतु आफ्रिकेच्या "काळ्या लोकां"वर दडपशाही करण्याचा होता; १९४८ सालीं हें सरकार सत्तेवर आल्यापासून परवाना कायदे अधिक कडक करण्यांत आले; ते स्त्रियांनाहि लागू करण्यांत आले. १९५० मध्यें **गट विभाग कायदा** ( ग्रूप एरिआज ॲक्ट ) करून शहरांची गोऱ्यांचा विभाग व काळ्यांचा विभाग अशी कायद्यानुसार फाळणी करण्यांत आली. १९५१ मध्यें **बांटू अधिकार कायदा** ( बांटू ॲथॉरिटीज ॲक्ट ) करून बांटू " बायकांना " हाताशीं धरून सर्वसाधारण लोकांना काबूत राखण्याची तरतूद करण्यांत आली; ( ह्यासंबंधींची अधिक माहिती पुढें दिली आहे. ) १९५४ मध्यें **देशी लोकांच्या पुनर्वसनाचा कायदा** ( नेटिव्ह्ज रिसेटलमेंट ॲक्ट ) करून जोहान्सबर्गमधील **७० हजार** आफ्रिकन लोकांना तेथून हांकलून काढण्यांत आलें. १९५७ मध्यें **देशी कायदे दुरुस्ती कायदा** ( नेटिव्ह्ज लॉ अमेंडमेंट ॲक्ट ) करून काळ्या व गोऱ्या लोकांनीं सामाजिक समारंभ-प्रसंगीं एकत्र येणें हा शिक्षापात्र गुन्हा ठरविण्यांत आला; **चर्चमध्यें एकत्र प्रार्थना करण्यावरहि ह्या कायद्यानें बंदी घातली.** १९५५ मध्यें बांटू शिक्षण कायदा ( बांटू एज्युकेशन ॲक्ट ) करून आफ्रिकन लोकांना पाश्चिमात्य शिक्षणापासून, म्हणजे शास्त्रीय ज्ञानापासून, वंचित करण्यांत आलें आणि त्यांच्यासाठीं खास अभ्यासक्रम तयार करून त्यांना "जमातीं"-च्या पद्धतीनुसार शिक्षण देण्याचें ठरविण्यांत आलें. संघराज्याचे पंतप्रधान डॉ. व्हरओर्ड यांनीं या कायद्याचें स्पष्टीकरण करतांना म्हटलें आहे, " **युरोपियन समाजांत हलक्या दर्जाचीं हमाली कामें करण्याशिवाय दुसरें कोणतेंहि स्थान देशी माणसाला देतां येणार** नाहीं. " ह्याच कायद्याची मर्यादा वाढवून १९५९ सालीं आफ्रिकन विद्यार्थ्यांना विश्व-

विद्यालयांत प्रवेश करण्यास बंदी करण्यांत आली आणि नवीं दुसरीं कालेजें त्यांच्यासाठीं उघडावींत असा सरकारला अधिकार देण्यांत आला. १९५० सालीं करण्यांत आलेल्या **कम्युनिझमवर बंदी घालण्याच्या कायद्या-**प्रमाणें ( सप्रेशन ऑफ कम्युनिझम ॲक्ट ) आणि १९५३ सालीं करण्यांत आलेल्या **सार्वजनिक सुरक्षा व गुन्हेगारी कायदा दुरुस्ती कायद्या-**प्रमाणें सर्व तऱ्हेच्या व्यक्तिस्वातंत्र्यावर व नागरिकस्वातंत्र्यावर बंदी घालण्यांत आली; संशयावरून, विनाचौकशी कोणालाहि तुरुंगांत टाकण्याचा अधिकार हे कायदे करून सरकारनें घेतला.

स्वातंत्र्याच्या, स्वराज्याच्या व साम्राज्यशाही विनाशाच्या आजच्या कालखंडांत दक्षिण आफ्रिकेंत ब्रिटिश व डच गोऱ्या वसाहतकारांनीं निर्माण केलेलें राज्य हें असें आहे.

## ७

दक्षिण आफ्रिकेंतील जनतेंतील जाणीव, जागृति व ऐक्य वरील कायद्यां-विरुद्ध त्यांनीं उभारलेल्या चळवळींतून निर्माण झालीं व वाढीस लागलीं. १९१२ सालीं स्थापन झालेल्या **आफ्रिकन नॅशनल कॉंग्रेसनें** परवाने जाळणें, संप व निर्बंधित प्रदेशांत प्रवेश करणें ह्या मार्गांनीं प्रारंभींच जनतेच्या लढ्यांना सुरुवात केली पण सरकारी दडपशाहीपुढें त्यांना माघार घ्यावी लागली. पुढें १९३६ मध्यें केप प्रांतांतील ११००० आफ्रिकन लोकांचा मतदानाचा हक्क हिरावून घेण्यांत आला त्यामुळें सुशिक्षित व तरुण आफ्रिकन लोकांचा भ्रमनिरास झाला. दुसऱ्या महायुद्धानें आफ्रिकें-तील लोकांत स्वातंत्र्य व लोकशाहीच्या कल्पना फार मोठ्या प्रमाणांत पसरविल्या आणि १९४८ मध्यें सत्तेवर आल्यापासून डॉ. मालनच्या सर-कारनें वंशभिन्नतेच्या धोरणाचा ज्या हिरीरीनें पाठपुरावा केला त्यामुळें जनतेच्या सर्व थरांत व वर्गांत जागृति व ऐक्यभावना दृढमूल झाली.

१९४८ पर्यंत द. आफ्रिकेंत चाललेल्या आंदोलनाची माहिती मागें दिली आहे. १९४८ नंतर आफ्रिकन नॅशनल कॉंग्रेसमध्यें अधिक लढाऊ प्रवृत्ति निर्माण झाल्या आणि त्यांनीं " **यूथ लीग** " संघटित करून १९५२ मध्यें " **सहा अन्यायी कायद्यांविरुद्ध** " अहिंसक प्रतिकाराची चळवळ

सुरू केली. सहा महिन्यांत ८००० आफ्रिकन, हिंदी व कांहीं युरोपियन लोक कायदेभंग करून तुरुंगांत गेले. १९५४ मध्यें सरकारनें खास कायदा करून अशा गुन्ह्याबद्दल ५ वर्षें कैदेची शिक्षा मुक्रर केली.

सरकारच्या दडपशाहीला द. आफ्रिकेच्या संघटनांनीं एकजूट करून तोंड दिलें. आफ्रिकन नॅशनल कॉंग्रेस, आफ्रिकन इंडियन कॉंग्रेस व कलर्ड पीपल्स ( कृष्णवर्णी लोकांची ) कॉंग्रेस ह्या तीन प्रमुख संघटनांनीं १९५५ मध्यें **संयुक्त मोर्चा** उभारून " जनता परिषद " भरविली. ह्या परिषदेला ५००० प्रतिनिधि उपस्थित होते आणि त्यांनीं " **स्वातंत्र्याची सनद** " तयार केली. दक्षिण आफ्रिकेंत वर्णभेद-रहित लोकशाहीची स्थापना करावी आणि मतदानासहित सर्व हक्क सर्वांना समान असावेत; कसेल त्याची मालकी जमिनीवर असावी आणि सर्वांना सर्वत्र हिंडण्याचें व राहण्याचें स्वातंत्र्य असावें ह्या प्रमुख घोषणा ह्या सनदेंत मांडण्यांत आल्या.

## ८

राष्ट्रीय स्वातंत्र्याच्या ह्या वाढत्या शक्तीला मारून काढण्यासाठीं म्हणून गोऱ्या वसाहतवादी हुकूमशाहीनें १९५९ मध्यें " **बांटुस्तान** " चें पिल्लू पोतडींतून बाहेर काढलें. **सात** " राखीव " विभागांना स्वायत्त सत्ता देण्यांत येणार असून तो विभाग जमातीच्या नायकाच्या अधिपत्याखालीं राहणार आहे. पण हीं " स्वतंत्र " बांटू राज्यें आफ्रिकन जनतेला संपूर्णपणें नामंजूर आहेत. जोंपर्यंत ९७ टक्के लोकांना १३ टक्के जमिनींत जखडून टाकण्याखेरीज दुसरी कोणतीहि योजना ह्या आमिषाच्या मागें नाहीं तोंपर्यंत वर्णभेदाच्या धोरणाचीच ती वाढविलेली आवृत्ति आहे हें आफ्रिकन लोकांना पुरेंपुरें समजून चुकलें आणि त्यांनीं द. आफ्रिकेंतील सर्व जमीन आमची आहे, सर्व प्रदेशावर लोकशाही हक्कानें आम्ही राज्य करणार, असें जाहीर करून बांटू-स्वायत्त-सत्ता कायद्याविरुद्ध आवाज उठवला. व्हरओर्ड सरकारनें ताबडतोब दडपशाहीचें शस्त्र उपसलें.

१९५२ पासूनच खेडे-विभागांत १० पेक्षां अधिक लोकांना एकत्र येण्यावर बंदी घालण्यांत आली होती. १९६० सालीं आफ्रिकन नॅशनल कॉंग्रेस बेकायदा करण्यांत आली, त्यामुळें तिला आपलें काम गुप्तपणें करावें लागू

लागलें. १९६० मध्यें, **ट्रान्स्केई** ह्या एका तथाकथित "बांटू राज्यांत" टेकडीवरच्या जंगलांत एक सभा भरलेली पोलिसांना आढळली; त्यांनीं ताबडतोब गोळीबार केला आणि यांत ११ लोक तेथल्या तेथें ठार झाले व अनेक जखमी झाले. तेव्हांपासून ह्या विभागांत आणीबाणीची परिस्थिति आहे. पाहिजे तेव्हां कोणालाहि विनाचौकशी तुरुंगांत टाकण्यांत येते आणि वाढलेले कर व दंड यांच्या ओझ्याखालीं जनतेला हैराण करण्यांत आलेलें आहे.

पण प्रतिकाराची भावना वाढतच आहे आणि अनेक शूर देशभक्त डोंगरांच्या व जंगलांच्या आश्रयास राहून स्वातंत्र्य-संग्राम लढवीत आहेत. १९६२ मध्यें ट्रान्स्केई भागांतील अशा ३० देशभक्तांना पकडून फांशीं देण्यांत आलें.

सेखुकुकुज-लँड ह्या अशाच दुसऱ्या विभागांतील १६ प्रतिकार-योद्ध्यांना १९६२ मध्यें देण्यांत आलेल्या फांशीच्या शिक्षा रद्द करून त्यांना जन्मठेपेची शिक्षा देण्यांत आली आहे. आणखीहि अनेक शेतकरी-तरुणांना हद्दपार करण्यांत आलें आहे.

नाताळ व ट्रान्सवाल प्रांतांतहि सरकारी धोरणांना जोराचा प्रतिकार होत असून पूर्व व उत्तर ट्रान्सवालच्या ग्रामीण भागांत आणीबाणीची परिस्थिति जाहीर करण्यांत आली आहे. ह्या भागांत व ऑरेंज फ्री स्टेटमध्यें लढण्याचा व्याप विद्यार्थी समुदायांतहि मोठ्या प्रमाणावर पसरला आहे. १९६३ मध्यें सरकारतर्फें प्रजासत्ताक दिनाचा महोत्सव साजरा करण्याची घोषणा होतांच सर्वत्र कामगारांनीं संप पुकारून निषेध व्यक्त केला आणि सरकारी महोत्सव बारगळला.

वर्णद्वेषी गोऱ्या मक्तेदाराच्या सत्तेला असा सुरुंग लागला असून जगांतहि त्यांची छिःथू झाली आहे. संयुक्त राष्ट्रसंघांत बड्या साम्राज्यवाद्यांचे प्रतिनिधि सोडून इतर सर्व देशांनीं त्यांचा धिक्कार केला आहे.

पण गोऱ्या वसाहतकारांना सत्ता व तिच्या आधारावर करतां येणारें अनिर्बंध शोषण सोडण्याची इच्छा नसल्यामुळें त्यांनीं लष्करी सत्तेच्या व हिंसेच्या जोरावर राज्य टिकविण्याचा अघोरी उपाय हातांत घेतला आहे. व्यक्तिशः व्हरओर्ड फॅसिझमचे पुरस्कर्ते आहेत. त्याच्या आदेशानुसार सर्व गोऱ्या स्त्री-पुरुषांना शस्त्रसज्ज करण्यांत येत आहे, खासगी सैन्य उभारण्याची

त्यांना परवानगी देण्यांत आली आहे आणि शिवाय सरकारनें आपलें २० हजारांचें लष्कर वाढवून तें १९६२ सालीं ६० हजारांवर नेलें आहे; पश्चिमात्य राष्ट्रांकडून युद्ध-विमानें व रॉकेट्स आणि इतर युद्धसामुग्री जोरानें खरीदली जात आहे.

द. आफ्रिका सरकारच्या ह्या लष्कराच्या बळावर चालणाऱ्या आणि संपूर्णपणें हिंसेवर व दडपशाहीवर चालणाऱ्या राज्यांत **सशस्त्र प्रतिकाराच्या लढ्याची** लाट आतां डोकें वर काढूं लागली आहे. **उमकान्सो विसिझवे** ( राष्ट्राची तलवार ) नांवाची संघटना १९६१ पासून सरकारी केंद्रावर हल्ले करण्याचें धोरण अमलांत आणीत आहे; आणि सरकार तिच्यामागें हात धुऊन लागलें असलें तरी तिचीं पाळेंमुळें फार खोल रुजलेलीं आहेत.

राष्ट्रीय विमोचन आघाडीचे एक नेते **युसूफ दादू** यांनींहि अलीकडे ( १९६४ मध्यें ) दिलेल्या मुलाखतींत जाहीर केलें आहे : " हिंसेच्या जोरावर लोकशाही चळवळ दडपणाऱ्या सरकारचा प्रतिकार हिंसेनें होणें स्वाभाविकच आहे; त्याची सर्व जबाबदारी व्हरओर्ड सरकारवर आहे. "

१९६४ मध्यें द. आफ्रिकेंत आणखी दोन कायद्यांची जोरानें अंमलबजावणी चालू आहे – कम्युनिझमविरोधी कायदा आणि खटला नाहीं ( नो ट्रायल ) कायदा. आधींच्या कायद्यांच्या भरीला हे कायदे झाल्यामुळें दडपशाहींत अनन्यसाधारण भर पडली आहे. जन्मठेप, १०–१० वर्षांच्या दीर्घ मुदतीच्या शिक्षा व गृह-कारावास ह्या सजांचें राज्य चालू आहे. द. आफ्रिकेच्या तुरुंगांत ६७,६०० पेक्षां अधिक राजकीय कैदी आहेत. प्रोफेसर्स, वकील, डॉक्टर्स, शास्त्रज्ञ, केमिस्ट, इंजिनिअर्स, इ. लोक वंशभेदाच्या राजकारणानें निर्माण केलेल्या समाजाला कंटाळून द. आफ्रिका सोडून जात आहेत आणि लढवय्ये लढत आहेत.

यूनोनें सर्व सभासद राष्ट्रांना द. आफ्रिकेवर आर्थिक व राजकीय बहिष्कार घालण्याचा आदेश दिला आहे. बहुसंख्य राष्ट्रांनीं हा आदेश मानला आहे, पण अमेरिका व ब्रिटनचीं सरकारें द. आफ्रिकेबरोबर शस्त्रास्त्रांचा व्यापार अद्याप बंद करण्यास तयार नाहींत. ह्या पण त्यांच्या कृतीचा निषेध आतां खुद्द त्यांच्या जनतेकडूनहि वाढत्या प्रमाणावर होत आहे.

• • •

७५३८२ : ज्ञ. ५१२.८
९८।३।७७
४८९

# २. नैर्ऋत्य आफ्रिका

**लोकसंख्या** – ५ लक्ष ७२ हजार, ७२,००० युरोपियन.

**राजधानी** – विंडहोक.

**राज्य** – साऊथ आफ्रिकेनें बेकायदेशीरपणें संघराज्यांत समाविष्ट करून घेतलेलें राज्य.

**मुख्य धंदा** – हिऱ्यांच्या खाणी.

१

दक्षिण आफ्रिकेला लागून असलेल्या नैर्ऋत्य आफ्रिका ह्या राष्ट्राची परिस्थिति अधिकच शोचनीय आहे.

आफ्रिकेवर साम्राज्यशाही सत्ता तुटून पडल्या त्या काळांत जर्मन साम्राज्यवाद्यांनीं हा प्रदेश स्वतःच्या ताब्यांत घेतला. त्यांनीं सर्व चांगली जमीन आपल्या ताब्यांत घेतली आणि आफ्रिकन लोकांना वाळवंटमय प्रदेशांत हांकलून दिलें. जर्मन राजवट इतकी निर्घृण होती आणि **हिरेरो** जमातींचा प्रतिकार इतका कडवा होता कीं जर्मन लष्करशहांनीं सूडबुद्धीनें त्यांची कत्तल केली; त्यावरून हिरेरो लोकांची संख्या ८० हजारांवरून १५ हजारांवर आली; **म्हणजे वसाहतविरोधी ह्या पहिल्या प्रतिकार-लढ्यांत ६५ हजार लोकांनीं बलिदान केलें.**

ही प्रतिकाराची भावना उत्तरोत्तर वाढत गेली आणि पहिल्या महायुद्धाच्या काळांत (१९१४–१९१८) येथील जनतेनें जर्मन साम्राज्यवाद्यांच्या बाजूनें युद्धांत भाग घेण्यास स्पष्ट नकार दिला. युद्धाच्या अखेरीस जर्मनीच्या पराभवानंतर हा प्रदेश दक्षिण आफ्रिकेकडे लीग ऑफ नेशन्सचा **विश्वस्त प्रदेश** म्हणून सोपविण्यांत आला. दुसऱ्या महायुद्धानंतर हा प्रदेश संयुक्त राष्ट्रसंघाचा विश्वस्त प्रदेश झाला. पण १९४६ मध्यें

दक्षिण आफ्रिकेचे मुख्यमंत्री जनरल स्मट्स यांनीं नैर्ऋत्य आफ्रिकेवर दक्षिण आफ्रिकेखेरीज कोणाचाहि हक्क नाहीं, असें जाहीर करून नव्या विश्वस्त मंडळाला धुडकावून लावलें. १९४९ नंतर दक्षिण आफ्रिकेच्या सरकारनें संयुक्त राष्ट्रसंघाकडे ह्या प्रदेशाचे अहवाल पाठविणेंहि बंद केलें. आफ्रिकन लोकांनीं आंतरराष्ट्रीय न्यायालयाकडे आपली कैफियत दाखल केली. ह्या कोर्टानें निर्णय दिला कीं संयुक्त राष्ट्रसंघाच्या अनुमतिशिवाय नैर्ऋत्य आफ्रिकेच्या राजकीय दर्ज्यांत बदल करण्याचा दक्षिण आफ्रिकेला कोणताच अधिकार नाहीं. ह्या निर्णयानंतर संयुक्त राष्ट्रांनीं नैर्ऋत्य आफ्रिकेच्या प्रश्नाची उकल करण्यासाठीं एक खास चौकशी-मंडळ नेमलें; परंतु **व्हरओर्ड-सरकारनें मंडळाच्या सदस्यांवर प्रवेश-बंदी लादल्यामुळे त्यांना आपली "चौकशी" बाहेरूनच करावी लागली.**

नैर्ऋत्य आफ्रिकेंत वास्तविक काय परिस्थिति आहे?—ती जरा पाहूं या.

## २

नैर्ऋत्य आफ्रिकेचे दोन विभाग पाडण्यांत आलेले आहेत, उत्तर व दक्षिण. दक्षिण विभागांत गोऱ्या वसाहतकारांची वस्ती आहे; स्वाभाविकपणेंच तेथें मोठीं मोठीं शहरें आहेत, सुंदर बागा व भव्य विश्रांति-गृहें आहेत. ऑरेंज नदीच्या मुखाजवळचा हिऱ्यांनीं समृद्ध असलेला विभागहि दक्षिणेंतच आहे. उत्तर विभाग मात्र निर्जन आहे, वाळवंटाचा आहे आणि आफ्रिकन लोकांची बहुतेक सर्व वस्ती ह्याच भागांत कोंबण्यांत आली आहे. **७२ हजार** युरोपियन लोकांच्या ताब्यांत सुपीक व समृद्ध असा **८७ टक्के भूभाग** आहे आणि **५ लक्ष ७२ हजार** आफ्रिकी लोकांना १३ टक्के रेताड निर्धन भाग देण्यांत आला आहे. अर्थात् आफ्रिकन लोक 'मागासलेले' आहेत म्हणून अतीव दरिद्री आहेत आणि आम्ही 'पुढारलेले' आहोंत म्हणून श्रीमान आहोंत, अशी प्रौढी इथूनचे गोरे लोक मारतांना आढळतात.

डॉ. मालन व नंतर हिटलरधार्जिणे डॉ. व्हरओर्ड यांनीं हा प्रदेश बेकायदेशीरपणानें बळकावून त्याला द. आफ्रिकेचा प्रांत बनविल्यापासून वंशभेदाच्या

अमानुष समाजरचनेचीं सर्व कडू फळें येथील जनतेलाहि भोगावीं लागत आहेत; दक्षिण आफ्रिकेंतील जीवनाची अधिक काळीकुट्ट प्रतिकृति नैर्ऋत्य आफ्रिकेंतील जीवनांत आहे. जोहान्सबर्ग, प्रिटोरिया वगैरे खाण-शहरें व वंशद्वेषावर आधारलेली अल्पसंख्यांक गोऱ्यांची लष्करी हुकमत यांच्या वर्णनांची द्विरुक्ति करण्याचें कांहींच कारण नाहीं.

मात्र देशांतील परिस्थितीचीं ' अधिकृत ' माहिती कोणालाच सांगतां येणार नाहीं. बाहेर जाऊन माहिती सांगूं शकेल असा ज्यांच्याबद्दल संशय वाटतो त्याला पासपोर्ट देण्यांत येत नाहीं; आणि प्रामुख्यानें विद्यार्थ्यांना नेहमींच पासपोर्ट नाकारला जातो. संयुक्त राष्ट्रसंघांत वंशभिन्नतेविरुद्ध टीका होते पण परिणामकारक इलाज करण्याची ब्रिटन-अमेरिकन सरकारची वृत्ति नसल्यामुळें आफ्रिकन जनतेवरील अन्याय तसेच चालू राहिले आहेत.

संयुक्त राष्ट्रसंघानें नेमलेल्या समितीनें दक्षिण विभाग दक्षिण आफ्रिकेला देऊन टाकण्याची आणि उत्तर विभाग सं. राष्ट्राचा विश्वस्त प्रदेश म्हणून परत मागण्याचीं शिफारस केली पण आपल्या देशाची फाळणी करून समृद्ध प्रदेशावर पाणी सोडण्यास कोणती जागृत जनता तयार होईल? आणि म्हणूनच लष्करशाही हुकमतीला तोंड देत तेथील जनता मुक्ततेचा लढा यशस्वी करण्याची तयारी करीत आहे.

● ● ●

# ३. बेचुआना-लँड

**लोकसंख्या** – ३ लक्ष ३४ हजार.

**राजधानी** – माफेकिंग (दक्षिण आफ्रिकेंत).

**राज्य** – ब्रिटिश विश्वस्त प्रदेश.

**मुख्य धंदा** – दक्षिण आफ्रिकेंतील खाणींत मजुरी.

१

नैर्ऋत्य आफ्रिकेच्या पूर्वेस व दक्षिण आफ्रिका संघराज्याच्या उत्तरेस लागून **बेचुआना लँडचें** राज्य आहे; ह्या प्रदेशाला ब्रिटिश हायकमिशनरचा प्रांत म्हणतात. तो ब्रिटनचा 'विश्वस्त प्रदेश' किंवा वसाहत आहे. ब्रिटनच्या ताब्यांतील ह्या देशांतील लोक अत्यंत गरीब आहेत; आणि त्यांच्यांतील बहुसंख्य लोकांना मजुरीसाठीं दक्षिण आफ्रिकेंत जावें लागतें.

या प्रदेशाचा बराच मोठा भाग **कलहारी वाळवंटाचा** आहे. कांहीं लोक गुरें पाळण्याचा धंदा करतात पण जमिनींची, कुरणांची, पाण्याची, व औषधोपचारांची कमतरता, यामुळें हें स्वतंत्र जीवन जवळ जवळ नष्टच झालें आहे.

वसाहत राज्यकारभाराचें खातें, गोरे वसाहतकार आणि ब्रिटिश साऊथ आफ्रिका, ह्या खाण कंपन्यांच्या ताब्यांत $\frac{1}{3}$ **जमीन** आहे; राहिलेल्या प्रदेशाचे १० भाग करून तेथें आफ्रिकन लोकांना दाटीवाटीनें राहण्यास भाग पाडण्यांत आलें आहे. द. आफ्रिकेच्या वंशभेदाच्या समाजपद्धतीची छाप अशी ठिकठिकाणीं दिसते.

या प्रदेशाचें राज्यकारभाराचें मुख्य केंद्र दक्षिण आफ्रिकेच्या भूमीवरच आहे; कारण ब्रिटिश हायकमिशनरला तेथें राहणेंच आवडतें.

सिसिल ऱ्होड्स दक्षिणेकडून सर्व प्रदेश ' घेत ' चालला होता त्या वेळीं तेथील लोकांनीं राणी व्हिक्टोरियाकडे संरक्षण मागितलें आणि म्हणून हा प्रदेश दक्षिण आफ्रिकेच्या संघराज्यांत समाविष्ट झाला नाहीं. येथील लोकांच्या संमतीखेरीज तो द. आफ्रिका राज्यांत सामील केला जाणार नाहीं असें आश्वासन त्या वेळींच देण्यांत आलें आहे; आतां त्या प्रदेशांतील फॅसिस्ट गोऱ्या हुकूमशाहीमुळें तेथील लोक द. आफ्रिकेंत जाण्यास सर्वस्वी प्रतिकूल झाले आहेत.

१९४९ सालीं **सेरेत्से खामा** ह्या भावी राजानें ('पॅरामाऊंट चीफ'नें) एका इंग्रज मुलीबरोबर विवाह केला. द. आफ्रिकेच्या वंशद्वेषी राजवटीला हा ' अत्याचार ' सहन झाला नाहीं; त्यांनीं दडपण आणून सेरेत्से खामाला लंडनमध्यें हद्दपार करविला. पुढें येथील लोकांच्या सतत मागणीमुळें १९५६ मध्यें त्याला परत स्वदेशीं पाठविणें ब्रिटिश सत्ताधिकाऱ्यांना भाग पडलें. ' राजा ' म्हणून असलेले सर्व हक्क त्याला सोडायला लावण्यांत आले आणि प्रदेशांत कायदेमंडळाची स्थापना करण्यांत आली.

ह्या विधिमंडळांत ब्रिटिश वसाहतकार व साम्राज्य सरकार यांचे $\frac{2}{3}$ प्रतिनिधि असतात आणि बाकीचे लोकांचे. संपूर्ण स्वातंत्र्य, संपूर्ण लोकशाही आणि वर्णविभिन्नतेच्या समाज-पद्धतींतून मुक्तता ह्या मागण्या घेऊन आतां येथील जनता आंदोलन उभारीत आहे. १९६० सालीं स्थापन झालेल्या **पीपल्स पार्टी** ह्या पक्षाकडे ह्या स्वतंत्र चळवळीचें पुढारीपण असून पूर्वीं शिक्षक असलेले **गालेमन टी. मोत्सेते** हे त्याचे मुख्य नेते आहेत. निरक्षरता, दारिद्र्य आणि ब्रिटिशांची राजकीय व आर्थिक गुलामगिरी नष्ट करण्यासाठीं लढा उभारण्याच्या मार्गावर असलेल्या येथील जनतेला दक्षिण आफ्रिका व दक्षिण ऱ्होडेशिया येथील वंशाभिन्नतेच्या राजकारणाशीं निकराचा लढा द्यावा लागत आहे; पण त्यांचें जीवन ह्या दोन प्रदेशांवर आर्थिकदृष्ट्या अवलंबून असल्यामुळें हा लढा अनेकपटीनें गुंतागुंतीचा व बिकट झाला आहे.

अखेर, १९६४ जूनमध्यें ब्रिटिश सरकारनें बेचुआना लँडला नवी घटना देऊं केली आहे. ह्या घटनेनुसार १९६५ च्या मार्चमध्यें येथें प्रौढ मतदानाच्या आधारावर पहिल्या निवडणुका होतील आणि आफ्रिकी लोकांची बहुसंख्या असलेलें विधिमंडळ स्थापन होईल. ह्या घटनेनें दिलेले हक्कहि मर्यादित आहेत, पण पुढचें पाऊल ह्या दृष्टीनें जनता निवडणुकीची तयारी करीत आहे.

• • •

# ४. बासुतो-लँड

**लोकसंख्या** – ८ लक्ष.

**राजधानी** – कालेडोन (द. आफ्रिका—बासुतोलँड).

**राज्य** – ब्रिटिश विश्वस्त प्रदेश.

**मुख्य धंदा** – द. आफ्रिकेंतील खाणींत मजुरी.

## १

दक्षिण आफ्रिका राज्याच्या पोटांत दोन छोटीं राज्यें आहेत; **बासुतो-लँड** व **स्वाझि-लँड**. बेचुआना-लँडप्रमाणेंच हीं दोन्ही राज्यें ब्रिटिशांचे विश्वस्त प्रदेश असून ब्रिटिश हायकमिशनरच्या ताब्यांत आहेत.

१९ व्या शतकाच्या प्रारंभीं **मोशेस** राजानें बासुतो लोकांना एकत्रित आणून बासुतो-लँडचें राज्य अस्तित्वांत आणलें पण ब्रिटिश व बोअर लोकांनीं बासुतो लोकांना द. आफ्रिका प्रदेशांतून हांकलून लावलें आणि सध्यां ते राहात असलेल्या पठारावर आश्रय घेण्यास भाग पाडलें. हा डोंगराळ प्रदेश सृष्टिसौंदर्यानें नटलेला असून लोक निकोप व उमदे आहेत. रंगीत कपडे घालून घोड्यावरून हिंडणारे हे लोक आफ्रिकन लोकांच्या स्वाभिमानी व स्वतंत्र वृत्तीचे द्योतक वाटतात. येथील **८ लक्ष** लोकांपैकीं जवळ जवळ **१ लक्ष ३० हजार** लोक किंवा धडधाकट व तरुण मंडळींपैकीं ४० टक्के लोक दक्षिण आफ्रिकेंतील खाणींतून काम करतात. राहिलेल्या लोकांचा मुख्य धंदा शेती; पण त्यांच्याजवळ शेती करायला जमीनच नाहीं; कारण त्यांच्या जमिनीवर त्यांचा ताबा नाहीं.

ब्रिटिश कमिशनरची संपूर्ण सत्ता राज्यावर चालते. बासुतो-लँड नॅशनल कौन्सिल (बासुतो-लँड राष्ट्रीय मंडळ) ह्या मंडळाला फक्त सल्ला देण्याचे

हक्क आहेत; आणि कमिशनर सर्व सल्ला धुडकावून लावूं शकतो. परंतु राज्यांत राजकीय जागृति झपाट्यानें वाढत असून, स्वातंत्र्य व लोकशाही हक्क यांसाठीं चाललेला लढा तीव्र होत आहे. ह्या माणसांना घेऊन **बासुतो-लँड कॉंग्रेस पक्षानें** १९६० सालीं विधिमंडळाच्या बहुसंख्य जागा जिंकल्या. यानें देशांत उत्साहाचें व आत्मविश्वासाचें वातावरण निर्माण झालें असून दक्षिण आफ्रिकेच्या वंशभेदाला आव्हान देऊन येथील जनतेचा निर्धारानें पुढें जाण्याचा क्रम चालू राहिला. त्यामुळें १९६४ मध्यें ब्रिटिश सरकारनें नवी घटना – स्वातंत्र्य-पूर्व घटना – दिली आहे. ही घटना एक वर्षभर राबविल्यानंतर स्वातंत्र्य देण्याचें मोघम आश्वासन त्यांना देण्यांत आलें आहे

• • •

## ५. स्वाझि-लँड

**लोकसंख्या** – २ लक्ष ७० हजार; ब्रिटिश वसाहतकार ९ हजार.

**राजधानी** – बाबाते.

**राज्य** – ब्रिटिश विश्वस्त प्रदेश.

**मुख्य धंदा** – खाणी व शेती.

१

बासुतो-लँडप्रमाणेंच **स्वाझि-लँड** हेंहि राज्य दक्षिण आफ्रिकेच्या पोटांत टिकून आहे. हा प्रदेशहि ब्रिटिशांचा विश्वस्त प्रदेश असून त्यावर ब्रिटिश हायकमिशनरची हुकमत चालते.

बेचुआना-लँड व बासुतो-लँडपेक्षां हा प्रदेश समृद्ध असल्यामुळें ब्रिटिश सत्ता व पिळवणूक अधिक कडवी आहे. वरील दोन प्रदेशांपेक्षां येथें ब्रिटिश वसाहतकारांची संख्याहि अधिक आहे; **२ लक्ष ७० हजार** लोकसंख्येपैकीं **९ हजार** ब्रिटिश वसाहतकार आहेत; पण देशांतील **निम्मी** जमीन ह्या गोऱ्या वसाहतकारांच्या मालकीची आहे, आणि आफ्रिकन लोकांना **३० संरक्षित** वस्त्यांमधून दाटीदाटीनें कोंबून राहण्याची सक्ति करण्यांत आली आहे.

ॲसबेस्टॉस व लोखंड यांच्या समृद्ध खाणी, गर्द रानें, सुंदर गवताळ प्रदेश आणि हालती डुलती उंसाचीं शेतें यांनीं हा प्रदेश नटलेला आहे. पण उंसाची व सायट्रस फळांचीं शेतें कलोनिअल डेव्हलपमेंट कॉर्पोरेशन (वसाहत विकास संस्थेच्या) मालकीचीं आहेत आणि ॲसबेस्टॉस, कोळसा व सोन्याच्या खाणी ब्रिटिश व दक्षिण आफ्रिकन कंपन्यांच्या मालकीच्या आहेत. स्वाभाविकपणेंच आफ्रिकन लोकांच्या 'नशिबीं' दारिद्र्य व अज्ञान आहे.

आफ्रिकन लोकांना अधिकार देण्याच्या बाबतींत ब्रिटिश सत्ताधारी फार कंजुषपणा दाखवीत आहेत. कमिशनरच्या हाताखालीं असलेल्या सल्लागार मंडळावर फक्त युरोपियन लोकच निवडले जातात. आफ्रिकन लोकांना राज्यकारभारांत प्रवेश करूं न देण्याचें सत्ताधाऱ्यांचें धोरण आहे.

याविरुद्धचा लढा **स्वाझि-लँड प्रोग्रेसिव्ह पार्टी**च्या नेतृत्वाखालीं चालू असून संपूर्ण राजकीय स्वातंत्र्य आणि वर्णभेदावर आधारलेल्या समाजधोरणाचा पाडाव ह्या त्यांच्या घोषणा आहेत. बासुतो-लँडमधील राजकीय प्रगतीमुळें येथील राजकीय वातावरणहि अधिक उत्तेजित झालें आहे. ह्या प्रदेशालाहि १९६४ मध्यें नवी घटना देण्यांत आली असून तो स्वातंत्र्याची मागणी करीत आहे.

• • •

# ६. दक्षिण ऱ्होडेशिया

**लोकसंख्या** – २७ लक्ष ५० हजार.
युरोपियन्स २ लक्ष ४० हजार.

**राजधानी** – सालिस्बरी.

**राज्य** – गोऱ्यांची हुकूमशाही.

**मुख्य धंदा** – शेती.

## १

दक्षिण आफ्रिकेच्या संघराज्याला लागून उत्तरेस ऱ्होडेशिया प्रांत आहे. सिसिल ऱ्होड्सनें ताब्यांत आणलेल्या ह्या अफाट प्रदेशाचे झांबिसी नदीमुळें दोन भाग झाले आहेत; ते दक्षिण ऱ्होडेशिया व उत्तर ऱ्होडेशिया या नांवानें ओळखले जातात.

ऱ्होडेशिया हें थंड हवेचें व गवताळ प्रदेशाचें विस्तीर्ण पठार आहे. झांबिसी नदीच्या खोऱ्यांत जंगलें आहेत. गवताळ प्रदेशांतील मैदानांवर गुरें पाळण्याचा व्यवसाय चालतो. गोरे वसाहतवाले मांसासाठीं व दूध-दुभत्यासाठीं जनावरांचें पोषण करतात. शेतीलाहि हा प्रदेश अनुकूल आहे. मका, तंबाखू व नारिंगें, लिंबें इत्यादि फळेंहि येथें मळ्यांतून विपुल प्रमाणावर होतात.

येथें लोखंड, सोनें व कोळशाच्या खाणी आहेत. वँकी येथील कोळशाच्या खाणी फार महत्त्वाच्या असून तेथील कोळसा मुख्यतः कटांगाच्या तांब्याच्या खाणींच्या प्रदेशाला पुरवला जातो.

**सालिस्बरी** हें शहर द. ऱ्होडेशियाची राजधानी आहे. ऱ्होडेशियाला समुद्रकिनारा नाहीं. त्याचा व्यापार पोर्तुगीजांच्या ताब्यांतलि पूर्व आफ्रिकेच्या प्रदेशांतील बैरा बंदरांतून चालतो.

सध्यां दक्षिण ऱ्होडेशियाची लोकसंख्या सुमारें ३७ लक्ष ५० हजार असून त्यांतील आफ्रिकन लोकांची, म्हणजे मुख्यतः बांटूंची लोकसंख्या ३५ लक्ष आहे. युरोपियन वसाहतकारांची संख्या २ लक्ष ४० हजार आहे.

दक्षिण आफ्रिकेच्या संघराज्याला लागून असलेल्या ह्या ब्रिटिश वसाहतीवर द. आफ्रिकेच्या राज्याच्या वंशभिन्नतेच्या विचारसरणीची दाट छाया आहे. पण द. आफ्रिकेपेक्षां येथील गोऱ्या लोकांची वस्ती संख्येनें कमी असल्यामुळें उघड वंशभिन्नतेच्या धोरणाचा पुरस्कार न करतां येथें "बहु-वांशिक समाज" (मल्टी रेशल सोसायटी Multi Racial Society) स्थापन करण्याची घोषणा केली जाते.

## २

मेटॅबल लोकांच्या लोबेंगुला राजाला महिन्याला १०० पौंड तनखा, कांहीं बंदुका व पाहिजे तितकी व्हिस्की देण्याचें वचन देऊन सिसिल ऱ्होड्सनें ह्या प्रांतांत सोनें खणण्याची परवानगी मिळविली. पुढें लौकरच सिसिल ऱ्होड्सच्या ब्रिटिश साऊथ आफ्रिका कंपनीच्या लोकांनीं मेटॅबेल लोकांबरोबर भांडण उकरून काढलें आणि त्यांच्याबरोबर युद्ध केलें. १८९० ते १८९७ ह्या ७ वर्षांत युद्धांत हजारों आफ्रिकन लोक मृत्युमुखीं पडले पण अखेरीस प्रदेशावर ब्रिटिश सत्ता स्थापन झाली. फौजांच्या पाठोपाठ वसाहतकार आले आणि त्यांनीं उत्तमोत्तम जमिनींवरून आफ्रिकी लोकांना हांकलून लावून तेथें आपल्या वसाहती केल्या. ह्या गोऱ्या वसाहतकारांनीं दक्षिण आफ्रिका संघराज्याच्या पावलावर पाऊल टाकून, १९२३ मध्यें ब्रिटिश साऊथ आफ्रिका कंपनीची सत्ता संपुष्टांत आणली आणि दक्षिण ऱ्होडेशिया हें ब्रिटिशांच्या देखरेखीखालील स्वतंत्र, स्वायत्त व सार्वभौम राज्य आहे असें जाहीर केलें.

गोऱ्या वसाहतकारांनीं २ कोटि ४० लक्ष हेक्टर जमीन स्वतःच्या ताब्यांत घेतली. ही जमीन उत्तम हवेची व मळ्यांना व गुराढोरांच्या पालनाला अनुकूल आहे. आफ्रिकी लोकांना १ कोटि ५० लक्ष हेक्टर जमिनीवर हांकलून देण्यांत आलें. ही जमीन नापीक व त्से त्से माश्यांचा उपद्रव असलेली आहे. त्यामुळें तेथें शेती करणें अगर गाई-मेंढरांचे कळप

पाळणें फार त्रासदायक आहे. ७ टक्के लोकसंख्या असलेल्या लोकांना निम्मी जमीन देऊन बाकीची स्वतःच्या ताब्यांत घेणाऱ्या वसाहतकारांनीं ह्या जमीन वांटपाला १९३० मध्यें कायद्याचें स्वरूप दिलें आणि मालमत्तेला व खासगी मालकीच्या संरक्षणासाठीं द. आफ्रिकेसारखी वंशभिन्नतेची व दहशतीची राजवट सुरू केली.

दक्षिण आफ्रिकेप्रमाणेंच येथेंहि " परवाना – पासा" चें बंड आहे. " जमीन मालकी कायद्या "नुसार आफ्रिकी लोकांना चांगल्या विभागांत जमिनी विकत घेतां येत नाहींत. शहरांतहि त्यांना जागा घेतां येत नाहीं; कारण शहरें सर्व युरोपियन विभागांत आहेत. मग त्यांना घरगडी म्हणून युरोपियन लोकांच्या घरांच्या पिछाडीला राहावें लागतें किंवा शहरापासून दूर असलेल्या वस्तींत जाऊन राहावें लागतें. तेथें राहण्याच्या सोयींच्या अभावीं बायका-मुलांसह राहतां येत नाहीं. म्हणून मग पोट भरण्याच्या आशेनें खाणींच्या शहरांत आणि जीवाभावाच्या मंडळींच्या ओढीनें खेड्यांतील खास " संरक्षित " वस्तीकडे अशी ये-जा चालू राहते. या सर्व अन्यायाविरुद्ध तरुण आफ्रिकी लोकांचें रक्त उसळून आलें नाहीं तरच नवल !

खेडे विभागांतील आफ्रिकी लोकांच्या वसाहती रोगराईनें, दारिद्र्यानें व दाटीवाटीच्या राहणीनें भरलेल्या आहेत. बाहेर जमीन विकत अगर भाड्यानेंसुद्धां घेण्याचा हक्क नसल्यामुळें त्यांचा चारी बाजूनें कोंडमारा होतो. जमिनीवर मोठ्या लोकसंख्येचा भार पडल्यामुळें तिचे अगदीं छोटे छोटे तुकडे झाले आहेत. बिनकसाच्या जमिनीचे हे छोटे तुकडे कोणत्याहि कुटुंबाचें पोषण करूं शकत नाहींत. युरोपियन लोकांच्या मालकीच्या फळा-फुलांनीं व धनधान्यांनीं फुललेल्या बागा व मळे आफ्रिकन शेतकऱ्यांचें दारिद्र्य अधिकच उघडें पाडतात. त्यामुळें गोऱ्या वसाहतकारांचे अर्थ-शास्त्रज्ञ हें सिद्ध करण्याचा प्रयत्न करतात कीं आफ्रिकी लोकांना शेती नीट करतां येत नाहीं; ते जमिनीची धूप थांबवीत नाहींत आणि त्याच त्याच जमिनीवर तेंच तेंच पीक काढून तिचा कस घालवितात !

राज्यांतील लोखंड, सोनें व कोळशाच्या खाणी वसाहतकारांच्या ताब्यांत आहेत. पोट भरण्यासाठीं व कर भरण्यासाठीं आफ्रिकन लोक युरो-पियन लोकांच्या मालकीच्या ह्या खाणींत अत्यंत कष्टाचें काम करतात आणि

जोहान्सबर्ग व प्रिटोरिया येथील खाणींप्रमाणेंच बँकींच्या व इतर खाणींत त्यांची पिळवणूक होते. त्यांना कसबी काम शिकण्याची परवानगी मिळत नाहीं, त्यांना सामाजिक विम्याच्या व इतर सवलतींचा लाभ मिळत नाहीं आणि आफ्रिकी मजुराच्या **२० पट पगार** गोऱ्या मजुराला मिळतो !

बागा, सिनेमागृहें, हॉटेलें या सर्वांवर " फक्त युरोपियन लोकांसाठींच " अशा पाट्या असतात. काळ्या लोकांना बसमध्यें बसतां येत नाहीं, सिनेमा अगर रेस्टॉरन्टमध्यें जातां येत नाहीं, शहर विभागांत पासाशिवाय प्रवेश करतां येत नाहीं, बँक अगर पोस्टांतहि निराळ्या खिडकींतून व्यवहार करावा लागतो आणि हे कायदे मोडणाऱ्यांना तुरुंगांत घालतात किंवा गोरे वसाहतकार हालहाल करून मारतात – त्याला ते ' लिंचिंग ' म्हणतात.

आर्थिक व राजकीय सत्ता संपूर्णपणें स्वतःच्या ताब्यांत घेऊन ऱ्होडेशिया-च्या सुंदर भूमीवर गोऱ्या वसाहतकारांनीं निर्माण केलेला समाज हा असा आहे ! " बहु-वांशिक समाजा "ची घोषणा असली तरी प्रत्यक्षांत वंश-भिन्नतेचेंच धोरण अमलांत आणलें जातें.

आतां तेथील राज्य ज्या पार्लमेंटरी पद्धतीनें चालतें तिची थोडक्यांत ओळख करून घेऊं या.

## ३

देशांत ब्रिटिश-धर्तीची लोकशाही आहे; म्हणजे कायद्यानें निवडलेलें पार्लमेंट व मंत्रिमंडळ आहे. दुसऱ्या महायुद्धानंतर आफ्रिकेंत राष्ट्रवादाचा जोर वाढला आणि त्याचे पडसाद द. ऱ्होडेशियांतहि उठूं लागले; पण सत्ताधाऱ्यांना सत्ता टिकविण्याची जबरदस्त इच्छा असल्यामुळें त्यांनीं ताठरपणाच्या धोरणाचा अंगीकार केला. प्रथम लोकशाहीचा देखावा करण्यासाठीं इंग्रजी जाणणाऱ्या व वार्षिक १०० पौंड उत्पन्न असलेल्या प्रौढ आफ्रिकन माणसाला मतदानाचा हक्क देण्यांत आला होता. अर्थात् ह्या अटीनुसार आफ्रिकी मतदार फक्त १००० होते आणि सगळ्या युरोपियन लोकांना मतदानाचा हक्क असल्यामुळें त्यांचीं माणसें निर्वेधपणानें निवडून येत होतीं. पण तरीहि त्यांना आफ्रिकी लोकांच्या मतदानावर नियंत्रण घालण्याचीच आवश्यकता वाटली आणि १९५१ मध्यें मतदानाचा

हक्क ५०० पौंड वार्षिक उत्पन्न असलेल्या इंग्रजी जाणणाऱ्यांपुरताच मर्यादित ठेवण्यांत आला.

पुढें युरोपियन वसाहतकारांची राजकीय व आर्थिक पकड अधिक भक्कम करण्यासाठीं व नफ्याचें क्षेत्र विस्तृत करण्यासाठीं **द. ऱ्होडेशिया, उत्तर ऱ्होडेशिया व न्यासालँड** या तीन राष्ट्रांचें **मध्य आफ्रिकी संघराज्य** १९५३ मध्यें अस्तित्वांत आणण्यांत आलें. आणि संघराज्याचे कट्टर पुरस्कर्ते सर रॉय वेलेन्स्की संघराज्याचे पंतप्रधान झाले. ह्या संघराज्याला न्यासालँडचा विरोध असल्यामुळें तेथील जनतेनें तें कसें उधळून लावलें त्याचा इतिहास उत्तर ऱ्होडेशिया व न्यासालँड यांच्या परिस्थितीचा परिचय करून घेतल्यानंतर पाहूं.

दरम्यान दक्षिण ऱ्होडेशियांतील गोऱ्या मक्तेदारांच्या राजवटीला आफ्रिकन जनतेंत जागृति निर्माण झाल्यामुळें विरोध होऊं लागला. द. ऱ्होडेशिया नॅशनल कॉंग्रेसची १९४० सालीं स्थापना झाली होती. १९५७ मध्यें नवे कायदे अस्तित्वांत आले; त्यांनीं एकीकडे एक हॉटेल व क्लब सर्व वंशांच्या लोकांसाठीं खुला ठेवण्याची सवलत दिली, कांहीं उद्यानांतील " फक्त युरोपियन लोकांसाठीं " ह्या पाट्या काढून टाकल्या पण त्याचबरोबर द. ऱ्होडेशियाच्या मुख्य प्रधानाच्या जागीं सर एडवर्ड व्हाईटहेड यांची स्थापना झाली आणि युरोपियन सत्ता टिकविण्याच्या धोरणाला अधिक बळकटी आली.

१९५९ मध्यें न्यासालँडच्या जनतेनें उघड बंडाला प्रारंभ केला. तेथें करण्यांत आलेल्या दडपशाहीचे प्रतिध्वनि द. ऱ्होडेशियांत उठले आणि कॉंग्रेसच्या ५०० सभासदांना अटक करण्यांत आली आणि कॉंग्रेस बेकायदेशीर ठरवून तिच्यावर बंदी घालण्यांत आली; अटक झालेल्या सभासदांना कोर्टांत खटला न भरतां ५ वर्षें तुरुंगांत डांबून ठेवण्याचा कायदा करण्यांत आला आणि राज्यांत आणीबाणीची परिस्थिति जाहीर करण्यांत आली. पण जनतेची प्रतिकारशक्ति अधिक उफाळून बाहेर आली. बेकायदेशीर ठरविण्यांत आलेल्या कॉंग्रेसचे अध्यक्ष **जोशुआ कोमो** ( Joshua Komo ) यांच्या नेतृत्वाखालीं **राष्ट्रीय लोकशाही पक्ष** ( नॅशनल डेमोक्रॅटिक पार्टी ) स्थापन झाली. राष्ट्रवादाचा वाढता जोर पाहून ब्रिटिश सरकारनें वाटाघाटींना प्रारंभ केला आणि नवी घटना देशाला देण्याचें आश्वासन दिलें.

ही नवी घटना लंडनमध्यें १९६१ मध्यें तयार करण्यांत आली. तिनें आफ्रिकी लोकांचा मतदानाचा हक्क वाढवून १ **टक्का** लोकांना मतदानाचा हक्क बहाल केला. यामुळें असेंब्लीमध्यें आफ्रिकी लोकांना १५ जागा मिळण्याची शक्यता निर्माण झाली. ७ टक्के युरोपियन लोकांना ७७ टक्के जागा अशी ही वांटणी जागृत आफ्रिकेच्या स्वाभिमानाला रुचली नाहीं. द. ऱ्होडेशियाची आफ्रिकी जनता संपूर्ण स्वातंत्र्याची, स्वराज्याची व न्यायाची मागणी करूं लागली.

नव्या घटनेबद्दल राष्ट्रीय लोकशाही पक्षाचे पुढारी जोशुआ कोमो यांनीं १९६१ च्या सप्टेंबरमध्यें जनतेचें मतदान घेतलें. त्यांत आफ्रिकन लोकांनीं घटना अमान्य केल्याचें स्पष्ट झालें. देशांतील स्वातंत्र्य चळवळीचें वातावरण युरोपियन वसाहतकारांना सहन होईना. सर एडगर व्हाईटहेड यानें डिसेंबरमध्यें राष्ट्रीय लोकशाही पक्ष बेकायदेशीर ठरविला.

ताबडतोब नवा पक्ष जन्माला आला, त्याचें नांव **झिंबाचे आफ्रिकन पीपल्स युनियन.** ह्या पक्षाचें पुढारीपणहि जोशुआ कोमो व त्यांचे सहकारी यांच्याकडेच आलें. त्यांनीं स्वातंत्र्यप्राप्तीसाठीं अहिंसात्मक प्रतिकाराची चळवळ करण्याची हांक पक्षातर्फे दिली. आफ्रिकाभर स्वातंत्र्यचळवळीचा जोर वाढता असल्यानें आणि नवीं नवीं राष्ट्रें उदयास येत असल्यानें ऱ्होडेशियाची जनताहि अधीर होऊन ठिकाठिकाणीं निदर्शनें करूं लागली. त्यामुळें १९६२ च्या ऑक्टोबरमध्यें गोऱ्या वसाहतकारांच्या सरकारनें "झापू" वरहि बंदी घातली. तिच्या व ट्रेड युनियनच्या २५० पुढाऱ्यांना तुरुंगांत घातलें. ह्या नव्या अन्यायामुळें जनता अधिकच चिडली. तेवढ्यांत सरकारनें स्वातंत्र्याचें ध्येय-धोरण बाळगणारा कोणताहि पक्ष स्थापन करण्यावर व तसा प्रचार करण्यावर बंदी घालणारा कायदा केला. अशा रीतीनें कायदेशीरपणें स्वातंत्र्यचळवळ करण्याचे ऱ्होडेशियन जनतेचे सर्व मार्ग रोखून ब्रिटिश वसाहतकारांनीं ऱ्होडेशियांत अल्पसंख्यांकांची फॅसिस्ट राजवट सुरू केली.

आज सर्व मोठ्या शहरांतून शिरस्त्राण घातलेल्या सशस्त्र लष्कराची गस्त रात्रंदिवस चालू असते. आणि रॉयल ऱ्होडेशियन एअर फोर्स (वैमानिक दलाची) जेट बॉंबर्स व अग्निबाण प्रक्षेपक विमानें आफ्रिकन

लोकांच्या वस्तीवर घिरट्या घालीत आहेत. युरोपियन लोक भयभीत जीवन जगत आहेत आणि सं. राष्ट्रसंघांत त्यांच्या प्रतिनिधीला आपल्या राजवटीचें समर्थन करणें अशक्य झालें आहे. ब्रिटिश राष्ट्रकुटुंबांत स्वतंत्र आफ्रिकन राष्ट्रांचे प्रतिनिधि वाढत्या संख्येनें आल्यामुळें ब्रिटिश साम्राज्यवाद्यांना अखेर दक्षिण ऱ्होडेशियांतील गोऱ्या वसाहतवाद्यांचा उघड पुरस्कार करणें सोडून द्यावें लागलें. १९६२ च्या निवडणुकांत फेडरेशनचा पुरस्कार करणाऱ्या सर एडगर व्हाईटहेड ह्या द. ऱ्होडेशियाच्या मुख्यमंत्र्यांचा आणि त्यांच्या नॅशनल पार्टीचा पराभव झाला आणि वर्णद्वेषाचा अधिक कडवटपणानें पुरस्कार करणाऱ्या ऱ्होडेशियन फ्रंटचें सरकार अस्तित्वांत आलें.

दरम्यान न्यासालँड व उ. ऱ्होडेशियाची स्वातंत्र्य-चळवळ अधिकच उग्र झाल्यामुळें १९६३ मध्यें फेडरेशन बरखास्त करणें ब्रिटिश सत्ताधाऱ्यांना भाग पडलें. त्यामुळें चिडलेल्या द. ऱ्होडेशियांतील गोऱ्या वसाहतवाद्यांनीं आफ्रिकन जनतेला राजकीय हक्कांपासून कायमचें वंचित करण्यासाठीं द. आफ्रिका सरकारच्या धोरणाची सही सही नक्कल करण्याचा चंग बांधला. त्यासाठीं त्यांनीं ब्रिटिश मुत्सद्द्यांकडे द. ऱ्होडेशियाला "संपूर्ण स्वातंत्र्य द्या," असा तगादा लावला आहे. गोऱ्यांच्या हुकूमशाहीच्या घटनेला उघड रीतीनें पाठिंबा देणें ब्रिटिशांना जड जात असून जगांतील सर्व स्वतंत्र व लोकशाही राष्ट्रांनींहि ब्रिटनवर दडपण आणलें आहे.

परंतु ऱ्होडेशियन फ्रंट पक्षाचे सध्यांचे मुख्यमंत्री मि. स्मिथ एकीकडे स्वतंत्र ऱ्होडेशियासाठीं लंडनमध्यें वाटाघाटी करीत असून दुसरीकडे स्वातंत्र्य-लढ्याच्या पुढाऱ्यांवर दडपशाही करीत आहेत. फेडरेशन बरखास्त करतांना ब्रिटिश सरकारनें शस्त्रसज्ज फेडरल आर्मी द. ऱ्होडेशियाच्या सरकारला देऊन त्यांचें बळ वाढविलें आहे. जोशुआ कोमो, त्यांच्या पत्नी व अनेक सहकारी तुरुंगांत असून त्यांच्या मुक्ततेसाठीं सालिस्बरी व इतर शहरांतून निदर्शनें होत आहेत. त्यांत स्त्रिया व विद्यार्थीहि मोठ्या प्रमाणावर भाग घेतात आणि पोलिसांच्या बायोनेटशीं झुंज देतात. असा हा संघर्ष मोठा तीव्र झाला आहे.

• • •

# ७. उत्तर ऱ्होडेशिया

**लोकसंख्या** – २५ लक्ष, युरोपियन्स ८० हजार.

**राजधानी** – ल्युसाका.

**राज्य** – ब्रिटिश विश्वस्त प्रदेश – स्वातंत्र्याच्या मार्गावर.

**मुख्य धंदा** – तांब्याच्या व झिंकच्या खाणी.

१

**झां**बिसी नदीच्या उत्तरेकडील ऱ्होडेशियाचा भाग म्हणजे उत्तर ऱ्होडेशियाचें राज्य. उत्तर ऱ्होडेशियाची भौगोलिक परिस्थिति जवळ जवळ दक्षिण ऱ्होडेशियासारखीच आहे. पठाराचा कोरडा व थंड हवेचा प्रदेश व गवताळ मैदानावर मांसोत्पादनासाठीं व दूधदुभत्यासाठीं गुरें चारण्याची सोय यामुळें ह्या प्रदेशांत युरोपियन लोकांनीं वस्ती केली. आपोआपच दक्षिण आफ्रिकेचें संघराज्य व द. ऱ्होडेशिया या राज्याप्रमाणें उत्तर ऱ्होडेशियांतहि ब्रिटिश वसाहतकार व आफ्रिकन लोक यांच्या परस्पर संबंधाच्या प्रश्नालाच प्राधान्य प्राप्त झालें आहे.

उ. ऱ्होडेशियांतील आफ्रिकी लोकांची संख्या **२४ लक्ष** असून, गोऱ्या वसाहतकारांची संख्या **८० हजार** आहे. द. ऱ्होडेशियापेक्षांहि गोऱ्या वसाहतकारांची संख्या येथें कमी असल्यामुळें ह्या ठिकाणीं हळूहळू "भागीदारीचें" ( पार्टनरशिप ) राज्य स्थापन करण्याची ते घोषणा करतात. प्रत्यक्षांत मात्र आपलें नियंत्रण कमी होऊं नये म्हणून बहुसंख्य आफ्रिकन लोकांवर हुकमत राहील अशी दक्षता घेतात.

**ल्युसाका** हें शहर उत्तर ऱ्होडेशियाची राजधानी आहे. रोन ॲंटिलोप ही तांब्याची खाण व **ब्रोकन हिल** येथील शिसें व जस्त यांच्या खाणी प्रसिद्ध आहेत. किंबहुना उ. ऱ्होडेशियांतील "तांब्याचा पट्टा" हेंच त्याचें वैभव आहे.

## २

उत्तर ऱ्होडेशियाचा हा प्रदेश सिसिल ऱ्होड्सच्या ब्रिटिश साऊथ आफ्रिका कंपनीनेंच ब्रिटिश साम्राज्यांत सामील करून घेतला. पण त्यासाठीं द. ऱ्होडेशियाप्रमाणें कंपनीला युद्धें करावीं लागलीं नाहींत. येथील जमातींच्या मुख्यांनीं इंग्लंडची राणी व्हिक्टोरिया हिच्याकडे "संरक्षणा"ची मागणी केली आणि राणीनें त्यांना आश्वासन देऊन तो " संरक्षित प्रदेश " असल्याचें जाहीर केलें. अशा रीतीनें ग्रेट ब्रिटनच्या ३ पट मोठा असलेला हा प्रदेश ब्रिटिश साम्राज्याचा भाग झाला. येथेंहि गोऱ्या वसाहतकारांनीं प्रवेश केला आणि उत्कृष्ट जमिनीवर ताबा मिळविला. १९६२ पर्यंत ह्या प्रदेशाचा कारभार लंडनमधील 'वसाहत ऑफिस'मधून चालत असे व मुख्य सत्ता ब्रिटिश वसाहतकारांचें आर्थिक व राजकीय वर्चस्व टिकविण्यासाठीं राबवली जात असे.

द. आफ्रिकेच्या संघराज्याप्रमाणें व द. ऱ्होडेशियाप्रमाणें उत्तर ऱ्होडेशियांत कायद्यानें वंशभिन्नतेचें अधिष्ठान नाहीं; परंतु प्रत्यक्षांत मात्र युरोपियन वसाहती व आफ्रिकन वसाहती निरनिराळ्या असून त्यांचें स्वरूप विरोधात्मकच आहे. $\frac{1}{6}$ जमीन उत्कृष्ट व निवडक अशी ८० हजार युरोपियन लोकांच्या मालकीची असून $\frac{1}{6}$ जमीन २४ लक्ष आफ्रिकन लोकांना मिळाली आहे; उरलेल्या जमिनीपैकीं मोठा भाग क्राऊन लँड ( राणीची जमीन ) ह्या सदराखालीं तंबाखूच्या मळेवाल्यांना दिला जातो. हे अर्थातच युरोपियन आहेत. राज्याच्या बऱ्याच मोठ्या भागाला त्से-त्से माश्यांचा उपद्रव पोहोंचतो आणि आफ्रिकन वसाहती अशाच भागांत आहेत. ह्या माश्या असलेल्या भागांत गुरें पाळतां येत नाहींत कारण त्या चावल्यामुळें रोग होऊन गुरें मरतात. तरी पण एकूण सर्व परिस्थिति व राहणी देशांतील जीवन वगैरे लक्षांत घेतां, द. ऱ्होडेशियाची ही बऱ्याच अंशानें सुधारून काढलेली आवृत्ति आहे, हें तेव्हांच लक्षात येतें.

## ३

उत्तर ऱ्होडेशियाच्या राष्ट्रीय जीवनाची गुरुकिल्ली म्हणजे ' तांब्याच्या पट्ट्यां'तील खाणी, तेथील कामाची स्थिति, तेथें काम करणारे मजूर व

त्यांच्या चळवळी, खाण-मालक व त्यांचें स्वरूप. पुढील घडामोडी समजावून घेण्यासाठीं ह्या विषयाची नीट माहिती असली पाहिजे.

खाणींतून तांबें काढण्याच्या धंद्याला १९३१ पासून मोठ्या प्रमाणावर प्रारंभ झाला आणि दुसऱ्या महायुद्धानंतर तांब्याची टंचाई निर्माण झाल्यामुळें तर ह्या धंद्याला फारच मोठी बरकत आली.

उत्तर ऱ्होडेशियांतील ह्या महत्त्वाच्या उत्पादनावर दोन मोठ्या मक्तेदारी कंपन्यांची मालकी आहे; एकीचें नांव आहे **ऱ्होडेशियन अँग्लो-अमेरिकन कॉर्पोरेशन**. ह्या ट्रस्टमध्यें मुख्यतः ब्रिटिश व द. आफ्रिकेंतील गोऱ्या वसाहतकारांचें भांडवल आहे. दुसऱ्या ट्रस्टचें नांव आहे **ऱ्होडेशियन सिलेक्शन ट्रस्ट**. ह्या ट्रस्टवर अमेरिकन मेटल कंपनीचें वर्चस्व आहे. ह्या दोन बड्या मक्तेदारांच्या तर्फे **चांगा ऱ्होकाना, रोन अँटलोप व मफुलिरा** ह्या चार मोठ्या व कांहीं छोट्यामोठ्या कंपन्या चालतात. जगांतील तांब्याच्या उत्पादनांत ३ रा क्रमांक मिळण्याइतकें उत्पादन ह्या कंपन्यांतर्फे चालणाऱ्या खाणींतून निघतें.

ह्या खाणींतून मिळणारा नफा अक्षरशः अवाढव्य आहे. १९४५ ते १९५४ ह्या चार वर्षांत ऱ्होकाना कॉर्पोरेशननें शेअर होल्डर्सना, **मूळ भांडवलाच्या १४ पटींपेक्षां जास्त** डिव्हिडण्ड वांटलें. १९५७ मध्यें तर कंपनीला ३५० टक्के नफा झाला. इतर कंपन्यांनाहि १०० टक्क्यांपेक्षां अधिक नफा दर वर्षी होतो. अलीकडच्या काळांत ह्या कंपन्यांना एकूण सरासरी वार्षिक नफा **४ ते ५ कोटि पौंड** इतका मिळतो.

नफ्याच्या ह्या दरावरूनच तेथें काम करणाऱ्या मजुरांना किती कमी वेतन देण्यांत येत असेल व त्यांना मिळणाऱ्या सामाजिक सोयी किती नगण्य असतील याची कल्पना येते.

युरोपियन कामगाराला सरासरी वार्षिक वेतन **१४१७** पौंड मिळतें पण आफ्रिकन कामगाराला वर्षाला सरासरीनें **१०५** पौंड मजुरी मिळते. वंशभिन्नतेवर आधारलेल्या ह्या पगारमानांतून खाणींतील नफ्याचें प्रमाण इतकें अवाढव्य वाढलें आहे.

ह्या विषमतेविरुद्ध आफ्रिकी कामगारांनीं केलेल्या सतत ट्रे. यु. चळवळींमुळें व त्यांत सोसलेल्या हालअपेष्टांमुळें त्यांच्यांत कणखर लढाऊ बाणा

निर्माण झाला. त्यामुळें, आणि उ. ऱ्होडेशियांत गोरे वसाहतकार कमी असल्यामुळें, वंशसलोख्याचा आभास निर्माण करण्यासाठीं आफ्रिकन कामगारांना इतरत्र नसलेल्या सवलती देण्याचा आव आणण्यांत आला आणि शिकाऊ कामगार म्हणून कसबी कामासाठीं आफ्रिकन कामगारांना घेण्यांत येईल असें १२ वर्षांपूर्वी जाहीर करण्यांत आलें. पण शिकाऊ म्हणून घेण्यांत आलेल्यांची संख्या १२ वर्षांत इतकी लहान राहिली आहे कीं, आफ्रिकन कामगारांचें ऐक्य मोडण्यासाठींच ह्या मूठभर व्यक्तींचा उपयोग करण्यांत येतो, अशी टीका सर्वत्र ऐकूं येते.

खाणींत काम करणारे युरोपियन कामगार वर्षाला २००० पौंडांपर्यंत वेतन मिळवितात, सवलतीच्या भाड्याच्या मोकळ्या जागेच्या घरांतून राहतात, त्यांच्या स्वतःच्या चांगल्यापैकीं मोटारी असतात, ते घरांत आफ्रिकन घरगडी राबवतात, आणि पुष्कळदां खेड्यांत आफ्रिकन कामगारांच्या श्रमानें पिकणारा मळा बाळगून असतात. त्यांच्या निराळ्या ट्रेड-युनियन्स चालतात आणि त्या बहुधा एकजुटीच्या लढ्याला तयार होत नाहींत. त्यांच्यामध्यें कांहीं कांहीं "काळ्या मध्यम-वर्गीयांची" भर घालून "उत्तर ऱ्होडेशियांत आफ्रिकन लोकांचें स्वराज्य स्थापन झालें पाहिजे" ही मागणी डावलण्याचे खास प्रयत्न दुसऱ्या महायुद्धानंतरच्या काळांत करण्यांत आले. ह्या कामीं आफ्रिकन जमातीच्या पुढाऱ्यांत फाटाफूट पाडण्याचा व एकमुखी मागणी उठूं न देण्याचाहि ब्रिटिश वसाहत कचेरीकडून प्रयत्न झाला. पण तरीहि आफ्रिकन जनतेची एकजूट, आणि तिचा पाया असलेली तांब्याच्या खाण-कामगारांची एकजूट भक्कम राहिली आणि तिनें राष्ट्रीय चळवळीला बळकटी आणली.

## ४

१९३२ मध्यें उत्तर ऱ्होडेशियांत नेटिव्ह वेलफेअर सोसायट्या (आफ्रिकन जनतेच्या समाज-कल्याण संस्था) स्थापन झाल्या. ह्या संस्थांना मदत दिली तर राष्ट्रवादाचा उठाव होणार नाहीं अशी आशा राज्यकर्त्यांना वाटत होती. पण ती फोल ठरली इतकेंच नव्हे तर १९४६ मध्यें सर्व समाज-कल्याण संस्थांचा संघ (फेडरेशन) स्थापन झाल्यानंतर त्यांतूनच

पुढें १९४८ सालीं **उत्तर ऱ्होडेशिया कॉंग्रेस** ही राजकीय स्वरूपाची संस्था निर्माण झाली. पुढें १९५१ मध्यें **हॅरी कुंबुला** हे तिचे अध्यक्ष झाले त्या वेळीं तिला उत्तर ऱ्होडेशिया आफ्रिकन राष्ट्रीय कॉंग्रेस हें संपूर्ण नांव प्राप्त झालें.

वंशभेदाविरुद्ध व आफ्रिकन जनतेला आपले प्रतिनिधि निवडण्याचा हक्क मिळाला पाहिजे ह्या मागणीसाठीं कॉंग्रेसतर्फे जागृति चालू असतांनाच १९५३ मध्यें राष्ट्रवादाला आळा घालून कायम युरोपियन वर्चस्व टिकविण्यासाठीं **मध्य आफ्रिकी संघराज्य** द. ऱ्होडेशियाच्या व उत्तर ऱ्होडेशियाच्या गोऱ्या वसाहतकारांच्या पुरस्कारानें स्थापन झाल्याचें जाहीर करण्यांत आलें. ह्या संघराज्याला उ. ऱ्होडेशियाच्या सर्व पुढाऱ्यांनीं व ट्रेड युनियन्सनीं विरोध केला आणि त्यानंतर राष्ट्रीय चळवळीचें सर्व लक्ष संघराज्यांतून निघून स्वतंत्र राज्य स्थापन करण्याच्या मागणीवर केंद्रित झालें.

१९५८ मध्यें न्यासालॅंडमध्यें फेडरेशनविरोधी चळवळीला जोर चढला. त्या वेळीं उ. ऱ्होडेशिया आफ्रिकन नॅशनल कॉंग्रेसमधील अधिक लढाऊ विभाग बाहेर पडला आणि त्यांनीं **केनेथ कौंडा** यांच्या अध्यक्षतेखालीं युनायटेड नॅशनल इन्डिपेन्डन्ट पार्टीची ( संयुक्त राष्ट्रवादी स्वतंत्र पक्षाची ) स्थापना केली. ह्या पक्षानें स्वातंत्र्याची मागणी उठवतांच तिच्यावर राज्याच्या गव्हर्नरानें बंदी घातली. ताबडतोब अध्यक्ष केनेथ कौंडा यांच्याच नेतृत्वाखालीं झांबिया नॅशनल कॉंग्रेसची स्थापना झाली.

१९५९ मध्यें हॅरी कुंबुला यांच्या कॉंग्रेसनें संघराज्याच्या निवडणुका लढविण्याचा निर्णय घेतला आणि केनेथ कौंडा यांच्या पक्षानें निवडणुकांवर बहिष्कार घालण्याचें ठरविलें. त्याच सुमारास न्यासालॅंडमध्यें स्वातंत्र्याचा मोठा उठाव झाला. त्याचा फायदा घेऊन गव्हर्नरनें झांबिया नॅशनल कॉंग्रेसच्या पुढाऱ्यांवर आफ्रिकन लोकांनीं निवडणुकांत भाग घेऊं नये म्हणून "ठार मारण्याचा सार्वत्रिक कट" केल्याचा आरोप ठेवून पुढाऱ्यांना अटक केली आणि पक्षावर बंदी घातली. पण स्वातंत्र्य-चळवळीचा जोर ओसरला नाहीं.

१९६० मध्यें किंवा त्यापूर्वीं स्वातंत्र्य मिळालेंच पाहिजे ह्या मागणीसाठीं लढा चालू राहिला. अखेर उ. ऱ्होडेशियाला नवी घटना देऊन

१९६२ मध्यें निवडणुका घेणें ब्रिटिश सरकारला भाग पडलें. ह्या घटने-प्रमाणें २५ लक्ष लोकसंख्येपैकीं १ लक्ष ३० हजार लोकांना मतदानाचा अधिकार देण्यांत आला. पण त्यांचे दोन मतदार-विभाग बनविण्यांत आले. त्यांपैकीं ९२ हजार (बहुसंख्य आफ्रिकन) लोकांना १५ असेंब्लीच्या जागा देण्यांत आल्या व ३७ हजार (बहुसंख्य युरोपियन) लोकांना १५ असेंब्लीच्या जागा देण्यांत आल्या आणि निवडून आलेल्या सभासदांनीं राष्ट्रीय कौन्सिलच्या १५ जागा निवडायच्या, (१ जागा आशियाई लोकांना देण्यांत आली) अशा रीतीनें ४५ सभासदांचीं दोन विधिमंडळें व त्यांना नियंत्रित राज्यकारभाराचे हक्क मिळाले.

ह्या निवडणुका, **केनेथ कौंडा** यांच्या युनायटेड नॅशनल इंडिपेंडन्ट पार्टीनें व **हॅरी कुंबुला** यांच्या आफ्रिकन नॅशनल कॉंग्रेसनें, फेडरेशन नको ह्या घोषणेवर लढविल्या. फेडरेशनचे पंतप्रधान सर रॉय वेलेन्स्की यांच्या पक्षानें त्या फेडरेशनच्या बाजूनें लढवल्या. त्यांत फेडरेशनविरोधी पक्षांच्या बाजूनें ¾ मतें पडलीं आणि केनेथ कौंडा यांच्या पक्षाला १४ व हॅरी कुंबुला यांच्या पक्षाला ७ आणि रॉय वेलेन्सीच्या पक्षाला १५ जागा मिळाल्या. दोन्ही सभागृहांनीं निवडलेल्या जागांवर एकमत होऊं शकलें नाहीं व कौन्सिल निवडलें गेलें नाहीं. पण अखेरीस केनेथ कौंडा व हॅरी कुंबुला यांनीं एकत्र येऊन असेंब्लीमध्यें बहुमत केलें आणि त्यांचें **संयुक्त सरकार** १९६३ च्या अखेरीस स्थापन झालें.

ह्या दोन्ही पक्षांत राष्ट्रीय कार्यक्रमावर मतभेद असले तरी फेडरेशन-विरोध व अधिक लोकशाही स्वरूपाची घटना ह्या दोन मागण्यांवर त्यांचें मतैक्य झाल्यामुळें गोऱ्या वसाहतकारांची बाजू लंगडी झाली आणि सत्ता त्यांच्या हातून निघून जाण्याची वेळ नजीक आली. राष्ट्रीय स्वातंत्र्याच्या दृष्टीनें पुढें पडलेलें हें निर्णायक पाऊल, उत्तर ऱ्होडेशियाची राजकीय व आर्थिक गुलामगिरी नष्ट करण्याचा मार्ग झपाट्यानें आक्रमिल्याखेरीज आतां राहणार नाहीं, हें स्पष्ट दिसून येऊं लागलें. तेव्हां अखेरीस १९६४ च्या ऑक्टोबरमध्यें "स्वतंत्र झांबियाचें राज्य" अस्तित्वांत येईल असें आश्वासन ब्रिटिश राज्यकर्त्यांना द्यावें लागलें आहे.

● ● ●

# ८. न्यासालँड

**लोकसंख्या** – २९ लक्ष, युरोपियन ९ हजार.

**राजधानी** – झोंबा.

**राज्य** – ब्रिटिश सत्तेखालील देश – स्वतंत्र राष्ट्र (१९६४ जुलै).

**मुख्य धंदा** – उत्तर ऱ्होडेशियाच्या व दक्षिण आफ्रिकेच्या खाणींत काम.

## १

उत्तर व दक्षिण ऱ्होडेशियालाच लागून न्यासालँडचें राज्य आहे. न्यासालँडचा बराचसा प्रदेश पठाराचा आहे पण दोन्ही ऱ्होडेशियाच्या मानानें खनिज संपत्ति बेताचीच असल्यामुळें त्या मानानें देश गरीब आहे. चिंचोळया व उभट असलेल्या न्यासा तलावाच्या कांठावर तो वसलेला आहे. आतां वस्ती बरीच दाट झालेली असून त्या मानानें उपजीविकेचीं साधनें कमी असल्यामुळें न्यासा लोकांना मोठ्या प्रमाणावर बाहेरच्या देशांत कामधंदा शोधावा लागतो.

राज्याची राजधानी झोंबा असून, व्यापाराचें केंद्र व सर्वांत मोठें शहर ब्लांटीर आहे.

न्यासालँडच्या लोकसंख्येपैकीं **२८ लक्ष** आफ्रिकन्स असून फक्त **१ हजार** युरोपियन्स आहेत, त्यामुळें या ठिकाणीं " भागीदारीच्या राजवटीची " घोषणा करून ब्रिटिश सत्ताधारी सत्ता टिकविण्याचा अगदीं अलीकडेपर्यंत प्रयत्न करीत होते.

डेव्हिड लिव्हिंगस्टन ह्या स्कॉटिश मिशनऱ्यानें १८५९ मध्यें न्यासालँडचा " शोध " लावला. त्यानंतर मिशनरी लोकांनीं तेथें मोठ्या प्रमाणावर प्रवेश केला आणि अखेर १८९१ मध्यें तेथील जमातींच्या पुढाऱ्यांना ब्रिटिश संरक्षणाखालीं जाणें भाग पडलें.

ब्रिटिश साम्राज्यवाद्यांनीं सत्ता हातांत घेतल्यानंतर तेथील पूर्वापार अर्थव्यवस्था मोडून तेथें चहा व तंबाखूचे मळे काढले आणि व्यापारी पिकांची अर्थव्यवस्था निर्माण केली त्यामुळें देशाचें अतोनात नुकसान झालें.

पूर्वापार चालत आलेली अर्थव्यवस्था मोडून काढण्यासाठीं व आफ्रिकन लोकांनीं आपल्या मळ्यांवर कामाला यावें म्हणून आफ्रिकेंत इतरत्र वापरलेल्या मार्गाचा अवलंब करून ब्रिटिशांनीं शेतकऱ्यांवर " झोपडी कर " व " दरडोई कर " बसविला. हा कर भरण्यासाठीं आफ्रिकन लोकांना युरोपियन लोकांकडे कामाला जावें लागलें आणि तेथें मिळणाऱ्या अत्यंत कमी वेतनामुळें त्यांची अतिशय पिळवणूक झाली. पण युरोपियन लोकांचे मळे पिकले आणि त्यांना फायदा मिळाला.

ह्या पिळवणुकीविरुद्ध न्यासालँडच्या लोकांनीं लहानमोठीं बंडें केलीं. उदाहरणार्थ, **जॉन चिलेंबवे**च्या नेतृत्वाखालीं १९१५ मध्यें न्यासालँडच्या लोकांनीं ठराव केला आणि साम्राज्यवाद्यांविरुद्ध युद्ध केलें.

न्यासालँडमधील सुमारें २,००,००० लोक काम करण्यासाठीं द. आफ्रिका युनियन व ऱ्होडेशिया येथील खाण विभागांत जातात आणि कांहीं वर्षांनीं परत आपल्या मायभूमीकडे येतात. परदेशीं जाणाऱ्या कामगारांचा प्रश्न हा न्यासालँडच्या जीवनाचा मुख्य प्रश्न असल्यामुळें त्याचा थोडा खोलांत शिरून परिचय करण्याची आवश्यकता आहे.

## २

न्यासालँडच्या लोकसंख्येपैकीं काम करूं शकणाऱ्या जनसंख्येच्या ३५ ते ४५ टक्के लोक फिरते कामगार असतात त्यामुळें अनेक प्रकारें सर्व देशाचें नुकसान होतें आणि लोकांचे हाल होतात.

पहिली गोष्ट म्हणजे, दुसऱ्या देशांत कामाला जातात ते सर्व प्रौढ व तरुण एकेकटेच जातात; त्यांचीं बायका-मुलें व जिव्हाळ्याची मंडळी पाठीमागें त्या ओसाड खेड्यांत राहतात.

दुसरी गोष्ट म्हणजे, हे कामगार 'कायम' कधींच होत नाहींत. वर्ष, सहा महिने एका ठिकाणीं काम केलें कीं, अधिक चांगल्या नोकरीच्या आशेनें ते दुसरीकडे जातात अगर घराच्या ओढीनें परत गांवाकडे वळतात.

तिसरी गोष्ट म्हणजे, ह्या बेकार शेतकऱ्यांच्या आयुष्यांत एकदां नव्हे तर अनेकदांहि कामाला जाण्याची व गांवाला परत येण्याची, परत कामासाठीं परदेशांत जाण्याची क्रिया चालू राहते.

चवथी गोष्ट ही कीं, दूरच्या देशांत काम करण्यासाठीं जाण्याचा अगर परतीचा प्रवास त्यांना पायींच करावा लागतो.

पांचवी गोष्ट ही कीं, अशा तऱ्हेचे कामगार पुष्कळदां कॉन्ट्रॅक्टरच्या हातीं सांपडतात आणि त्यांच्याकडून वेठबिगार करून घेतली जाते.

सहावी गोष्ट ही कीं, हें परदेश-गमन इतक्या मोठ्या प्रमाणावर चालतें कीं, त्यामुळें शेतकऱ्याला माणसें मिळेनाशी होऊन शेतीव्यवसायांत अरिष्टें निर्माण होतात.

ह्या सर्वांचा परिणाम फिरत्या कामगारांवर होऊन त्यांच्या जीवनाची धूळधाण होते. शिवाय नोकरींत अनिश्चितता व बदल असल्यामुळें पगार कमी मिळतात, कसबी काम हस्तगत करतां येत नाहीं आणि ट्रेड युनियन चळवळ कमजोर होऊन सर्वच कामगारांचें अतोनात नुकसान होतें.

न्यासालँडच्या जनतेनें हीं सर्व दुःखें अनुभवलीं आणि त्यांनीं ही परिस्थिति बदलण्यासाठीं हालचाल सुरू केली. पण द. आफ्रिका, द. ऱ्होडेशिया व उत्तर ऱ्होडेशिया यांवर अनियंत्रित सत्ता गाजविण्याचा हव्यास धरणाऱ्या ब्रिटिश मक्तेदारांना न्यासालँडनें स्वतंत्र मार्गानें जाण्यापेक्षां आपल्या विळख्यांत यावें हें अधिक फायदेशीर वाटत होतें.

आणि म्हणूनच १९५३ मध्यें दोन्ही ऱ्होडेशिया व न्यासालँड यांचें संघराज्य ब्रिटिश साम्राज्यवाद्यांनीं अस्तित्वांत आणलें. न्यासालँडच्या जनतेनें त्याला उत्स्फूर्त रीतीनें व सहजप्रवृत्तीनें विरोध केला. न्यासालँडला उत्तर ऱ्होडेशियाच्या तांब्याच्या खाणींच्या जकात-करांचा फायदा मिळून राज्याचें उत्पादन वाढेल आणि राजकीयदृष्ट्या तोटा झाला तरी आर्थिक फायदा मिळेल असें आमिष दाखविण्यांत आलें. प्रत्यक्षांत न्यासालँडच्या लोकांची प्रतिक्रिया बरोबर ठरली आणि फेडरेशनमुळें जनतेचें शोषण अधिकच वाढलें.

७५३८२
८८१
मराठी ग्रंथसंग्रहालय ठाणे
२८।३।८२
९४०८२

फेडरेशन अस्तित्वांत आल्यानंतर न्यासालँडची आर्थिकदृष्ट्यासुद्धां पिछे-हाट झाली. १९५३ पूर्वींच्या चार वर्षांत राज्यांतील एकूण 'उत्पादन' दर-वर्षी सरासरी १६॥ टक्क्यांनीं वाढलें होतें, तें फेडरेशननंतर १०॥ टक्क्यां-वर आलें, असें १९५८ च्या न्यासालँडवरील सरकारी अहवालांत म्हटलें आहे.

फेडरेशन अस्तित्वांत आल्यानंतर जनतेवर फेडरल टॅक्स बसविण्यांत आला, त्यामुळें करांचा बोजा वाढला. " स्वस्त सुती कापड, पायतणें, स्वयंपाकाचीं भांडीं " अशा रोजच्या गरजेच्या वस्तु अधिक महाग झाल्या.

संघराज्याच्या जकातीचा हिस्सा मिळाल्यामुळें राज्याची परिस्थिति सुधारेल असा एक युक्तिवाद करण्यांत येत असे. पण फेडरल रेव्हेन्यूचा भाग जरी न्यासालँडला मिळाला तरी राज्याला नेहमीं मिळणारी कस्टम ड्यूटी मात्र फेडरेशनला द्यावी लागली. त्यामुळें संघराज्याकडून १५ लक्ष पौंड कर मिळाला पण नेहमीं मिळणारा २० लक्ष पौंड जकात-कर संघराज्याला द्यावा लागला, तेव्हां एकूण नुकसानच अधिक झालें.

युरोपियन खाण मालकांचे नफे वाढले पण आफ्रिकन कामगारांचे पगार कमी झाले. १९४५ मध्यें नफ्याशीं पगाराचें प्रमाण २५ टक्के होतें, तें १९५६ मध्यें ८ टक्क्यांवर आलें. त्यामुळें कामगारांचेंहि नुकसानच झालें.

कामगारांप्रमाणेंच आफ्रिकन शेतकऱ्यांचेंहि नुकसान झालें. युरोपियन मालकीच्या खाणी, उद्योगधंदे व घरें यांत वीज खेळविण्यासाठीं बांधण्यांत आलेल्या कारिबा धरणाच्यामुळें हजारों शेतकऱ्यांना जमिनीस मुकावें लागलें. १९५२ मध्यें फेडरल सरकारनें काढलेल्या एका वटहुकमामुळें युरोपियन मळ्यांवर खंडाच्या पद्धतीनें टंगाटा पद्धतीनें काम करणाऱ्या शेत-कऱ्यांच्या हक्कांवर घाला घातला गेला त्यामुळें १९४६ मध्यें असलेल्या ५०,००० खंडकऱ्यांच्या कुटुंबांची संख्या १९५८ मध्यें १६,००० झाली.

संघराज्य अस्तित्वांत आल्यानंतर, द. आफ्रिकेच्या वंशभिन्नतेच्या धोरणाखालीं, संघराज्याचे पंतप्रधान रॉय वेलेन्स्की यांनीं आंखलेल्या

योजनेनुसार, युरोपियन लोकांच्या सुखसोयींसाठीं फार मोठ्या रकमा सार्वजनिक निधींतून खर्च होऊं लागल्या. ह्या रकमा युरोपियन लोकांची आफ्रिकन लोकांच्या मानानें असलेली फार लहान लोकवस्ती लक्षांत घेतां प्रमाणाबाहेर तर होत्याच पण एकुण रकमेनेंसुद्धां अधिक मोठ्या होत्या.

ह्या सर्व अन्यायामुळें, न्यासालँड आफ्रिकन कॉंग्रेसच्या नेतृत्वाखालीं न्यासालँडच्या लोकांनीं प्रखर स्वातंत्र्य-संग्राम केला.

## ४

**न्यासालँड आफ्रिकन कॉंग्रेसची** स्थापना १९५० मध्येंच झाली होती. पण संघराज्य अस्तित्वांत आल्यानंतर त्याविरुद्ध तिनें जनतेंत मोठी जागृति निर्माण केली. तिची घोषणा " **वाका** " ( Kwaka " जागे व्हा " ) ही होती.

१९५९ मध्यें कॉंग्रेसच्या १५ पुढाऱ्यांना बेकायदेशीर सभा घेतल्याबद्दल अटक करण्यांत आली. त्यामुळें संतापलेल्या न्यासा लोकांनीं जेलवर हल्ला करून आपल्या पुढाऱ्यांना सोडविलें. सर्वत्र लोकांनीं उठाव केला. रस्तोरस्तीं बॅरिकेड्स उभारण्यांत आल्या. संघराज्याच्या सरकारनें ताबडतोब लष्कर आणलें आणि दहशत व दडपशाहीला प्रारंभ केला. कॉंग्रेसचे पुढारी **डॉ. बंडा** व त्यांचे हजारों अनुयायी यांना तुरुंगांत स्थानबद्ध केलें. अनेक आफ्रिकन लोकांना गोळ्या घातल्या आणि न्यासालँडमध्यें आणीबाणीची परिस्थिति जाहीर केली.

ह्या अशांततेमुळें अखेर ब्रिटिश वसाहतखात्याला चौकशीसाठीं कमिशन नेमावें लागलें. ह्या डेव्हलिन कमिशनपुढें " डॉ. बंडा व त्यांचे अनुयायी यांनीं सर्व गोऱ्यांची कत्तल करण्याचा कट केला " असा आरोप साम्राज्य-वाद्यांनीं मांडला. चौकशीनंतर डेव्हलिन कमिशननें जाहीर केलें कीं, न्यासालँडला संघराज्यांत घालून तेथें आफ्रिकन लोकांना हळूंहळूं स्वायत्त सरकार स्थापन केलें जाईल असें पूर्वीं देण्यांत आलेलें आश्वासन मोडल्यामुळें संघराज्याबद्दल जनतेंत सखोल व तीव्र विरोधी-भावना आहे. आणीबाणाची परिस्थिति जाहीर झाल्यापासून न्यासालँड हें " पोलिस स्टेट " ( लष्करी दडपशाहीच्या अमलाखालील राज्य ) बनलें आहे. डॉ. बंडांनीं खून पाडण्याचें

धोरण स्वीकारलें आहे असें म्हणण्याला कोणताहि पुरावा नाहीं. त्यामुळे त्यांना व इतर अनेकांना अटक करण्यांत "अनावश्यक आणि म्हणून बेकायदेशीर बळाचा वापर करण्यांत आला."

हा अहवाल बाहेर आल्यानंतर कॉमन्स सभागृहांत त्यावर खडाजंगी चर्चा झाली व अखेर सरकारनें अहवालाचा मुख्य भाग अमान्य केला आणि न्यासालँडचे पुढारी तुरुंगांतच राहिले.

पण अखेरीस न्यासालँडला नवी घटना देणें ब्रिटिश सरकारला भाग पडलें आणि १९६१ मध्यें झालेल्या निवडणुकींत डॉ. बंडांच्या मालवी कॉंग्रेस पक्षाला (कॉंग्रेसमधील अधिक प्रागतिक विभागाला) निर्णायक बहुमत मिळालें आणि त्यांनीं मालवी (न्यासांचें पूर्वीचें नांव) लोकांच्या स्वतंत्र राज्याची घोषणा करण्यास प्रारंभ केला.

१९६३ च्या फेब्रुआरींत डॉ. हेस्टिंग्ज बंडा यांचें मंत्रिमंडळ स्थापन झालें आणि न्यासालँडचें पहिलें स्वायत्त सरकार अस्तित्वांत आलें. त्यानें, फेडरेशन बरखास्त करा आणि आम्हांला संपूर्ण स्वातंत्र्य द्या, ह्या घोषणा घेऊनच कार्याला प्रारंभ केला. अखेर १९६३ च्या डिसेंबरांत फेडरेशन बरखास्त करणें ब्रिटिश वसाहतखात्याला भाग पडलें आणि न्यासालँडचा स्वातंत्र्याचा मार्ग मोकळा झाला.

१९६४ च्या ४ ते ७ जुलैला मालवी राज्यानें आपला स्वातंत्र्योत्सव मोठ्या थाटामाटानें साजरा केला आणि स्वतंत्र मालवी राज्याच्या उभारणीचें कार्य मुख्यमंत्री डॉ. बंडा यांच्या नेतृत्वाखालीं सुरू केलें आहे.

• • •

# ९. मोझांबिक

**लोकसंख्या** -- ६५ लक्ष, युरोपियन्स मुख्यतः पोर्तुगीज व ब्रिटिश ६६ हजार.

**राजधानी** – बैरा.

**राज्य** – पोर्तुगीजांची फॅसिस्ट हुकमत; पोर्तुगालचा ‘समुद्र पार प्रांत’ (अंकित देश).

**मुख्य धंदा** – कंत्राटी मजुरी.

१

ऱ्होडेशिया व न्यासालँडच्या संघराज्याला लागून पूर्वेकडे मोझांबिक ही पोर्तुगीज वसाहत आहे. ती समुद्रकिनाऱ्याला लागून असल्यामुळें आणि ऱ्होडेशिया-न्यासालँड संघराज्याला समुद्रकिनारा नसल्यामुळें, बैरा ह्या बंदरांतून त्यांचा सर्व व्यापार चालतो. पूर्वीहि अरब व्यापाऱ्यांनीं येथूनच व्यापार केला. त्याचप्रमाणें फार प्राचीन काळापासून ह्या प्रदेशाचा भारताशीं व्यापार चालू आहे. बैरा हें मोझांबिकचें राजधानीचें शहर आहे.

मोझांबिकची लोकसंख्या ६५ लक्ष आहे. युरोपियन्स (मुख्यतः पोर्तुगीज व ब्रिटिश लोकवस्ती) ६६,००० असून १७,००० भारतीय व इतर आशियाई लोक आहेत.

साखर, कॉफी, कापूस, खोबरें, व पाम तेल ही विषुववृत्तीय प्रदेशांतील संपत्ति हा व्यापाराचा मुख्य आधार आहे.

खनिज संपत्तीच्या दृष्टीनें हा देश समृद्ध आहे. येथें कोळसा, बॉक्साईट, कथील, सोनें, युरेनियम, खनिज तेल, व इतर खनिज द्रव्यांचे सांठे आहेत. पण खनिज संपत्ति व जलविद्युत्शक्ति यांचा भरपूर उपयोग करून घेण्यांत न आल्यामुळें देशाचा आर्थिक विकास समतोल झालेला नाहीं.

# २

खुद्द पोर्तुगालमध्यें सालाझारची एकतंत्री हुकूमशाही असल्यामुळें मोझांबिकच्या लोकांना लोकशाही हक्क नाहींत, हें सांगण्याची आवश्यकता नाहीं. लिस्बनहून आलेल्या गव्हर्नरांच्या कडक हुकमतीखालीं येथील जनता जीवन जगत असते.

गुलामगिरीच्या पद्धतीवर आंतरराष्ट्रीय कायद्यानें वंदी घातल्याला अनेक वर्षें उलटल्यानंतरहि मोझांबिकमध्यें गुलामगिरी कायम असल्याचें उघडकीस आलें आहे. अमेरिकेंतील कोलंबिया विद्यापीठाचे एक शास्त्रज्ञ **प्रो. मार्व्हिन हॅरिस** यानीं मोझांबिकमधील परिस्थितीचा अभ्यास करून १९५८ मध्यें लिहिलेल्या पुस्तिकेंत म्हटलें आहे :

" ह्या वसाहतींतील सक्तीच्या वेठबिगारीचें मुख्य सूत्र हें आहे कीं, आपण ' बेकार ' नाहीं असें सिद्ध न करणाऱ्या सर्व आफ्रिकन पुरुषांना सरकार ' बेकार ' ठरवितें. आपण कामावर असल्याचा पुरावा ज्यांना देतां येत नाहीं त्यांना सरकार सहा महिनेपर्यंत सक्तीनें सरकारी काम करायला भाग पाडतें; त्यांनीं " स्वखुषीनें " खासगी मालकीच्या उद्योग-धंद्यांत, मळ्यांवर अगर खाणींत कामाला जाण्याची तयारी दाखविली तरच ही वेठबिगार चुकते. हें काम त्यांना फक्त " दलालांच्या " मार्फत मिळतें. ह्या पद्धतीला " **शिबालो पद्धत** " म्हणतात. शिबालो-पद्धत म्हणजे, कोणत्याहि जिल्हा-अधिकाऱ्याच्या शब्दोच्चाराबरोबर कोणत्याहि आफ्रिकी माणसाला वेठबिगारीवर जाण्याची सक्ति. ह्या शिबालोंना त्या भागांत मिळणारें कमींत कमी वेतन देण्यांत येतें. "

प्रो. हॅरिस म्हणतात, "सरकार व खासगी मालक मिळून दर वर्षीं सुमारें १००,००० शिबालो कंत्राटानें कामाला ठेवतात. पण बेकार राहण्याच्या ह्या कायद्याची व्याप्ति प्रत्यक्षपणें पकडून कामाला लावल्या जाणाऱ्या कामगारांच्या संख्येपेक्षां फार मोठी आहे. सक्तीच्या वेठबिगारीच्या धमकीचा परिणाम एकुण कामगारशक्तीवर फार मोठा होतो. ह्या भीतीमुळें मोझांबिकच्या सर्व नागरिकांना युरोपियन अर्थव्यवस्थेंत जुंपण्यांत आलें आहे, त्यामुळें युरोपियन लोकांचा फायदा होतो आणि भाजूबाजूंच्या

राज्यांतील आफ्रिकन लोकांसह सर्व आफ्रिकी लोकांचें नुकसान होतें. "

ह्या वेठविगारीमुळें मुख्यतः दक्षिण आफ्रिकेच्या संघराज्याचा व दक्षिण ऱ्होडेशियाचा अतिशयच फायदा होतो. मोझांबिकमधून सुमारें ४,००,००० कामगार ह्या दोन विभागांत कामाला नेण्यांत येतात. याशिवाय, नेटिव्ह लेबर असोसिएशन नांवाची एक खास सरकारी संस्था आहे; ती ट्रान्स-वालमधील सोन्याच्या व कोळशाच्या खाणींसाठीं कामगारांची भरती करते. प्रा. हॅरिस यांनीं काढलेल्या निष्कर्षाप्रमाणें येथील ७५ टक्के लोक परदेशांत कामाला जातात.

ह्याच्याच परिणामीं मोझांबिकमधील शेतकऱ्यांना वसाहत राज्यकर्त्यांच्या हुकमाप्रमाणें शेती-उत्पादन करावें लागतें. प्रा. हॅरिस म्हणतात—

" ह्या आधुनिक गुलामगिरींत, मध्ययुगीन काळांतील गुलामांच्या मालकांची जागा १२ खासगी पोर्तुगीज कंपन्यांनीं घेतली आहे. त्यांना अफाट प्रदेशांतील कापूस उत्पादनाची मक्तेदारी मिळालेली आहे. प्रत्येक कंपनीच्या विभागांत सरकारनें किती एकर जमिनींत कापूस लावला पाहिजे हें ठरवून दिलें आहे. ह्या विभागांतील शेतकऱ्यांना स्वतःचें मत नाहीं. त्यांना कंपनीनें सांगितल्याप्रमाणें कापूस लावावाच लागतो आणि सरकारनें ठरविलेल्या किमतीला विकावाच लागतो; आणि ही किंमत आंतरराष्ट्रीय बाजार-भावापेक्षां खूपच कमी असते. शिवाय ह्या शेतकऱ्यांना स्वतःच्या कुटुंबाला पुरेल इतकेंहि धान्य पिकवितां येत नाहीं. चांगल्या मोसमांत शेतकरी कुटुंबाला वर्षाला ५ पौंड उत्पन्न मिळतें आणि हवापाणी वाईट असलेल्या वर्षाला कांहींच मिळत नाहीं.

अशा रीतीनें, प्रत्यक्षपणें वंशभिन्नतेचे कायदे नसलेल्या मोझांबिकमध्यें आफ्रिकन लोकांची परिस्थिति अत्यंत वाईट असून त्यांना कामासाठीं इतरत्र जाऊन वंशभेदाच्या धोरणाखालींहि राबावें लागतें.

## ३

पोर्तुगीज साम्राज्यवाद्यांचें आसन युरोपांत कमजोर झाल्यापासून त्यांच्या वसाहतींत देखील अमेरिका व ब्रिटनच्या साम्राज्यवाद्यांचें पाय रोंवले जाऊं लागले आहेत.

मोझांबिकच्या खाणींकडे अमेरिकन मक्तेदारांचें लक्ष वेधलें आहे. लष्करी डावपेचांच्या दृष्टीनें महत्त्व असलेल्या भागांतून युद्धाला उपयोगी पडणाऱ्या कच्च्या मालाच्या सांठ्याचे तळ अमेरिका तयार करीत आहे. ह्या दृष्टीनें पोर्तुगाल व अमेरिका यांच्यांत १९५० मध्यें एक करार झाला. ह्या करारान्वयें अमेरिकन कंपन्यांना **लौवरेंसु मार्कीश** ह्या बंदराची सुधारणा करण्याची मक्तेदारी मिळाली आहे. तसेंच रेल्वेमार्ग बांधण्याची व खनिज धातूंसाठीं संपूर्ण प्रदेशाची पाहणी करण्याचीहि परवानगी मिळाली आहे.

त्याचप्रमाणें, मोझांबिकमध्यें ब्रिटिश भांडवलाचें भक्कम जाळें पसरलें आहे. **बैरा** बंदर व तेथपर्यंत येणारी रेल्वे यांचा संयुक्त वापर करण्याचा करार १९५० मध्यें पोर्तुगाल व ब्रिटनमध्यें झाला. लष्करी डावपेचांच्या दृष्टीनें ब्रिटन ह्या भागाची पुनर्रचना करीत आहे. अलीकडच्या वर्षांत मोझांबिकमध्यें २३ विमानतळ वाढविण्यांत आले आणि तेथें लष्करी उपयोगासाठीं अद्यावत् साधनसामुग्री आणून ठेवण्यांत आली आहे.

ह्यामुळें बैरा व लौवरेंसु मार्कीश शहरांत मोठमोठ्या इमारती, हॉटेल्स व दारूचीं दुकानें दृष्टीस पडतात. मोटारी, यंत्रें व महागडीं हॉटेलें यांनीं हीं शहरें गजबजलेलीं दिसतात. द. आफ्रिका व मध्य आफ्रिका संघराज्याचे प्रवासी व व्यापारी आणि त्यांचा आयात व निर्यात होणारा माल यांच्यावरील कर हे मोझांबिकच्या सरकारी उत्पन्नाचे मुख्य आधार आहेत.

## ४

पोर्तुगीज वसाहतकार वर्ण-निर्बंधांचें (colour-bar) स्तोम माजवीत नाहींत. अनेक पोर्तुगीजांनीं मोझांबिकमध्यें विवाह केले आहेत. आपल्या धोरणाचें वर्णन ते (ॲसिमिलाडो सिस्टिम) "सामिलीकरणाची पद्धत" असें करतात. अशा "सामील करून घेण्यांत आलेल्या" किंवा "सुसंस्कृत" आफ्रिकन लोकांना ते इतर पोर्तुगीज लोकांइतकेच हक्क व सवलती देतात. (पण खुद्द पोर्तुगीज लोकांनाच हक्क व सवलती फार थोड्या आहेत तो प्रश्न निराळा.) एखाद्या आफ्रिकन माणसानें लवादाची जर खात्री करून दिली

कीं, मी युरोपियन लोकांप्रमाणें जीवन जगतो, आपले रीतिरिवाज पाळीत नाहीं, मी पोर्तुगीज भाषा लिहितों व बोलतों, मला गरजेपुरते व थोडे अधिक पैसे मिळवितां येतात आणि मी लष्करांतील नोकरी पूर्ण केली आहे, तर त्याला " सामील केलेल्या माणसाचा " ( ॲसिमिलाडोचा ) दर्जा मिळतो. मग तो युरोपियन कोर्ट-कचेऱ्या, शाळा, हॉटेल्स व घरें यांचा उपयोग करूं शकतो. अशा रीतीनें पुढारलेल्या व शिकलेल्या लोकांना आफ्रिकन जनतेपासून दूर करून पोर्तुगीज राज्यकर्त्यांनीं कांहीं प्रमाणांत " राष्ट्रीय भावनेला " मुरड घालण्यांत यश मिळविलें. पण ह्या पोर्तुगीज बनलेल्या आफ्रिकी लोकांचें प्रमाण फारच कमी आहे, १९५० च्या गणती-प्रमाणें, अंगोला व मोझांबिकच्या १ कोटि लोकसंख्येपैकीं फक्त २ लक्ष ४० हजार ॲसिमिलाडो होते तेव्हां बहुसंख्य आफ्रिकी लोकांचें दुःख, दारिद्र्य व हालअपेष्टा मोझांबिकमधील कॉन्ट्रॅक्ट पद्धतीनें जितक्या पटीनें वाढल्या आहेत त्याच्या $\frac{1}{100}$नें सुद्धां त्या ॲसिमिलाडोंच्या अस्तित्वानें कमी झालेल्या नाहींत ही वस्तुस्थिति आहे.

## ५

आफ्रिकेंतील देश एकामागून एक स्वतंत्र होऊं लागल्यापासून मोझां-बिकच्या जनतेंतहि अलीकडच्या काळांत स्वातंत्र्याच्या भावना परिपक्व होऊं लागल्या आहेत. आतां ॲसिमिलाडोंना जनतेंत जागृति करण्यांत पुढाकार घेण्याची व संघटना करण्याची आवश्यकता वाटूं लागली आहे. मोझां-बिकमध्यें स्थापन झालेल्या संघटनांनीं अंगोलामधील संघटनांबरोबर सह-कार्यानें कार्य चालविलें आहे. ( अर्थात् राजवट अनियंत्रित हुकूमशाहीची असल्यामुळें ह्या संघटना ' बेकायदेशीर ' व गुप्त आहेत. ) गोव्यांतील स्वातंत्र्य-संग्रामामुळें व अखेर १९६१ मध्यें भारत सरकारनें गोवा मुक्त केल्यापासून मोझांबिक व अंगोलाची जनताहि स्वराज्यासाठीं उत्सुक झाली आहे.

या ठिकाणीं आणखी एका घटनेचा उल्लेख केला पाहिजे. गोवा हातां-तील गेल्यामुळें चिडलेल्या पोर्तुगीज साम्राज्यवाद्यांनीं मोझांबिकमधील भारतीयांवर त्याचा सूड उगवला. १९६२ च्या अखेरीस रातोरात काढलेल्या

एका हुकमामुळें मोझांबिकमधील २००० भारतीयांना स्थानबद्ध ( इन्टर्न ) करण्यांत आलें. त्यांची सर्व मालमत्ता नष्ट करण्यात आली आणि त्यांना मोझांबिक सोडून जाण्याच्या नोटिसा देण्यांत आल्या. त्यांच्या मुलांना मात्र मोझांबिकमध्येंच ठेवण्याचा प्रयत्न करण्यांत आला. ह्या प्रकारामुळें मोझांबिकच्या हुकूमशाही व क्रूर राजवटीचें स्वरूप निदर्शनास येऊन मोझांबिक जनतेबद्दलची सहानुभूति मोठ्या प्रमाणावर वाढली आहे.

● ● ●

# १०. अंगोला

**लोकसंख्या –** ४७ लक्ष; पोर्तुगीज १ लक्ष १५ हजार.

**राजधानी –** लुआंदा.

**राज्य –** पोर्तुगालचा अंकित देश.

**मुख्य धंदा –** कंत्राटी मजुरी व वेठबिगार.

## १

उत्तर ऱ्होडेशियाला लागून आफ्रिकेच्या पश्चिम किनाऱ्यावर अंगोला ही पोर्तुगीजांची वसाहत आहे. पोर्तुगालची ही सर्वांत मोठी वसाहत. हिची लोकसंख्या सुमारें ४७ लक्ष असून युरोपियन लोकांची, म्हणजे मुख्यतः पोर्तुगीज लोकांची संख्या सुमारें १ लक्ष १५ हजार आहे. अंगोलाची राजधानी **लुआंदा** आहे.

इतर युरोपियन राष्ट्रांच्या आफ्रिकेंतील वसाहतींप्रमाणें अंगोला हा पोर्तुगालला कच्च्या मालाचा पुरवठा करणारा हुकमी प्रदेश आहे. त्याच्या उत्तर भागांत रबर, पाम तेल, कॉफी, कोको इत्यादींची लागवड होते. दक्षिण भागांत कापूस पिकतो. लुआंदा व लोबिटा बंदरांतून वरील जिनसांची पोर्तुगालला निर्यात होते. कॉंगोंतील कटांगा प्रदेशातील तांबेंहि त्याच मार्गानें युरोपला रवाना होतें.

## २

मोझांबिकप्रमाणेंच अंगोलांतील जनतेला कोणतेहि लोकशाही हक्क नाहींत. लिस्बनहून येणाऱ्या पोर्तुगीज गव्हर्नरांच्या कडक हुकमतीखालीं येथील जनता जीवन जगते.

आंतरराष्ट्रीय कायद्यानें गुलामगिरीची प्रथा बंद पाडल्यानंतरहि पोर्तुगालच्या ह्या वसाहतींत गुलामांची विक्री चालते, ही बातमी बाहेर फुटली

आणि त्यासंबंधीं माहिती गोळा होऊं लागली. लंडनच्या 'हार्पर्स' मॅगाझिननें १९०५ सालीं एच्. डब्ल्यू. नेव्हिसन यास अंगोलांत पाठवून ह्या प्रश्नाला वाचा फोडली. त्यानें लिहिलेल्या 'मॉडर्न स्लेव्हरी' (आधुनिक गुलामगिरी) ह्या पुस्तकांत मोठ्या प्रमाणावर जवळ जवळ गुलामगिरीसदृश परिस्थितींत करून घेतल्या जाणाऱ्या सक्तीच्या वेठबिगारीचीं अनेक उदाहरणें दिलीं आहेत. पुढें ५० वर्षांनीं ह्याच मासिकानें बेसिल डेव्हिडसन यांना अंगोलांत पाठविलें. डेव्हिडसन यांच्या "दी आफ्रिकन अवेकनिंग" (आफ्रिकेंतील जागृति) ह्या पुस्तकावरून आणि गुलामगिरीविरोधी सोसायटी व आंतरराष्ट्रीय कामगारसंघ यांनीं प्रसिद्ध केलेल्या अहवालावरून अंगोलांतील "कॉन्ट्रॅक्ट लेबर"ची माहिती मिळते. ही कॉन्ट्रॅक्ट पद्धत म्हणजे गुलामगिरीच आहे.

बेसिल डेव्हिडसननें ह्या पद्धतीचें वर्णन पुढीलप्रमाणें केलें आहे.

दहा वर्षांपुढील प्रत्येकाला आपण वर्षांतून सहा महिने काम करतों हें सिद्ध करावें लागतें अगर सध्यां काम करीत आहोंत हें दाखवावें लागतें. ता कामाला नसला तर त्याला वेठबिगारीला पाठविलें जातें. ज्या मालकांना वेठबिगारीचे मजूर पाहिजेत ते कॉन्ट्रॅक्टरकडे, इतर कच्च्या मालाची मागणी करतात त्याप्रमाणें मागणी करतात. कित्येक मालक त्यासाठीं अनेक पोर्तुगीज अधिकाऱ्यांना लांच देतात; कारण वेठबिगारीचे मजूर अत्यंत स्वस्त पडतात. पोर्तुगीज अधिकारी स्थानिक हस्तकांकडून मजुरांना पकडून आणतात. कित्येकदां पोलिस पाठवून लोकांना पकडण्यांत येतें. ह्या लोकांची संख्या ४ लक्षांपर्यंत आहे. कासेक्वल उंसाच्या मळ्याचा जनरल मॅनेजर व डेव्हिडसन यांच्यांत पुढीलप्रमाणें प्रश्नोत्तरें झालीं, त्यांवरून ह्या कामगारांना कसें वागविण्यांत येतें याची कल्पना येते.

"सक्तीनें वेठबिगारीला आणलेल्या माणसांनीं काम करण्याचें नाकारलें तर काय होतें?" डेव्हिडसननें विचारलें.

मळ्याच्या मॅनेजरनें डेव्हिडसनकडे आश्चर्यानें पाहिलें व म्हटलें,

"पण हीं माणसें काम करतातच."

"पण समजा, त्यांनीं नाकारलें तर?"

"नाकारलें तर आम्हीं त्यांना पोलिस-स्टेशनवर पाठवितों. त्यांना तुरुंगांत घालण्यांत येतें आणि फटके मारण्यांत येतात."

कामगारांना कोणत्या रीतीनें मारतात याचें वर्णन दुसऱ्या एका युरोपियन माणसानें डेव्हिडसनजवळ केलें, तें असें :

फटके लहान गुन्ह्यासाठीं कातड्यानें – आसुडानें मारले जातात; पण अनेक ठिकाणीं **पामाटोरिया**चा उपयोग करतात. पामाटोरिया कठीण व सलग लाकडापासून बनविलेला असतो. त्याला १०–१२ इंच लांब लांकडाचा दांडा असतो आणि खालीं १॥–२ इंच जाडीचा एक गोल असतो. ह्या गोलाच्या दोन्ही बाजूला पांच भोंकें असतात. कामगाराला हाताचा तळवा वर करून हात लांब करून उभा करतात. कॉन्ट्रॅक्टर किंवा पोलिस जोरानें पामाटोरिया त्याच्या तळव्यावर मारतो. त्या आघाताबरोबर हाताचें मांस पामाटोरियाच्या भोंकांत शिरतें. हीं भोंकें निमुळतीं होत गेलेलीं असल्यामुळें भोंकांत मांस अडकतें आणि अनंत वेदना होतात. आफ्रिकन लोक ह्या हत्याराला " वेदना "च म्हणतात. त्याचा प्रयोग पाठोपाठ दोन्ही हातांवर केला जातो. कमाल सहनशक्ति असलेला माणूस असे ५ किंवा ६ घाव मुकाट्यानें झेलतो, मग तो ओरडूं लागतो.

ह्या हत्याराचें १००–१५० वार केले कीं माणूस ठार होतो.

अशा तऱ्हेची सक्तीची वेठबिगार अंगोलांत इतकी रूढ आहे कीं तिचें अस्तित्व कोणालाच नाकारतां येत नाहीं आणि थोडीशी माणुसकी शिल्लक असलेला माणूस तिच्या क्रौर्याकडे डोळेझांक करूं शकत नाहीं. ह्या परिस्थितीवर सारवासारव करण्यासाठीं पोर्तुगाल सरकारनें १९४७ मध्यें, अंगोलांतील कामगार परिस्थितीबद्दल पाहणी करण्यासाठीं कॅप्टन गालहाओ ह्यांना पाठविलें. त्यांनीं परत गेल्यानंतर, अंगोलांत पाहिलेली सत्यस्थिति लिहून काढली आणि तो अहवाल गुप्तपणें अनेकांना वाटला. परिणामीं पोर्तुगाल सरकारनें त्यांच्यावर गुप्त खटला चालवून त्यांना १६ वर्षांची कैदेची शिक्षा दिली.

## ३

अंगोलांतील ह्या सक्तीच्या वेठबिगारीचे परिणाम मोझांबिकमधील वेठबिगारीप्रमाणेंच होतात. युरोपियन लोकांना स्वस्त मजूर मिळतात आणि सर्व आफ्रिकन लोकांवर दहशत बसते. ह्या पद्धतिनुसार द. आफ्रिका व

ऱ्होडेशियामध्यें दर वर्षीं स्वस्त मजुरांचा भरणा केला जातो आणि तेथील वाढत्या ट्रेड-युनियन चळवळीला आळा घालण्याचा कावा साधण्यांत येतो. अंगोलांतील प्रौढ पुरुषांपैकीं $\frac{1}{3}$ ते $\frac{1}{2}$ संख्या देशाबाहेर कामाला आहे, यावरून वेठबिगार पद्धतीचें गांभीर्य समजून येईल.

ह्या वेठबिगारीमुळें शेतकऱ्यांतहि दहशत निर्माण करण्यांत आलेली आहे; त्यांच्याकडून जमिनीच्या मोठ्या भागांत सक्तीनें कापूस पिकवून घेण्यांत येतो. याशिवाय अलीकडेच ६० हजार पोर्तुगीज शेतकऱ्यांना अंगोलांत आणून त्यांची वसाहत करण्यांत आली; त्यासाठीं आफ्रिकन शेतकऱ्यांच्या जमिनी काढून घेण्यांत आल्या.

मोसांबिकप्रमाणें अंगोलांतहि आतां अमेरिकन साम्राज्यवाद्यांनीं भक्कमपणें पाय रोंवले आहेत. कम्पानीया दुझ दियामांतीश द अंगोला, व काम्पानीया द वेस्कमझेस द अंगोला, ह्या अंगोलियाच्या हिऱ्यांच्या खाणींचा ताबा अमेरिकेनें मिळविला आहे. शिवाय, बंदरें, हमरस्ते, रेल्वे व जल-विद्युत्केंद्रें बांधण्यासाठींहि तेच भांडवल पुरवीत आहेत आणि आपलें वर्चस्व वाढवीत आहेत.

## ४

ह्या अन्यायी व एकतंत्री राजवटीविरुद्ध अंगोलाची जनता असंतोष प्रकट करूं लागली आहे. आफ्रिकेंतील इतर राज्यांतील स्वातंत्र्यलढ्यांनीं व स्वातंत्र्यप्राप्तीमुळें तिला स्फूर्ति मिळाली आहे.

१९५५ सालीं अंगोलांत कम्युनिस्ट पक्षाची स्थापना झाली. १९५६ सालीं आफ्रिकन लोकांची संयुक्त आघाडी स्थापन झाली आणि त्यांनीं स्वातंत्र्याची मागणी केली. हे सर्व पक्ष व संघटना सरकारनें बेकायदेशीर ठरविल्या आणि दडपशाहीला प्रारंभ केला.

१९५९ मध्यें ५० देशभक्तांना सरकारनें अटक केली. त्याबरोबर त्यांच्या मुक्ततेच्या मागणीसाठीं देशभर आंदोलन सुरू झालें. पोर्तुगीज सत्तेनें " आमच्या जगांत कोठेंहि वसाहती नाहींत. समुद्रापलीकडे आमचे प्रांत आहेत, ते आमच्या राज्याचेच भाग आहेत. त्यांना स्वातंत्र्य देण्याचा

प्रश्नच उद्‌भवत नाहीं. तेथील सर्व जनता सुखांत व समाधानांत आहे" असें पुन्हा एकदां जाहीर केलें. त्यामुळें तडजोडीचे व शांततेनें सत्तांतर होण्याचे सर्व मार्ग बंद झाले.

त्यानंतर पोर्तुगीजांनीं फार मोठ्या प्रमाणावर पोर्तुगीज लष्कर अंगोलांत नेलें आणि जनतेला आव्हान दिलें. जनतेनें हें आव्हान स्वीकारलें.

१९६० च्या जुलै महिन्यांत आयकोलो बेंगो या गांवीं पोर्तुगीज सैनिक व जनता यांच्यांत चकमक सुरू झाली. अंगोला विमोचन आंदोलनांतील ८०० कार्यकर्ते व पुढारी अटकेंत होते; त्यांच्या मुक्ततेची मागणी करणाऱ्या जमावावर पोलिसांनीं गोळीबार केल्यामुळें चिडलेल्या लोकांनीं पोलिसांबरोबर सामना केला.

हें वातावरण अधिकच पसरत गेलें. ४ फेब्रुवारी १९६१ रोजीं, स्वातंत्र्यवीरांनीं लुआंदांतील लष्कराची जीप ताब्यांत घेतली आणि हातीं आलेल्या शस्त्रास्त्रांसह राजधानींतील लष्करी ठाण्यांवर व तुरुंगांवर हल्ले चढविले. त्यांनीं शेंकडों देशभक्तांना तुरुंगांतून मुक्त करण्यांत यश मिळविलें. त्याचबरोबर अत्यंत उपयुक्त अशी लष्करी सामुग्री ताब्यांत मिळविली.

त्यामुळें साम्राज्यवादी अधिकच चिडले. त्यांनीं सर्व अंगोलाभर दहशती वातावरण निर्माण केलें आणि देशाला लष्करी छावणीचें रूप आलें. लष्करानें ३००० आफ्रिकन लोकांची कत्तल केली.

ह्या अत्याचारांमुळें लढ्याची ज्योत जनतेच्या सर्व थरांत पसरली.

भारतांतील गोवा पोर्तुगीज जोखडांतून मुक्त झाल्यामुळें ह्या स्वातंत्र्यसंग्रामाला अधिकच धार चढली. सालाझारच्या फॅसिस्ट राजवटीविरुद्ध अंगोलांतील शेतकरीहि लढ्यांत ओढला गेला. खेडोंपाडीं लढा सुरू झाला आणि अंगोलांतील "शांतते"चें बिंग बाहेर फुटलें.

१४ मार्च रोजीं प्रीमावेरा या शेतजमिनीवर सावसाल्वादोर या गांवीं शेतमजूर व जमीनमालक यांच्यांत झगडा उत्पन्न झाला. अपुरें वेतन व दररोज १४ तास काम करण्याची सक्ति यांविरुद्ध तेथील शेतमजुरांनीं आवाज उठविला. जमीनमालकानें शेतमजुरांवर गोळीबार केला व या झटापटींत जमीनमालक ठार झाला.

पोर्तुगीजांनीं ही संधि साधून अनेक शेतमजुरांना ठार केलें. सर्वत्र वणवा भडकला. सारा अंगोला पेटला. मिळेल तें हत्यार हातीं घेऊन स्वातंत्र्यवादी अंगोलन रस्त्यावर आला आणि प्राणपणानें आपल्या मायभूमीच्या स्वातंत्र्यासाठीं लढूं लागला.

अंगोलन जनतेनें पोर्तुगीजांविरुद्ध युद्ध पुकारलें. अंगोलांतील सारे राजकीय पक्ष जनतेची बाजू घेऊन या युद्धांत सहभागी झाले आणि सशस्त्र प्रतिकार करून पोर्तुगीजांची हकालपट्टी करण्यासाठीं जिवाचें रान करीत आहेत. सशस्त्र प्रतिकार चळवळीचा जोर उत्तर अंगोलांत अधिक आहे.

सशस्त्र स्वातंत्र्यसैनिकांपुढें टिकाव धरण्याचें पोर्तुगीजांना सामर्थ्य नाहीं. त्यामुळें त्यांनीं आपला मोर्चा सर्वसाधारण नागरिकांवर वळविला आहे. खेडींच्या खेडीं उद्ध्वस्त करण्याचें सत्र चालविलें आहे. त्यामुळें सुमारें १,३०,००० अंगोलियन नागरिकांनीं कॉंगोंत आश्रय घेतला असून अद्यापपर्यंत ५०,००० अंगोलनांची कत्तल करण्यांत आली आहे.

एवढें झालें असलें तरी पोर्तुगीजांच्या धोरणांत बदल होण्याची मुळींच आशा नाहीं. दररोज बोटींतून व विमानानें लष्कर, दारूगोळा व इतर युद्धसाहित्य अंगोलांत एकसारखें आणलें जात आहे. १९६२ च्या ऑक्टोबर अखेरपर्यंत बंडखोरांचा संपूर्ण पाडाव करूं, अशी शेखी पोतुगीज अधिकारी मारीत होते. ३०,००० पोर्तुगीज सैनिकांना गमिनी लढ्याचें शिक्षण देण्यांत आलें असून पोर्तुगीजांचा सारा भर याच गोष्टीवर अधिक आहे. तथापि राष्ट्रवादी नेत्यांनीं आपल्या डावपेंचांत नवें तंत्र वापरून पोर्तुगीजांचें मनोराज्य उद्ध्वस्त करण्याचे जोराचे प्रयत्न चालविले आहेत.

१९६२ च्या मार्च महिन्यांत युनोच्या सुरक्षामंडळापुढें अंगोल्याचा प्रश्न चर्चिला गेला. युनोंतील सर्व सदस्य व पोर्तुगालचे नाटो संघटनांतील दोस्तांनींहि अंगोल्यांतील अत्याचारांबद्दल पोर्तुगालची बरीच कानउघडणी केली. पोर्तुगालचीं अंगोल्यांतील कृत्यें गर्हणीय व घृणास्पद आहेत याबद्दल आज सर्वांची पूर्ण खात्री पटली आहे.

पण आश्चर्याची गोष्ट ही कीं, अमेरिका आपल्या जुन्या दोस्ताला–पोर्तुगालला–हत्यारें आणि इतर युद्धसाहित्य पुरवून मदत करीत आहे. ६४,४०,००० डॉलर्स किमतीचें युद्धसाहित्य पोर्तुगालनें अमेरिकेंतून

खरीदलें असून, या युद्धसाहित्याचा वापर विशेषतः अंगोल्यांत व इतर पोर्तुगीज वसाहतींत चालू असलेल्या मुक्तिआंदोलनांना दडपण्यासाठीं होणार हें उघड आहे.

तरीहि अंगोलाची जनता धैर्यानें स्वातंत्र्यासाठीं तयारी करीत आहे. वसाहतवादाचे दिवस संपले असल्यामुळें तिच्या मुक्ततेचा दिवसहि लवकरच उजाडेल, हें निश्चित.

• • •

## ११. मलागासी ( मादागास्कर )

**लोकसंख्या** – ५५ लक्ष; फ्रेंच व इतर युरोपियन्स २५ हजार.

**राजधानी** – तानानारिव्हे.

**राज्य** – स्वतंत्र प्रजासत्ताक ( १९६० ).

**मुख्य धंदा** – शेती व कॉफी-तंबाखूचे मळे.

१

मोझांबिकच्या खाडींतील मादागास्कर हें बेट १८९५ पासून फ्रेंच साम्राज्यवाद्यांच्या ताब्यांत होतें. हें बेट फ्रान्सपेक्षां मोठें असून तें जगांतील ४ थ्या क्रमांकाचें मोठें बेट आहे. तेथें कॉफीचें उत्पन्न मोठ्या प्रमाणावर होतें. त्याशिवाय लवंगा, व्हॅनिला, तांदूळ, साखर व तंबाखूचेंहि पीक होतें.

ह्या बेटाची लोकसंख्या ५५ लक्ष आहे आणि त्यांतील बहुसंख्य लोक बांटू आफ्रिकन आहेत. फ्रेंच व इतर युरोपियन लोकांची संख्या २५ हजार आहे. एका काळीं वैभवसंपन्न राजेशाहीचा ह्या देशांत विकास झालेला असल्यामुळें फ्रेंच सत्तेविरुद्धचा असंतोष तेथें फार झपाट्यानें वाढला. १९४७ मध्यें फ्रेंच सत्तेविरुद्ध जनतेनें एवढा मोठा उठाव केला कीं तो शांत करण्यासाठीं हजारों आफ्रिकन लोकांना ठार मारण्यांत आलें आणि हजारोंना कैद करण्यांत आलें; प्रमुख पुढाऱ्यांना देशांतून हद्दपार करण्यांत आलें.

१९५८ मध्यें फ्रेंच राष्ट्रकुटुंबांतर्गत स्वायत्त राज्याचा दर्जा आफ्रिकेंतील इतर फ्रेंच वसाहतींबरोबर ह्या देशाला प्राप्त झाला आणि १९६० मध्यें तो संपूर्ण स्वतंत्र झाला. **मलागासी प्रजासत्ताक** हें प्राचीन काळापासूनचें

नांव धारण करून त्यानें आपल्या स्वतंत्र जीवनाची वाटचाल सुरू केली आहे. राज्याचे अध्यक्ष **सिरिनाना** हे आहेत. तानानारिव्हे हें राजधानीचें शहर असून तामातेव हें प्रमुख बंदर आहे.

आंतसिरानें (डिंगो सुआरेझ) ह्या ठिकाणीं फ्रेंच साम्राज्यवाद्यांचा लष्करी विमान-तळ अजूनहि कायम असल्यामुळें स्वातंत्र्याला पूर्णता आलेली नाहीं. मुख्य आर्थिक सत्ता अद्यापहि फ्रेंच थैलीशहांच्याच हातांत आहे.

• • •

# १२. तांगानिका

**लोकसंख्या** – ९५ लक्ष ५० हजार. युरोपियन्स २२ हजार. आशियाई ९० हजार. अरबी २० हजार. आफ्रिकी १५ लक्ष.

**राजधानी** – दारेसलाम.

**राज्य** – स्वतंत्र प्रजासत्ताक ( १९६१ पासून ).

**मुख्य धंदा** – गुरांचें पालन, शिसमचे मळे, हिऱ्याच्या खाणी.

१

## ब्रिटिश पूर्व आफ्रिका

( प्रास्ताविक )—**तांगानिका, झांझिबार, केनिया, युगांडा**

काँगोच्या पूर्वेला व न्यासालँड-मोझांबिकच्या उत्तरेस लागून कांहीं वर्षांपूर्वीपर्यंत ब्रिटिश पूर्वआफ्रिका या नांवानें ओळखला जाणारा प्रदेश आहे. या प्रदेशांत तांगानिका, केनिया, युगांडा व झांझिबार बेटांचा समावेश होतो. १९ व्या शतकाच्या प्रारंभापर्यंत झांझिबारचा अरब सुलतान ह्या सर्व प्रदेशावर व त्यांतील संपत्तीवर नियंत्रण चालवीत असे. आणि म्हणूनच, " झांझिबारमध्यें बांसरी वाजली कीं तलावाच्या पूर्वेकडील सर्व आफ्रिकेला नाचावें लागतें, " अशी म्हण पडली होती. युरोपियन राष्ट्रांनीं आफ्रिकेसाठीं मारामाऱ्या केल्या त्या काळांत तांगानिकाचा प्रदेश जर्मनांच्या वर्चस्वाखालीं आणि केनिया, युगांडा व झांझिबार ब्रिटिशांच्या वर्चस्वाखालीं आला. पहिल्या जागतिक महायुद्धांत जर्मनीचा पराभव झाल्यानंतर तांगानिकाहि ब्रिटिशांचा " विश्वस्त प्रदेश " ( ट्रस्ट टेरिटरी ) बनला. अशा रीतीनें ह्या सर्व प्रदेशाला ब्रिटिशांची पूर्वेकडील वसाहत हें नांव प्राप्त झालें.

## तांगानिका

तांगानिकांतील दारेसलामचें नांव आपल्या देशांत अनेकांना परिचित आहे. इस्लाम पंथाचे श्रीमान राजे आगाखान यांची हीरक-तुला दारेसलाम येथेंच करण्यांत येते आणि त्यांचीं वर्णनें वर्तमानपत्रांत वाचावयास मिळतात.

तांगानिका राज्याच्या पश्चिमेला बेल्जिअम कॉंगो व दक्षिणेस न्यासालॅंड, मोझांबिक हीं राज्यें आहेत. किनाऱ्याजवळच्या प्रदेशांतील हवा उष्ण व दमट असून तेथें सदाहरित वृक्षांचें जंगल आहे. ही हवा आरोग्यदायक नाहीं. पण बाकीचा भाग पठाराचा आहे. पठारावर गवताळ प्रदेश आहे. तेथें गुरें व मेंढ्या यांचे कळप पाळले जातात. तेथें कॉफी, कापूस, मका व तंबाखू यांची लागवड होते. पण मुख्य पीक शिसम व हेम्प हिचें. ही वनस्पति अंबाडीसारखी उपयुक्त असून तिचें येथें रान झालेलें दृष्टीस पडतें. तिच्या पानांतील तंतूंपासून दोर व सुतळी तयार करतात. **किलिमांजारो** पर्वताच्या उतारावर हवा थंड व आल्हाददायक असून तेथें युरोपियन लोकांची वस्ती आहे.

तांगानिकाची लोकसंख्या **९० लक्ष ५० हजार** असून भारतीय व इतर आशियाई ९० हजार, अरबी लोक २० हजार व युरोपियन्स २२ हजार आहेत. **दारेसलाम** हें बंदर असून तेंच शहर राज्याची राजधानी आहे. **आरुशा व मोशी** ही भरभराटीला आलेली, थंड हवेची व मुख्यतः युरोपियन वस्तीची शहरें आहेत. हिऱ्यांच्या शोधामुळें तांगानिकाच्या राष्ट्रीय संपत्तींत भर पडली आहे. तागांनिकांत अनेक निरनिराळ्या जमाती (Tribes) राहतात पण त्या सर्वांना **स्वाहिली** भाषेनें एकत्र आणलें आहे. **मसाई** जमातींचे लोक सर्वांत पुढारलेले आहेत.

## २

१८९० च्या सुमारास तांगानिकावर जर्मन साम्राज्यवाद्यांचा अंमल चालू झाला. १९०३ मध्यें तांगानिकाच्या लोकांनीं जर्मनांविरुद्ध उठाव केला; तो साम्राज्यवाद्यांनीं अत्यंत क्रूरतेनें चिरडून टाकला. त्यांत **१ लक्ष २० हजार** आफ्रिकन लोक ठार झाले.

वसाहतींतील चांगली जमीन स्वतःसाठीं घेण्याचा खटाटोप जर्मनांनीं-सुद्धां केला. १९०५ मध्यें त्यांची बहुतेक सर्व चांगली जमीन साम्राज्य-वाद्यांनीं आपल्या ताब्यांत घेतली. पुढें १९१८ मध्यें पहिल्या महायुद्धाच्या अखेरीस तांगानिका ब्रिटिश साम्राज्यवाद्यांच्या ताब्यांत आल्यानंतर जर्मन-मालकीच्या ह्या जमिनी १९२३ मध्यें ब्रिटिशांनीं विक्रीला काढल्या. मुळांत त्या ज्यांच्या मालकीच्या होत्या त्या **वामेरू** लोकांनीं त्या मिळाव्यात म्हणून अर्ज केले आणि ब्रिटिशांनीं मागितलेल्या किमतीला त्या घेतल्या. १९३९ मध्यें शेवटचे हप्ते भरून आपल्याच जमिनी त्यांनीं परत विकत घेतल्या. पण जमिनीची मालकी मिळाल्याचें समाधान त्यांना दहा वर्षेंदेखील मिळालें नाहीं.

१९४६ मध्यें तांगानिका सरकारनें **अरुशा-मोशी-लँड कमिशन** नेमलें. कमिशनचा उद्देश अरुशा व मोशी जिल्ह्यांतील जमिनीचें पुनर्वाटप करणें हा होता. त्याचें कारण कमिशननें दिलें तें असें– “ अरुशा व मोशी जिल्ह्यांतील जमीन अगदीं यथार्थानें सोन्यापेक्षां अधिक मूल्यवान आहे. ”

अशी ही जमीन ब्रिटिश वसाहतकारांना हवी होती आणि म्हणूनच कमिशन नेमून त्यास “ स्थानिक रहिवाशांखेरीज इतरांना जमीन वांटून देण्याची योजना आंखण्याची ” कामगिरी देण्यांत आली. कमिशननें वामेरू लोकांनीं ती जमीन सोडून द्यावी, असा निर्णय दिला. ही सुपीक जमीन गोऱ्या वसाहतकारांना पाहिजे होती; त्याप्रमाणेंच आफ्रिकन शेत-कऱ्यांना दरिद्री बनवून, कर भरण्याच्या निमित्तानें, युरोपियन लोकांच्या सिसमच्या मोठमोठ्या शेतांवर, इतर मळ्यांवर व बागांतून काम करण्यास भाग पाडावें, हा हेतूहि जमीन काढून घेण्याच्या पाठीशीं होता.

कमिशनचा निर्णय येतांच, १० डिसेंबर १९५१ रोजीं बळाच्या जोरावर जमिनी ताब्यांत घेण्याच्या कामाला प्रारंभ झाला. मेरुभूमीवर घरांना आगी लावण्याचें व झाडें तोडण्याचें काम करण्यास पोलिस आले. हें काम जवळ जवळ वर्षभर चाललें होतें. त्या सत्रांत उभीं शेतें व गांवेंच्या गांवें भस्मसात् करण्यांत आलीं.

हा सर्व प्रकार १९५१ सालीं घडला आणि तांगानिकाच्या लोकांनीं यूनोच्या विश्वस्तमंडळाकडे त्याविरुद्ध तक्रारी पाठविल्या; कारण दुसऱ्या

महायुद्धानंतर तांगानिकाचें राज्य यूनोचा "विश्वस्त प्रदेश" म्हणून ब्रिटिशांच्या ताब्यांत होतें.

तांगानिकाचा जवळजवळ ⅔ भाग त्से-त्से माश्यांच्या त्रासामुळें निरुपयोगी झालेला आहे आणि त्यामुळें जमिनीचा प्रश्न अधिकच तीव्रतेनें जाणवतो. त्यांत मूठभर युरोपियन लोकांनीं उत्तम जमिनी ताब्यांत घेतल्यामुळें स्वतःच्या हक्कांबद्दल जागृत झालेल्या लोकांना हा अन्याय व विषमता अधिकच जाणवते. उदाहरणार्थ, किलिमांजारो पर्वताच्या व आजूबाजूच्या डोंगरांच्या उतरणीवर युरोपियन मालकीचे कॉफीचे मळे आहेत. खालच्या मैदानावर मसाई लोक गुरें पाळून राहतात. पण युरोपियन लोकांच्या वस्तीच्या डोक्यावर छागा लोक राहतात. हे फार हुशार आहेत. आणि तेथें सहकारी पद्धतीनें कॉफीचे मळे पिकविले असून ते चांगलेच भरभराटीला आले आहेत. त्यांना कॉफीसाठीं आणखी प्रदेश पाहिजे आहे पण युरोपियन लोकांनीं डोंगर-उतरणी अडवल्या आहेत आणि मैदानावरील मलेरियाच्या प्रदेशांत जाण्याची छागांची इच्छा नाहीं, त्यामुळेंच १९३७ मध्यें त्यांनीं जमिनीसाठीं बंड पुकारलें. "निद्रिस्त" समजल्या गेलेल्या तांगानिकांत स्वातंत्र्याची जागृति अशा मागण्यांतून निर्माण झाली.

खाणींतून निघणाऱ्या नफ्याच्या आंकड्यांनींसुद्धां तांगानिकांत आपण लुबाडले जात आहोंत, ही भावना अधिक दृढ होऊं लागली. १९५८ मध्यें ६० लक्ष पौंड किमतीचे धातु ब्रिटिश मालकीच्या खाण कंपन्यांनीं काढले; त्यांतील ४४ लक्ष पौंड किमतीचे हिरे होते; आणि ते वादुई येथील विलिअमसन ह्या खाणींतून काढण्यांत आले होते. ब्रिटिश राज्यकर्त्यांना श्रीमंत बनविणाऱ्या ह्या तांगानिकांतील लोक मात्र फारच गरीब आहेत. सिसलच्या मळ्यावर सर्वांत अधिक कामगार काम करतात पण त्यांना १९५९ च्या एका अहवालाप्रमाणें महिन्याला केवळ ३१ शिलिंग मिळत असत. इतर राज्यांप्रमाणें सामाजिक सवलतींचा येथें अभाव आहे, हें सांगायला नकोच. ह्या परिस्थितीमुळें कामगारांच्या व शेतमजुरांच्या ट्रेड युनियन संघटना दुसऱ्या महायुद्धानंतरच्या काळांत उदयास आल्या आणि त्यांनीं राष्ट्रीय चळवळीचा पाया मजबूत केला.

## ३

आफ्रिकेच्या दक्षिणेकडील राज्यांच्या मानानें युरोपियन वसाहतकारांची संख्या तांगानिकांत अगदींच तुटपुंजी असल्यामुळें आपलें वर्चस्व टिकविण्यासाठीं त्यांनीं निराळीच युक्ति अमलांत आणली. तांगानिकांत त्यांनीं "वांशिक समानता" (Racial parity) किंवा "वांशिक अ-भिन्नता" (Non-racialism) हें तत्त्व पुढें मांडलें आणि १९५५ च्या घटनेप्रमाणें विधानसभेंत ११ आफ्रिकन, ११ युरोपियन व ११ आशियाई अशा जागा प्रतिनिधींना दिल्या. अर्थातच ९५ लक्ष आफ्रिकन लोकांना ११ जागा आणि २२ हजार युरोपियन लोकांना ११ जागा अशी वांटणी तांगानिकाची जनता कायमची मान्य करील हीं ब्रिटिश राज्यकर्त्यांचीं सुखस्वप्नें लौकरच खोटीं ठरलीं. राष्ट्रीय स्वातंत्र्यचळवळीचा उदय होतांच ब्रिटिश साम्राज्यवाद्यांच्या घटनेनेंच त्यांचा पराभव केला.

१९५४ मध्यें **ज्युलिअस नायरेरे** यांच्या पुढाकाराखालीं **तांगानिका आफ्रिकन नॅशनल युनियन** (तानु) या संस्थेचा जन्म झाला. वायुवेगानें तिची संघटना इतकी वाढत गेली आणि तिनें राष्ट्रीय स्वातंत्र्य ताबडतोब मिळालें पाहिजे, ह्या मागणीचा पुरस्कार केला.

१९५८ मध्यें तांगानिकांत पहिली सार्वत्रिक निवडणूक झाली. ह्या निवडणुकींत मतदारांची यादी एकच होती; प्रत्येकाला तीन मतें होतीं; एक मत युरोपियन प्रतिनिधीला, एक आफ्रिकन प्रतिनिधीला व एक आशियाई प्रतिनिधीला. ज्युलियस नायरेरे यांच्या तानु पक्षानें तांगानिकाच्या स्वातंत्र्याला पाठिंबा देणारे सर्व वंशाचे प्रतिनिधि उभे केले आणि ते सर्व निवडून आले. अशा रीतीनें स्वातंत्र्यभावनेचा नेत्रदीपक विजय झाला. तांगानिकाला स्वातंत्र्य देण्याची तारीख निश्चित करणें त्यानंतर ओघानेंच आलें. १९६० मध्यें ज्युलिअस नायरेरेंच्या नेतृत्वाखालीं तांगानिकाचें पहिलें मंत्रिमंडळ अस्तित्वांत आलें. १९६१ मध्यें तांगानिकाचें स्वतंत्र राज्य निर्माण झालें आणि १९६२ मध्यें पहिल्या स्वातंत्र्यमहोत्सवाच्या वेळीं तांगानिकाचें प्रजासत्ताक राज्य (Republic) स्थापन झालें.

इतर नव-स्वतंत्र आफ्रिकन राष्ट्रांप्रमाणेंच तांगानिकाला राष्ट्राच्या उन्नतीसाठीं उद्योगधंदे काढण्याच्या आणि राष्ट्रीय कारभारांत आफ्रिकन लोक व तंत्रज्ञ तयार करून कामाला लावण्याच्या कामगिरीचा श्रीगणेशा करावा लागला. त्या दिशेनें आतां तांगानिकाची वाटचाल झपाट्यानें चालू झाली आहे.

तांगानिकानें अलिप्ततावादी परराष्ट्रीय धोरणाचा स्वीकार केला असून सर्व राष्ट्रांबरोबर मैत्रीचे संबंध प्रस्थापित केले आहेत. आफ्रिकन ऐक्य व वसाहतविरोधी लढ्याला हें सरकार मदत देते. झांझिबारबरोबर संयुक्त प्रजासत्ताक स्थापन करून तांगानिकानें एका नव्या पद्धतीनें आफ्रिकेच्या छोट्या छोट्या प्रदेशांना एकत्र आणण्याच्या कल्पनेला हातभार लावला आहे. ( पुढील प्रकरण पाहा. )

# १३. झांझिबार-पेम्बा वगैरे

**लोकसंख्या** – ३ लक्ष. ५० हजार अरब, १७ हजार भारतीय, २ लक्ष ३० हजार आफ्रिकी.

**राजधानी** – झांझिबार.

**राज्य** – स्वतंत्र प्रजासत्ताक (डिसेंबर १९६३ पासून).

**मुख्य धंदा** – लवंगाचे मळे, नारळीच्या बागा, पोंवळी-शंख-शिंपल्यांची कारागिरी.

## तांगानिका – झांझिबार संयुक्त प्रजासत्ताक

**स्थापना** – एप्रिल १९६४.

१

तांगानिकाच्या पूर्व किनाऱ्यावर असलेलीं झांझिबार, पेम्बा व इतर अनेक लहान बेटें हीं लवंगाचीं बेटें. ह्या बेटांवर ३ लाखांवर लोकवस्ती असून त्यांतील ५० हजार अरब व १७ हजार भारतीय आहेत; बाकीचे स्वाहिली भाषा बोलणारे आफ्रिकन लोक आहेत; त्यांच्यापैकीं बहुतेक धर्मानें मुसलमान आहेत.

जगांतील लवंगांच्या पुरवठ्यापैकीं ¾ **पुरवठा** करण्याचें भाग्य ह्या बेटांना लाभलें आहे. पण १८९० मध्यें ब्रिटिश साम्राज्यवाद्यांनीं हीं बेटें जिंकून घेतलीं, आणि आतां ब्रिटिश-नियंत्रणाखालील मक्तेदारी कंपनी **क्लोव्ह ग्रोअर्स असोसिएशन** लवंगांचा व लवंग तेलाचा व्यापार काबीज करून बसली आहे.

पारतंत्र्याच्या काळांत बहुसंख्य लोक अगदीं गरीब, आणि त्यांच्यांत क्षयरोगाचा प्रसार फार मोठ्या प्रमाणावर अशी स्थिति होती.

ब्रिटिश-संरक्षणाखालील स्वतंत्र राजेशाही मुलूख असा ह्या विश्वस्त

प्रदेशाचा राजकीय दर्जा १९६३ अखेरपर्यंत होता व प्रत्यक्षपणें सर्व कारभार ब्रिटिश रेसिडेन्टच्या हातांत होता.

झांझिबार नॅशनॅलिस्ट पार्टी, आफ्रो शिराझी पार्टी, झांझिबार अँड पेम्बा पीपल्स पार्टी व कम्युनिस्ट पार्टी हे येथील प्रमुख राजकीय पक्ष आहेत. आफ्रो-शिराझी पार्टी (जिच्यांत बहुसंख्य शिराझी आफ्रिकन जमातींचे लोक आहेत) आणि नॅशनॅलिस्ट पार्टी (जिच्यावर श्रीमत अरबी लोकांचें प्रभुत्व आहे) ह्या दोन पक्षांत ब्रिटिश साम्राज्यवाद्यांनीं कलह पेटविला आणि १९६१ च्या सुलतानाच्या हुकमतीखालील कायदे-मंडळाच्या निवडणुकांपासून ही तेढ वाढतच गेली. ह्या निवडणुकांत शिराझी पक्षाला एकूण मतदानापैकीं निम्मीं मतें मिळालीं पण नॅशनॅलिस्ट पार्टीला बहुसंख्य जागा मिळाल्या. नॅशनॅलिस्ट पक्षानें व झांझिबार-पेम्बा पीपल्स पार्टीनें संयुक्त मंत्रिमंडळ तयार केलें, पण दंग्यांना प्रारंभ झाला आणि देशांत आणीबाणीची परिस्थिति जाहीर करण्यांत आली. सर्व तऱ्हेच्या राजकीय हालचालींवर बंदी बसल्यामुळें मक्तेदारांच्या पिळवणु-कीला रान मोकळें झालें.

अखेर, १९६२ च्या डिसेंबरमध्यें, १॥ वर्षांच्या कालावधीनंतर आणी-बाणीची परिस्थिति रद्द झाल्याचें ब्रिटिश रेसिडेन्टनें जाहीर केलें. ताबडतोब स्वातंत्र्याच्या मागणीसाठीं व ब्रिटिश लष्कर काढून घेण्यासाठीं निदर्शनें सुरू झालीं आणि त्यांत अरब, आफ्रिकन व बुरखे घेतलेल्या स्त्रियाहि भाग घेऊं लागल्या; त्यामुळें १९६३ च्या जूनमध्यें झांझिबार व पेम्बा बेटांना अंतर्गत स्वायत्तता दिल्याचें ब्रिटिश वसाहत कचेरीनें जाहीर केलें. १९६३ च्या ९ डिसेंबरला रात्रीं झांझिबारनें स्वातंत्र्य मिळविलें आणि ब्रिटिश साम्राज्यवाद्यांचा सूर्य आणखी एका भूप्रदेशावर मावळला.

नवस्वतंत्र झांझिबारवर (पूर्वींच्या गुलाम-मालकांचें वंशज असलेल्या) सुलतानाच्या आधिपत्याखालीं नॅशनॅलिस्ट पार्टी व पीपल्स पार्टी यांच्या संयुक्त सरकारचें राज्य प्रस्थापित झालें पण जनतेच्या अधिक विश्वासांतला आफ्रो-शिराझी पक्ष मात्र सरकारांत समाविष्ट नव्हता. तशांत उम्मा (पीपल्स) पार्टीला जानेवारींत बेकायदेशीर ठरवून सरकारनें श्रमिक जनतेचा रोष

ओढवून घेतला. परिणामीं १२ जानेवारी ( १९६४ ) रोजीं तेथें **रक्तहीन क्रांति** होऊन जनतेच्या प्रजासत्ताक राज्याची स्थापना झाली. आफ्रो-शिराझी पार्टीचे पुढारी शेख अबेद अमानी कारुमे ( राष्ट्राध्यक्ष ), शेख अब्दुल्ला हंगा ( उपाध्यक्ष ) आणि उम्मा पार्टीचे पुढारी शेख महमद अब्दुल बाबू ( गृहमंत्री ) यांचा समावेश असलेलें सरकार राज्यावर आलें. क्रांतिकारक कौन्सिलच्या ह्या सरकारनें अनेक सामाजिक व आर्थिक बदल घडवून आणले. सरंजामदारांची जमीन जप्त करून गरीब शेतकऱ्यांना वांटून दिली; मोठेमोठे मळे सरकारी मालकीचे केले, श्रीमंत व्यापाऱ्यांची धनदौलत ताब्यांत घेतली आणि ब्रिटिश अधिकाऱ्यांना काढून टाकलें. अमेरिकेचा अंतराळ संशोधन तळ उठवायला लावून आणि समाजसत्ता-वादी देशांबरोबर मैत्रीचे संबंध प्रस्थापित करून ह्या सरकारनें आपलें शांततावादी परराष्ट्रीय धोरण जाहीर केलें.

## तांगानिका-झांझिबार संघराज्य

२२ एप्रिल १९६४ रोजीं तांगानिकाचे अध्यक्ष ज्युलिअस नायरेरे व झांझिबार-पेम्बा जनता प्रजासत्ताकाचे अध्यक्ष अबेद कारुमे यांनीं दोन्ही राज्यांचें **संयुक्त राज्य** स्थापन केल्याची घोषणा केली. तांगानिकाच्या राष्ट्रीय विधिमंडळानें व झांझिबारच्या क्रांतिकारक कौन्सिलनें ठराव करून त्या निर्णयास पाठिंबा दिला.

परराष्ट्र खातें, संरक्षण, परदेशांबरोबरचा व्यापार, वाहतूक इत्यादि खातीं संघराज्याच्या अधिकारांत राहणार असून मध्यवर्ति लोकसभा स्थापन करण्यांत येईल. नव्या राज्याचे अध्यक्ष व पंतप्रधान तांगानिकाचे नायरेरे असून झांझिबारचे अध्यक्ष संघराज्याचे उपाध्यक्ष आहेत. झांझिबारचे परराष्ट्र मंत्री व लोकप्रिय नेते महमद बाबू हे एक नियोजन मंत्री आहेत. झांझिबारचे उपाध्यक्ष कासीम हंगा उद्योग-खाण व वीज मंत्री आहेत.

हें संघराज्य झांझिबारच्या कम्युनिस्ट मतप्रणालीच्या सरकारला पायबंद घालील अशी आशा साम्राज्यवाद्यांना वाटतें; पण आफ्रिकेंतील जनता मात्र एकी, स्वातंत्र्य, सार्वभौमत्व व विकास ह्या मार्गावर पडलेलें हें पुढचें पाऊल समजून त्याचें स्वागत करीत आहे.

● ● ●

# १४. केनिया

**लोकसंख्या** – ६५ लक्ष. १ लक्ष ७० हजार भारतीय, ६० हजार युरोपियन्स, ६२ लक्ष आफ्रिकी.

**राजधानी**–नैरोबी.

**राज्य**–स्वतंत्र प्रजासत्ताक.

**मुख्य धंदा**–कॉफी-चहाचे मळे, तांब्याच्या व सोन्याच्या खाणी.

१

तांगानिकांत जर्मन साम्राज्यवाद्यांनीं ठाण मांडलें तेव्हां मोंबासापासून युगांडापर्यंत रेल्वे-रस्ता तयार करून तो सर्व टापू आपल्या ताब्यांत ठेवण्याचा ब्रिटिशांनीं खटाटोप चालविला. ही रेल्वे बांधीत असतांनाच सध्यांचें केनियाचें राज्य अस्तित्वांत आलें. रेल्वे बांधण्यास १८९६ मध्यें प्रारंभ झाला. ब्रिटिशांनीं भारतांतून मजूर आणून रेल्वे बांधली. त्यामुळें स्थायिक भारतीयांची संख्या वाढत गेली. किनाऱ्यावरील बंदरें व शहरें येथें भारतीय व्यापारी प्रथमपासूनच होते. त्यामुळें केनियांतील बराचसा व्यापार त्यांनीं आपल्या ताब्यांत घेतला.

आज केनियाची लोकसंख्या सुमारें **६५ लक्ष** आहे, त्यांत **१ लक्ष ७० हजार** भारतीय, **३७ हजार** अरब व **६० हजार** युरोपियन्स आहेत.

**नैरोबी** शहर केनियाची राजधानी आहे. ह्या शहराच्या आजूबाजूचा प्रदेश उंच पठाराचा असून अत्यंत आल्हाददायक आहे. खुद्द नैरोबी शहर ५५०० फूट उंचीवर असून एका काळीं इंग्रजाचें विलासमय जीवन व ऐश्वर्य यांचें प्रतिक होतें. पूर्व आफ्रिकेच्या पठारावर नवें वैभवशाली इंग्लंड जन्माला आलें आहे, असें वर्णन पूर्वीं युरोपियन लोक अभिमानानें करीत असत. त्या ठिकाणीं जाणाऱ्यांना, मैलच्या मैल लांब तारांचीं कुंपणें घातलेलीं

आहेत; त्यांत धष्टपुष्ट इंग्लिश गाई चरत आहेत; गवताचे प्रचंड भारे रचून ठेवलेले आहेत; लांबवर झाडींत इंग्रज मळेवाल्यांचे टुमदार बंगले आहेत; इंग्रज तरुणी घोड्यावर बसून फिरायला निघाल्या आहेत; मधून मधून आरामगृहें व दारूचे गुत्ते आहेत; त्यांच्याभोंवतीं मोटारींच्या रांगा लागलेल्या आहेत, असा देखावा पाहावयास मिळतो.

त्याच्या उलट, मिमोझाच्या झुडपांत **लुओ** लोकांच्या मातीच्या झोंपड्या आहेत; त्यांच्याभोंवतीं कांटे पसरलेले आहेत. **मसाई** लोकांजवळ गुरांना चरायला गवताळ जागा नाहींत; त्यांच्या राखीव वस्त्यांत बेसुमार गर्दी झालेली आहे; त्यांना व्हिक्टोरिया तलावाजवळच्या सखल, रोगग्रस्त हवेच्या जागेंत राहावें लागत आहे; सिसलची लागवड करून पैसे मिळविण्यास त्यांना बंदी आहे; नैरोबीच्या बाजारांत गुरेंढोरें घेऊन जाण्यासाठीं युरोपियन लोक त्यांना रस्ता द्यायला तयार नाहींत असाहि दुसरा देखावा पाहावयास मिळतो.

आफ्रिकन लोकांनीं इंग्रज मळेवाल्यांच्या मळ्यांत स्वस्त वेतनावर काम करावें म्हणून त्यांच्या जमिनी ब्रिटिश साम्राज्यवाद्यांनीं काढून घेतल्या आणि त्यांच्यावर कर बसविण्यांत आले. प्रत्येक आफ्रिकन माणसाकडून १५ शिलिंग झोंपडी कर, ८ शिलिंग स्थानिक कर व २ शिलिंग सहकारी कर असा कर वसूल करण्यांत येऊं लागला. आफ्रिकेच्या जीवनाची ही जुलमी कहाणी केनियांत अधिकच प्रकर्षानें जाणवते कारण ज्या **किकियू** लोकांची जमीन काढून घेण्यांत आली ते मोठे स्वाभिमानी असून त्यांनीं ह्या अन्यायाविरुद्ध मोठा लढा केला. त्याच्या निवेदनापूर्वी जमिनीची कहाणी पाहूं या.

## २

" व्हाईट हायलंड्स " ( गोऱ्यांचें पठार ) ह्या नांवानें ओळखला जाणारा प्रदेश चार हजार फूट उंच असल्यामुळें तेथील हवा थंडगार आहे. जमीन सुपीक आहे. ह्या ठिकाणीं वस्ती करून शेती करण्याचें इंग्रज लोकांनीं ठरविलें तेव्हां तेथें किकियू लोक शेती करून राहात होते. त्यांना युरोपियन लोकांनीं हांकलून दिलें. शेजारींच मसाई लोक गुरें चारीत हिंडत होते

त्यांनाहि हुसकावून लावण्यांत आलें. एकेका इंग्रज वसाहतवाल्यानें शेंकडों मैलांच्या प्रदेशाला कुंपण घालून तो स्वतःच्या ताब्यांत घेतला.

१९०१ मध्यें ह्या भागांत फक्त १३ गोरे वसाहतकार होते. पण १९०४ च्या अखेरीपर्यंत त्यांनीं २ लक्ष २० हजार एकर जमीन ताब्यांत घेतली. त्यानंतर तर जमिनी बळकावण्याला ऊत आला. सिंडिकेट्स, सट्टेवाले व पैसेवाले धावून आले. ईस्ट आफ्रिकन सिंडिकेटनें ३,२०,००० एकर जमीन बळकावली; आयलँड्स ऑफ ईस्ट आफ्रिका सिंडिकेट लिमिटेडनें ३,५०,००० एकर घेतले; ग्रोगन फॉरेस्ट कन्सेशन्सनें २,००,००० एकर जमीन मिळविली. गोऱ्या वसाहतकारांचे थवेच्या थवे जमिनीची ही महति ऐकून येऊं लागले. त्यांत लॉर्ड डेलामेर यास १ लक्ष एकर जमीन मिळाल्यामुळें तो वसाहत-कारांचा पुढारीच बनला. १९०५ ते १९१४ च्या दरम्यान किकियू लोकांची ४४ लक्ष एकर जमीन ह्या वसाहतकारांनीं ताब्यांत घेतली. ही हांव वाढतच गेली. अखेरीस केनियांतील पिकाऊ जमिनीपैकीं **निम्मी** जमीन गोऱ्या लोकांनीं आपल्या ताब्यांत घेतली. आफ्रिकन लोकांची वस्ती युरोपियन वस्तीपेक्षां १५० पट आहे ही वस्तुस्थिति लक्षांत घेतां केनियांतील अन्याया-वर लख्ख प्रकाश पडतो.

ह्या सुपीक व अमाप जमिनींत इंग्रज लोकांनीं कापूस, गहूं, मका, चहा, कॉफी व सिसल यांचे मळे पिकविले. त्याच्या जोडीला गुरांचें पालन केलें आणि नानाप्रकारच्या भाज्या, बटाटे, रताळीं लावून समृद्ध जीवनाची मजा लुटली. शेतांत जबरदस्तीनें किकियू लोकांना मजुरीला लावूनच त्यांनीं धन कमाविल्यामुळें जखमेवर मीठ चोळलें गेलें. स्वातंत्र्यपूर्व काळांतील केनियाच्या जीवनाचें मुख्य शल्य इंग्रज लोकांनीं उघड उघड रीतीनें केलेली जमिनीची लूट हेंच होतें.

## ३

आपण केलेली लूट सतत टिकवतां यावी म्हणून इंग्रजांनीं केनियांत सर्व राजकीय सत्ता प्रारंभीं स्वतःच्याच हातांत ठेवली होती. दक्षिण आफ्रिके-प्रमाणेंच केनियांतहि वंश-भिन्नतेचें व वंश-द्वेषाचे राजकारण व वातावरण होतें. ह्या सर्वांचा परिणाम होऊन आफ्रिकन लोकांत चीड व संताप

निर्माण झाला. आफ्रिकन लोकांचें आर्थिक व राजकीय हक्कांसाठीं आंदोलन सुरू झालें.

परसत्तेविरुद्धच्या ह्या आंदोलनाच्या आघाडीवर किकियू लोक होते. १९४६ मध्यें **जोमो केन्याटा** यांच्या मार्गदर्शनाखालीं **किकियू सेंट्रल असोसिएशन** अस्तित्वांत आली. पण आफ्रिकन लोकांनीं राजकीय हक्कांची मागणी करणें म्हणजे " घातपाती चळवळ करणें, " असें वसाहतकारांचें मत होतें. त्यामुळें ही संस्था बेकायदेशीर ठरवून बंद करण्यांत आली. आफ्रिकन लोकांच्या तक्रारी दूर करण्याचे प्रयत्न मात्र झाले नाहींत; त्यांना विधानसभेंत नाममात्र प्रतिनिधित्व देण्यांत आलें. असोसिएशनवर बंदी घालण्यांत आल्यानंतर तिच्या पुढाऱ्यांनीं अभ्यास-मंडळाच्या रूपानें नवी संस्था स्थापन केली आणि तिच्यांतूनच पुढें **केनिया आफ्रिकन नॅशनल युनियन** ( कानू ) जन्माला आली. १९४७ मध्यें जोमो केन्याटा यांची तिचे अध्यक्ष म्हणून निवड झाली. केन्याटा यांनीं तिला सर्व राष्ट्रीय वृत्तीच्या लोकांचें संघटित केंद्र हें स्वरूप देण्याचा प्रयत्न केला आणि युनियनची सभासद-संख्या १० लक्षांवर गेली. वसाहतकारांनीं व साम्राज्यवादी राजवटीनें तिला "किकियूं"ची संस्था संबोधून इतर जमातींना तिच्या विरुद्ध चिथावण्याचा चंग बांधला. तरीसुद्धां आफ्रिकन जनतेची वाढती एकजूट व राष्ट्रप्रेम यांमुळें आपल्या वर्चस्वाला धोका निर्माण होईल ह्या भीतीमुळें सत्ताधाऱ्यांनीं दडपशाहीला प्रारंभ केला. " माऊ माऊ " संघटनेचे लोक खून व घातपाती कृत्यें करीत आहेत अशी सर्व वर्तमानपत्रांतून ओरडा-आरड सुरू झाली आणि किकियूंच्या खास वस्तीवर लष्कराची धाड आली. माऊ माऊला उत्तेजन दिल्याच्या आरोपाखालीं जोमो केन्याटांना १९५२ मध्यें अटक करण्यांत आली आणि त्यांना ७ वर्षांची सजा ठोठावण्यांत आली. केनियांत " आणीबाणीची परिस्थिति " जाहीर करण्यांत आली.

१९५१ ते १९५६ ह्या पांच वर्षांत सम्राज्यवाद्यांच्या खास पोलिसांनीं केनियांत धुमाकूळ घातला. कर्फ्यू, पासेस व परमिटांनीं किकियूंना हैराण करण्यांत आलें. सर्व राजकीय पक्षांवर करडी नजर ठेवण्यांत आली. हजारों लोकांना व राजकीय कार्यकर्त्यांना संशयावरून बेमुदत बंदिस्त करण्यांत

आलें. ब्रिटिश सरकारनें केनियाच्या सरकारला २ कोटि ८० लक्ष पौंड मदत दिली व दोन लष्करी तुकड्या केनियांत पाठविल्या. दहशतवादी चळवळ म्हणून जगभर जिचा गाजावाजा व नाचक्की करण्यांत आली त्या ह्या माऊ माऊ उठावाच्या सत्रांत **५३ गोरे व १२००० आफ्रिकन लोक** मारले गेले. दडपशाहीची कल्पना देण्यास हे आंकडे समर्थ आहेत-

दडपशाहीनें केनिया शांत होत नाहीं असें पाहून राज्यकर्त्यांनीं तड-जोडीस प्रारंभ केला. वंश-भिन्नतेची प्रथा बंदुकीच्या धाकदपटशाखालीं अमलांत आणणाऱ्या केनियांत "बहुवांशिकते"च्या तत्त्वज्ञानाचे गोडवे गाण्यांत येऊं लागले. एक आफ्रिकन व दोन भारतीय मंत्री केनियाच्या मंत्रिमंडळांत घेण्यांत आले. पण १९५७ मध्यें झालेल्या निवडणुकांत ह्या मधाच्या बोटानें जनता खूष होणार नाहीं, हें सिद्ध केलें; जनतेनें बहुमतानें राष्ट्रवादाचा पुरस्कार केला. १९५८ मध्यें केनियाच्या सरकारनें पुष्कळच पुढचें पाऊल टाकलें आणि विधिमंडळांत आफ्रिकन लोकांना **समान प्रतिनिधित्व** देऊं केलें. राष्ट्रवादी पुढाऱ्यांनीं ही योजना फेंटाळून लावली. अखेर १९६० मध्यें **बहुसंख्य आफ्रिकन** लोकप्रतिनिधींची निवड होईल, अशा घटनेला मान्यता देणें सत्ताधाऱ्यांना भाग पडलें. त्या वेळीं आणी-बाणीची परिस्थिति रद्द करून राजकीय पक्षांना कार्य करण्यास मोकळीक देण्यांत आली आणि साम्राज्यवाद्यांनीं आपले डावपेंच मुत्सद्दीपणानें टाक-ण्यास प्रारंभ केला.

त्यांनीं केनिया आफ्रिकन नॅशनल युनियन (कानू) मधील कांहीं पुढाऱ्यांना फोडले; त्यांना पैसे दिले आणि केनिया आफ्रिकन डेमॉक्रेटिक युनियन (काडू) जन्माला आली. मसाई, कालेन्जिन ह्या लहान जमातींच्या हक्क-रक्षणाचा दावा पुढें करून तिनें लोकांतील द्वेषभावनांना उत्तेजन देण्यास प्रारंभ केला. काडूच्या मदतीनें १९६२ मध्यें जी घटना साम्राज्यवाद्यांनीं देशाच्या माथीं मारली तिच्यांत मध्यवर्ति सरकार निर्बल राहील व विभागांना फुटीरपणा करतां येईल अशी तरतूद होती. किंबहुना देशाच्या फाळणीचा मालमसाला तिच्यांत ठासून भरलेला होता.

१९६३ च्या मेमध्यें झालेल्या निवडणुकांत काडूचे उमेदवार निवडून यावे म्हणून गोऱ्या मालमत्तेदारांनीं २५ हजार पौंड तिला दिले; मतदार-

संघांची रचना वसाहतकारांनीं अशी केली कीं, समान जागा जिंकण्यासाठीं कानूला काडूपेक्षां ५० टक्के अधिक मतें मिळविणें आवश्यक व्हावें. गोऱ्या वसाहतकारांनीं गुप्त लष्करी संघटना उभारून मतदारांवर अत्याचार व धाकदपटशा करण्याचे प्रयत्न केले. पण लांचलुचपत, मुत्सद्देगिरी, दहशत या सर्वांना न जुमानतां कानूनें घवघवीत बहुमत मिळविलें आणि **जोमो केन्याटांचें** मंत्रिमंडळ स्थापन झालें. त्यानें ताबडतोब स्वातंत्र्य, ब्रिटिश लष्कर काढून घेणें व घटनेंत फेरबदल ह्या मागण्या सांगितल्या. तांगानिका व युगांडाच्या सरकारांनीं त्यांना पाठिंबा जाहीर केला.

अखेरीस नाइलाज होऊन ब्रिटिश सरकारनें १२ डिसेंबर १९६३ रोजीं स्वातंत्र्य देण्याचें आणि एका वर्षाच्या आंत लष्कर काढून घेण्याचें मान्य केलें; पण घटना बदलण्यास नकार दिला. ऑक्टोबर १९६३ मध्यें लंडन येथें झालेल्या वाटाघाटींत हा प्रश्न घसास लागला. पूर्वींची घटनाच कायम टिकविण्याचा काडू-पुढाऱ्यांचा हट्ट न मानल्यास स्वातंत्र्याची तारीख पुढें ढकलावी लागेल, असें दडपणहि ब्रिटिश साम्राज्यवाद्यांनीं आणलें. पण कानूच्या पुढाऱ्यांनीं ठाम भूमिका घेऊन स्वातंत्र्य मिळविण्याचा व योग्य घटनाहि मिळविण्याचा निर्धार व्यक्त केला; व त्याला मान्यता देणें ब्रिटिशांना भाग पडलें. पराभूत झालेल्या काडू पुढाऱ्यांनीं रीफ्ट व्हॅली, कोस्ट व वेस्टर्न हे तीन प्रांत स्वतंत्र करण्याची धमकी दिली. पण अखेर स्वातंत्र्य व ऐक्य यांनीं भारावलेल्या वातावरणामुळें काडू पुढारी रॉबर्ट नगाला यांनीं तात्पुरती माघार घेतल्याचें जाहीर केलें. असें असलें तरी फुटीर वृत्तीचा धोका मात्र नष्ट झालेला नाहीं.

केनियाचा पुढील विकास कसा होणार ? हा प्रश्न सध्यांतरी कांहींसा अस्पष्ट आहे. सत्ताधारी कानू पक्षानें "लोकशाहीवादी समाजवादी केनिया" स्थापन करणें हें ध्येय असल्याचें घोषित केलें आहे. परंतु समाजवाद कसा, कोणत्या प्रकारचा याबद्दल पक्षांत एकमत झालेलें नाहीं. पक्षाच्या कांहीं पुढाऱ्यांच्या मतें वाहतूक, बँका, विमा कंपन्या, वीज इत्यादि धंद्यांचें राष्ट्रीयीकरण ताबडतोब करून योजना आंखाव्यात असें आहे; तर कांहींवर उद्योगधंद्यांच्या खासगी मालकांचें दडपण आहे. सरकारी मालकीच्या उद्योगधंद्यांबद्दल त्यांना विशेष आस्था वाटत नाहीं. जमीनमालकीच्या

व संबंधांच्या बाबतींतहि असेंच दुमत आहे. सरकारनें सध्यां ( चहा, कॉफी, सिसल व ऊंस यांचे मळे सोडून ) युरोपियन लोकांकडून ३० लक्ष एकर जमीन चार वर्षांत विकत घेण्याची योजना जाहीर केली आहे. ती अपुरी आहे असा मतप्रवाह सरकारांतच आहे. तसेंच परराष्ट्रीय धोरण समाजवादी देशांसह सर्व देशांबरोबर सहकार्याचे संबंध ठेवण्याचें असावें असें मत सत्ताधारी पक्षांत वाढतें आहे. ह्या मतप्रवाहांच्या संघर्षांतूनच केनियांतील पुढील विकास होणार आहे.

• • •

# १५. युगांडा

**लोकसंख्या**–६५ लक्ष २६ हजार. ७० हजार भारतीय.

**राजधानी** – एन्टेब्बे.

**राज्य** – स्वतंत्र देश.

**मुख्य धंदा** – कॉफीचे मळे.

१

युगांडा हा देश केनिया, तांगानिका, रुआंडा, कॉंगो व सुदान या देशांच्या मधोमध कोंदणासारखा वसलेला आहे. म्हणूनच त्याला आफ्रिकेचा मौक्तिक म्हणतात. त्याच्या उत्तरेस मर्चिसन धबधबा असून दक्षिणेस व्हिक्टोरिया सरोवर आहे. व्हिटोरिया सरोवराला स्थानिक भाषेंत नालुबाले (ईश्वराचें साम्राज्य) असें म्हणतात. इथूनच सुप्रसिद्ध नाईल नदी वाहते. तिला स्थानिक भाषेंत किंयिरा असें म्हणतात. समुद्रसपाटीपासून ४ हजार फूट उंचीवर हा प्रदेश असल्यामुळें येथील वातावरण फार सुखदायक असतें. पाऊसहि फार पडत असल्यानें हा प्रदेश वनश्रीमय झाला आहे. शिवाय त्यामुळेंच हा देश शेतीला अनकूल झाला असून मुख्यतः शेतीप्रधान आहे. या देशाचें क्षेत्रफळ ९३ हजार ९३१ चौरस मैल म्हणजे साधारणतः पश्चिम जर्मनीएवढें असून एकूण लोकसंख्या ६५ लक्ष २६ हजार ६१६ आहे. त्यांपैकीं ९८ टक्के आफ्रिकी असून २ टक्के इतर आहेत. या इतरांत ७० हजार भारतीय असून ते व्यापारधंद्यांत गुंतलेले आहेत. बाकी मुख्यतः युरोपियन्स, विशेषतः ब्रिटिश असून हा गट पिळणूक करणाऱ्यांपैकीं आहे. आफ्रिकन लोक मुख्यतः शेतींत व खाणधंद्यांत राबतात. कम्पाला शहर ही युगांडाची व्यापारी राजधानी असून त्याची लोकसंख्या ६० हजार आहे. परंतु शासकीय राजधानी

एन्टेब्बे ही आहे. बुगांडा, बुन्योरो, अंकोले आणि तोरो हे चार प्रांत मिळून युगांडा देश बनलेला आहे. हीं चार राज्यें पूर्वापार सरंजामी राजांच्या वर्चस्वाखालीं होतीं. त्यांपैकीं बुगांडा हा आर्थिकदृष्ट्या संपन्न असून, काबाका नांवाच्या सरंजामी राजाच्या वर्चस्वाखालीं आहे.

२

युगांडा देश हा मुख्यतः शेतीप्रधान आहे. कापूस, चहा, कॉफी व साखर हीं तेथील मुख्य उत्पादनें होत. पूर्वीं कापूस हा उत्पादनांतील मुख्य भाग होता. ८० टक्के निर्यात कापसाची होत असे. परंतु आतां त्याची जागा कॉफीनें घेतली आहे. याशिवाय टिन, लोखंड, तांबें वोलफ्राम, वेरील, गॅलेना, अपेटाईट, सोने इत्यादि खनिज संपत्ति युगांडांत भरपूर असून, १९५६ सालीं सुरू झालेल्या किलेम्बे खाणींतील तांबें हें आज निर्यातीचें तिसऱ्या नंबरचें साधन बनलेलें आहे. युरेनिअमचा शोधहि चालू आहे. जिंजा येथें तांब्याची भट्टी आहे. कच्चें लोखंड पश्चिम युगांडांत मिळतें. युगांडामध्यें एक कापडगिरणीहि असून त्यांतून दरवर्षी २ कोटि ६० लाख वार कापडउत्पादन होतें. नाईल नदीच्या उगमस्थानीं ओवेन धबधबा असून त्या ठिकाणीं हायड्रो इलेक्ट्रिक स्कीम सुरू झालेली आहे. त्यामुळें पूर्व आफ्रिकेंतील विद्युत्पुरवठ्याचें सर्वांत मोठें केंद्र युगांडा बनेल. अशा रीतीनें व्यापारी पिकें, खनिज संपत्ति, जलविद्युत्संपत्ति इत्यादि उत्पादन युगांडांत मुबलक प्रमाणांत आहे, परंतु या नैसर्गिक संपत्तीचा योग्य औद्योगिकरणासाठीं उपयोग घडवून आणणें, त्याचप्रमाणें शेतीसुधारणा करणें या दोन महत्त्वाच्या गोष्टींवर युगांडाची भावी आर्थिक प्रगति अवलंबून आहे. या संपत्तीवर मूठभर राजांचा व ब्रिटिश भांडवलदारांचा कबजा असून, स्थानिक जनता अत्यंत हलाखींत त्यांच्यासाठीं राबत असते. परकीय वर्चस्वामुळें या आर्थिक संपत्तीचा देशाच्या व देशांतील जनतेच्या विकासास उपयोग होत नाहीं. कोट्यवधि संपत्तीची लूट परदेशांकडून होत असते.

३

युगांडांत एकंदर ३ राजकीय पक्ष आहेत. त्यांपैकीं सर्वांत मोठा पक्ष युगांडा पीपल्स कॉंग्रेस ( UPC ) हा आहे. हा पक्ष राष्ट्रवादी व क्रांति-

वादी आहे. स्वातंत्र्यलढ्यांत हाच पक्ष आघाडीवर होता व आहे. याला जनतेचा सर्वांत जास्त पाठिंबा आहे. हा पक्ष कामगार संघटनांशीं ( ट्रेड युनियन्सशीं ) संलग्न आहे. ३६ वर्षांचे श्री. अपोल्लो मिल्टन आबोटे हे या पक्षाचे नेते असून, स्वतंत्र युगांडाचे पहिले पंतप्रधान म्हणून यांची निवड झाली आहे. केनियामध्यें मजूर म्हणून काम करीत असतांनाच त्यांनीं श्री. जोमो केन्याटा यांच्या प्रेरणेनें चाललेल्या स्वातंत्र्यचळवळींत भाग घेतला होता. त्यानंतर त्यांनीं कांहीं दिवस शिक्षक म्हणून काम केलें. नंतर युगांडामध्यें जाऊन, त्यांनीं हा पक्ष स्थापन करून तेथें स्वातंत्र्यचळवळीला सुरुवात केली. स्वातंत्र्य, राष्ट्रीय एकात्मता व देशाची प्रगति हीं त्यांचीं तीन ध्येयें असून, ते स्वतःला " सौम्यक्रांतिकारक " म्हणवून घेतात. या पक्षाचे दुसरे नेते श्री. एच्. एम्. लुआन्दे हे असून ते कामगारनेते आहेत. युगांडांतील ट्रेड युनियन संघटनेचे ते अध्यक्ष असून, युगांडाच्या स्वतंत्र राजवटींत त्यांना उपाध्यक्षपदाचा मान मिळाला आहे. युगांडांतील दुसरा पक्ष म्हणजे काबाका येक्का पार्टी ( KYP ) होय. हा पक्ष परंपरावादी व प्रतिगामी पक्ष असून, त्यामध्यें सरंजामी प्रवृत्तींच्या लोकांचा भरणा आहे. कोणत्याहि प्रकारच्या सुधारणेस विरोध करणारा हा पक्ष असून, सध्यां या पक्षाचे कांहीं लोक ओबोटे मंत्रिमंडळांत आहेत. श्री. काबाका हे या पक्षाचे नेते असून ते सध्यां बुगांडाचे राजे आहेत. डेमोक्रॅटिक पार्टी ( DP ) हा तिसरा पक्ष आहे. हा पक्ष रोमन कॅथॉलिक वर्चस्वाखालीं असून, कॅथॉलिक मिशन्स व शाळांवर आधारलेला आहे. पोपच्या पाठिंब्यानें असलेला हा पक्ष पश्चिम जर्मनींतील ख्रिश्चन डेमोक्रॅटिक पक्षाकडून आणि कॅनडा, पोर्तुगाल व इटलींतील कॅथॉलिक ॲक्शन ग्रुप्सकडून आर्थिक-दृष्ट्या पोसला जातो. हा प्रतिगामी पक्ष साम्राज्यवादीधार्जिणा आहे. सध्यांच्या राजवटींत तो विरोधी पक्ष म्हणून वावरत आहे. या पक्षाचे नेते श्री. बेनेडिक्टो किवानुका हे स्वतः कॅथॉलिक असून मुगांडा म्हणजे बुगांडाचे रहिवाशी आहेत. याशिवाय युगांडामध्यें नववसाहतवादी अमेरिकन वर्चस्वहि दिवसेंदिवस वाढत आहे.

४

६८ वर्षांपूर्वीं ब्रिटिश साम्राज्यवाद्यांनीं या देशाचा कबजा घेतला. त्या वेळीं

या देशांत दोन सामाजिक पद्धति नांदत होत्या. उत्तरेकडे व पूर्वकडे लहान लहान टोळ्यांचे गट खेड्यापाड्यांतून विखुरलेले होते; तर दक्षिणेकडे व पश्चिमेकडे सरंजामी राजांची राजवट होती. ब्रिटिशांनीं या राजांशीं व टोळीप्रमुखांशीं संधान बांधून तिथें आपलें बस्तान टेकवलें व आस्ते आस्ते तेथील आर्थिक व्यवस्थेवर पगडा बसवून, जनतेची अमानुष पिळवणूक सुरू केली, बुगांडा, बुन्योरो, अंकोले व तोरो या चार सरंजामी राजवटींच्या मागें दडून व त्यांना नामधारी राजे ठेवून अप्रत्यक्ष-रीत्या सारा कारभार ब्रिटिश वसाहतवादीच हांकीत असत. बुगांडा हें राज्य विकसित असून त्यांत बुगांडा टोळीचे लोक राहतात व ही टोळी युगांडांतील सर्वांत मोठी जमात आहे. २० लाख लोकवस्तीचा हा प्रदेश आहे. या राज्याला व तेथील काबाका येक्का या राजाला हाताशीं धरून ब्रिटिशांनीं युगांडांत आतांपर्यंत आपल्या भेदनीतीचें राजकारण चालू ठेवलें व स्वातंत्र्यचळवळ चिरडण्याकरितां व तींत फूट पाडण्यासाठीं त्याचा उपयोग करून घेतला. त्याचबरोबर दुसऱ्या बाजूला 'डेमोक्रॅटिक पक्ष' हा साम्राज्यधार्जिणा पक्ष उभा करून, स्वातंत्र्यलढ्यांत प्रतिस्पर्धी संघटना उभी केली. युगांडाच्या कायदेमंडळांत ब्रिटिश गव्हर्नरच्या सत्तेखालीं राजवट चालू होती. परंतु श्री. ओबोटे या स्वातंत्र्यलढवय्याच्या नेतृत्वाखालीं युगांडा पीपल्स कॉंग्रेसनें स्वातंत्र्यलढा जोरदारपणें चालवला. अखेर १९६० सालीं नवीन निवडणूक कायद्यान्वयें युगांडांतील कायदेमंडळाला व्यापक दर्जा मिळाला. युगांडांत पूर्वीं एकंदर ६ लक्ष मतदारसंख्या होती ती २० लाखांपर्यंत वाढविण्यांत आली. त्याचप्रमाणें 'बिगर आफ्रिकन अल्पसंख्यां-कांचे संरक्षित हक्क' या नांवाखालीं कायदेमंडळांत ⅓ पेक्षां जास्त जागा युरो-पियनांसाठीं राखून ठेवण्यांत आल्या होत्या. त्या रद्द करून घेण्यांत स्वातंत्र्य-चळवळीनें यश मिळविलें. त्यामुळें नव्या निवडणुका युगांडांत व्याव्या लागल्या व मार्च १९६० मध्यें युगांडाला अंतर्गत स्वायत्तता मिळाली. मार्च १९६० च्या निवडणुकींत साम्राज्यधार्जिण्या डेमोक्रॅटिक पक्षाला ४३ जागा मिळाल्या. युगांडा पीपल्स कॉंग्रेस या स्वातंत्र्यवादी पक्षाला ३५ जागा मिळाल्या. डेमोक्रॅटिक पक्षाला काबाका येक्काच्या २० जागा मिळाल्या, त्यामुळें त्यांचें बहुमत झालें.

त्यानंतर स्वातंत्र्यलढा जास्त जोरदार झाल्यामुळें ९ ऑक्टोबर १९६१ मध्यें ' लंडन करार ' करण्यांत आला. त्यामध्यें ब्रिटिश परकीय वर्चस्व संपुष्टांत आणण्यांत स्वातंत्र्यलढ्यानें यश मिळवलें. युगांडाला स्वातंत्र्य व सार्वभौमत्व देण्याचें ठरविण्यांत आलें. त्यासाठीं लंडनला वाटाघाटी झाल्या. बुन्योरो, तोरो व अंकोले येथील सरंजामी राजवटी सोडल्यास फक्त बुगांडानें संपूर्ण स्वतंत्र राज्याचा दर्जा मागितला. अर्थात् भेद-नीतिनिपुण ब्रिटिशांनींच हा डाव टाकला होता. अखेर बुगांडाचा स्वतंत्र दर्जा मान्य करण्यांत आला. नवीन घटनेंत इतर राजांनाहि मान्यता देण्यांत आली. परंतु त्यांना संघराज्यांत राहण्याचें बंधन घालण्यांत आलें. बुगांडाला अंतर्गत स्वायत्तता व स्वतंत्र विधिमंडळ देण्यांत आलें. त्यांच्या विधिमंडळाला लुकीको म्हणतात व काबाका येक्का हा तेथील राजा स्वतंत्र असून बुगांडाचें मध्यवर्ती राजवटीशीं संघराज्याचें नातें ठेवण्यांत आलें आहे. बुगांडा, अंकोले, तोरो व बुन्योरो हीं चार व इतर युगांडा मिळून संघराज्य ( फेडरेशन ) बनविण्यांत आलें व अखेर या नव्या व्यवस्थेनुसार एप्रिल १९६२ मध्यें नव्या निवडणुका घेण्यांत आल्या.

एप्रिल १९६२ च्या नव्या निवडणुकींत युगांडा पीपल्स कॉंग्रेसला ६५ टक्के मतें व ३७ जागा मिळाल्या. डेमोक्रॅटिक पक्षाला २२ जागा मिळाल्या व काबाका येक्का पक्षाला २१ जागा मिळाल्या. कायदेमंडळाच्या एकूण जागा ८२ होत्या. अर्थात् कोणालाच बहुमत नव्हतें. अखेर युगांडा पीपल्स कॉंग्रेसनें काबाका येक्का पक्षाशीं तात्पुरती संयुक्त आघाडी केली व अशा-रीतीनें दोघांचें मिळून ५८ सभासदांचें बहुमत झालें व श्री. ओबोटे हे पंतप्रधान झाले आणि ९ ऑक्टोबर १९६२ रोजीं या नव्या मंत्रिमंडळाच्या हातांत ब्रिटिश गव्हर्नर ड्यूक ऑफ केन्ट यांनीं युगांडाची राजकीय सत्ता सुपूर्द केली. युगांडा राजकीयदृष्ट्या स्वतंत्र व सार्वभौम झाला !

५

युगांडाला अशारीतीनें स्वातंत्र्य मिळालें तरी पुढील समस्या फार बिकट आहे. कारण स्वातंत्र्य देतांना ब्रिटिशांनीं फुटीरतेचीं बीजें तिथें पेरून ठेवलेलीं आहेत. बुगांडाच्या राजावर अद्याप ब्रिटिश वर्चस्व आहे. शिवाय

इतर राजांवरहि साम्राज्यवादी वर्चस्व आहे. त्यामुळें वरील चार राज्यें संघराज्यांत असलीं तरी तीं संघराज्याशीं राष्ट्रीयदृष्टीनें समरस झालेलीं नाहींत. त्यामुळें नव्या राजवटीसमोर राष्ट्रीय एकात्मतेचा प्रश्न हा अव्वल दर्जाचा प्रश्न आहे. युगांडा पीपल्स कॉंग्रेस व त्याचे नेते पंतप्रधान श्री. ओबोटे यांना युगांडामध्यें प्रगत बदल घडवून आणावयाचे आहेत व देशाची शेतीविषयक व औद्योगिक सुधारणा घडवून आणावयाची आहे. परंतु ज्या काबाका येका पक्षाशीं त्यांनीं संयुक्त आघाडी केली आहे तो पक्ष सरंजामी असून त्याचा प्रगत सुधारणांना विरोध आहे. बुगांडाचे राजे काबाका व गांडा जमीनदार यांच्या हितसंबंधरक्षणाला तो पक्ष बांधलेला आहे. अशा या सरंजामी पक्षाचे लोक नव्या मंत्रिमंडळांत अर्थखातें व आर्थिक सुधारणाखातें अशांसारख्या निर्णायक महत्त्वाच्या जागांवर आहेत. त्यांचा विरोध पत्करूनच श्री. ओबोटे यांना औद्योगिक व शेतीविषयक सुधारणा युगांडांत घडवून आणाव्या लागतील.

शिवाय देशाच्या आर्थिक रचनेवर व संपत्तीवर ब्रिटिश मक्तेदारांचें वर्चस्व आहे. १९५४ मध्यें त्यांनीं युगांडांतून ८ कोटी २६ लक्ष पौंड नफा लुटला तर १९५९ मध्यें १० कोटी २२ लक्ष पौंड नफा लुटला. म्हणजे फक्त ५ वर्षांत २३ टक्क्यांनीं नफ्यांत वाढ झाली. उलटपक्षीं खासगी उद्योगधंद्यांतील ६० टक्के आफ्रिकन नोकरांना (रेशन व अलाउन्स धरून) महिना सरासरी फक्त ४ पौंड पगार देण्यांत येतो. (ईस्ट आफ्रिकन स्टॅटिस्टिकल डिपार्टमेंटच्या माहितीपत्रकानुसार). त्याचप्रमाणें युगांडांतील दरमाणशीं वार्षिक उत्पन्न १९५५ सालीं २३ पौंड १६ शिलिंग होतें तें १९६० सालीं २२ पौंड १६ शिलिंग झालें. (लंडन टाइम्स १४ जून १९६०). यावरून ब्रिटिश मक्तेदार युगांडांतील आफ्रिकन जनतेची केवढी अमानुष पिळवणूक करतात व किती प्रचंड नफा लुटून परदेशीं नेतात हें वाचकांना कळून चुकेल. या ब्रिटिश मक्तेदारांचें आर्थिक वर्चस्व नष्ट केल्यानेंच युगांडाचा आर्थिक विकास होऊं शकतो व तेथील जनतेचें राहणीमान सुधारूं शकतें. म्हणून हाहि दुसरा अव्वल महत्त्वाचा प्रश्न नव्या स्वतंत्र राजवटीसमोर आहे. त्याचप्रमाणें डेमोक्रॅटिक पक्ष या साम्राज्यधार्जिण्या, प्रतिगामी विरोधी पक्षाशीं सामना देऊन युगांडाचा स्वातंत्र्यविकास साधावा लागेल.

चौथी गोष्ट म्हणजे युगांडांत वाढत जाणारें अमेरिकन नववसाहतवादी वर्चस्व. तथाकथित युगांडा डेव्हलपमेंट कॉर्पोरेशन या नांवाच्या संस्थेखालीं युगांडांत परकीय अमेरिकन भांडवल मोठ्या प्रमाणांत घुसत आहे. हल्लींच १५० अमेरिकन शिक्षक युगांडांत आले असून केनयाचे श्री. टॉम बोया यांच्या देखरेखीखालीं कम्पाला येथें स्थापन झालेल्या धी इंटरनॅशनल कॉन्फेडरेशन ऑफ फ्री ट्रेड युनियन कॉलेज या शीतयुद्धाच्या अमेरिकन संस्थेंत दाखल झाले आहेत. या वाढत्या अमेरिकन नववसाहतवादी वर्चस्वाला आळा घालण्याचा प्रश्नहि नव्या राजवटीसमोर आहे.

थोडक्यांत ब्रिटिश मक्तेदारांचें आर्थिक वर्चस्व नष्ट करणें, ब्रिटिशांचे फुटीर डाव हाणून पाडून संघराज्यांतील चारहि राज्यांत राष्ट्रीय एकात्मता घडवून आणणें, साम्राज्यधार्जिण्या डेमोक्रॅटिक पक्षाला संपुष्टांत आणणें व नववसाहतवादी अमेरिकन चंचुप्रवेश थांबविणें हीं चार महत्त्वाचीं कार्यें आज श्री. अपोल्लो ओबोटे यांच्या नव्या स्वतंत्र राजवटीसमोर आहेत. हीं कार्यें पार पाडल्यानेंच युगांडाचा औद्योगिक व शेतीविषयक विकास घडवून आणणें शक्य होईल व स्वातंत्र्य अधिक मजबूत होईल. 'आफ्रिकेचा हा मौक्तिक अलंकार' राजकीयदृष्ट्या स्वतंत्र झाला असला तरी ब्रिटिश व इतर साम्राज्यवादी भुजंगांपासून आणि त्यांच्या स्थानिक हस्तकांपासून त्याला आर्थिकदृष्ट्या स्वतंत्र करणें आवश्यक आहे. तरच तो 'मौक्तिक अलंकार' स्वातंत्र्यांत अधिकच खुलेल, चमकेल, स्वतः सुखावेल नि जगाला सुखवेल !

● ● ●

# १६. रूआंडा-उरुंडी

**लोकसंख्या** – ५० लाख. ३ हजार आशियाई. ४ हजार युरोपियन्स.

**राजधानी** – उसुंबुरा - उसा.

**राज्य** – स्वतंत्र देश.

**मुख्य धंदा** – कॉफीची लागवड.

१

'रूआंडा–उरुंडी' या संयुक्त नांवानें ओळखला जाणारा पूर्व आफ्रिकेंतील हा भूभाग म्हणजे वास्तविक दोन राष्ट्रें आहेत. एकाचें नांव आहे 'रूआंडा' नि दुसऱ्याचें 'उरुंडी'. परंतु भौगोलिक व ऐतिसाहिकदृष्ट्या तीं एकवटलेलींच आहेत. "रूआंडा–उरुंडी"चीं स्वातंत्र्यानंतर आतां दोन राष्ट्रें बनणार आहेत. उत्तरेस युगांडा, दक्षिणेस तांगानिका व पश्चिमेस कांगो अशा तीन मोठ्या राष्ट्रांच्या मध्यें हें 'रूआंडा–उरुंडी' राष्ट्र वसलेलें आहे. या चिमुकल्या राष्ट्राचें क्षेत्रफळ अवघें २०,५४० चौरस मैल असून, लोकसंख्या अवघी ५० लाख आहे. या ५० लाख लोकसंख्येपैकीं बहुसंख्य लोक बटुत्सी व वाहुतु जमातींचे असून त्यांमध्ये बाहुतु ८० टक्के आहेत. शिवाय ४॥ हजार युरोपियन व ३ हजार आशियाई लोक या देशांत वास्तव्य करून आहेत. उसुंबुरा, किटेगा, किगाली, मुरमव्हिया हीं या देशांतील प्रमुख शहरवजा गांवें असून, उसुंबुरा ही 'रूआंडा–उरुंडी'ची राजधानी आहे. हिलाच स्थानिक लोक 'उसा' या लाडक्या नांवानें संबोधतात ! किगाली ही उपराजधानी आहे. या देशांत रेल्वे मुळींच नाहीं व एकंदर ६ हजार मैलांचे रस्ते आहेत.

या देशांत उद्योगधंदे जवळजवळ नाहींतच. मुख्यतः शेतीप्रधान असा हा देश आहे. कॉफीचें उत्पन्न ८० टक्के असून शिवाय कातडीं व

गुरें या देशांतून निर्यात केलीं जातात. परंतु तेथील साऱ्या उत्पादनावर बेल्जम व अमेरिका यांची आर्थिक पकड असल्यामुळें स्थानिक शेतकऱ्यांना अत्यंत हलाखीचें जीवन कंठावें लागतें. ' कुबेर असूनी जनीं, जाहला करटीचा हा धनी ' अशी तिथल्या जनतेची परिस्थिति आहे. या निसर्गरम्य देशांतील जनता बेल्जियन व अमेरिकन भांडवलदारांच्या नफेखोरीच्या स्वार्थापायीं अमानुष पिळणूक आज वर्षानुवर्षें सहन करीत आहे.

" ऑफिस कॅफे इंडिजिन रूआंडा-उरुंडी " या नांवाची एक कंपनी देशांत असून तिच्याकडे देशांतील बहुतेक आयातीची व निर्यातीची मक्तेदारी आहे. त्या कंपनीवर बेल्जियन व अमेरिकन भांडवलदारांचा कबजा असून, कॉफीच्या एकूण उत्पादनापैकीं ९० टक्के उत्पादन अमेरिकेंत रवाना करून कोट्यवधि रुपयांचा नफा ही कंपनी कमवीत असते. म्हणूनच रूआंडा–उरुंडीतील पिळली जाणारी जनता या बेल्जियन व अमेरिकन भांडवलदारांना आपल्या भाषेंत त्वेषानें " कॉफीवर घाला घालणारे अष्टभुज समुद्रराक्षस " या योग्य नांवानें संबोधते ! सर्वसाधारण बाहुतु शेतकरी १००, २०० अशा कॉफीच्या झाडांची एकरीं लागवड करतो. अशा शेतकऱ्यांकडून हें कॉफीचें उत्पादन विकत घेऊन वरील बेल्जियन व अमेरिकन कंपनी त्या शेतकऱ्याला १०० कॉफीच्या झाडांमागें अवघे २० बेल्जियन फ्रँक्स् देते. आणि तो माल बाहेर पाठवून स्वतः नफा किती कमावते ? तर अफाटच. दरवर्षीं ही बेल्जियन कंपनी या रूआंडा–उरुंडीमधील कॉफीच्या धंद्यांत एकूण १ अब्ज बेल्जियन फ्रँक्स गुंतवते; ( २६ कोटी रुपये ). त्यांतून सर्व खर्च वजा जातां एकूण निर्यात कॉफीवर कंपनीला दरवर्षीं ५० कोटी फ्रँक्स् ( १३ कोटी रुपये ) नफा मिळतो ! म्हणजे जेवढें भुद्दल तेवढाच नफा ही कंपनी दरवर्षीं उकळते ! आणि हें सर्व कोणाच्या जिवावर ? तर वर्षभर अहोरात्र कष्ट करून कॉफी पिकवणाऱ्या रूआंडा-उरुंडींतील गरीब बाहुतु शेतकऱ्यांच्या जिवावर ! त्यांची भयानक व अमानुष पिळवणूक करून ! मग बाहुतु शेतकऱ्यांनीं या बेल्जियन कंपनीला ' अष्टभुज समुद्रराक्षस ' म्हणून संबोधलें तर त्यांत नवल काय ? या परिस्थितींत देशांतील उत्पन्नाचा बहुसंख्य हिस्सा व त्यापासून होणारें अर्थोत्पादन परदेशीं गेल्यामुळें रूआंडा–उरुंडी हा देश आर्थिकदृष्ट्या दुरवस्थेचा ठरतो. त्याला

# १६. रूआंडा-उरुंडी

**लोकसंख्या** — ५० लाख. ३ हजार आशियाई. ४ हजार युरोपियन्स.

**राजधानी** — उसुंबुरा - उसा.

**राज्य** — स्वतंत्र देश.

**मुख्य धंदा** — कॉफीची लागवड.

१

'रूआंडा-उरुंडी' या संयुक्त नांवानें ओळखला जाणारा पूर्व आफ्रिकेंतील हा भूभाग म्हणजे वास्तविक दोन राष्ट्रें आहेत. एकाचें नांव आहे 'रूआंडा' नि दुसऱ्याचें 'उरुंडी'. परंतु भौगोलिक व ऐतिसाहिकदृष्ट्या तीं एकवटलेलींच आहेत. "रूआंडा-उरुंडी"चीं स्वातंत्र्यानंतर आतां दोन राष्ट्रें बनणार आहेत. उत्तरेस युगांडा, दक्षिणेस तांगानिका व पश्चिमेस कांगो अशा तीन मोठ्या राष्ट्रांच्या मध्यें हें 'रूआंडा-उरुंडी' राष्ट्र वसलेलें आहे. या चिमुकल्या राष्ट्राचें क्षेत्रफळ अवघें २०,५४० चौरस मैल असून, लोकसंख्या अवघी ५० लाख आहे. या ५० लाख लोकसंख्येपैकीं बहुसंख्य लोक बटुत्सी व बाहुतु जमातींचे असून त्यामध्ये बाहुतु ८० टक्के आहेत. शिवाय ४॥ हजार युरोपियन व ३ हजार आशियाई लोक या देशांत वास्तव्य करून आहेत. उसुंबुरा, किटेगा, किगाली, मुरमव्हिया हीं या देशांतील प्रमुख शहरवजा गांवें असून, उसुंबुरा ही 'रूआंडा-उरुंडी'ची राजधानी आहे. हिलाच स्थानिक लोक 'उसा' या लाडक्या नांवानें संबोधतात ! किगाली ही उपराजधानी आहे. या देशांत रेल्वे मुळींच नाहीं व एकंदर ६ हजार मैलांचे रस्ते आहेत.

या देशांत उद्योगधंदे जवळजवळ नाहींतच. मुख्यतः शेतीप्रधान असा हा देश आहे. कॉफीचें उत्पन्न ८० टक्के असून शिवाय कातडीं व

गुरें या देशांतून निर्यात केलीं जातात. परंतु तेथील साऱ्या उत्पादनावर बेल्जम व अमेरिका यांची आर्थिक पकड असल्यामुळें स्थानिक शेतकऱ्यांना अत्यंत हलाखीचें जीवन कंठावें लागतें. ' कुबेर असूनी जनीं, जाहला कर-टीचा हा धनी ' अशी तिथल्या जनतेची परिस्थिति आहे. या निसर्गरम्य देशांतील जनता बेल्जियन व अमेरिकन भांडवलदारांच्या नफेखोरीच्या स्वार्थापायीं अमानुष पिळणूक आज वर्षानुवर्षें सहन करीत आहे.

" ऑफिस कॅफे इंडिजिन रूआंडा-उरुंडी " या नांवाची एक कंपनी देशांत असून तिच्याकडे देशांतील बहुतेक आयातीची व निर्यातीची मक्ते-दारी आहे. त्या कंपनीवर बेल्जियन व अमेरिकन भांडवलदारांचा कबजा असून, कॉफीच्या एकूण उत्पादनापैकीं ९० टक्के उत्पादन अमेरिकेंत रवाना करून कोट्यवधि रुपयांचा नफा ही कंपनी कमवीत असते. म्हणूनच रूआंडा-उरुंडीतील पिळली जाणारी जनता या बेल्जियन व अमेरिकन भांडवलदारांना आपल्या भाषेंत त्वेषानें " कॉफीवर घाला घालणारे अष्टभुज समुद्रराक्षस " या योग्य नांवानें संबोधते ! सर्वसाधारण बाहुतु शेतकरी १००, २०० अशा कॉफीच्या झाडांची एकरीं लागवड करतो. अशा शेतकऱ्यांकडून हें कॉफीचें उत्पादन विकत घेऊन वरील बेल्जियन व अमेरिकन कंपनी त्या शेतकऱ्याला १०० कॉफीच्या झाडांमागें अवघे २० बेल्जियन फ्रॅंक्स् देते. आणि तो माल बाहेर पाठवून स्वतः नफा किती कमावते ? तर अफाटच. दरवर्षीं ही बेल्जियन कंपनी या रूआंडा-उरुंडी-मधील कॉफीच्या धंद्यांत एकूण १ अब्ज बेल्जियन फ्रॅंक्स गुंतवते; ( २६ कोटी रुपये ). त्यांतून सर्व खर्च वजा जातां एकूण निर्यात कॉफीवर कंप-नीला दरवर्षीं ५० कोटी फ्रॅंक्स् ( १३ कोटी रुपये ) नफा मिळतो ! म्हणजे जेवढें मुद्दल तेवढाच नफा ही कंपनी दरवर्षीं उकळते ! आणि हें सर्व कोणाच्या जिवावर ? तर वर्षभर अहोरात्र कष्ट करून कॉफी पिकवणाऱ्या रूआंडा-उरुंडींतील गरीब बाहुतु शेतकऱ्यांच्या जिवावर ! त्यांची भयानक व अमानुष पिळवणूक करून ! मग बाहुतु शेतकऱ्यांनीं या बेल्जियन कंपनीला ' अष्टभुज समुद्रराक्षस ' म्हणून संबोधलें तर त्यांत नवल काय ? या परिस्थितींत देशां-तील उत्पन्नाचा बहुसंख्य हिस्सा व त्यापासून होणारें अर्थोत्पादन परदेशीं गेल्यामुळें रूआंडा-उरुंडी हा देश आर्थिकदृष्ट्या दुरवस्थेचा ठरतो. त्याला

अशारीतीनें मागासलेला ठेवण्यांत येतें. आणि त्याची अशी पिळणूक करून व स्वतःच त्याच्या आर्थिक दुरवस्थेला कारणीभूत होऊन, आणि वर पुन्हा उदार कर्णाचा आव आणून, बेल्जमचे साम्राज्यवादी त्याला पुन्हा आर्थिक साहाय्य देण्याचा देखावा करतात !

१९५८ सालीं १२५ दशलक्ष फ्रँक्स् व १९६१ सालीं ३६० दशलक्ष फ्रँक्स् एवढी आर्थिक मदत देऊन बेल्जमनें म्हणे रूआंडा–उरुंडीला आर्थिक दुर॰ वस्थेंतून टिकवलें ! केवढें हें औदार्य ! स्वातंत्र्यानंतर बेल्जमकडून मिळणारें आर्थिक साहाय्य बंद झालें तर रूआंडा-उरुंडीचें राष्ट्रीय जीवन कोलमडून पडेल, असें बेल्जियन साम्राज्यवाद्यांच्या बातम्यांवर विसंबून राहणारे आमच कांहीं 'आतरराष्ट्रीय तज्ज्ञ' लेखक लिहितात ! बिचारे ! त्यांना बेल्जमकडून रूआंडा–उरुंडीच्या होणाऱ्या आर्थिक पिळणुकीची माहिती नसावी. ती असती तर रूआंडा–उरुंडीमधील बेल्जियन–अमेरिकन परकीय कंपन्यांचें राष्ट्रीयीकरण करावें व त्यांची आर्थिक पिळणूक नष्ट करावी अशीच त्यांनीं मागणी केली असती ! तसें केल्यास राष्ट्रीय संपत्तीचा मोठा हिस्सा रूआंडा–उरुंडींतच राहून त्या देशाच्या प्रगतीला हातभार लागेल !

## २

रूआंडा-उरुंडीचा हा प्रदेश मुळांत जर्मन साम्राज्यवाद्यांच्या ताब्यांत होता. पण पहिल्या महायुद्धानंतर राष्ट्रसंघाच्या आदेशानुसार हा प्रदेश बेल्जमच्या ताब्यांत देण्यांत आला. दुसऱ्या महायुद्धानंतर राष्ट्रसंघाच्या विश्वस्त समिती-च्या आदेशानुसार तो प्रदेश 'स्ट्रटीशिप'च्या म्हणजे 'विश्वस्ता'च्या नांवा-खालीं बेल्जमनेच बळकावला ! अशारीतीनें वसाहतवाद्यांनीं आलटून पालटून व निरनिराळ्या नांवाखालीं या देशाला राजकीय व आर्थिक गुलामगिरींत ठेवून, त्याची सतत पिळणूक चालू ठेवली. गेल्या दशकांत आफ्रिकेमध्यें जी प्रचंड राष्ट्रीय चळवळ उभी राहिली त्यांत रूआंडा–उरुंडीचीहि जनता राजकीयदृष्ट्या जागृत झाली. आणि त्या ठिकाणीं बेल्जियन साम्राज्यवाद्यांच्या 'नकली विश्वस्तांविरुद्ध' राष्ट्रीय आंदोलन उभें राहिलें. या आंदोलनाभोंवतीं देशांतील पिळला जाणारा शेतकरी जवान उभा राहिला.

रूआंडामध्यें १९५९ सालीं 'उनार' (नॅशनल रूआंडीज युनियन) नांवाचा राष्ट्रीय पक्ष उदयास आला व त्यानें 'बेल्जम ट्रस्टीशिप' देशांतून नष्ट करण्यासाठीं आंदोलन सुरू केलें. हें आंदोलन दडपण्यासाठीं बेल्जियन साम्राज्यवाद्यांनीं तेथील जनतेवर अमानुष अत्याचार केले, हजारों लोकांना तुरुंगांत डांबण्यांत आलें, अनेकांच्या घरांच्या झडत्या घेऊन नासधूस करण्यांत आली. देशभक्तांचा तर राक्षसी छळ करण्यांत आला व त्यांना सहानुभूति दाखविल्याबद्दल अनेकांना मारहाण करण्यांत आली. अखेर १९५९ च्या हिंवाळ्याच्या सुरुवातीलाच 'उनार' पक्षाचे नेते फ्रान्सिस रुकेला यांना बेमुदत तुरुंगांत डांबण्यांत आलें.

एवढेंच करून बेल्जियन साम्राज्यवादी थांबले नाहींत तर त्यांनीं या राष्ट्रीय आंदोलनांत फूट पाडण्यासाठीं कांहीं स्थानिक पित्ते हाताशीं धरून रूआंडामध्यें कांहीं पक्ष स्थापन केले. 'पीपल्स पार्टी', 'पीझाट्न्स डेमोक्रॅटिक युनियन' इत्यादि गोंडस नांवांखालीं हे त्यांचे हस्तक पक्ष रूआंडामध्यें वावरूं लागले व फूटपाडेपणाचा धंदा त्यांनीं सुरू केला.

त्याच सुमारास इकडे उरंडीमध्येंहि राष्ट्रीय चळवळ सुरू झाली. "उप्रोना" (पार्टी ऑफ् नॅशनल युनिटी ॲण्ड प्रोग्रेस) नांवाचा राष्ट्रीय पक्ष त्या ठिकाणीं १९५८ मध्यें उदयास येऊन त्यानें बेल्जियन साम्राज्यवाद्यांच्या हकालपट्टीची मोहीम सुरू केली. त्या ठिकाणींहि बेल्जियन सत्ताधिशांनीं अमानुष अत्याचार करून 'उप्रोना'चे नेते प्रिन्स लुईस र्वागासोर यांना तुरुंगांत डांबलें.

दरम्यानच्या काळांत बेल्जियन साम्राज्यवाद्यांनीं राष्ट्रीय आंदोलन खच्ची करण्याचा नवा डाव टाकला. आपल्या स्थानिक हस्तकांकरवीं त्यानीं रूआंडांतील नामधारी स्थानिक राजाला उलथून पाडून 'प्रजासत्ताक रूआंडाची' फसवी घोषणा केली. आणि नाना हिकमती करून, धाकदपटशाही करून, व लांचलुचपतीचे व्यवहार करून आपल्या हस्तक पक्षांकरवीं 'कायदेमंडळाची' स्थापना केली. २५ सप्टेंबरच्या कायदेमंडळाच्या निवडणुकींत बेल्जियन हस्तक पक्षांचे ३५ उमेदवार (एकूण ४४ जागा) निवडून आल्याचें जाहीर करण्यांत आलें. अशारीतीनें एका बाजूला

'ट्रस्टीशिप 'ला बोंचणारा राजाचा कांटा त्यांनीं दूर करून रूआंडाचा संपूर्ण कबजा घेतला व दुसऱ्या बाजूला आपल्या 'ट्रस्टीशिप 'विरुद्ध चाललेल्या चळवळीला बगल देऊन 'प्रजासत्ताका 'चा देखावा केला! पर्यायानें संबंध रूआंडावर लोकशाहीच्या नांवाखालीं सर्वाधिकार गाजविण्यास त्यांनीं सुरुवात केली !

परंतु रूआंडाप्रमाणें उरुंडीमध्यें मात्र बेल्जमचे हे डावपेच यशस्वी झाले नाहींत. कायदेमंडळाच्या निवडणुकींत उरुंडीमधील 'उप्रोना' या राष्ट्रीय पक्षाला बहुमत मिळालें. आणि (चौथ्या म्वामी म्वामबुस्टाचे सुपुत्र) ३२ वर्षांचे तरणेबांड, 'उप्रोना'चे राष्ट्रवादी नेते प्रिन्स ऱ्वागासोर हे पंतप्रधान निवडले गेले! त्यामुळें चिडून जाऊन व येथील देशभक्त शक्तींना घाबरविण्यासाठीं बेल्जियन साम्राज्यवाद्यांनीं गेल्या वर्षींच्या ऑक्टोबरमध्यें प्रिन्स ऱ्वागासोर या देशभक्त नेत्याचा खून करण्याचा अघोरी कट रचला. परंतु राष्ट्रवादी बिलकुल डगमगले नाहींत. त्यांनीं आपल्या राष्ट्रीय सरकारमार्फत या अमानुष कृत्याचा जाब विचारण्यासाठीं व त्यांतील गुन्हेगार शोधून काढण्यासाठीं संयुक्त राष्ट्र संघाकडे मागणी केली.

या मागणीनुसार संयुक्त राष्ट्र संघानें एक कमिशन नेमलें. युनोच्या या 'रूआंडा-उरुंडी कमिशन 'नें गेल्या फेब्रुवारीमध्यें अधिकृत चौकशी करून व निरनिराळीं निवेदनें घेऊन या प्रकरणाबाबत एक अहवाल युनोला सादर केला. या अहवालांतील माहितीवरून बेल्जियन साम्राज्यवाद्यांच्या अघोरी कृत्यांवर झगझगीत प्रकाश पडतो. कांगोमध्यें लुमुम्बांचा खून करणारे साम्राज्यवादी व उरुंडीमध्यें प्रिन्स ऱ्वागासोरचा खून करण्याचा कट रचणारे साम्राज्यवादी एकच हें या संदर्भात लक्षांत ठेवलें पाहिजे !

कमिशनच्या अहवालांत या प्रकरणीं पुढील माहिती देण्यांत आली आहे: "एक ग्रीक उद्योगपति मिचेल इआट्रो हे या खुनाच्या कटाचे संघटक होते. प्रत्यक्ष खुनाची तयारी करणाऱ्याचें नांव जिन कॉगॉरगीस. प्रिन्सचा खून करण्यासाठीं जिन कॉगॉरगीस याला १० लाख बेल्जियन फ्रॅंक्स् व एका महत्त्वाच्या जर्मन फर्ममध्यें हुद्द्याची जागा देण्याचें मिचेल इआट्रो यांनीं आमिष दिलें. या भीषण कटांतील एक महत्त्वाचा दुसरा सूत्रधार

म्हणजे उरुंडीमधील बेल्जियन साम्राज्यवाद्यांच्या हस्तक पक्षाचा एक नेता जिन बाप्टिस्टे न्टीडेंडेरेझा हा होय! या हस्तक पक्षाला बेल्जमकडून पैसा पुरवला जातो. ”

“ कटवाले बराच काळ योग्य संधीची वाट बघत होते. गेल्या १३ ऑक्टोबरला उसुंबुरा या राजधानीच्या शहरांत एका हॉटेलमध्यें आपल्या इतर मंत्र्यांसमवेत पंतप्रधान प्रिन्स र्वागासोर हे खाना घेत असतांना, वर उल्लेख केलेला बदमाश कॉगॉरगीस त्या ठिकाणीं दडून होता. त्यानें हॉटेलाच्या खिडकींतून प्रिन्सवर गोळी झाडली, ती त्यांच्या मानेंत घुसली. येतांना कॉगॉरगीस व त्याचे साथीदार मोटारमधून आले होते. गोळी झाडल्यावर सर्वजण पळाले. परंतु त्याच्या साथीदारांनीं पोलीसपहारा ओलांडून बाहेर पळ काढला व नाइलाजानें कॉगॉरगीस पुन्हा उसुंबुरामध्यें परतला. अल्पावकाशांत त्याला व त्याच्या साथीदारांना पकडण्यांत आलें व त्यांनीं आपण वरील कृत्य केल्याची जबानी दिली. ”

अशा या बेल्जियन साम्राज्यवाद्यांच्या अघोरी कृत्यांना तोंड देऊन रूआंडा-उरुंडीमधील स्वातंत्र्यचळवळ पुढें वाढतच गेली. ती बेल्जमच्या आटोक्यांत येईना. दरम्यानच्या काळांत आफ्रिकन नवस्वतंत्र राष्ट्रें, भारतासारखीं स्वातंत्र्यवादी राष्ट्रें व सोविएत युनियनसारखीं समाजवादी राष्ट्रें यांच्या व जगातील आणि खुद्द आफ्रिकेंतील स्वातंत्र्यचळवळी यांच्या दड-पणामुळें युनोमध्यें ‘ जगांतील वसाहतींना स्वातंत्र्य देण्याचा ठराव ’ मंजूर झाला. अशा परिस्थितींत २३ फेब्रुवारी १९६२ रोजीं युनोच्या जनरल असेंब्लीनें ‘ रूआंडा-उरुंडी कमिशनचा अहवाल ’ ऐकण्यासाठीं जून १९६२ मध्यें बैठक भरवण्याचें ठरवलें व त्या बैठकींत रूआंडा-उरुंडी या बेल्जियन ट्रस्टीशिपखालील प्रदेशाला स्वातंत्र्य देण्याची तारीख मुक्रर केली. रूआंडा-उरुंडीमधील स्वातंत्र्यलढ्यानें जेरीस आलेल्या बेल्जमनेंदेखील काळाचीं पावलें ओळखून व आपल्या नववसाहतवादी अमेरिकन धन्यांच्या धूर्त सल्ल्यानुसार रूआंडा-उरुंडीला स्वातंत्र्य देण्याचें कबूल केलें आणि अखेर १ जुलै १९६२ रोजीं रूआंडा-उरुंडी स्वतंत्र झालें. हजारों देश-भक्तांचें स्वप्न प्रत्यक्षांत उतरलें.

## ३

अमेरिकेच्या ‘ नववसाहतवादी ’ सल्ल्यानुसार बेल्जमनें रूआंडा–उरुंडी-मधील आपली राजकीय सत्ता संपुष्टांत आणली तरी त्या देशावरील त्यांची आर्थिक पकड नष्ट झालेली नव्हती. त्याचप्रमाणें बेल्जियन सैन्यदेखील अद्याप रूआंडा–उरुंडीमध्यें ठाण मांडून आहेत. “ आपण या देशाला देणारी ‘ आर्थिक मदत ’ बंद केल्यास तिथें आर्थिक अनावस्था ओढवेल, त्या ठिकाणचीं सैन्यें काढून घेतल्यास तंत्रज्ञ व कसबी कारागीर यांना हा देश मुकेल, त्यांच्या दोन जमातींत झगडे उत्पन्न होतील, मग त्या देशांत शांतता टिकणार नाहीं, अशांतता माजेल ” वगैरे अपमतलबी समर्थन याबाबत बेल्जम करीत आहे.

परंतु रूआंडा–उरुंडीमधील दोन जमातींत वितुष्ट माजवून व आपल्या सैन्याचा वापर करून ‘ दिलेलें स्वातंत्र्य ’ धुळीला मिळवायचें व पुन्हा “ या लोकांना स्वातंत्र्य झेपत नाहीं ” असा प्रचार करून आपली अधिसत्ता तिथें परत प्रस्थापित करायची, त्याचप्रमाणें तिथली आर्थिक पकड कायम ठेवून नफे लुटायचे हें बेल्जमचें व त्यांच्यामागील अमेरिकन साम्राज्य-वाद्यांचें तंत्र आहे ! कांगोमध्यें त्यांचें हें तंत्र उघड झालेलें आहे. म्हणून “ बेल्जमनें आपलें सैन्य आमच्या देशांतून काढून घ्यावें ” हीं तेथील राष्ट्रवाद्यांनीं मागणी केली आहे. सोविएत रशियानेंदेखील या मागणीला पाठिंबा दिला आहे. त्याचप्रमाणें तेथील कॉफीच्या धंद्याचें राष्ट्रीयीकरण होऊन त्या धंद्यांतील बेल्जियन व अमेरिकन भांडवलदारांच्या मक्तेदारीचें उच्चाटन झाल्यास वर्षाला १३ कोटी रुपये नफा देशांतच राहून त्याचा रूआंडा-उरुंडीच्या प्रगतीसाठीं उपयोग होऊं शकतो. रूआंडा-उरुंडीची लोकसंख्या ५० लाख असून बेल्जियन भांडवलदार लुटून नेत असलेले वार्षिक १३ कोटी रुपये जर त्या देशांतच राहिले तर तेथील मागासलेपणा घालवून त्या देशाची प्रगति करणें कांहीं प्रमाणांत तरी शक्य आहे. म्हणून बेल्जियन सैन्याचें उच्चाटन, अंतर्गत ऐक्य, बेल्जियन व अमेरिकन आर्थिक मक्तेदारीचें उच्चाटन, युनोची स्वातंत्र्यवादी, शांततावादी व समाजवादी देशांची विनाअट आर्थिक मदत या चार गोष्टींवर,

रूआंडा-उरुंडीचें नवस्वातंत्र्य स्थिर होऊन त्या देशाची पुढील प्रगतीकडे वाटचाल होणें अवलंबून आहे.

पूर्व आफ्रिकेंतील या नितांतरम्य निसर्गलेण्यावर वर्षानुवर्षें वेटोळें घालून बसलेली बेल्जियन साम्राज्यवादी राजकीय पकड जरी आज नष्ट झाली असली, तरी त्याची त्यावरील आर्थिक व लष्करी पकड कायम आहे. ती जेव्हां नष्ट होईल त्याच वेळीं रूआंडा-उरुंडीचें हें निसर्गलेणें खऱ्या अर्थानें मुक्त होईल आणि राजकीय, आर्थिक व सामाजिकदृष्ट्या स्वावलंबी झालेल्या मुक्त रूआंडा-उरुंडीमधील मुक्त मानवाच्या सुखी व संपन्न हस्तांचे कलात्मक संस्कार या निसर्गलेण्यावर घडून तें याहून अप्रतिम सौंदर्यानें आणि दिमाखानें जगासमोर झळकेल !

● ● ●

# १७. कांगो ( लिओपोल्डव्हिला )

**कांगो** ( पूर्वीचें बेल्जियम )

**लोकसंख्या** – १ कोटी ४० लक्ष.

**राजधानी** – लिओपोल्डव्हिला.

**राज्य** – स्वतंत्र प्रजासत्ताक ( साम्राज्यवाद्यांचा हस्तक्षेप चालू ).

**मुख्य धंदा** – रबर, तांब्याच्या व युरेनियमच्या खाणी.

## १

अंगोलाच्या पश्चिमेस व ऱ्होडेशियाच्या पूर्वेस लागून कांगोचें राज्य आहे. कांगोचें खोरें म्हणजे विषुववृत्तीय जंगलांचा प्रदेश होय. येथील हवा उष्ण व दमट आहे. बाराहि महिने ८० इंचांवर पाऊस पडतो. भरपूर सूर्यप्रकाश व पाऊस यांमुळें महागनि, एबनि, शिस, ताड, वगैरे उंच वृक्ष व त्यांवरील वेली यांचें सदा हिरवेंगार दिसणारें दाट जंगल या ठिकाणीं वाढलें आहे. यामुळें दिवसांदेखील सूर्यकिरण जमिनीपर्यंत पोहोंचूं शकत नाहींत. जंगलांत भर दुपारीं मंद हिरवा प्रकाश पडलेला दिसतो.

जंगलांतून नाना प्रकारचे प्राणी स्वैर सफर करीत असतात. रस्ते, मोटारी व रेल्वे यांचें युग सुरू होण्यापूर्वींच्या काळचें वर्णन तर अद्‌भुतरम्य वाटण्यासारखें आहे.

राजा लिओपोल्ड कांगो जिंकायला निघाला त्यावेळीं हत्तींच्या प्रचंड झुंडी ह्या जंगलांतून हिंडत असत. घोर जंगलांतिल गुहेंतून मरून पडलेल्या हत्तींचे असंख्य दांत पडलेले असत. रबराच्या वेलींची संख्या तर अगणित होती.

जंगलांत राहणारे लोक ठेंगू व काळे असून स्वभावानें अत्यंत भोळे व सरळ होते. शिकार हा त्यांचा मुख्य धंदा होता आणि रानांतील विपुल फळें व कंदमुळें खाऊन ते राहात असत.

७५३८२

या भागांतून वाहणारी कांगो ही नदी टांगानिका सरोवराच्या दक्षिणेस असलेल्या पठारांत उगम पावते. किनाऱ्याजवळील धबधब्यांचा भाग सोडला तर तिच्यांतून १००० मैलपर्यंत प्रवास करतां येतो. तिच्या मुखाशीं १०० मैल आंत माताडी म्हणून बंदर आहे; तेथें मोठ्या बोटीदेखील येऊं शकतात.

कांगोच्या मुखाजवळच्या भागांत पाम वृक्षांचीं फार मोठीं जंगलें आहेत. आंतल्या भागांतील लोकांपेक्षां ह्या भागांतील बांटु निग्रो युरोपियन लोकांच्या शिरकावापूर्वींहि अधिक सुधारलेले होते. ते माती व लाकडें यांचीं घरें बांधून राहात व लहान प्रमाणावर शेती करीत. तांदूळ, केळीं, मनिओर, यॅम इ. पिकें ते काढीत.

कटांगाच्या पठारावर तांब्याच्या खाणी आहेत. त्यांतल्या खाणींत तांब्याच्या धातूचें जितकें प्रमाण आहे तितकें जगांतील इतर कोणत्याहि देशांत नाहीं. आणि निसर्गानें ह्या प्रदेशाला काय दिलें नाहीं ? तेथें टिन आहे, झिंक आहे, आणि पुढें समजून आलें की युरेनियमहि आहे. तेथें हिरेहि सांपडतात, आणि कोळसासुद्धां.

असा हा प्रदेश समृद्ध होता. खनिज संपत्ति व कच्चा रबर यांचा वास वसाहतकार युरोपियन लोकांना अत्यंत प्रिय होता. त्यांचे उद्योगधंदे व नफा यांची पुष्टि त्यांवरच होणार होती ! साम्राज्यवाद्यांनीं आफ्रिकेची वांटणी केली त्या काळांत, बेल्जियमचा राजा लिओपोल्ड यानें पुढाकार घेऊन ह्या प्रदेशावर हक्क सांगण्यास सुरुवात केली.

## २

कांगोचा असा हा सोन्याची खाण ठरणारा प्रदेश पिकलेलें फळ अलगद जमिनीवर पडावें त्याप्रमाणें लिओपोल्डच्या हातांत जात असलेला पाहून इंग्लंड-पोर्तुगालनें एकत्र येऊन त्याला शह देण्याचा प्रयत्न केला. पण अमेरिका, फ्रान्स व जर्मनी यांनीं बेल्जियमला पाठिंबा दिल्यामुळें अखेर बर्लिनच्या आंतरराष्ट्रीय परिषदेंत समझोता होऊन तह झाला; आणि लिओपोल्डचा ह्या प्रदेशावरील अधिकार मान्य झाला.

आंतरराष्ट्रीय मान्यता मिळतांच लिओपोल्डनें पांघरलेलें स्वार्थत्यागाचें व मानवी प्रेमाचें कातडें टाकून दिलें आणि आपलें खरें रूप दाखविण्यास प्रारंभ केला.

स्वतःच्या अधिकाराखालीं घेतलेल्या प्रदेशांत त्यानें जुलै १८८५ मध्यें " कांगोचें स्वतंत्र राज्य " जाहीर केलें; आणि तो स्वतः त्याचा " सम्राट " बनला. हें स्वतंत्र राज्य त्यानंतर बेल्जिमच्या राजाच्या सत्तेखालीं गेलें पण बेल्जियमचा त्यावर कोणताहि हक्क नव्हता; लिओपोल्ड त्या प्रदेशाचा व्यक्तिशः मालक बनला.

हळूंहळूं आपली सत्ता वाढवीत त्यानें ९ लक्ष चौरस मैलांचा टापू स्वतःच्या राज्यांत सामील करून घेतला. ह्या साम्राज्यावर त्यानें २३ वर्षें राज्य केलें.

त्याच्या ह्या प्रदीर्घ राजवटींत तो रबर व हस्तिदंत यांचा बादशहा बनला

लहान लहान झोंपड्या बांधून राहणाऱ्या रहिवाशांचीं आजूबाजूचीं छोटीं शेतें सोडून बाकीची सर्व " रिकामी जमीन " लिओपोल्डनें सरकारी जमीन असल्याचें जाहीर केलें. ह्या " रिकाम्या जमिनी "वर दाट जंगलें होतीं; या जंगलांतून हत्तींचे असंख्य कळप भटकत असत. त्यांनीं टाकलेले हस्तिदंत वरील कायद्यानें सरकारी मालकीचें झालें. जंगलांतील रबराच्या वेलींचा रसहि आतां सरकारी मालकीचा झाला. हस्तिदंत व रबर ह्या निर्यातीच्या बहुमोल वस्तु होत्या आणि ही संपत्ति लिओपोल्डच्या पायाशीं लोळण घेत होती. दुसऱ्या एका हुकमानें बादशहानें ह्या वस्तु सरकारी एजंटाखेरीज दुसऱ्या कोणालाहि विकण्यास मनाई केली. आतां फक्त एकच अडथळा उरला. जंगलांतील ही अफाट संपत्ति जमा करून आणून जहाजांत भरायची, हें काम कोण करणार ?

रबर व हस्तिदंत गोळा करण्याची वेठबिगार कांगोंतील निग्रो स्वखुषीनें स्वतःवर लादून घेण्यास तयार नव्हते; त्यांना तें काम करण्याची बिलकूल इच्छा नव्हती. मग संस्कृतीच्या शिलेदारांनीं त्यांच्यावर नवें हत्यार चालवलें — बादशहानें आपल्या प्रजेवर कर बसविले आणि करांच्या पोटीं हस्तिदंत व रबर गोळा करून आणण्याचा हुकूम सोडला. प्रत्येक गांवावर हस्तिदंत व रबर यांचा कर बसविण्यांत आला. हा कर बरोबर वसूल व्हावा म्हणून

सक्तीनें भरती करून निग्रो लोकांचेंच सैन्य उभारण्यांत आलें. कांहीं भागांत हें काम राजानें खासगी "कंपन्यांच्या" स्वाधीन केलें. कामाबद्दल कंपन्यांना सवलती देऊं केल्या. या कंपन्यांत स्वतःचे ५० टक्क्यांपेक्षां अधिक शेअर्स ठेवून लिओपोल्डनें आपलें भाडवलदारी चातुर्य सिद्ध केलें. त्यांतच स्वतःची अशी एक खासगी इस्टेट करून तिला कंपनीचें रूप दिलें. केवळ ह्या इस्टेटीमधून १० वर्षांत त्याला १ कोटी ५० लक्ष डॉलर्सचा नगद नफा झाला! कंपन्यांचे नफे वाढले तसे लिओपोल्डचे व इतर शेअर-होल्डर्सचे खिसे भरले. मूळ शेअरच्या किंमतीच्या दहा दहा पट नफा मिळवून प्रत्येक शेअर-होल्डर मोकळा झाला! लिओपोल्डला ह्या वसाहतींत कमींत कमी दोन कोटी डॉलर्स नफा मिळाला असा आंकडेशास्त्रज्ञांचा अंदाज आहे.

आणि कांगोच्या खोऱ्यांतून असा खोऱ्यानें पैसा ओढण्यासाठीं लिओ-पोल्डनें काय केलें?

त्यानें जें केलें त्याचीं वर्णनें वाचून ज्याचें रक्त गोठत नाहीं तो माणूस नव्हे. त्याच्या अत्याचारांचे मागे राहिलेले पुरावे पाहून करुणा व घृणा यांनीं ज्याच्या भावना उसळत नाहींत त्याचें काळीज दगडाचें असलें पाहिजे.

लिओपोल्डच्या "धर्मकृत्यां"ची नोंद पुढें घेऊं या.

## ३

कांगोंतून मिळणाऱ्या अफाट संपत्तीमुळें राजा लिओपोल्डचें उखळ पांढरें होत असतानाच इकडे खुनाला वाचा फुटली. कांगोंत चाललेल्या अत्या-चारांच्या बातम्या ह्या ना त्या मार्गानें बाहेर येऊं लागल्या. ग्रेट ब्रिटनच्या आदिवासी संरक्षण मंडळानें १८९३ मध्यें कांगोंतील अत्याचारांचा निषेध केला. कांगोंत अनेक वर्षें राहून परतलेल्या ब्रिटिश व अमेरिकन मिश-नऱ्यांनीं लिओपोल्डच्या राजवटीवर टीकेचा भडिमार केला. १९०३ मध्यें ब्रिटिश सरकारनें आंतरराष्ट्रीय चौकशी मंडळाच्या नियुक्तीची मागणी केली. वर्तमानपत्रांतून व पुस्तिकांतून कांगोंतील परिस्थितीबद्दलचे लेख प्रसिद्ध होऊं लागले. पैशांनींसुद्धां टीकाकारांचीं तोंडें बंद करतां येईनात. अखेर १९०४ मध्यें लिओपोल्डनें चौकशी मंडळ नेमलें. पण त्याचा

अहवाल प्रसिद्ध करण्याचें त्याला धाडस झालें नाही. सर्व जगभर बदनामी झाल्यानंतर त्यानें अहवालाचे निष्कर्ष फक्त प्रसिद्ध केले ! !

ह्या अहवालांतून, मिशनऱ्यांच्या मुलाखतींतून, प्रवाशांच्या लेखांतून व रोजनिशींतून कांगोबद्दल कोणती माहिती मिळाली? — अहवालांतील कांहीं भाग पुढीलप्रमाणें आहेत.

**गुलामांचें गाऱ्हाणें**:—( ब्रिटिश मिशनऱ्याचा अहवाल ) " अल्पावधींतच बोलणीं सुरू झालीं. स्थानिक लोक आपणहूनच माहिती सांगूं लागले. ते म्हणाले, " गोरा माणूस येथें आला तेव्हां आम्ही शांततेनें आणि समाधानानें राहात होतों. गोरे लोक आम्हांला हें करा, तें करा अशी विनंति करूं लागले. पण त्याचा अर्थ त्यांची गुलामी करा, असा वाटला म्हणून आम्ही त्यांना आमच्या देशापासून दूर ठेवण्याचा प्रयत्न केला, पण जमलें नाहीं. बंदुकांना आम्हीं पुरे पडूं शकलों नाहीं. मग आम्हीं माघार घेतली.

" प्रथम आम्हांला सैनिकांसाठीं घरें बांधून देण्याचा हुकूम झाला, तो आम्ही सहजपणानें पार पाडला. मग हे सैनिक व त्यांचीं बायका-मुलें यांना अन्न पुरविण्याचा आम्हाला हुकूम झाला. त्यानंतर आम्हाला रबर आणून द्यायला सांगण्यांत आलें. ही एक नवलाचीच गोष्ट वाटली आम्हाला. अनेक दिवस चालून जाऊन जंगलांत घुसलें कीं तेथें रबर मिळतो हें आम्हांला माहीत होतें पण त्या रबराला किंमत असते हें आम्हांला नवीन समजलें. रबर आणणाऱ्यांना लहान लहान बक्षिसें मिळूं लागलीं, मग सगळे धांवत निघाले. रानटी वेलीचा रस घेऊन त्याच्या मोबदल्यांत कापड व मणि देणारा गोरा माणूस आम्हांला फार विचित्रच वाटला. पण हळूंहळूं बक्षिसी कमी होऊं लागली आणि मग फुकटांत रबर आणायला सांगण्यांत आलें. तें आम्हाला आवडलें नाहीं. पण आम्ही अळंटळं करूं लागतांच अनेकांना गोळ्या घालण्यात आल्या आणि बाकीच्यांना सांगण्यांत आलें कीं, निमूटपणानें जाऊन सांगतों तितका रबर गोळा करून आणा नाहींतर आणखी लोकांना ठार मारूं. हें ऐकतांच सर्वजण घाबरून गेले. मग त्यांनीं रबर गोळा करतांना बरोबर न्यावी लागणारी १५ दिवसांच्या अन्नाच्या शिदोरीची तयारी करण्यास आरंभ केला. सैनिकांनीं त्यांना तेथें बसलेले

पाहिलें. ते म्हणाले, " काय ! अजून तुम्हीं गेलां नाहींत ? " मग ठो, ठो, ठो, आवाज निघाले आणि एकामागून एक लोक मरून पडले. आपल्या बायका-माणसांच्या गराड्यांत ठार मरून पडले. सर्वत्र गोंधळ माजला, रडारड सुरू झाली, मेलेल्यांना पुरण्याची तयारी सुरू झाली; पण त्याला परवानगी देण्यांत आली नाहीं. सगळ्यांना जंगलांत जाण्याचा हुकूम देण्यांत आला. " तावडतोब ? " " हो, तावडतोब. " " अन्न बरोबर न घेतां ? " " हो, तसेंच जा. " बिचाऱ्यांना जावें लागलें. त्यांच्यांतील अनेक जण उपासमारीनें मेले, अनेक जण शिपायांनीं गोळ्या घातल्यामुळें मेले. " अहवालांत पुढें म्हटलें आहे—

" मीं त्या विभागाची पाहणी केली. सात वर्षांपूर्वीं त्या एक मैलाच्या परिसरांत २००० माणसें राहात होतीं; आतां तेथें फक्त २०० आहेत. आणि त्यांच्यावर दुःखाची व निराशेची अशी दाट छाया पसरलेली आहे कीं तींहि लवकरच कमी कमी होत आहेत. "

[ १९०३ च्या जुलै, ऑगस्ट व सप्टेंबरमध्यें केलेला प्रवास. लेखकः ए. ई. स्क्रिव्हेनर, ब्रिटिश मिशनरी ]

## गवतांतील कवट्या व हाडें

ह्याच प्रवाशानें लिहिलेला आणखी एक उतारा पुढीलप्रमाणें आहे :

" रविवारीं मला कळलें कीं जवळपास हाडें पडलेलीं आहेत, आम्हीं सोमवारीं तेथेंच राहिलों आणि हाडें कोठें आहेत म्हणून विचारलें. मी राहात होतों त्या घरापासून जवळच, गवतांत मानवांच्या कवट्या, हाडें व कांहीं पूर्ण सांगाडे पडलेले होते. मीं ३६ कवट्या मोजल्या; आणि पुष्कळ हाडें पाहिलीं पण कवट्या तेथें नव्हत्या. मी एका माणसाला हांक मारून विचारलें कीं, याचा अर्थ काय ? तो म्हणाला, " रबराची मागणी सुरू झाली त्या वेळीं शिपायांनीं इतक्या लोकांना गोळ्या घालून ठार मारलें कीं आम्हीं त्याना पुरूं शकलों नाहीं, पुष्कळदां आम्हांला त्यांना पुरायला परवानगीच मिळत नसे. मग आम्हीं तीं प्रेतें गवतांत टाकून दिलीं. तुमची इच्छा असल्यास शेंकडों प्रेतांचे सांगाडे तुम्हांला बघायला मिळतील. " पण मला बिलकूल इच्छा नव्हती, जें पाहिलें तें पुरेसें होतें...... ह्या

लोकांनीं हें सर्व कर्म सहन केलें याचें मला नवल वाटलें. त्यांच्यापैकीं कांहीं जण पळून गेले ही त्यांतल्यात्यांत समाधानाची गोष्ट. मी तेथें आणखी दोन दिवस राहिलों आणि रबर गोळा करण्याची पद्धत पाहिली; तिचा माझ्या मनावर खोलवर ठसा राहिला. मीं लोकांच्या लांबच लांब रांगा येतांना पाहिल्या. त्यांच्या हातांत रबर जमवून आणलेल्या टोपल्या होत्या; त्यांच्या टिनच्या डब्यातून त्यांना मीठ देण्यांत आलें आणि त्यांच्या मुख्याच्या अंगावर दोन वार कॅलिकोचें कापड फेंकून देण्यांत आलें; हीच त्यांची मजुरी. मी त्यांना थरथर कापत असतांना पाहिलें किंबहुना दहशतीची परिस्थिति व गुलामगिरीच्या ज्या अवस्थेंत ते राहात होते त्याचे सर्व पुरावे पाहिले. ''

कांगोंतील ब्रिटिश प्रतिनिधि मि. केसमेंट यानें दिलेल्या साक्षींत एका रोजनिशीचा उपयोग केला होता. ही रोजनिशी राजाच्या एका अधिकाऱ्यानें लिहिलेली आहे. त्यांतील एक परिच्छेद पुढीलप्रमाणे आहे :

**माणसांपेक्षां काडतुसें महत्त्वाचीं**

'' सैनिकांच्या तुकडीचा पुढारी रबर आणण्याच्या कामगिरीवर निघाला कीं त्याला काडतुसें दिलीं जातात. न वापरलेलीं सर्व काडतुसें परत आणण्याचा त्याला हुकूम असतो; आणि वापरलेल्या प्रत्येक काडतुसाबद्दल एक एक उजव्या हाताचा तुकडा आणण्याचा हुकूम असतो. एका सैनिकानें मला सांगितलें कीं कधीं कधीं ते काडतुसांचा उपयोग प्राण्यांची शिकार करण्यासाठीं करतात आणि मग वापरलेल्या गोळ्यांसाठीं जिवंत माणसाचा हात तोडून नेतात. हा प्रकार किती प्रमाणावर चालतो? उत्तर असें आहे कीं, ६ महिन्यांत, कांगोच्या एका लहानशा विभागांत, ६००० काडतुसें वापरलीं गेलीं. याचा अर्थ ६००० लोक ठार करण्यांत आले किंवा थोटे करण्यांत आले; किंबहुना ६००० पेक्षां जास्त. कारण पुष्कळदां काडतूस फुकट जाऊं नये म्हणून शिपाई लहान मुलांना बंदुकीच्या दस्त्यानें ठार मारीत असत. ''

चौकशी कमिशनपुढें आलेल्या पुराव्याप्रमाणे लिओपोल्ड राजाच्या २० वर्षांच्या कारकीर्दींत कांगोची लोकसंख्या २॥ कोटींवरून १॥ कोटींवर

आली; म्हणजे त्यानें १ कोटि ते १॥ कोटि स्त्री-पुरुष व मुलें यांची हत्या केली, असा अंदाज आहे!

## " हिडीस वृत्तींतून सौंदर्यप्रसाधन "

सौंदर्यवृत्तींचें प्रदर्शनसुद्धां कधीं कधीं हिडीस वाटतें, ठाऊक आहे? लेव्ह नांवाच्या ब्रिटिश प्रवाशानें १८९४ मध्यें कमिशनपुढें पुढीलप्रमाणें साक्ष दिली:

" स्टॅन्ले फॉल्स् येथें डोक्याच्या २१ कवट्या आणण्यांत आल्या आणि कॅप्टन रोमनें एका फुलझाडांच्या ताटव्याभोंवतीं त्या शोभेच्या वस्तु म्हणून लावून ठेवल्या. "

' आळशी ' निग्रोंना उद्योगी बनविण्यासाठीं शिक्षा द्यावीच लागतें, हें तेथील अधिकाऱ्यांचें मत असल्यामुळें खून हा त्यांच्या हातचा मळ झाला होता. मारलेल्या लोकांच्या डोक्याच्या कवट्या ह्या त्यांनीं सौंदर्यप्रसाधनाच्या व दहशत बसविण्याच्या वस्तु म्हणून एकदमच वापरल्या. साम्राज्यवादी नीति किती क्रूर असते याचा पूर्ण प्रत्यय कांगोली लोकांना असा मिळाला!

## कमिशनच्या अहवालांतील कांहीं भाग

कांगोली लोकांनीं रबर व हस्तिदंत आणून राजाच्या अधिकाऱ्यांच्या स्वाधीन करावा म्हणून ठेवाव्या लागणाऱ्या सैनिकांच्या व अधिकाऱ्यांच्या खाण्यापिण्याची सर्व सोय त्याच लोकांना करावी लागते. ह्यामुळें त्यांना स्वतःला खाण्यापिण्याचे जे हाल करावे लागतात त्याचें वर्णन करतांना एका मिशनरी साक्षीदारानें सांगितलें :

" स्थानिक लोकांना लिओपोल्डव्हिलेच्या ३००० लोकांना अन्नाचा पुरवठा करावा लागतो. ही पद्धत आणखी पांच वर्षें चालू ठेवली तर ह्या जिल्ह्याची सर्व लोकसंख्या नष्ट होऊन जाईल. "

कर म्हणून रबर गोळा करण्याची पद्धत तर स्थानिक लोकांना फारच त्रासदायक आहे.

रबर गोळा करण्यासाठीं बहुतेक लोकांना दर १५ दिवसांनीं १–२ दिवस चालून रबराच्या वेलींच्या जंगलांत जावें लागतें ह्या ठिकाणीं त्यांना अनेक दिवस अत्यंत हालांत काढावे लागतात. तेथें त्यांना आसऱ्या-साठीं कांहींतरी उभारावें लागतें आणि तें अर्थातच त्यांच्या राहत्या

झोपडीपेक्षां फारच कमी प्रतीचें असतें. येथें त्यांना नेहमींच्या सरावाचें अन्नहि मिळूं शकत नाहीं. त्यांची वायका-मुलें त्यांच्याजवळ नसतात आणि जंगलांतील जनावरांच्या व प्राण्यांच्या हल्ल्याची सतत टांगती तलवार त्यांच्या डोईवर असते. रबर गोळा झाला कीं त्यांना तो प्रथम सरकारी कचेरींत नेऊन द्यावा लागतो आणि मगच ते आपल्या गांवांत जायला मोकळे होतात. आपल्या घरीं राहण्याचें स्वातंत्र्य ते २-३ दिवसच भोगूं शकतात, कारण रबरासाठीं जाण्याची पाळी त्यांच्यावर पुन्हा तावडतोब येतेच.

आम्हीं भेट दिलेल्या बहुतेक ठाण्यांवर, रबर गोळा करण्याची हमी म्हणून जामीन ठेवलेल्या स्त्रियांना तुरुंगांत बंद करण्यांत येतें, पूर्वींच्या टोळ्यांच्या सरदारांना गुलाम म्हणून वेठीला धरण्यांत येते, त्यांचा अपमान करण्यांत येतो, रबर गोळा करणाऱ्यांना चाबकानें मारण्यांत येतें, त्यांच्यावर नेमण्यांत आलेले काळे नोकर अत्याचार करतात, ह्या सर्व प्रकारांची पुन्हापुन्हा माहिती देण्यांत आली.

कांगोतील अशा या अत्याचारांना निरनिराळ्या रीतीनें वाचा फुटतांच युरोपमध्यें तो एक चर्चेचा व चळवळीचा विषय झाला. बेल्जियमच्या पार्लमेंटनें राजा लिओपोल्डनें कांगोवरचा ताबा सोडून द्यावा म्हणून त्याच्यावर दडपण आणलें. झालेल्या बेअब्रूनें चिडलेल्या राजानें प्रथम नकारच दिला. पण त्याला अखेरीस सत्ता सोडणें भाग पडलें.

१५ नोव्हेंबर १९०८ रोजीं " कांगोचें स्वतंत्र राज्य " — कांगोच्या जनतेवरची लिओपोल्ड राजाची रानटी जुलूमशाही संपुष्टांत आली आणि साम्राज्यशाहीचा अंत झाला नाहीं तरी तिच्या उघड व लाजिरवाण्या व घाणेरड्या पिळवणुकीला कांहींसा धरबंध बसला. नव्या राज्याला " बेल्जियम कांगो " हें नांव देण्यांत आलें आणि बेल्जियम साम्राज्यवाद्यांची ही वसाहत पार्लमेंटनें नेमलेल्या गव्हर्नर जनरलच्या अधिकाराखालीं देण्यांत आली.

कांगोची मालकी सोडतांना लिओपोल्ड राजानें ९५ कोटि फ्रँक्स मोबदला म्हणून पार्लमेंटकडून घेतले ! !

## ४

१९०८ मध्यें लिओपोल्ड राजाची कांगोंतील सत्ता संपुष्टांत आली आणि तो देश बेल्जियम साम्राज्याची वसाहत बनला. पण कांगोली जनतेचें भाग्य उदयास आलें नाहीं. बेल्जियमच्या **७७ पट** मोठा असलेला देश राज्यकर्त्यांनीं संपूर्णपणें व्यापारी तत्त्वावर, म्हणजे नफ्यासाठीं राबविला. ह्या काळांत कांगोवर तिहेरी सत्ता स्थापन झाली. पहिली व मुख्य राजकीय सत्ता ब्रुसेल्स ( बेल्जियमची राजधानी ) हून नेमण्यांत आलेल्या गव्हर्नर जनरलची. दुसरी सत्ता राजकीय सत्तेच्या आधारानें आर्थिक पिळवणूक करणाऱ्या बड्या कंपन्यांची. आणि ह्या परकीय सत्तेवर रंगसफेती करणारी “ दैवी ” सत्ता चर्चची.

१९०८ ते १९५८ ह्या काळांत कांगोवर अधिसत्ता गाजविणारा बेल्जियन गव्हर्नर जनरल सत्तेचें मुख्य केंद्र होता. विधानसभा किंवा कोणत्याहि प्रकारच्या प्रातिनिधीक मंडळाची अडचण त्याच्या मार्गांत नव्हती. नगरपालिकासुद्धां निवडणुकीनें अधिकारावर येत नसत. आफ्रिकन लोकांप्रमाणेंच तेथील वसाहतकार बेल्जियन व इतर युरोपियन लोकांनाहि कोणत्याच प्रकारचा मतदानाचा अधिकार नव्हता. कर बसविणें, वसूल करणें आणि त्यांची विभागणी करणें हीं सर्व कामें गव्हर्नर जनरल करीत असे.

कांगोचे सहा प्रांत केलेले होते; त्या प्रत्येक प्रांतावर गव्हर्नर नेमण्यांत आलेले असत, आणि त्यांच्या हाताखालीं जिल्हा कमिशनर्स असत. त्यांच्या हाताखालच्या सर्व अधिकाराच्या जागांवर बेल्जियम लोकांखेरीज कोणाचीहि नेमणूक होत नसे. वरपासून खालपर्यंत सर्व सरकारी यंत्रणा “ गोरी ” होती.

लिओपोल्ड राजाची रानटी राजवट व नवी पद्धतशीर लूट करणारी राजवट यांविरुद्ध कांगोली लोकांचीं मनें कटुतेनें व द्वेषानें भरून जाऊं नयेत म्हणून नव्या राजवटीनें चर्चला हाताशीं धरलें. १९२५ मध्यें बेल्जियम सरकारनें सरकारी शाळाखात्याची संपूर्ण आर्थिक मदत कॅथॉलिक चर्चच्या हातीं दिली आणि चर्चला सर्वाधिकार दिले. सरकारी पैसा फार मोठ्या प्रमाणा-

वर चर्चच्या हातांत आला. मग ठिकाठिकाणीं प्राथमिक शाळा, हॉस्पिटल्स् व घरबांधणीचे कार्यक्रम हातात घेण्यांत आले आणि जगभर कांगोंत "कल्याणकरी राज्य" (वेल्फेअर स्टेट) स्थापन झाल्याची टिमकी वाजविण्यांत आली.

कांगोच्या बेल्जियम सरकारच्या हातांत लिओपोल्ड राजाची सर्व खासगी मालमत्ता आली आणि अशा रीतीनें अफाट जमीन व व्यापारी कंपन्या सरकारी मालकीच्या झाल्या. ह्या सरकारी भांडवलाच्या ताब्यांत कांगोंतील **७० टक्के** आर्थिक व्यवहाराचें नियंत्रण आलें. अशा रीतीनें ह्या काळांत कांगोंतलि सर्व उद्योगधंदे सरकारी मालकीचे होते. उदाहरणार्थ, सोसायटी जनरल द बेल्जियम ह्या अवाढव्य कॉर्पोरेशनचे, कंपनी कांगोलीज द कॉमर्स अँड इंडस्ट्रीज ह्या कंपनीवर वर्चस्व होतें, आणि ही कंपनी कापूस, साखर, औषधें, मोटारी व दारूच्या धंद्यांवर मक्तेदारी चालवीत असे. तसेंच विमा, रेल्वेरस्ते, जहाजधंदा, विमानवाहतूक, हिरे, पशुपालन व मांस-उत्पादन केंद्रें ह्या सर्वांवर तिचा ताबा होता. अशा रीतीनें राष्ट्राच्या जीवनाच्या सर्व नाड्या हातांत ठेवणाऱ्या ह्या आर्थिक व्यवहारासंबंधीं थोडी अधिक माहिती मिळविणें आवश्यक आहे.

## ५

बेल्जियम हें अगदीं लहान राष्ट्र असून त्याची लोकसंख्या १ कोटीपेक्षां कमी आहे, पण कांगोंतील नफ्यामुळें ह्या राष्ट्रानें गडगंज भांडवल जमविलें. १९५६ मध्यें बेल्जियमचें कांगोंत **१ अब्ज पौंड** भांडवल होतें असा अंदाज आहे. त्यांपैकीं सुमारें ९० टक्के भांडवल एका लहानशा गटाचें होतें.

ह्या भांडवलानें कांगोंतील सर्व उत्पादन व आयात-निर्यात व्यापार ताब्यांत घेतल्यामुळें कांगोली लोकांच्या वाढीला कोठेंच वाव राहिला नाहीं. त्यांचें पूर्वापार शेती-उत्पादन बंद पडलें आणि बेकार लोक बेल्जियम-मालकीच्या खाणी व इतर उद्योगधंद्यांतून अगदींच किरकोळ पगारावर काम करूं लागले. त्यांतील बहुतेकांची भरती ३ टक्के उद्योग-कंपन्यांत झाली असून त्या देशांतील ७० टक्के उत्पादन करतात. यांपैकीं सर्वांत मोठी

कंपनी ' **सोसायटी जनरल** ' कटांगांतील मक्तेदारी कंपनी ' **युनियन मिनिरल द् कटांगा** ' ही ह्याच ट्रस्टचा एक भाग असून कटांगांतील तांब्याच्या प्रदेशावर तिचा ताबा आहे. त्याचप्रमाणें, कोबाल्ट, झिंक, युरेनिअम, मँगेनीज व टिन यांच्या उत्पादनाची मक्तेदारी तिच्या हातांत आहे.

धातु व मळे ह्यांवर बेल्जियम भांडवलदारी कंपन्यांनीं ताबा मिळवून कांगोंतील नैसर्गिक संपत्ति आपल्या देशांत वाहून नेली. तिच्या जोरावर त्यांनीं आपल्या देशांत उद्योगधंदे उभारले आणि ती विकून परदेशी चलन कमाविलें. याशिवाय ह्या कंपन्यांना दरवर्षीं सुमारें ८॥ **कोटी** रु. नफा होतो.

कांगोचे व तेथील संपत्तीचे खरे वारसदार असलेले कांगोली लोक मात्र दारिद्र्याच्या खाईंत लोटले गेले. त्यांच्या मालकीचे उद्योगधंदे जवळ जवळ नसल्यासारखेच. कांगोली कामगाराला पगारहि युरोपियन कामगाराच्या $\frac{1}{10}$ इतका. शहरांत त्यांची राहण्याची धड सोय नाहीं. बायको-मुलांसह राहावें तर पगार पुरत नाहीं. कांगोची राजधानी ' लिओ ' ( लिओपोल्डव्हिला ) येथील मुलांच्या परिस्थितीसंबंधीं युनेस्कोतर्फे झालेल्या एका पाहणींत पुढील गोष्टी आढळून आल्या.

" पुष्कळ आफ्रिकन मुलांची उपासमारीशीं ओळख फार लवकर होते. वयाच्या **सहाव्या** वर्षापासूनच अनेकांना २४ तासपर्यंत कांहींएक न खातां राहण्याची संवय करावी लागते. अशा मुलांची संख्या ५० टक्क्यांपेक्षां अधिक आहे. ' उपाशी राहण्याचें शिक्षण ' लवकर सुरू झाल्यामुळें अनेक मुलें आयुष्यांतील धडेहि फार लवकर शिकतात. ८–१० वर्षांचीं १२–१५ मुलें एकत्र येऊन ' **पेका** ' करतात; म्हणजे त्यांच्याजवळचें सर्व अन्न एकत्र करून तें तीं सारखें वांटून खातात. त्यांच्यांतील कांहीं नोकरीहि करतात पण त्यांना पुरेसें वेतन मिळत नाहीं. मग ३–४ मुलें एकत्र येतात, रोजची कमाई एकत्र करतात आणि पाळी-पाळीनें ती सर्व एका मुलाला देतात. "

वैभवशाली कांगोच्या परतंत्र प्रजेचें हें चित्र फार जुनें नाहीं; १९५९ चा हा अहवाल आहे.

६

भांडवलदारांच्या संपत्ति वाहून नेण्याच्या लोभामुळें कांगोचें " औद्योगीकरण " आफ्रिकेंतील इतर कोणत्याहि देशापेक्षां अधिक झालें आणि युरोपियन वैभवाचें प्रतिक म्हणून " लिओ " अस्तित्वांत आलें.

कांगोची ही राजधानी कांगो नदीच्या तीरावर वसलेली आहे. नदीला लागून युरोपियन विभाग आहे. तेथें प्रशस्त व मनोहारी बागा आहेत. मोठमोठीं फॅशनेबल दुकानें आहेत. या दुकानांतून पॅरिस-फॅशनच्या कपड्यांपासून ते मोटरींपर्यंत सर्व वस्तु विकल्या जातात. इथें भव्य हॉटेल्स व आरामगृहें आहेत. टेनिसकोर्ट व पोहोण्याचे तलाव असलेले प्रवाशांसाठीं " अर्थात युरोपियन " भाड्यानें दिले जातात. रस्त्यांवर मोटारींची व सायकलींची गर्दी असते आणि शहराच्या मध्यभागीं उंचच उंच गगनचुंबी इमारती आहेत.

ह्या विभागाला लागून रेल्वे लाईन आहे आणि रेल्वे लाइनच्या पलीकडे कांगोली लोकांची वसाहत आहे. ही लाईन दारिद्र्य व संपन्नता यांच्यांतील सीमा आहे. सामाजिक अन्याय व सत्ता यांच्यामधील सीमा आहे. इथें झांपा टाकलेल्या हजारों झोपड्या आहेत; त्यांत अंधार व ओल आहे. वस्तींतून रस्ता नाहीं, पाणी नाहीं, वीज नाहीं. पुरुषमंडळी दिवसभर घराबाहेर काढतात. बायका सूत कांततात, जेवण करतात आणि मुलांचें पोषण करतात. मोठीं मुलें मातींत खेळतात. लिओ ह्या आधुनिक सुखसोयींनीं सज्ज असलेल्या राजधानीची स्वातंत्र्यपूर्व काळांत ही अवस्था होती. तेथल्या ३ लक्ष ७१ हजार वस्तीपैकीं ३ लक्ष ५० हजार कांगोलींचें जीवन असें होतें!

ह्या सर्व अन्यायांमुळें असंतुष्ट झालेल्या आणि आफ्रिकेंतील इतर राष्ट्रांच्या स्वातंत्र्यामुळें जागृत झालेल्या कांगोली लोकांनीं आपल्या स्वातंत्र्य-लढ्याला प्रारंभ केला आणि कांगोंत आपण त्रिकालाबाधित राज्य करूं हें बेल्जियम साम्राज्यवाद्यांचें स्वप्न भंग पावलें.

७

१९५७ सालीं कांगोंत नगरपालिकेच्या पहिल्या निवडणुका झाल्या. त्यांत दिसून आलेला राष्ट्रवादी भावनेचा जोर पाहून राज्यकर्ते थक्क झाले.

लिओपोल्डव्हिलाच्या एका आफ्रिकन वसाहतीचे मेयर जोसेफ कासावूबू यांनीं **अबाको मूव्हमेंट** ( द ॲसोसिएशन ऑफ द पीपल ऑफ द लोअर कांगो ) ही संस्था स्थापन केली. १९५८ मध्यें **पॅट्रिस लुमुंबा** यांनीं **कांगोली राष्ट्रीय मूव्हमेंट** ( कांगोलीज नॅशनल मूव्हमेंट ) ह्या संस्थेची स्थापना केली. ह्या दोन्ही संस्थांचे नेते आणि इतर कार्यकर्ते १९५८ मध्यें **आक्रा** येथें भरलेल्या आफ्रिकन जनतेच्या परिषदेसाठीं लुमुंबांच्या नेतृत्वाखालीं कांगोली जनतेचे प्रतिनिधि म्हणून उपस्थित झाले.

१९५८ मध्यें, घाना, लायबेरिया, मोरोक्को, ट्युनिशिया, लिबिया, इजिप्त, सुदान व इथोपिया इतकीं आफ्रिकन राष्ट्रें स्वतंत्र झालीं होतीं. त्यांच्या पुढाकाराखालीं घानाची राजधानी आक्रा येथें भरलेल्या परिषदेंत सर्व परतंत्र आफ्रिकी राष्ट्रांच्या प्रतिनिधींनीं परस्परांच्या राष्ट्रीय स्वातंत्र्य-लढ्यांना सहानुभूति व बंधुभाव व्यक्त केला. जागृत आफ्रिकेच्या स्वातंत्र्य-भावनेचें तें विराट प्रदर्शन पाहून साम्राज्यवादी सत्ता खवळून गेल्या.

आक्रा परिषदेंत पास झालेला कांगोच्या स्वातंत्र्याचा ठराव जनतेला समजावून सांगण्यासाठीं पुढाऱ्यांनीं ४ जानेवारी १९५९ रोजीं लिओपोल्ड-व्हिलामध्यें सभा बोलाविली असतां तेथें प्रचंड जनसमुदाय जमा झाला. सरकारनें प्रथम सभा बेकायदेशीर असल्याचें फर्मान काढलें आणि मग जमावावर गोळीबार केला. कांगोच्या स्वातंत्र्य-लढ्याची पहिली सलामी अशी झाली. त्यानंतर चिडलेल्या जनतेनें शहर ताब्यांत घेतलें. युरोपमधून पॅराट्रुप्स आणल्यानंतरच बेल्जियम अधिकाऱ्यांना परिस्थिति पुन्हा "शांत" करतां आली. ह्या अवधींत लष्करांत केलेल्या गोळीबारांत शेंकडों आफ्रिकन्स ठार झाले; आणि १०० पुढाऱ्यांना व कार्यकर्त्यांना तुरुंगांत बंद करण्यांत आलें.

१९५९ च्या ऑक्टोबरमध्यें स्टॅन्लेव्हिला येथें भरलेल्या कांगोच्या सर्व राजकीय पक्षांच्या परिषदेंत लुमुंबांनीं, " कांगोला ताबडतोब स्वातंत्र्य मिळालें पाहिजे, " ही मागणी मांडली. ह्या मागणीसाठीं जनतेनें प्रचंड निदर्शन केलें. सरकारनें तावडतोब लुमुंबांना अशांतता माजविल्याच्या आरोपाखालीं सहा महिन्यांची शिक्षा ठोठावली.

सर्व देशभर लुमुंबांच्या मुक्ततेची मागणी उठली. अखेरीस १९६० च्या प्रारंभीं सरकारला माघार घेऊन बोलणीं सुरू करावीं लागलीं. ब्रुसेल्स येथें भरलेल्या परिषदेसाठीं लुमुंबांसह अनेक कांगोली नेत्यांना तुरुंगांतून आणून साम्राज्यवाद्यांना हजर करावें लागलें. परिषदेंत लहानसहान सवलती देऊन मुख्य प्रश्न लांबणीवर टाकण्याचे अनेक डाव साम्राज्यवाद्यांनीं टाकले. पण कांगोली नेत्यांच्या निर्धारामुळें अखेरीस ३० जून रोजीं कांगोला स्वातंत्र्य देण्याचें अभिवचन देणें साम्राज्यवाद्यांना भाग पडलें.

२२ मे १९६५ रोजीं कांगोंत पहिली सार्वत्रिक निवडणूक झाली. ह्या निवडणुकींत पॅट्रिस लुमुंबा यांचा पक्ष कांगोलीज नॅशनल मूव्हमेंट, कासावूबू यांचा पक्ष अबाको पार्टी ऑफ आफ्रिकन सोलिडॅरिटी ह्या प्रमुख राजकीय पक्षांनीं व इतरांनीं भाग घेतला. साम्राज्यवाद्यांनीं ह्या स्वातंत्र्यवादी पक्षांच्या हातीं सत्ता जाऊं नये म्हणून नॅशनल प्रोग्रेसिव्ह पार्टी नांवाचा पक्ष उभारून, लाखों रुपये खर्च करून वर्तमानपत्रांतून त्या पक्ष-उमेदवारांची टिमकी वाजविली व देशभर बेल्जियमहून आणलेल्या लष्कराची गस्त निवडणुकांच्या आधल्या दिवसापासून सुरू करून दहशत बसविण्याचा प्रयत्न केला.

पण ह्या सर्व प्रयत्नांना अपयश आलें. कांगोली जनतेनें मोठ्या सणाच्या उत्साहानें निवडणुकांत भाग घेतला. लुमुंबांच्या पक्षाला ४१ जागा मिळाल्या, कासावूबूच्या पक्षाला १२ जागा मिळाल्या, सॉलिडॅरिटी पार्टीला १३ जागा मिळाल्या आणि साम्राज्यवाद्यांच्या पक्षाला २१ जागा मिळाल्या. अशा रीतीनें कांगोमध्यें स्वतंत्र सार्वभौम मध्यवर्ति सरकार स्थापन व्हावें, ह्या बाजूनें जनतेनें मतदान केलें आणि लोकसभेंतहि त्या विचारांना प्रतिसाद मिळून पॅट्रिस लुमुंबांच्या नेतृत्वाखालीं कांगोचें पहिलें सार्वभौम सरकार अस्तित्वांत आलें.

पण अमाप नफ्याचें पीक देणारें कांगोचें राज्य इतक्या सुखासुखीं सोडण्यास साम्राज्यवादी तयार नव्हते.

## ८

मोठ्या चमत्कारिक घटना कांगोंत झपाट्यानें घडूं लागल्या. स्वराज्याचा कारभार सुरू होण्याच्या सुमारास बेल्जियम सरकारनें कांगोंतील सर्व

**सुवर्णगंगाजळी** काढून नेली; सेवानिवृत्त बेल्जियम अधिकाऱ्यांना पेन्शन देण्यासाठीं आणि निर्वासित होणाऱ्या बेल्जियम लोकांना नुकसानभरपाई देण्यासाठीं हें सोनें नेण्यांत आलें, असा सरकारी खुलासा करण्यांत आला. सरकारी खजिन्यांतील **चलनाला** एकदम ओहोटी लागली. १९५७ मध्यें सरकारी खजिन्यांत ७ कोटी पौंड होते; त्यांतील १९५९ च्या अखेरीस फक्त ३० लक्ष पौंड शिल्लक उरले. पूर्वी कांगोंतील सेंट्रल बॅंकेकडे सरकारकडून घेतलेले ५०० कोटी फ्रॅंक्सचें कर्ज होतें. स्वतंत्र सरकारला कारभार हातांत घेतांना आढळून आलें कीं ह्या बेल्जियम वर्चस्वाखालील बॅंकेला आपण २०० कोटींपेक्षां अधिक देणें लागतों ! ! स्वतंत्र सरकारला आढळून आलें कीं सरकारी नोकरांना देण्याच्या पगाराची रक्कम कांगोच्या बाहेर पाठवून देण्यांत आली होती आणि बरीच मोठी पगाराची रक्कम बेल्जियमच्या बॅंकेंत अडकलेली होती.

ह्या सर्व गोष्टी उघडकीस आल्या आणि लुमुंबांचें स्वातंत्र्यप्रेम अधिकच उफाळून आलें. पंतप्रधान म्हणून केलेल्या पहिल्याच भाषणांत त्यांनीं कांगोचें स्वतंत्र सरकार राष्ट्राच्या राजकीय व आर्थिक पुनर्रचनेचे सर्व प्रयत्न करील आणि साम्राज्यवाद्यांच्या गोटांत सामील न होतां अलिप्ततावादी परराष्ट्रीय धोरणाचा स्वीकार करील अशी घोषणा केली. त्यामुळें साम्राज्यवादी अधिकच चिडले आणि त्यांनीं राज्यांतील फुटीर प्रवृत्तींना व आपल्या हस्तकांना बंडाळी करून लुमुंबा सरकार उलथून पाडण्याची चिथावणी दिली.

कांगोला स्वातंत्र्य देतांना बेल्जियम साम्राज्यवाद्यांनीं कांगोच्या लष्करावर आपलें नियंत्रण राहील, सर्व अधिकारी व तंत्रज्ञ बेल्जियम राहतील अशी अट घातली होती. कटांगा प्रांतांतील कामिना व किटोना व बनाना ह्या ठिकाणीं स्वतःचे लष्करी-तळहि साम्राज्यवाद्यांनीं ठेवले होते, पण लोकांच्या राष्ट्रीय भावनेला ह्या अटी मानवण्यासारख्या नव्हत्या.

१९६० च्या जुलै महिन्यांत बेल्जियम अधिकाऱ्यांना काढून टाकण्याची मागणी उठाव करून कांगोच्या लष्करानें केली आणि सरकारनें ती मान्य केली. ह्या घटनेचें निमित्त करून बेल्जियम सरकारनें कांगोंत मोठ्या

प्रमाणावर विमानानें लष्कर व लष्करी सामुग्री उतरविली आणि सर्व राज्यभर बेल्जियम फौजांचे तळ बसविले. नव-स्वतंत्र देशावरचें हें साम्राज्यवादी आक्रमण परतवून लावण्यासाठीं कांगोच्या सरकारनें यूनोच्या सुरक्षा मंडळाकडे मदत मागितली. यूनोंत या मागणीला आशिया-आफ्रिकेंतील नवस्वतंत्र राष्ट्रांनीं जोरदार पाठिंबा दिला आणि ताबडतोब भारतासह २९ राष्ट्रांतील १८५०० शिपायांची फौज कांगोच्या मदतीसाठीं उभारण्यांत आली व तेथें रवाना झाली.

साम्राज्यवाद्यांच्या लष्कराच्या जोडीला तेथील बेल्जियम रहिवाशी त्याचप्रमाणें त्यांच्या हस्तक संस्था लुका व नॅशनल प्रोग्रेसिव्ह पार्टी यांचे पुढारी उभे राहिले आणि त्यांनीं पंतप्रधान लुमुंबा यांचा खून करण्याचें कारस्थान रचलें. पण तें उघडकीला आलें आणि लढाईला जोरानें तोंड लागलें.

त्याच वेळीं बेल्जियम मक्तेदारांचा सर्वांत समृद्ध असलेला खाणीचा प्रदेश कटांगा येथें प्रांताचा मुख्य प्रधान शोंबे यानें बंड केलें आणि मध्यवर्ति सरकारची सत्ता धुडकावून लावून स्वतंत्र झाल्याचें जाहीर केलें. ' युनियन मिनेरो ' ह्या कंपनीच्या खाण-मालकांनीं युद्धासाठीं अमाप पैसा शोंबेच्या हवालीं केला. यूनोनें ठराव करून बेल्जियम सरकारवर दडपण आणलें. साम्राज्यवाद्यांच्या फौजा कटांगांत केंद्रित झाल्या. त्यांच्याच चिथावणीनें कसाई हा खाणीचा प्रदेशहि मध्यवर्ति सरकारविरुद्ध बंडांत सामील झाला. कांगोंत अराजक माजलें आणि यादवी युद्धाची धुमश्चक्री चालू झाली.

तशांत घाबरलेल्या कासावूबूनें लुमुंबांविरुद्ध कारवाया केल्या आणि अखेरीस लष्करी अधिकारी मोबुतु यानें सत्ता ताब्यांत घेतली. ह्याच लष्करी सत्तेनें लुमुंबांचा व त्यांच्या दोघां सहकाऱ्यांचा अमानुषपणानें खून केला. शोंबेच्या लष्करानें यूनोचे जनरल सेक्रेटरी हमरशोल्ड यांचें विमान पाडून त्यांनाहि ठार मारलें.

अशा रीतीनें साम्राज्यवाद्यांनीं नव-स्वतंत्र कांगोला रक्तपातांत बुडवून टाकलें आणि देशभर अंदाधुंदी निर्माण केली.

तरीहि लुमुंबा सरकारांतील उपपंतप्रधान **गिझेंगा** यांनीं स्टॅन्लेव्हिला येथें प्रतिसरकारची स्थापना केली आणि ताबडतोब जनतेचे मोठे विभाग त्यांच्या

पाठीशीं उभे राहिले. त्यांनीं शोंबेच्या गोऱ्या फौजांना मोठ्या प्रमाणावर काबूंत आणलें. अखेरीस यूनोच्या मदतीनें १९६१ च्या ऑगस्टमध्यें कांगोच्या पार्लमेंटची बैठक होऊन त्यांत **अदौला** यांची पंतप्रधान म्हणून व **गिझेंगा** यांची उपपंतप्रधान म्हणून निवड झाली.

परंतु पुढें अदौला बेल्जियम व इतर अमेरिकन पाश्चिमात्य राष्ट्राच्या दडपणाला बळीं पडले; त्यांनीं शोंबेबरोबर तडजोडीचीं बोलणीं सुरू केलीं आणि गिझेंगांना अटक करून तुरुंगांत टाकलें. अशा रीतीनें स्वातंत्र्य-लढ्यांतील सर्व मान्यवर नेत्यांना दूर केल्यानंतर अमेरिकन साम्राज्यवाद्यांनीं यूनोंतील आपल्या अधिकाऱ्यांना शोंबेला काबूंत आणण्याचा इशारा दिला. १९६३ च्या प्रारंभीं कटागा प्रांत यूनोच्या फौजांनीं जिंकला आणि शोंबेनें आपण " स्वखुशीनें हद्दपार होत आहोंत " असें जाहीर केलें.

त्यानंतरच्या काळांत कांगोंत फार झपाट्यानें घडामोडी झाल्या. अदौला सरकारवरचा जनतेचा विश्वास उडाल्याचें स्पष्ट प्रत्यंतर येऊं लागलें. ॲन्टोनी गिझेंगा यांच्या मुक्ततेच्या मागणीला देशव्यापी चळवळीचें स्वरूप आलें. लुमुंबा यांनीं स्थापन केलेल्या कांगोली राष्ट्रीय मूव्हमेंट व गिझेंगांनीं स्थापन केलेल्या आफ्रिकी ऐक्य (सॉलिडॅरिटी) पार्टी यांचा जोर एवढा वाढला कीं अदौलांनीं सप्टेंबरमध्यें त्यांच्यावर बंदी घातली; शेंकडों लोकांना अटक केली. त्यांत पार्लमेंटचे ५ सभासद होते आणि आणखी ७ सभासदांवर पकड वॉरंटें काढलीं. ऑक्टोबरमध्यें " आणीबाणीची परिस्थिति " जाहीर करण्यांत आली आणि २४ ट्रेड युनियन पुढाऱ्यांना अटकेंत टाकण्यांत आलें.

ह्या परिस्थितींत अनेक देशभक्त कांगो नदीच्या पैलतीरावरील ब्राझाव्हिला येथें पळून गेले आणि त्यांनीं तेथें **राष्ट्रीय मुक्ति समिति** स्थापन केली; आणि अदौला सरकार उलथून पाडण्याची तयारी केली. त्यानंतर लुमुंबा सरकारांतील शिक्षणमंत्री **पिडारे मुलेले** यांच्या नेतृत्वाखालीं १९६४ च्या जानेवारींत किलु प्रांतांत सशस्त्र उठावाला प्रारंभ झाला. अध्यक्ष कासावूबू यांनीं पार्लमेंट बरखास्त केलें; कारण पार्लमेंटचे २०-२५ सभासद मुक्ति-संग्रामांत सामील झाले होते. सशस्त्र उठावाचीं केंद्रें किलु प्रांतांत व उत्तर काटांगांतहि स्थापन झालीं. उत्तर कटांगा प्रांताची राजधानी अल्बर्टव्हिला

मुक्ति फौजांनीं ताब्यांत घेतली आणि तेथें तात्पुरत्या सरकारची स्थापना केली.

अशा परिस्थितींत १९६४ च्या जुलैच्या अखेरीस, यूनोच्या फौजा कांगोंतून निघून गेल्यानंतर, कांगो देश कांगोली जनतेच्या ताब्यांत जाईल, असें स्पष्ट चित्र दिसूं लागलें आणि मग साम्राज्यवाद्यांच्या हालचालींना पुन्हा प्रारंभ झाला. त्यांनीं शोंबेला पुन्हा बाहेर काढला. तो स्पेनमध्यें माद्रिद येथें ऐषआरामांत राहात होता. तेथून लंडनला गेला आणि अमेरिकन, ब्रिटिश, फ्रेंच व बेल्जियम मक्तेदारी भांडवलदारांच्या प्रतिनिधींनीं त्याच्या आधारावर कांगोवर पुन्हा जाळें टाकण्यास धीरानें सुरुवात केली.

शोंबे कांगोंत दाखल झाला आणि पूर्वींचे सर्व पगारी लष्कर त्याच्या भोंवतीं गोळा झालें. राष्ट्रीय एकजुटीची भाषा बोलून त्यानें कांहीं लोकांना वश करून घेतलें. मक्तेदार कंपन्या त्याच्या पायाशीं पैसा व शस्त्रास्त्रें यांचा ढीग करूं लागले आहेत, युरोपियन्स हातांत शस्त्रें घेत आहेत, आणि मुक्त होत चाललेल्या कांगोंत पुन्हा एकदां साम्राज्यवाद्यांचा हस्तक्षेप होत आहे. पण ह्या सर्व यमयातनांतून कांगो मुक्त झाल्याशिवाय राहील काय ?

● ● ●

## १८. कांगो प्रजासत्ताक ( ब्राझाव्हिला )

**कांगो** – ( पूर्वींचें फ्रेंच )

**लोकसंख्या** – ८ लक्ष, पैकीं ७ लक्ष–बाकांगो.

**राजधानी** – ब्राझाव्हिला.

**राज्य** – स्वतंत्र प्रजासत्ताक.

**मुख्य धंदा** – तेलाचे व पेट्रोलियमचे कारखाने.

१

पूर्वींच्या बेल्जियम कांगोला लागून फ्रेंचांनीं जिंकलेला कांगोचा भाग आहे; तो आतां कांगो प्रजासत्ताक ह्या नांवानें ओळखला जातो. हा कांगोचा प्रदेश, बेल्जियमपासून स्वतंत्र झालेलें कांगो, पोर्तुगीजांच्या ताब्यांत असलेला **कॅबिंडा** नांवाचा छोटासा प्रदेश व **अंगोला** ह्या चार राज्यांत प्राचीन काळच्या कांगो राज्यांतील मूळचे **बाकांगो** लोक विभागले गेले आहेत. त्यांची एकुण संख्या ३० लक्ष असून त्यांतील ७ लक्ष लोक कांगो प्रजासत्ताकांत आहेत. ह्या राज्याची लोकसंख्या ८ लक्ष आहे. स्वाभावि - पणेंच राज्यावर स्पष्ट छाप बाकांगो लोकांचा आहे.

कांगो प्रजासत्ताकाची राजधानी **ब्राझाव्हिला** व ( पूर्वींच्या बेल्जियम ) कांगोची राजधानी लिओपोल्डव्हिला कांगो नदीच्या दोन्ही तीरांवर जवळ-जवळ समोरासमोर आहेत. कांगोच्या ऐलपैल तीरावरील ब्राझा व लिओ हीं शहरें अनेक दृष्टींनीं भिन्न आहेत. लिओ जितकें संपन्न आहे तितकेंच ब्राझा गरीब आहे. कारण ( पूर्वींचा बेल्जियम ) कांगो प्रदेश जितका सुपीक व खनिज संपत्तीनें समृद्ध आहे तितकाच हा निकृष्ट आहे. अलीकडे तेल सांपडल्यामुळें मात्र पेट्रोलियम तेलाचे कारखाने निघाले आहेत. बाकी उद्योगधंदे जवळजवळ नाहींतच आणि साक्षरतेचें प्रमाणहि १० टक्क्यांपेक्षां कमी आहे.

आफ्रिकेंतील फ्रेंचांच्या साम्राज्यांतील सर्व राज्यांतील (अल्जेरिया सोडून) राजकीय घडामोडी जवळजवळ सारख्याच आहेत. त्यांचा एकत्र आढावा पुढें घेण्यांत आला आहे. (पुढील – फ्रेंच पूर्व साम्राज्यावर दृष्टिक्षेप हें प्रकरण पाहा.) कांगो प्रजासत्ताकाबद्दल सांगायचें तर १९५६ मध्यें त्यास कांहीं राजकीय हक्क मिळाले आणि तेथें निवडणुका होऊं लागल्या. अर्थात् सर्व राजकीय हक्क पॅरिसच्या पार्लमेंटलाच होते आणि येथील प्रतिनिधि त्या लोकसभेंत सभासद म्हणून जात असत. पुढें १९५८ मध्यें फ्रेंच साम्राज्यांतर्गत स्वयंशासित प्रजासत्ताकाचा दर्जा ह्या राज्याला मिळाला.

ॲबर्ट फुलबर्ट युलू नांवाच्या कॅथॉलिक धर्मगुरूच्या नेतृत्वाखालीं पहिलें सरकार स्थापन झालें. देश लहान त्यांतून साम्राज्यवाद्यांना त्याच्या ४ प्रांतांना स्वायत्तता देऊन फारच लहान केला व उद्योगधंद्यांसाठीं पैसे त्याहूनहि थोडे. तशांत युलू सरकारनें देशहिताच्या कोणत्याच गोष्टींना प्रारंभ केला नाहीं. कोणत्याच सुधारणा केल्या नाहींत. पैसे खाऊन मंत्री गब्बर झाले आणि लोक अधिकाधिक दरिद्री झाले. स्वाभाविकपणेंच ह्या सरकारबद्दल अत्यंत अप्रियता निर्माण झाली आणि १९६३ च्या ऑगस्टमध्यें लोकांनीं क्रांति करून तें उलथून पाडलें.

१५ ऑगस्टला निःशस्त्र निदर्शकांचा मोठा जमाव मुख्य मंत्र्याच्या घरासमोर जमला. तो ॲबट सरकारच्या राजीनाम्याची मागणी–घोषणा देऊन करीत होता. सैन्यसुद्धां लोकांच्या बाजूनें उभें राहिलें आणि सरकार कोसळलें. फ्रेंच साम्राज्यवाद्यांना आपल्या मित्रांना मदत देण्यासाठीं हातसुद्धां वर करतां आला नाहीं.

तें सरकार आफ्रिकन हितसंरक्षक लोकशाही युनियन ह्या ॲबट युलूंनीं स्थापलेल्या पक्षावर आणि जॅक्वीस ऑपनगॉल्ट यांच्या पुढाकाराखालील आफ्रिकन समाजवादी आंदोलन या नांवाच्या पक्षावर आधारलेलें होतें. त्या दोघांनीं सत्तेची वांटणी करून घेतली होती. उत्तर भाग ऑपनगॉल्टच्या बाजूचा व दक्षिण युलूच्या बाजूचा होता. म्हणजे त्यांची एकजूट निरनिराळ्या जमातींतील वैरभावावर अवलंबून होती. ऑगस्ट क्रांतिनंतर दोन्ही पक्षांत फाटाफूट झाली, ते नष्ट झाले. जमातींचे पुढारी व फ्रेंच-धार्जिणे पदाधिकारी यांचें जनतेवरील वजन नष्ट झालें आणि ट्रेड युनियन पुढारी व जनसंघटना

यांनीं त्यांची जागा घेतली. अर्थात पूर्वींपासून चिथावण्यांत आलेल्या भांडणांचे अवशेष व परस्परांबद्दलचा अविश्वास निरनिराळ्या जमातींतून अद्याप संपूर्णपणें नष्ट झालेला नाहीं आणि त्याचा फायदा घेऊन प्रतिगामी लोक अजूनहि दंगे पेटविण्याचा प्रयत्न करतात. **पास्कल लिस्सौबा** यांच्या नेतृत्वाखालच्या मंत्रिमंडळाला म्हणूनच सदोदित तत्पर राहावें लागतें.

लोकसंख्या वाढती आहे, नवे उद्योगधंदे फारसे निघालेले नाहींत, शेतकरी व बेकार शहरांत नोकरीसाठीं गर्दी करीत आहेत—असे प्रश्न सरकारपुढें आहेत.

सरकारी खर्चांत कमाल काटकसर, आफ्रिकेंतील व इतर देशांतील भांडवलाची मदत, खासगी व सरकारी क्षेत्रांत उद्योगधंद्यांचा विकास अशा योजना नव्या सरकारनें आंखल्या आहेत. १९६४ च्या मेमध्ये अध्यक्ष मसांबा डेबट यांनीं घानाला भेट देऊन अध्यक्ष क्वामे न्क्रुमा यांची भेट घेऊन त्या बाबतींत बोलणीं केलीं. जूनमध्यें अल्जेरियाचे अध्यक्ष बेन बेला यांची भेट घेतली आणि नंतर सरकारी प्रतिनिधीमंडळानें सोविएत युनियन व इतर समाजवादी देशांबरोबर बोलणीं केलीं.

अमेरिकेचा दुय्यम स्टेट-सेक्रेटरी हॅरिमन यांनीं ब्राझाव्हिलाचें सरकार लिओपोल्डव्हिलाच्या दृष्टीनें धोक्याचें आहे, असें जाहीर करून हस्तक्षेपाला उत्तेजन देण्याचा प्रयत्न केला; परंतु आफ्रिकेच्या एका अत्यंत अविकसित भागांत झालेली ही क्रांति टिकून राहील व यशस्वीपणें जनतेचे प्रश्न सोडवील अशी जाणकारांना आशा वाटते.

# फ्रेंच पूर्व-साम्राज्यावर दृष्टिक्षेप

## फ्रेंचांचें विषुववृत्तीय आफ्रिकी साम्राज्य आणि पश्चिम आफ्रिकी साम्राज्य

आजच्या कांगो प्रजासत्ताकाला धरून, पश्चिम टोंकावर सेनेगालपर्यंत फ्रेंचांचें फार मोठें साम्राज्य पसरलेलें होतें. त्याचे दोन मोठे प्रादेशिक विभाग करण्यांत आले होते. **फ्रेंचांची विषुववृत्तीय आफ्रिका** ( राजधानी ब्राझाव्हिला ) आणि **फ्रेंचांची पश्चिम आफ्रिका** ( राजधानी दाकार-

सेनेगाल ). याशिवाय **टोगोलँड व कॅमेरून** हे दोन विश्वस्त प्रदेश होते. ह्या सर्व प्रदेशांची राजकीय वाटचाल एकाच पद्धतीनें झाली आहे.

फ्रेंच साम्राज्यवाद्यांचें राजकीय सूत्र हें होतें कीं, **त्यांचें साम्राज्य हा फ्रान्सचा भाग आहे.** पोर्तुगीज साम्राज्यवाद्यांची " सामिलीकरणाची नीति " व फ्रेंचांची ही नीति पुष्कळच सारखी होती. फ्रेंच भाषा बोलतां येणाऱ्या व मातब्बर अशा निवडक आफ्रिकन लोकांना मतदानाचा हक्क देऊन पॅरिसमधील लोकसभेसाठीं प्रतिनिधि-सभासद निवडण्यांत येत असत. आफ्रिकेंतील राजकीय पक्ष फ्रान्समधील पक्षांच्या शाखा असत आणि त्या पक्षांच्या मतांमध्यें येथील मतांचाहि समावेश करण्यांत येत असे. हा प्रकार १८७० पासून १९५६ पर्यंत चालू होता. पण आफ्रिकेंतील इतर वसाहतींत स्वतंत्र व सार्वभौम सत्तांचा उदय होतांच फ्रेंचांच्या वसाहतींतील ह्या डोलाऱ्यालाहि तडा गेल्या.

१९४५ मध्यें फ्रेंचांनीं आपल्या पश्चिम आफ्रिकेंतील साम्राज्याला फ्रेंच युनियन हें नांव दिलें. आणि १९५६ मध्यें ह्या युनियनमधील ८ प्रांतांना कांहीं प्रमाणांत लोकशाहीचे हक्क दिले. सार्वत्रिक मतदानाचा हक्क आणि लोक-मतानें निवडलेलीं मंत्रिमंडळें स्थापन करण्याचा अधिकार युनियनमधील प्रांतांना मिळाला. पण स्वातंत्र्याच्या हक्काचा मागमूसहि ह्या " कायद्याच्या रूपरेखेंत " ( outline-law मध्यें ) नव्हता. पॅरिसमधून नेमलेल्या गव्हर्नराच्या हाताखालीं ह्या मंत्रिमंडळांनीं कारभार करावयाचा होता. फ्रेंचांच्या वसाहती राज्याचें राज्यशकट हांकलणारे व्यवस्थापक मंडळ हेंच नांव ह्या नव्या मंत्रिमंडळांना शोभण्यासारखें होतें. आणि ह्या नव्या घटनेचा पाया ‘ स्वातंत्र्य ’ हा नव्हता तर ‘परस्परावलंबित्व’(inter dependence) म्हणजेच परावलंबन हा होता. ह्या घटनेमुळें फ्रेंचांच्या पश्चिमी आफ्रिकन वसाहतींत **दाहोमी, अप्पर व्होल्टा, माली, आयव्हरी कोस्ट, गिनी, सेनेगाल व निगर** ही आठ स्वायत्त ( self governing ) राज्यें आस्तित्वांत आलीं.

लौकरच ह्या राज्यांच्या व विषुववृत्तीय आफ्रिकन राज्यांच्या स्वातंत्र्याचा प्रश्न फ्रेंचांना भेडसावूं लागला. अखेरीस १९५८ मध्यें फ्रान्सचे सर्वसत्ताधारी जनरल द गॉल यांनीं आफ्रिकेंतील वसाहतींना संपूर्ण स्वतंत्र होण्याचा अगर

आफ्रिका-फ्रेंच कुटुंबांत ( All French Commnuity मध्यें ) भागीदारी स्वीकारण्याचा हक्क दिला. त्याचा फायदा घेऊन गिनीच्या राज्यानें संपूर्ण स्वातंत्र्याचा अधिकार मागितला. बाकीच्या राज्यांनीं फ्रेंच राष्ट्रकुटुंबांत राहण्याचें मान्य केलें. त्यानंतर विषुववृत्तीय फ्रेंच वसाहतींत **चार मध्य आफ्रिकन प्रजासत्ताक, गॅबन व कांगो प्रजासत्ताक** हीं चार स्वायत्त राज्यें स्थापन झालीं.

यांपैकीं कांगो प्रजासत्ताकाची माहिती पूर्वीच्या प्रकरणांत दिली आहे. म्हणूनें गॅबन, मध्य आफ्रिकन प्रजासत्ताक व चाद यांचा आतां परिचय करून घ्यायचा आहे.

• • •

# १९. गॅबन

**लोकसंख्या** – ४ लक्ष, ५० हजार; ४ हजार ५०० फ्रेंच.

**राजधानी** – लायब्रेव्हिला.

**राज्य** – स्वतंत्र प्रजासत्ताक.

**मुख्य धंदा** – मॅंगनीज, युरेनियम, कोळसा, सोनें, लोखंड वगैरेंच्या खाणी.

## १

कांगो प्रजात्ताकाला लागून गॅबन प्रजासत्ताक आहे. त्याची लोकसंख्या ४ लक्ष ५० हजार असून सुमारें ४ हजार ५ शें लोक युरोपियन (मुख्यतः फ्रेंच) आहेत. **लायब्रेव्हिला** ही त्याची राजधानी आहे. आर्थिकदृष्ट्या हें राज्य अविकसित आहे.

१९५८ मध्यें द गॉल घटनेप्रमाणें ह्या राज्याला फ्रेंच कुटुंबांतर्गत स्वायत्त प्रजासत्ताकाचा दर्जा मिळाला; १९६० मध्यें तें स्वतंत्र राज्य झालें. पण राज्याच्या पंतप्रधानांनीं फ्रेंच सरकारबरोबर परराष्ट्रीय धोरणासंबंधीं व संरक्षणासंबंधीं करार करून सहकार्य घोषित केलें. ह्याचा अर्थ परराष्ट्रीय धोरण व संरक्षण या बाबतींत ह्या राज्यानें फ्रेंच सरकारपेक्षां निराळें धोरण आंखण्याचा अधिकार मिळविलेला नाहीं. हें राज्य १९६० पासून सं. राष्ट्र संघाचे सभासद झालें.

फ्रेंच साम्राजवाद्यांच्या कलाप्रमाणें चालणारें गॅबनचें पहिलें मंत्रिमंडळ जनतेंत लौकरच अप्रिय होऊं लागलें. राज्यांतील नैसर्गिक संपत्तीची लूट फ्रान्सकडे तशीच चालू राहिली. मॅंगेनीजच्या खाणीवर ब्रिटिश-अमेरिकन मक्तेदारांची सत्ता आणि फ्रान्स तयार करीत असलेल्या अणु-बॉंबसाठीं युरेनियमची लूट यांमुळें जागृत जनमत प्रक्षुब्ध झालें. सैन्याधिकाऱ्यांनीं

१९६४ च्या फेब्रुवारींत उठाव करून सरकार उलथून पाडलें आणि विरोधी पक्षाचे पुढारी **आयलर अवामे** यांच्या हातांत सत्ता दिली. हा बदल होतांना रक्ताचा थेंबसुद्धां सांडला नाहीं.

अर्थात्, फ्रेंच साम्राज्यवाद्यांना नवी राजवट पसंत पडली नाहीं. फ्रान्सचे अध्यक्ष द गॉल यांनीं हुकूम देऊन सैन्य पाठविलें आणि पुन्हा तेथें लिओन माबो यांच्या अध्यक्षतेखालचे हस्तक सरकार स्थापन केलें. त्यामुळें जनता प्रक्षुब्ध असून राजकीय वातावरण अनिश्चित बनलें आहे. परकीय फौजा काढून घेण्याच्या मागणीसाठीं मोठ्या प्रमाणावर निदर्शनें होत आहेत; कारण परकीय फौजा असेपर्यंत तेथील जनतेला पाहिजे असें सरकार सत्तारूढ होऊं शकणार नाहीं.

• • •

# २०. मध्य आफ्रिकन प्रजासत्ताक

**लोकसंख्या** – १२ लक्ष.

**राजधानी** – बांगुई.

**राज्य** – स्वतंत्र प्रजासत्ताक.

**मुख्य धंदा** – कापूस व चहाचे मळे; कांहीं प्रमाणांत हिऱ्याच्या व सोन्याच्या खाणी.

१

मध्य आफ्रिकन प्रजासत्ताकाच्या दक्षिणेस दोन्ही कांगो प्रजासत्ताक राज्यें व पश्चिमेस कॅमेरून्स प्रजासत्ताक आहे. १९६० पर्यंत फ्रेंच साम्राज्यवाद्यांच्या अमलाखालीं असलेल्या ह्या राज्याचें क्षेत्रफळ फ्रान्सपेक्षां पुष्कळच जास्त आहे. लोकसंख्या मात्र पुष्कळच कमी, म्हणजे १२ लक्ष आहे. राज्याची राजधानी **बांगुई** आहे. हा संपूर्ण प्रदेश म्हणजे उत्तरेस चाद तलावाकडे उतरतें पठार आहे; तें गवताळ आहे.

आफ्रिकेंतील गरीब देशांपैकीं हा एक आहे. येथील लोकांचा मुख्य व्यवसाय शेती असून कापूस व कॉफीचें उत्पादन निर्यातीसाठीं केलें जातें. साम्राज्यवादी सत्तेनें बाजारी पिकांना महत्त्व देऊन अन्नधान्याचें उत्पादन मारल्यामुळें उपासमार व रोगराईनें बहुसंख्य लोक हैराण झाले होते. उद्योगधंदे जवळजवळ परकीय सत्ताधाऱ्यांनीं काढलेच नाहींत. सरकी काढण्याच्या कांहीं वखारी, तेलाची चाकी, एक साबूचा कारखाना व लहान लहान सोन्या-हिऱ्यांच्या खाणी इतकेच उद्योगधंदे तेथें आहेत. त्यांतून होणाऱ्या नफ्याचा फायदाहि आतांपर्यंत फ्रेंचांनाच मिळत असे.

फ्रेंचांची सत्ता ह्या प्रदेशावर १८९४ पासून सुरू झाली. फ्रेंच विषुववृत्तीय आफ्रिकेचा तो भाग होता. १९५८ पर्यंत त्यास ( तेथील उबांगी व शारी

ह्या नद्यांवरून ) **उबांगी-शारी** विभाग म्हणत असत. १९५८ मध्यें विषुववृत्तीय फेडरेशन रद्द करण्यांत आल्यानंतर फ्रेंच राष्ट्रकुटुंबाचें सभासदत्व ह्या राज्याला बहाल करण्यांत आलें आणि राज्यांत विधिमंडळ व मंत्रिमंडळ स्थापन झालें; तेव्हां विधिमंडळानें राज्याचें नांव मध्य आफ्रिकन प्रजासत्ताक ठेवलें.

राज्यांतील मुख्य राजकीय पक्ष **मेसान ( मूव्हमेंट फॉर द सोशल इव्होल्युशन ऑफ ब्लॅक आफ्रिका** – काळ्या आफ्रिकेच्या सामाजिक विकासासाठीं आंदोलन- ) हा आहे. विधिमंडळांतील सर्व जागा ह्या पक्षानें जिंकल्या असून, पक्षाचे पुढारी **डेव्हिड डाको** हे राज्याचे मुख्य प्रधान व अध्यक्ष आहेत.

आफ्रिका खंडांतील फ्रेंच, पोर्तुगीज, बेल्जियम व स्पॅनिश वसाहतींच्या स्वतंत्र राज्यांचें संघराज्य स्थापन करणें हें मेसान पक्षाचें ध्येय आहे.

१९५८ मध्यें फ्रेंच गिनीला संपूर्ण स्वातंत्र्य मिळाल्यामुळें ह्या मध्य आफ्रिकन प्रदेशांतील वातावरणहि बदललें आणि अखेरीस १९६०च्या ऑगस्टमध्यें **मध्य आफ्रिकन प्रजासत्ताक** हें स्वतंत्र राज्य निर्माण करणें फ्रेंच राज्यकर्त्यांना भाग पडलें. परंतु राज्यांतील स्वतंत्र विकासाला अद्याप दिशा लागायची आहे.

• • •

# २१. चाद्

**लोकसंख्या** – २६ लक्ष.

**राजधानी** – फोर्ट लामी.

**राज्य** – स्वतंत्र प्रजासत्ताक.

**मुख्य धंदे** – कापसाची शेती.

१

कॅमेरून्स व मध्य आफ्रिकन प्रजासत्ताकांना लागून उत्तरेस चाद प्रजासत्ताक आहे. पूर्वीच्या फ्रेंच विषुववृत्तीय आफ्रिकेंत चादचा प्रदेश सर्वांत मोठा होता. त्याची लोकसंख्या २६ लक्ष असून राजधानी **फोर्ट-लामी** आहे.

प्रदेशाचा बराचसा भाग गवताळ असून उत्तरेकडचा भाग वाळवंटाचा आहे. आर्थिक विकासाच्या दृष्टीनें प्रदेश अत्यंत मागासलेला आहे. निर्यातीसाठीं परकीय सत्तेनें फक्त कापसाच्या पिकासच उत्तेजन दिलें. म्हणून निर्यात करारांत ⅘ भाग कापूस असतो. उद्योगधंदे नाहींतच आणि वाहतुकीचीं साधनेंहि नाहींत.

राज्यांतील राजकीय घडामोडी इतर फ्रेंच वसाहतीप्रमाणेंच आहेत. **प्रोग्रेसिव्ह पार्टी** ( पुरोगामी पक्ष ) हा सर्वांत मोठा राजकीय पक्ष असून १९५९ च्या निवडणुकांत ह्या पक्षानें ८५ पैकीं ५७ जागा जिंकल्यामुळें ह्या पक्षाचें मंत्रिमंडळ सत्तेवर आलें. पक्षाचे पुढारी **फ्रॅन्काइस टंबलवे** हे राज्याचे मुख्य प्रधान व अध्यक्ष आहेत. पॉप्युलर मूव्हमेंट ( लोकमान्य चळवळ ), आफ्रिकन नॅशनल पार्टी व युनियन ऑफ इंडिपेंडन्ट्स् अँड रूरल्स ( स्वतंत्र व ग्रामीण यांची संघटना ) हे इतर राजकीय पक्ष आहेत.

विधिमंडळानें स्वातंत्र्याच्या मागणीचा ठराव केल्यानंतर **ऑगस्ट १९६०** मध्यें स्वतंत्र व सार्वभौम चाद प्रजासत्ताकाचा उदय झाला.

फ्रेंच साम्राज्यवाद्यांचे अधिकारी देशाच्या अंतर्गत कारभारांत ढवळाढवळ करतात म्हणून ह्या सरकारनें १९६१ मध्यें फ्रेंच राष्ट्रकुलाबरोबरचे संबंध तोडून टाकले. आतां सर्व देशांबरोबर व्यापारी संबंध जोडून देशाचा स्वतंत्र आर्थिक विकास करण्याचे सरकार प्रयत्न करीत आहे; परंतु स्पष्ट दृष्टिकोनाच्या अभावीं त्यांना अनेक अडचणी येतात.

ह्या राज्यांत मुस्लिम व आफ्रिकन धर्मांचे लोक यांच्यांत तेढ असून फ्रेंच साम्राज्यवाद्यांचे आर्थिक हितसंबंध टिकवूं पाहणारे गट ती कायम टिकविण्याचा प्रयत्न करीत आहे. अध्यक्ष टंबलबे यांनीं मुस्लिम जनतेच्या पुढाऱ्यांना तुरुंगांत टाकले, विधिमंडळ बरखास्त केलें आणि सर्व सत्ता स्वतःच्या हातांत घेतली. त्यामुळें देशांतील वातावरण बिघडलें असून प्रगतीचा मार्ग खुंटून गेल्यासारखा झाला आहे.

• • •

# २२. कॅमेरून्स संघराज्य

**लोकसंख्या** – ४० लक्ष.

**राजधानी** – याऊंदे.

**राज्य** – स्वतंत्र संघराज्य (प्रजासत्ताक).

**मुख्य धंदा** – लाकूड तोडणें वगैरे.

१

गॅबन प्रजासत्ताकाला लागून कॅमेरून्सचें राज्य आहे. त्याचें क्षेत्रफळ जवळजवळ फ्रान्सइतकें आहे. लोकसंख्या ४० लक्ष आहे. **याऊंदे** ही कॅमेरून्सची राजधानी आहे.

कॅमेरून्सचा मध्य व दक्षिण भाग पठारासारखा असून दक्षिणेकडे समुद्र-किनाऱ्यावर पायरीपायरीनें उतरता होत गेलेला आहे. किनाऱ्यावरील जंगलाचा पट्टा सदाहरित झाडांनीं व वेलींनीं व्यापलेला आहे. ह्या जंगलांत महागनी, टीक, देवदार हे वृक्ष असून लाकडाचा व्यापार हें राज्याच्या संपत्तीचें प्रमुख साधन आहे. उत्तरेस गवताळ प्रदेश आहे. उत्तर टोंकास असलेलें **चाद सरोवर** जगांतील सर्वांत मोठ्या सरोवरांपैकीं आहे.

बहुसंख्य कॅमेरून्स खेडेगांवांत राहतात. ते मका, तांदूळ, याम इत्यादि धान्यें पिकवतात. जंगल विभाग साफ करून शेतीसाठीं जमीन तयार करण्याचें काम अद्यापहि चालूच असतें. हे लोक बहुतेक **बांटू** आहेत. उत्तरेकडे कांहीं सुदानी जमातींचे लोक असून दक्षिणेच्या जंगलांत पिग्मी लोक राहतात.

कॅमेरून्सचें राज्य खनिज संपत्तीनें परिपूर्ण आहे. तेथील खाणींत सोनें, जस्त, युरॅनियम, मॅंगनीज व टिटॅनियम हे सर्व धातु सांपडतात.

जर्मन साम्राज्यवाद्यांनीं १८८४ मध्येंच आपल्या हस्तकांकरवीं येथील सरदारांकडून करार करून हा प्रदेश स्वतःच्या ताब्यांत मिळविला. पण

प्रत्यक्षपणें फ्रेंच लष्कर ह्या विभागावर ताबा घेण्यासाठीं व उत्तरेकडे ब्रिटिशांबरोबर लढाई करण्यासाठीं आलें असतां येथील लोकांनीं धनुष्य-बाण घेऊन त्यांचा निकरानें प्रतिकार केला. पण अखेरीस जर्मनांच्या सुसज्ज फौजेनें व दारूगोळ्यानें त्यांचा पराभव केला.

पहिल्या महायुद्धांत ब्रिटिश व फ्रेंच यांनीं हा प्रदेश आपल्या ताब्यांत घेतला आणि त्याचे दोन तुकडे केले. पुढें लीग ऑफ नेशन्सनें ह्या विभागणीस मान्यता दिली.

दुसऱ्या महायुद्धाच्या प्रारंभीं वसाहतकारांनीं आफ्रिकन लोकांना राजकीय स्वातंत्र्याचें अभिवचन दिलें. हजारों कॅमेरून्सनीं हिटलर-विरुद्धच्या लढाईत पराक्रम केला. पण त्यांना मिळालेलें आश्वासन खरें झालें नाहीं. १९४६ मध्यें कॅमेरून्सना युनोचे 'विश्वस्त प्रदेश' हा दर्जा मिळाला; ह्याचा अर्थ त्यांचा फ्रेंच व ब्रिटिश वसाहती हा दर्जा कायम राहिला. आफ्रिकन लोकांना कोणतेहि हक्क मिळाले नाहींत आणि वेठ-बिगार चालूंच राहिली. यामुळें १९४५ पासूनच देशांत निदर्शनें सुरू झालीं. राज्यकर्त्यांनीं दडपशाही केली पण त्यामुळें जनतेंत अधिकच जागृति झाली आणि स्वातंत्र्य–लढ्याच्या इतिहासांत नवें पर्व सुरू झालें. स्वातंत्र्य व (ब्रिटिश व फ्रेंचांत विभागल्या गेलेल्या) देशाचें एकीकरण ह्या दोन घोषणा घेऊन हा लढा पुढें जाऊं लागला.

१९५६ मध्यें इतर आफ्रिकन वसाहतींना दिलेल्या सवलती फ्रेंच कॅमेरूनलाहि मिळाल्या. निवडणुका होऊन विधानसभा व मंत्रिमंडळाची स्थापना झाली. पण स्थानिक कारभाराशिवाय इतर सर्व खात्यांवर फ्रेंचांचें नियंत्रण कायम राहिलें; परराष्ट्रीय संबंध, अर्थव्यवस्था, संरक्षण व व्यापार फ्रेंचांच्याच हातांत राहिला. त्यामुळें स्वातंत्र्यप्रेमी जनतेंत असमाधान कायम राहिलें. १९५८ मध्यें लढ्याचें स्वरूप इतकें तीव्र झालें कीं, कॅमेरून्समध्यें 'दुसरा अल्जेरिया' होणार असे उद्‌गार राजकीय वर्तुळांत काढले जाऊं लागले.

अखेरीस १९५९ च्या मार्चमध्यें संयुक्त राष्ट्र संघाच्या सर्वसाधारण सभेंत फ्रेंच कॅमेरून्सला स्वातंत्र्य देण्याचा ठराव मान्य झाला आणि **१ जानेवारी १९६०** रोजीं कॅमेरून स्वतंत्र राज्य झालें.

फ्रेंच कॅमेरून स्वतंत्र झाल्यामुळें ब्रिटिश नियंत्रित कॅमेरूनमध्येंहि स्वातंत्र्याची मागणी जोरानें होऊं लागली. ह्या प्रदेशाचे दोन भाग पाडून ब्रिटिशांनीं तेथील लोकांच्या भिन्नत्वावर जोर दिला होता; तरीसुद्धां जानेवारी १९५९ मध्यें झालेल्या निवडणुकांत उत्तर व दक्षिण, दोन्ही भागांत स्वातंत्र्यवादी पक्षांचा विजय झाला. दक्षिण विभागांत **नॅशनल डेमोक्रॅटिक पार्टीला** बहुसंख्येनें मतदान करून लोकांनीं फ्रेंच विभागा-बरोबर एकत्र येण्याचा कौल दिलाच होता. नोव्हेंबरमध्यें संयुक्त राष्ट्र-संघातर्फे उत्तर विभागांत ह्या प्रश्नावर मतदान झालें; प्रत्येकाला नायगेरियांत सामील होण्याविषयीं अगर भावी काळांत कॅमेरूनमध्यें सामील होण्या-विषयीं मतदान करण्याचा हक्क देण्यांत आला. त्या मतदानानुसार ब्रिटिश कॅमेरूनचा उत्तर विभाग नायगेरियाच्या फेडरेशनमध्यें सामील झाला. आणि १९६१ मध्यें संपूर्णपणें नायगेरियांत विलीन झाला.

फ्रेंच व ब्रिटिश नियंत्रणाखालून स्वतंत्र झालेल्या कॅमेरूनसच्या संयुक्त व स्वतंत्र राज्याला आतां आर्थिक मागासलेपणा दूर करण्याची कामगिरी करा-वयाची आहे. परकीय अमलाखालीं तेथें निर्यातीसाठीं **कोको** पिकविण्यांत येत असे, देशाच्या व्यापारांत ५० टक्के कोको असतो. एक लाकूड कापण्याचा व एक रबराचा कारखाना यांखेरीज तेथें उद्योगधंदे नाहींत. आर्थिक विकासाचा व संपूर्ण राजकीय स्वातंत्र्याचा प्रश्न सोडविण्याची जबाबदारी स्वतंत्र कॅमेरूनच्या सरकारवर आली.

परंतु १९६१ सालीं निर्माण झालेल्या ह्या संघराज्यावरची आर्थिक पकड काढून घेण्याची फ्रेंच व ब्रिटिश साम्राज्यवाद्यांची तयारी नव्हती कारण तेथील ॲल्युमिनिअमच्या खाणींतून जगांत सर्वांत अधिक ॲल्युमिनिअम निघतें. त्याचप्रमाणें मध्य आफ्रिकेंत शिरकाव करण्याच्या दृष्टीनें कॅमेरूनस हें प्रवेशद्वार असल्यामुळें अध्यक्ष अहमद अहिजो यांस फ्रेंच साम्राज्यवाद्यांनीं हातच्या बाहुल्याप्रमाणें वागविलें. अहिजोनें करार करून आपला देश ९९ वर्षें लष्करी तळ म्हणून वापरण्यास फ्रेंचांना परवानगी दिली. तेव्हां जनतेंतील असंतोषाला उग्र स्वरूप आलें.

जनतेची चळवळ दडपण्यासाठीं दडपशाहीची राजवट सुरू झाली. आज तेथें दोनपेक्षां अधिक लोकांना एकत्र येण्यास बंदी आहे; स्थानिक वृत्त-

पत्रांवर बंदी, परदेशी वकिलांना व पत्रकारांना प्रवेश करण्यास बंदी, दौला गाआंवे या शहरांत कर्फ्यू, ५० हजार शेतकऱ्यांना कुंपणखान्यांत राहण्याची सक्ति, खेडीं बेचिराख, मारलेल्या देशभक्तांच्या मुंडक्यांचें प्रदर्शन—अशी विलक्षण दडपशाहीची राजवट स्थापन झाली आहे.

परंतु, दडपशाहीबरोबरच जनतेचा प्रतिकारहि वाढत आहे. युनियन ऑफ पीपल्स ऑफ कॅमेरून—**कॅमेरून्सच्या जनतेची संघटना**—ह्या संस्थेच्या नेतृत्वाखालीं कॅमेरूनमध्यें सशस्त्र मुक्ति-संग्राम चालू असून जवळ-जवळ १ लक्ष प्रतिकार सैन्य उभें झालें आहे. ह्या संस्थेनें सर्व देशभक्तांना एकत्र करून **क्रांतिकारक समिति** स्थापन केली आहे. ह्या समितीच्या नेतृत्वा-खालचा हा प्रखर लढा यशस्वी करून कॅमेरूनची जनता आपल्या देशाच्या विकासाचे मार्ग मोकळे करून घेणार आहे; साम्राज्यवाद्यांची लूट बंद पडणार आहे. तो दिवस दूर नाहीं.

● ● ●

# २३. निगर प्रजासत्ताक

**लोकसंख्या** – २९ लक्ष.

**राजधानी** – नियामी.

**राज्य** – स्वतंत्र प्रजासत्ताक.

**मुख्य धंदे** – भुईमूग, मीठ वगैरे.

१

**चा**द प्रजासत्ताकाला लागून पश्चिमेकडे आजचें निगर प्रजासत्ताक राज्य आहे. तें पूर्वीच्या फ्रेंच पश्चिम आफ्रिकन साम्राज्यांतील एक भाग होतें. ह्या राज्याची लोकसंख्या २० लक्षांहून अधिक असून **नियामी** ही राजधानी आहे.

ह्या प्रदेशाला ' वाळवंटांतील बोट ' म्हणत असत. त्याचें उत्तर टोंक सहारा वाळवंटाच्या मध्यापर्यंत गेलें असून दक्षिणेस नायगेरिया राज्याची सीमा आहे. हा प्रदेश गवताळ असून निगरची बहुतेक सर्व लोकवस्ती ह्याच भागांत आहे. नायगेरियांत प्रमुख असलेल्या **हौसा** जमातीचे लोक ह्याहि राज्यांतील मुख्य स्थायिक लोक आहेत. निगर नदीच्या खोऱ्यांत **सोंघाई** व **जेरमा** जमातीचे लोक राहतात. उत्तरेकडे **तुरग** जमातीचे भटके लोक आहेत; त्यांचा धर्म व रीतिरिवाज इस्लाम धर्मांशीं मिळता-जुळता आहे.

फ्रेंचांच्या सत्तेखालीं हा देश आर्थिक दृष्ट्या अत्यंत अविकसित राहिला ह्या ठिकाणीं पाण्याची कमतरता आहे; रेल्वेरस्ते व साधे रस्तेहि नाहींत.

मुख्य पीक भुईमुगाचें असून, निर्यात व्यापाराचा ¾ भाग भुईमूग आहे. **बिल्मा** ओॲसिस वाळवंटांतील पाणथळ जागेमध्यें मीठ उत्पादनाचा धंदा चालतो. पत्र्याचे कांहीं लहान कारखाने राज्याच्या मध्य विभागांत आहेत. इतर उद्योगधंदे जवळजवळ नाहींतच.

इतर सर्व फ्रेंच वसाहतींप्रमाणें १९५८ मध्यें पहिल्या सार्वत्रिक निवडणुका होऊन निगर राज्याचें विधिमंडळ व मंत्रिमंडळ अस्तित्वांत आलें. ह्या निवडणुकींत **बाउबाउ हामा** यांच्या नेतृत्वाखालील **प्रोग्रेसिव्ह पक्षानें** ६० पैकीं ४९ जागा जिंकून राज्यकारभार हातांत घेतला.

१९६० मध्यें विधिमंडळानें संपूर्ण स्वातंत्र्याची मागणी केली. १९६० च्या ऑगस्टमध्यें स्वतंत्र निगर प्रजासत्ताकाची स्थापना झाली. राज्याचे मुख्य मंत्री **हामानी दिओरी** हे आहेत. देशांतील स्वतंत्र आर्थिक विकासाला अद्याप जोरदार प्रारंभ झालेला नाहीं.

● ● ●

# २४. अप्पर व्होल्टा

**लोकसंख्या** – ३६ लक्ष.

**राजधानी** – औगादौगौ.

**राज्य** – स्वतंत्र प्रजासत्ताक.

**मुख्य धंदे** – अविकसित देश.

१

निगर प्रजासत्ताकाच्या नैर्ऋत्येस व माली राज्याच्या आग्नेय कोपऱ्यांत आणि घानाच्या उत्तरेस व्होल्टाचें प्रजासत्ताक आहे. ह्या राज्याची लोकसंख्या ३६ लक्ष आहे. **औगादौगौ** ही राज्याची राजधानी आहे.

हा प्रदेश अत्यंत अविकसित व गरीब आहे. देशांतील मुख्य धंदा मेंढपाळीचा आहे. भुईमूग, तांदूळ, कापूस व मका यांचेंहि उत्पादन कांहीं प्रमाणावर होतें. खनिज संपत्तीचें संशोधन अद्याप झालेलें नाहीं.

इतर फ्रेंच वसाहतींप्रमाणेंच अप्पर व्होल्टा राज्याची राजकीय हालचाल झालेली आहे. १९५८ च्या सार्वत्रिक निवडणुकीनंतर स्थापन झालेल्या विधिमंडळानें स्वातंत्र्याची मागणी केली. १९६० च्या ऑगस्टमध्यें त्यांस स्वातंत्र्य मिळालें.

व्होल्टामधील जमातींचे प्रमुख ( Tribal Chiefs ) प्रथमपासूनच परकीय सत्ताधाऱ्यांबरोबर सलोख्याचे संबंध ठेवून आहेत. त्यांची "युनियन ऑफ व्होल्टा चीफ्स" नांवाची राजकीय संघटना असून देशाच्या स्वतंत्र विकासाला अडथळा निर्माण करणारी ही शक्ति आहे.

**डेमोक्रॅटिक रॅली** हा राज्यांतील प्रमुख राजकीय पक्ष असून विधिमंडळांत ७५ पैकीं ६४ जागा ह्या पक्षानें मिळविलेल्या आहेत. ह्या पक्षाचे अध्यक्ष **मॉरिस योमेगो** देशाचे मुख्यप्रधान आहेत. व्होल्टा रिग्रुपिंग मूव्हमेंट व रिपब्लिकन पार्टी ऑफ् फ्रीडम हे दुसरे दोन राजकीय पक्ष आहेत.

घानाबरोबर सहकार्य करून आर्थिक विकास करून घेण्याचे प्रयत्न हें राज्य करीत आहे.

● ● ●

# २५. दाहोमी

**लोकसंख्या** – २० लक्ष.

**राजधानी** – पोर्टनोहो.

**राज्य** – स्वतंत्र प्रजासत्ताक.

**मुख्य धंदे** – अविकासित प्रदेश.

१

अप्पर व्होल्टा प्रजासत्ताकाला जोडून पतंगाच्या शेपटीप्रमाणें दाहोमी राज्याचा तुकडा समुद्रकिनाऱ्यापर्यंत गेला आहे. ह्या राज्याच्या पूर्वेला नायगेरियाचें भव्य राज्य आहे व पश्चिमेस टोगोलँडचा कलिंगडाच्या कापेसारखा तुकडा आहे. दाहोमीचा प्रदेश हा फ्रेंच पश्चिमी वसाहतींतील सर्वांत छोटा प्रदेश होता. ह्या राज्याची लोकसंख्या २० लक्ष आहे. राजधानी **पोर्टोनोहो** आहे; पोर्टोनोहो हें बंदरहि आहे.

नारळांच्या पाम व ऑलिव्हच्या झाडांनीं आणि त्यांच्या फळांनीं किनाऱ्याकडील प्रदेश बहरलेला असतो. देशाची मुख्य निर्यात ह्या फळांचीच आहे. किनाऱ्यापासून अंतर्गत भागांत मका व रताळी यांचें उत्पादन होतें; शेळ्यामेंढ्यांचे कळपहि ह्या भागांत दृष्टीस पडतात. अगदीं उत्तरेस कापूस पिकतो.

उद्योगधंदे जवळजवळ नाहींतच, अलीकडच्या काळांत क्रोमाईट, लोखंड व इल्मेनाईटचा शोध लागला आहे.

पूर्वीं ह्या प्रदेशांत दाहोमीचें सुप्रसिद्ध राज्य होतें, त्या राज्याच्या सैन्यांत स्त्रियांची भरती फार मोठी होती, हें त्याचें वैशिष्ट्य होतें. पुढें हा विभाग गुलामांच्या विक्रीचें केंद्र बनला होता. त्यांच्या 'वखारीं'-साठीं बांधलेले किल्ले व त्यांचे अवशेष किनाऱ्यावरच्या भागांत मोठ्या प्रमाणावर पसरलेले आहेत.

ह्या प्रदेश १८९० मध्यें फ्रेंचांच्या ताब्यांत गेला व पुढें त्यांनीं त्यास फ्रेंच पश्चिमी साम्राज्यांतील विभाग बनविला. १९५८ मध्यें त्यास फ्रेंच राष्ट्र-कुटुंबाचा सभासद बनवून स्वायत्तसत्ता देण्यांत आली. १९५८ मध्यें त्यानें माली संघराज्यांत प्रवेश केला होता पण साम्राज्यवाद्यांनीं दडपण आणून त्यास बाहेर काढलें.

१९५९ मध्यें झालेल्या सार्वत्रिक निवडणुकांत **रिपब्लिकन पार्टीला २८, डेमोक्रॅटिक रॅली ऑफ दाहोमी** पक्षाला २२ व डेमोक्रॅटिक युनियनला २० जागा मिळाल्या. डेमोक्रॅटिक युनियनचे पुढारी **ह्युबर्ट मागा** यांच्या अध्यक्षतेखालीं संयुक्त मंत्रिमंडळ स्थापन झालें. ऑगस्ट १९६० मध्यें दाहोमी स्वतंत्र व प्रजासत्ताक राज्य बनलें.

ह्युबर्ट मागा यांच्या सरकारनें साओ जोओ बाप्टिस्टा डी अजुदा हा किनाऱ्यालगतचा पोर्तुगीजांच्या ताब्यांत असलेला प्रदेश मुक्त करून स्वातंत्र्याला बळकटी आणली. पोर्तुगीज साम्राज्यवाद्यांकडे अनेकदां मागणी करूनहि त्यांनीं त्यावरील ताबा सोडण्यास नकार दिला होता. अखेर सैन्य पाठवून प्रदेश जिंकावा लागला. पोर्तुगीजांनीं जातां जातां तेथील एकूण एक इमारतींना आग लावून त्या भस्मसात केल्या.

ह्या राज्याच्या स्वतंत्र अर्थविकासाला अद्याप जोमानें प्रारंभ झालेला नाहीं. परंतु आजूबाजूला घडणाऱ्या बदलांचे परिणाम जनतेच्या मागण्यांत दिसून येत आहेत.

• • •

# २६. टोगोलँड

**लोकसंख्या** – १४ लक्ष.

**राजधानी** – लोम.

**राज्य** – स्वतंत्र प्रजासत्ताक.

**मुख्य धंदे** – कोको व कॉफीची लागवड.

१

दाहोमीच्या पश्चिमेस लागून टोगोलँडचा उभा पट्टा आहे; टोगोलँडच्या पश्चिमेस घानाचें राज्य आहे.

ह्या देशांतील बहुतेक प्रदेश डोंगराळ आहे; हे डोंगर समुद्रकिनाऱ्याकडे उतरते आहेत. किनाऱ्यावरील वालुकामय प्रदेशांतून दाहोमी व घानाकडे जाणारा मोटाररस्ता आहे. देशांत गिरण्या, कारखाने, खाणी असे कोणतेच उद्योगधंदे नाहींत. दक्षिण भागांत नारळाचीं व पामचीं झाडें, मध्य भागांत कापूस, कॉफी व कोको आणि उत्तर भागांत तंबाखू व एरंडेल याची लागवड होते. परदेशांत जाणाऱ्या पदार्थांत ७५ टक्के कोको व कॉफी असते.

**लोम** हें राजधानीचें शहर असून, देशाची लोकसंख्या १४ लक्ष आहे.

युरोपियन राष्ट्रांनीं आफ्रिकेची लांडगेतोड केली त्यांत १८८४ मध्यें ह्या प्रदेशावर जर्मन साम्राज्यवाद्यांनीं वर्चस्व मिळविलें. पहिल्या महायुद्धांत जर्मनीचा पराभव झाल्यानंतर ह्या प्रदेशावर ब्रिटिश व फ्रेंच साम्राज्यवाद्यांचें वर्चस्व स्थापन झालें; त्यांतील $\frac{1}{3}$ प्रदेश ब्रिटिशांचा ‘ विश्वस्त ’ प्रदेश आणि $\frac{2}{3}$ फ्रेंचांचा ‘ विश्वस्त ’ प्रदेश बनला. अशा रीतीनें टोगोलँडची फाळणी झाली आणि ती आजतागायत कायम राहिली आहे.

कारण, १९५६ मध्यें घाना संपूर्ण स्वातंत्र्याच्या मार्गावर असतांना ब्रिटिश सरकारनें टोगोलँडचा त्यांच्या ताब्यांतील विश्वस्त प्रदेश घानामध्यें

विलीन करून टाकला. ह्या प्रदेशाची लोकसंख्या ४॥ लक्ष असून आतां तो स्वतंत्र घानाचा एक प्रांत बनला आहे.

फ्रेंचांच्या अमलाखालील टोगोलँडचा स्वातंत्र्य-लढा १९४६ सालीं स्थापन झालेल्या " कमिटी ऑफ टोगोलँड युनिटी " ( **टोगोलँड ऐक्य समिती** ) च्या नेतृत्वाखालीं सुरू झाला. १९५८ मध्ये सार्वत्रिक मतदानाचा हक्क मिळविण्यांत चळवळीनें यश मिळविलें आणि साम्राज्यवाद्यांनीं देऊं केलेलीं आश्वासनें व ' सुधारणा ' यांचें प्रलोभन धिःकारून १९५८ च्या सार्वत्रिक निवडणुकात टोगोच्या जनतेनें संपूर्ण स्वातंत्र्याच्या बाजूनें मतदान केलें.

समितीचे अध्यक्ष **सिलव्हानस ऑलिम्पिओ** यांच्या नेतृत्वाखालीं विजयी समितीचें पहिलें सरकार स्थापन झालें आणि १९६० पर्यंत टोगो-लँडला संपूर्ण स्वातंत्र्य मिळालें पाहिजे अशी सरकारनें मागणी केली. ही मागणी फ्रेंच साम्राज्यवाद्यांना मान्य करणें भाग पडलें आणि टोगोलँडचें स्वतंत्र राज्य अस्तित्वांत आलें.

त्यानंतरच्या दोन वर्षांत ऑलिंपिओच्या सरकारनें आर्थिक व राज्य-कारभारविषयक क्षेत्रांत फ्रान्सवरचें परावलंबित्व नष्ट करण्याचें धोरण खंबीरपणानें अमलांत आणलें.

कोकोच्या व्यापाराचें नियंत्रण करून ह्या सरकारनें शेतकऱ्यांना विक्रीचें स्थैर्य मिळवून दिलें. सरकारनें परदेशी व्यापार वाढविला आणि सोविएत युनियनबरोबर व्यापार करण्यास प्रारंभ करून राष्ट्राचा फायदा करून घेतला.

राज्यकारभाराच्या खर्चापैकीं ७० टक्के रक्कम फ्रेंच अधिकाऱ्यांच्या पगारासाठीं खर्च होत होती; ती कमी करून सरकारी कारभारांत टोगोंना स्थान देण्याचें धोरण सरकारनें आंखलें. " श्रम, स्वातंत्र्य व राष्ट्रप्रेम " ह्या निष्ठेनें कार्य करण्याचें घोषित करून ह्या सरकारनें नवी घटना तयार केली. हें सरकार खंबीर साम्राज्यविरोधी धोरण व स्वतंत्र अर्थविकास यांचा पुरस्कार करणारें होतें. घानांत समाविष्ट असलेला प्रदेश परत टोगोलँडमध्यें घालण्याचे प्रयत्न चालू होते.

परंतु १९६२ च्या डिसेंबरमध्यें अध्यक्ष सिलव्हानस आलिंपिओ यांचा सैन्यानें केलेल्या उठावांत खून झाला. खुनाच्या मागें कोणाचा हात होता हें

शेवटपर्यंत बाहेर आलें नाहीं, पण आफ्रिकेंतील सर्व स्वतंत्र राष्ट्रांच्या प्रमुखांनीं ह्या खुनाचा धिक्कार केला.

त्यानंतर, परागंदा झालेले एक देशभक्त ग्रुनित्झकी यांच्या पुढाकाराखालीं नवें सरकार १९६३ च्या जानेवारींत अधिकारावर आलें. ह्या सरकारनें टोगोलँडमधील सर्व पक्षांना एकत्र आणलें; आणि घानाबरोबरचे संबंध सुधारले. सध्यां हें सरकार स्थिर झालें असून त्यानें जनताभिमुख धोरण स्वीकारलेलें आहे.

● ● ●

# २७. आयव्हरी कोस्ट

**लोकसंख्या** – ३२ लक्ष.

**राजधानी** – अबिद्जान.

**राज्य** – स्वतंत्र प्रजासत्ताक.

**मुख्य धंदे** – कॉफी व कोकोची लागवड; हिऱ्यांच्या खाणी.

१

माली प्रजासत्ताक व अप्पर व्होल्टा प्रजासत्ताकांना लागून दक्षिणेस व घानाच्या पश्चिमेस आयव्हरी कोस्टचें प्रजासत्ताक आहे. हें अटलांटिक समुद्रकिनाऱ्यापर्यंत पसरलेलें असून त्याचें क्षेत्रफळ फ्रान्सच्या निम्म्याइतकें आहे. राज्याची लोकसंख्या २५ लक्ष आहे. **अबिद्जान** हें बंदर असून राज्याची राजधानी आहे.

आफ्रिकेंतील पूर्वीच्या फ्रेंच पश्चिमी साम्राज्यांतील आयव्हरी कोस्टचे प्रदेश आर्थिकदृष्ट्या सर्वांत अधिक विकसित समजला जात असे. कॉफी व कोको ह्या बाजारी पिकांचें येथें अमाप उत्पादन होतें. कॉफीच्या उत्पादनांत ह्या प्रदेशाचा जगांत तिसरा क्रमांक व कोकोच्या उत्पादनांत चवथा क्रमांक लागतो. दुसऱ्या महायुद्धाच्या काळांत ह्या प्रदेशांत हिरे सांपडले आणि आतां फ्रेंच कंपन्या हिऱ्यांच्या खाणींतून हिऱ्यांचें खनन व व्यापार करीत आहेत. ह्या मौल्यवान पदार्थांच्या जोडीलाच उत्तम लांकडांचा व्यापार देशाच्या संपत्तींत भर टाकणारा आहे. लांकडांच्या व्यापारांतील जवळजवळ निम्में उत्तम शिसवी लांकूड असतें. लांकडाचा सर्व व्यापार व जंगलें युरोपियन लोकांच्या हातांत आहेत.

अबिदजानजवळ एक फ्रेंचांच्या मालकीची कागदाची गिरण आहे. विषुववृत्तविभागांतील आफ्रिकेंतील ही पहिलीच कागदाची गिरण. ही

१९५० सालीं सुरू झाली. म्हणजे यांत्रिक उद्योगधंद्याची सुरुवात ह्या विभागांत आयव्हरी कोस्टमध्यें झाली.

१८९३ पासून ह्या प्रदेशावर फ्रेंचांची सत्ता स्थापन झाली. पुढील इतिहास फ्रेंचांच्या सर्व पश्चिम वसाहतींसारखाच आहे. मात्र प्रदेश समृद्ध असल्यामुळें येथील राजकीय पक्षांनीं, आणि विशेषतः **डेमोक्रॅटिक पार्टीचे** पुढारी **फेलिक्स हौफौएन बॉइंग्नि** यांनीं पॅरिसमध्यें प्रतिनिधित्व करतांना बराच राजकीय अनुभव मिळविला. ह्या पक्षाची स्थापना १९४६ मध्यें झाली. १९५८ च्या निवडणुकांत बहुमत मिळवून तो सत्तेवर आला. ऑगस्ट १९६० मध्यें आयव्हरी कोस्टच्या प्रजासत्ताकाची घोषणा करण्यांत आली.

सध्यांच्या सरकारनें ५ वर्षें फ्रेंच राष्ट्रकुटुंबांत राहण्याचा व फ्रेंच लष्करी केंद्र ठेवण्यास संमति देण्याचा करार केला आहे. या कराराविरुद्ध जनतेंत असंतोष आहे.

तसेंच स्वातंत्र्यानंतरच्या सरकारनेंहि पूर्वींची राज्ययंत्रणा कायम ठेवल्यामुळें, सत्ताधारी गटाची मिळकत व जनतेचें राहणीमान यांत अत्यंत विषमता आहे. त्वरित समाजिक सुधारणांसाठीं जनता उत्सुक आहे. त्यामुळें असंतोष निर्माण झाला असून सरकारनें सर्व विरोधी पक्षांच्या नेत्यांना तुरुंगात टाकलें आहे.

● ● ●

# २८. माली प्रजासत्ताक

**लोकसंख्या** – ३६ लक्ष.

**राजधानी** – बामको.

**राज्य** – स्वतंत्र प्रजासत्ताक.

**मुख्य धंदे** – भुईमूग, कापूस ह्या बाजारी पिकांचे.

१

· निगर प्रजासत्ताकाला लागून पश्चिमेस पूर्वी ज्यास **फ्रेंच सुदान** म्हणत असत तो भाग आहे. पूर्वीच्या फ्रेंच पश्चिम आफ्रिकन साम्राज्यांतील ह्या विभागाला आतां माली प्रजासत्ताक म्हणतात. ह्या राज्याची लोकसंख्या ३२ लक्षांवर असून **बामको** ही राजधानी आहे. ह्या निरनिराळ्या निग्रो जमातींचें वास्तव्य असून एका काळच्या वैभवशाली निग्रो साम्राज्याचे हे लोक वंशज आहेत. सर्वांत अधिक संख्या मॅंडिंगिनज निग्रोंची आहे. ५५ टक्के लोक मुसलमान धर्माचे आहेत.

मुख्य व्यवसाय शेती; पण इतर अनेक आफ्रिकन राज्यांपेक्षां अन्नधान्याची परिस्थिति बरी आहे. कापूस, भुईमूग व तांदूळ परदेशांत निर्यात केले जातात. मेंढपाळाचा व कोंबड्या-बदकें वगैरे पाळण्याचा धंदा फार मोठ्या प्रमाणावर चालतो. मका मुख्यतः घरगुती उपयोगासाठीं पिकविला जातो. शेतीची पद्धत पुरातन असून उत्पादन त्यामानानें दर एकरीं फार कमी येतें.

येथें लोखंड, तांबें, झिंक, जस्त, सोनें, प्लॅटिनम, हिरे, युरॅनिअम, थोरिअम व रॉकेल यांचे सांठे आहेत असा तज्ज्ञांचा अंदाज आहे; पण अद्याप प्रत्यक्षपणें खाणी चालू झालेल्या नाहींत.

१८९८ मध्यें ह्या प्रदेशावर फ्रेंचांची सत्ता चालू झाली. १९०४ मध्यें फ्रेंचांनीं त्यास **फ्रेंच सुदान** हें नांव देऊन पश्चिम साम्राज्याचा एक भाग

बनविलें. १९५८मध्यें इतर सर्व विभागांप्रमाणेंच येथेंहि सार्वत्रिक निवडणुका होऊन विधिमंडळ व मंत्रिमंडळ स्थापन झालें आणि सुदानी प्रजासत्ताक अस्तित्वांत आलें. १९५९ मध्यें **सेनेगॉल** व **सुदान** यांनीं मिळून **माली संघराज्य** निर्माण केलें.

सुदानाचे प्रतिनिधि फेडरेशनचा स्वतंत्रपणें व जोमानें विकास व्हावा या धोरणाचा पुरस्कार करीत असत. त्यामुळें फ्रेंच साम्राज्यवाद्यांनीं भेदनीतीचा अवलंब करून फेडरेशनमध्यें फूट पाडली; सेनेगालचें राज्य फेडरेशनमधून बाहेर पडलें. त्यानंतर सुदान विधिमंडळानें १९६२ च्या सप्टेंबरमध्यें आपल्या राज्याला **माली प्रजासत्ताक** हें नांव घेतलें.

ह्या राज्यांत स्वातंत्र्य-लढ्याच्या काळांत ( १९५८ मध्यें ) सर्व राजकीय पक्षांनीं एकत्र येऊन **सुदानी जनतेची संघटना** ( सुदानीज युनियन ) स्थापन केली होती. तोच राजकीय पक्ष आज सत्तेवर आहे. लिओपोल्ड सेनघोर हे मुख्य मंत्री असून, राज्याचे अध्यक्ष **मोडिबा केटा** हे आहेत. ट्रेड युनियन संघटना, युवक व महिला संघटनाहि ह्याच मुख्य संघटनेला जोडलेल्या आहेत.

माली प्रजासत्ताकाचें सरकार स्वतंत्र व तटस्थ राष्ट्रीय धोरणाचा पुरस्कार करणारें आहे. त्यानें राज्याच्या आर्थिक विकासासाठीं **पंचवार्षिक** योजना आंखली असून खनिज संपत्तीच्या पाहणीचें काम चालू केलें आहे. ह्या कामांत सोविएत युनियन व इतर समाजवादी सरकारें राज्याला मदत करीत आहेत.

माली प्रजासत्ताकानें **बिगर-भांडवलदारी** मार्गानें समाजवादी रचनेचा पाया घालण्याचा निर्धार केलेला आहे. देशांत शास्त्रशुद्ध समाजवादाचें तत्त्वज्ञान रुजविण्यासाठीं मार्क्सवाद-लेनिनवादाचें शिक्षण अभ्यासक्रमांत देण्यांत येतें. कामगार, शेतकरी, पुरोगामी व्यक्ति, प्रामाणिक व्यापारी या सर्वांनीं मिळून राष्ट्रीय लोकशाहीचें सरकार अस्तित्वांत आणलें आहे. देशानें स्वतःची बँक व चलन सुरू केलें आहे.

• • •

# २९. गिनी

**लोकसंख्या** -- २४ लक्ष.

**राजधानी** -- कोनाक्री.

**राज्य** -- स्वतंत्र प्रजासत्ताक.

**मुख्य धंदे** -- अल्युमिनिअम व बॉक्साईटच्या खाणी, कॉफीचे मळे.

## १

पश्चिमेस सेनेगाल, उत्तरेस माली व पूर्वेस आयव्हरी कोस्टचें प्रजासत्ताक यांच्यामध्यें गिनीच्या आखाताजवळ गिनीचें सुप्रसिद्ध प्रजासत्ताक आहे; आफ्रिका खंडाच्या उगवत्या राष्ट्रांत तें एक मानाचें पान आहे. त्याची लोकसंख्या २४ लक्ष असून, आफ्रिकेच्या पश्चिम किनाऱ्यावरील सर्वांत महत्त्वाचें बंदर **कोनाक्री** त्याची राजधानी आहे. मुख्यतः फुलानी व मॅंडिगो निग्रोंची वस्ती असलेल्या ह्या प्रदेशांत अनेक जमातींचे लोक राहतात व तेथें अनेक भाषा बोलल्या जातात.

जवळजवळ ९० टक्के लोक खेडेगांवांत राहतात. उंच गवतानें शाकारलेल्या व सभोंवतालीं वेलींचा मांडव असलेल्या झोंपड्यांतून राहणारे पूर्व भागांतील शेतकरी तांदूळ, रताळी, भुईमूग पिकवतात. पश्चिमेकडील उंचवट्याच्या भागांत मेंढपाळीचा धंदा चालतो. किनाऱ्याला लागून असलेल्या भागांत केळीं व नारळाच्या नयनमनोहर बागा आहेत. तेथून केळीं, नारळ व खोबरेल तेल यांची परदेशांत निर्यात होते.

हा देश खनिज संपत्तीनें समृद्ध आहे. बोके, फ्रिआ, किंडिआ व दाबोला येथील खाणींत असलेला **बॉक्साईटचा** सांठा सर्व जगांत मोठा आहे, असें भूगर्भशास्त्रज्ञांचें मत आहे.

अल्युमिनिअम कंपनी ऑफ अमेरिका ह्या कंपनीची फ्रेंच शाखेकडे बोकेच्या खाणीची मालकी आहे. किंडिआ, फ्रिआ व दाबोला येथील खाणी

आंतरराष्ट्रीय खाण कंपनीकडे आहेत. ही कंपनी ह्या खाणी चालविण्याच्या हेतूनें १९५७ साली स्थापन झाली असून त्यांतील ५३·५ टक्के शेअर्स अमेरिकन कंपनीचे आणि बाकीचे फ्रेंच, ब्रिटिश, कॅनेडियन, इटालियन व प. जर्मनी इ. कंपन्यांचे आहेत.

बॉक्साईटशिवाय सोनें, हिरे, केळीं, पाम तेल, कॉफी, कोको, लांकूड इत्यादि संपत्ति गिनीमध्यें भरपूर आहे.

गिनीचा प्रदेश फ्रेंच साम्राज्यवाद्यांच्या ताब्यांत जाण्यापूर्वी तो अन्नोत्पादनाच्या दृष्टीनें स्वयंपूर्ण होता. पण फ्रेंच लोकांनीं उत्कृष्ट जमिनी शेतकऱ्यांकडून काढून घेऊन तेथें कॉफी, केळीं व अननसाच्या बागा लावल्या; त्यामुळें अन्नधान्याचें उत्पन्न कमी झालें आणि तें परदेशांतून आणावें लागूं लागलें.

ह्या प्रदेशाला "पश्चिम आफ्रिकेचा पाण्याचा मनोरा" म्हणतात; कारण निगर, सेनेगाल, गॅंबिया, कॉंकौर नद्या व त्यांच्या उपनद्या फूटा जालन पर्वतांत उगम पावून ह्या प्रदेशांतून वाहतात. त्यांच्या प्रवाहांत अमाप वीजनिर्मितीची ताकद आहे आणि ती राष्ट्राच्या औद्योगिकरणाला उपयुक्त आहे.

## २

हा प्रदेश फ्रेंचांच्या ताब्यांत सुखासुखी गेला नाहीं. तेथील लोकांनीं फ्रेंच सैन्याबरोबर सतत व निकराच्या लढाया केल्या. १८८५-८७ ह्या काळांत फ्रेंच सैन्याचा पराभव झाला. पण अखेरीस त्यांनीं सामोरी राजाला विश्वासघातानें शरण यावयास भाग पाडलें; देशांतून हद्दपार केलें. असें सांगतात कीं, जातां जातां त्यानें आपला नातू फ्रेंचांना पराभूत करून मोठा राजा होईल, असें भविष्य वर्तविलें.

१८९५ पूर्वी सेनेगाल प्रदेशाचा गिनी हा भाग बनविण्यांत आला होता. पुढें त्यास "स्वायत्त सार्वभौम" बनवून पश्चिम आफ्रिकन साम्राज्यांत सामील करण्यांत आलें. इ. स. १९०० व १९०८ मध्यें येथील लोकांनीं डोईजड कर व सक्तीची वेठबिगार यांविरुद्ध बंडें केलीं, पण तीं सैन्याच्या जोरावर चिरडण्यांत आलीं.

१९४६ मध्यें **डेमोक्रॅटिक युनियन ऑफ आफ्रिका** ह्या संस्थेची स्थापना झाली आणि तिच्या शाखा सर्व पश्चिम आफ्रिकेंतील वसाहतींतून स्थापन झाल्या. गिनीमध्यें ही संघटना **डेमोक्रॅटिक पार्टी** ( लोकशाहीवादी पक्ष ) ह्या नांवानें ओळखली जाते. ही संघटना अत्यंत बलशाली असून प्रत्येक खेड्यांत तिच्या शाखा आहेत. ट्रेड युनियन संघटना, महिला व युवक संघटना तिच्यांत सामील झाल्या. काळ्या आफ्रिकेच्या कामगार संघटनेचे ( जनरल वर्कर्स युनियन ऑफ ब्लॅक आफ्रिकेचे ) अध्यक्ष **सिकौ तौरी** हे ह्या स्वातंत्र्यलढ्याच्या संघटनेचे प्रमुख पुढारी म्हणून पुढें आले आणि गिनीची जनता त्यांना भूतपूर्व राजाचा नातू संबोधून त्यांच्याकडे आशेनें पाहूं लागली. १९५६ मध्यें सार्वत्रिक निवडणुका होऊन ते गिनीचे मुख्य प्रधान झाले.

१९५८ सालीं फ्रान्सचे अध्यक्ष द गॉलनें सर्व पश्चिम आफ्रिकेच्या वसाहतींना ' फ्रेंच कुटुंबांतर्गत स्वायत्तता ' अगर संपूर्ण स्वातंत्र्य ह्यांपैकीं एक निवडण्याचें आवाहन केलें. इतर सर्व फ्रेंच वसाहतींनीं ' स्वायत्त ' होण्यावर समाधान मानलें; पण गिनीच्या मुख्य मंत्र्यांनीं द गॉलच्या उपस्थितींत भाषण करतांना सांगितलें, " **गुलामगिरींतील श्रीमंतीपेक्षां स्वातंत्र्यांतील दारिद्र्य गिनीला अधिक पसंत आहे.** " ह्या घोषणेनें द गॉलसाहेब यांना राग आला आणि त्यांनीं सांगितलें, " तर मग ' नाहीं ' म्हणून मतदान करा कीं पुरें. " आणि खरोखरीच ९७·४ टक्के लोकांनीं " नाहीं " म्हणून मतदान केलें आणि स्वातंत्र्याचा स्वीकार केला. त्यांनीं फ्रेंच साम्राज्यवाद्यांचें आव्हान स्वीकारलें आणि १९५८ **ऑक्टोबर**मध्यें स्वतंत्र गिनीचें प्रजासत्ताक राज्य स्थापन झालें.

## ३

गिनीनें द गॉल घटनेचा धिक्कार केल्याचें जाहीर होतांच फ्रेंच सरकारनें ताबडतोब आपले सर्व अधिकारी व तंत्रज्ञ परत बोलावले. त्यांनीं पॅरिसला जातांना नेतां येईल तें तें सर्व बरोबर नेलें. ऑफिसांतील फर्निचर, इतर सामान, पोलिसांचे गणवेश, खिडक्यांच्या चौकटीसुद्धां नेल्या. गिनीच्या खजिन्यांत त्यांनीं फुटका मणि पण ठेवला नाहीं. फ्रेंच सरकारनें गिनीवर

आर्थिक बहिष्कार घातला. अशा रीतीनें ह्या नवोदित राज्याला आपण वठणीवर आणूं अशी त्यांना आशा होती.

पण गिनीचे पंतप्रधान सिकौ तौरी, त्यांचें सरकार व त्यांची संघटना खंबीर होती; त्यांना जनतेचा भक्कम पाठिंबा होता. त्यांनीं स्वातंत्र्य टिकविण्याच्या दृष्टीनें ताबडतोब पावलें उचललीं. चैनीच्या मालाची आयात बंद केली. समाजवादी राष्ट्रांबरोबर व्यापारी करार केले. आफ्रिकेंतील इतर राष्ट्रांनीं त्यांना सुशिक्षित कर्मचारी दिले. खुद्द कांहीं फ्रेंच इंजिनिअर्सनींहि व इतर तज्ज्ञांनींहि त्यांना साहाय्य केलें. स्वतंत्र घानानें १ कोटी रुपयांचे कर्ज देऊन भ्रातृभाव व्यक्त केला. **घाना-गिनी** यांचें सहकाराचें जीवन व ‘ युनियन ’ ( एक प्रकारचें संघराज्य ) निर्माण झालें.

पूर्वींच्या फ्रेंच साम्राज्यांतून आतां १४ स्वतंत्र राष्ट्रें जन्माला आलीं आहेत पण त्यांतील गिनीची महति मोठी आहे. ह्या राष्ट्रानें खरेंखुरें स्वातंत्र्य मिळविलें आहे. पुढें स्वतंत्र माली प्रजासत्ताकानेंहि गिनीपासून स्फूर्ति घेऊन आपलें स्वातंत्र्य अधिक दृढ केलें. आज ह्या राष्ट्रांत फ्रेंच ‘ सल्लागार व अधिकारी ’ यांची गर्दी नाहीं, फ्रेंचांच्या अधिकाराखालची वसाहती फौजा नाहींत आणि व्यापारी बंधनें नाहींत. खाणधंद्यावरील परकीय कंपन्यांची मालकी अद्याप कायम असली तरी उद्योगधंद्यांचा विकास चांगल्या रीतीनें होऊं लागतांच वसाहत राजवटीचा हा अवशेषहि क्रमशः नष्ट झाल्याशिवाय राहणार नाहीं.

• • •

# ३०. गिनी ( पोर्तुगीज )

**लोकसंख्या** – ५ लक्ष ३५ हजार.

**राजधानी** -- बिसाओ.

**राज्य** -- पोर्तुगीजांची वसाहत.

**मुख्य धंदे** -- अविकसित.

१

गिनीचा एक भाग पोर्तुगीजांच्या ताब्यांत आहे. त्याची लोकसंख्या ५ लक्ष ३५ हजार आहे. पोर्तुगीजांच्या इतर मोठ्या वसाहतींप्रमाणेंच ह्या छोट्या राज्यांतहि कोणत्याहि प्रकारचे राजकीय हक्क वा स्वातंत्र्य नाहीं. एका खेड्यांतून दुसऱ्यांत जाण्यासाठींसुद्धां अधिकाऱ्यांची परवानगी लागते. सत्ताधाऱ्यांना वाटेल तेव्हां वाटेल त्या व्यक्तीला हद्दपार करतां येते. शिक्षण फक्त मिशनरी संस्थाच देऊं शकतात. सर्व व्यापार पोर्तुगीजांच्या हातांत आहे. पोर्तुगीज शिकून त्यांचें संपूर्ण दास्यत्व मान्य करणाऱ्यांनाच फक्त 'नागरिकत्वा'चा हक्क मिळतो. ९९·७ टक्के लोक निरक्षर आहेत. आफ्रिकन लोकांचें लोकसंख्येंतील प्रमाण तेवढेंच आहे. **बिसाओ** हें राजधानीचें शहर आहे.

ही गुलामगिरी नष्ट करण्यासाठीं १९५३ मध्यें गुप्त संघटना स्थापन होऊन लढ्याला प्रारंभ झाला. गिनी व केप वर्दे यांच्या स्वातंत्र्यासाठीं लढणारा आफ्रिकन पक्ष ह्या संघटनेनें त्याचें नेतृत्व केलें. आज जनतेचा स्वातंत्र्य-मोर्चा उभारून **अमिलीअर कार्व्हालो** यांच्या पुढाकाराखालील हा मुक्तिसंग्राम यशस्वी होत आहे. गिनीचा $\frac{2}{3}$ भाग त्यांनीं मुक्त केला आहे. आफ्रिकेंतील पोर्तुगीज वसाहती याच मार्गानें संपूर्ण स्वातंत्र्य प्राप्त करून घेतील हें ह्या लहान विभागानें दाखवून दिलें आहे.

# ३१. सेनेगाल

**लोकसंख्या** – ३१ लक्ष.

**राजधानी** – दाकार.

**राज्य** – स्वतंत्र प्रजासत्ताक.

**मुख्य धंदे** – अविकासित – मुख्य पीक भुईमूग.

## १

आफ्रिकेच्या अगदीं पश्चिम टोंकाला असलेलें सेनेगालचें राष्ट्र फ्रेंच वसाहतींत फ्रेंच सुदानचा ( मालीचा ) भाग होतें. आणि सेनेगालची राजधानी दाकार ही फ्रेंच पश्चिम आफ्रिका संघराज्याची राजधानी होती. १८९८ च्या सुमारास हा प्रदेश फ्रेंचांनीं ताब्यांत घेतला. सेनेगालची लोकसंख्या ३१ लक्ष आहे.

१९५८ मध्यें इतर सर्व फ्रेंच वसाहतींप्रमाणेंच ह्या प्रदेशालाहि स्वातंत्र्याच्या मार्गावर पहिलें पाऊल टाकतां आलें. सार्वत्रिक निवडणुका होऊन विधिमंडळ व मंत्रिमंडळ स्थापन झालें. पण देश स्वातंत्र्याच्या उंबरठ्यावर असतांना फ्रेंचांनीं त्याला मालीपासून अलग केलें होतें. पूर्वापार परंपरा व आर्थिक विकासाची आवश्यकता लक्षांत घेऊन १९५९ मध्यें हें राज्य मालीबरोबर पुन्हा संयुक्त झालें होतें; परंतु १९६० मध्यें फ्रेंचांच्या दबावाखालीं तें परत विभक्त झालें.

सेनेगालचा प्रागतिक पक्ष ( सेनेगालीज प्रोग्रेसिव्ह युनियन ) हा मुख्य राजकीय पक्ष असून त्याच्या नेतृत्वाखालींच जनतेच्या स्वातंत्र्याच्या आकांक्षा व्यक्त झाल्या. अध्यक्ष **लिओपोल्ड सेंघोर** व मुख्य मंत्री **दिया** हे दोघे सेनेगालचे पुढारी स्वतःला समाजवादी म्हणवून घेत असत. परंतु १९६२ च्या अखेरीस त्यांच्यांतील मतभेद विकोपाला गेले. अध्यक्ष सेंघोर यांनीं

मुख्य मंत्री दिया यांना काढून टाकण्याची गुप्तपणें तयारी केली आणि त्यांनीं प्रतिकारासाठीं पावलें उचलतांच त्यांच्यावर बेकायदेशीरपणें सरकार ताब्यांत घेण्याचा कट रचल्याचा आरोप ठेवून त्यांना अटक केली.

त्यानंतरच्या २ वर्षांत सेंघोर सरकारचें धोरण अधिकाधिक जनता-विरोधी, फ्रेंचधार्जिणें व हुकूमशाही पद्धतीचें बनलें. १९६३ च्या अखेरीस सेनेगालमध्यें विधिमंडळाच्या व लोकसभेच्या निवडणुका झाल्या; त्याच्या आधींपासूनच लोकशाहीवादी नेत्यांच्या छळाला प्रारंभ झाला. जनतेचे पुढारी सोर दिआफ व ओमर म्बादे यांना तुरुंगांत हाल करून मारण्यांत आलें. निवडणुकींच्या काळांत २०० कार्यकर्ते ठार झाले व ५०० जखमी झाले. निवडणुकींनंतर सेंघोर यांनीं " फ्रेंच तज्ज्ञां "च्या मदतीनें व्यापक प्रमाणावर जप्त्या, झडत्या, अटक व हद्दपारींचें सत्र सुरू केलें आहे. त्यामुळें सेनेगालच्या जनतेंत असंतोष उफाळला असून संयुक्त मोर्चा उभारून सर्व देशभक्त लोक राष्ट्रीय लोकशाही, शांतता व स्वतंत्र अर्थविकास यांचा पुरस्कार करणारें सरकार अस्तित्वांत आणण्यासाठीं झटत आहेत.

• • •

# ३२. गॅंबिया

**लोकसंख्या** – ३ लक्ष ५५ हजार.

**राजधानी** – बाथर्स्ट.

**राज्य** – ब्रिटिश वसाहत.

**मुख्य धंदे** – भुईमुगाची शेती, तेल गिरण्या.

१

आफ्रिकेच्या पश्चिम टोंकाला सेनेगालच्या वेढ्यांत ४००० चौ. मैलांचा एक छोटासा पट्टा आहे. हा १९६३ पर्यंत ब्रिटिशांचा विश्वस्त प्रदेश होता. त्याची लोकसंख्या ३ लक्ष १६ हजार आहे. हा प्रदेश गॅंबिया नदीच्या दोन्ही बाजूंना पसरलेला असून "गॅंबिया" नांवानें ओळखला जातो. **बाथर्स्ट** ही त्याची राजधानी आहे. गॅंबिया नदीच्या कांठावर तांदूळ पिकतो. ह्या वसाहतींतील मुख्य उत्पादन म्हणजे भुईमूग होय. भुईमुगाच्या तेलापासून साबण, मार्गारीन व तेल तयार करतात; राहिलेल्या चोथ्याच्या ढेपींचा गुरांच्या खाण्यासाठीं उपयोग होतो. भुईमूग हाच ह्या देशांतील निर्यात व्यापाराचा एकमेव पदार्थ आहे. निर्यात होणाऱ्या पदार्थांत **९३ टक्के** किमतीचा भुईमूग असतो.

हा देश ब्रिटिशांनीं १८ व्या शतकांत जिंकला आणि पश्चिम आफ्रिकेंतील ब्रिटिश साम्राज्याचा पाया घातला. १६ व्या शतकापासून ब्रिटिश लोक ह्या प्रदेशांतून गुलाम, हस्तिदंत व कातड्याचा व्यापार करीत होते.

वसाहत अर्थव्यवस्थेचा विकास करून ब्रिटिशांनीं इतर देशांतील सर्व धंदे जवळजवळ बंद पाडून भुईमुगाचें उत्पन्न हा एकमेव व्यवसाय बनविला. त्यामुळें अन्नधान्य व इतर सर्व जिन्नस देशाला परदेशांतून घ्यावे लागतात. **गॅंबिया ऑईल सीड मार्केटिंग कंपनी** ही व्यापारी कंपनी ब्रिटिश भांडवलदारांनीं

स्थापन केली. भुईमूग विकत घेऊन तो परदेशी विकण्यापर्यंतचे सर्व व्यवहार हीच कंपनी करते. **ब्रिटिश टिटान प्रॉडक्टस्** नांवाची दुसरी एक कंपनी किनाऱ्याजवळील इलमेनाईट धातू खणून परदेशी रवाना करण्याचें काम करते. याखेरीज लहानसहान हस्तोद्योग सोडल्यास देशांत इतर धंदे नाहींत.

दारिद्र्य व मागासलेपणा यांविरुद्ध जनतेनें लढा करण्यास सुरुवात केली आणि त्याबरोबरच स्वातंत्र्याची मागणी केली, परंतु दारिद्र्य व मागासलेपणा ह्या कारणांसाठींच ब्रिटिशांनीं स्वातंत्र्याची मागणी धुडकावून लावली. त्यामुळेंच आजूबाजूंचीं अनेक राष्ट्रें स्वतंत्र होऊनसुद्धां १९६४ च्या अखेरपर्यंत गॅंबिया मात्र अद्याप "वसाहत व संरक्षित प्रदेश" ह्याच राजकीय गटांत मोडत आहे.

ब्रिटिश साम्राज्यांतील सर्व वसाहतींप्रमाणें वसाहत खात्यानें नेमलेल्या गव्हर्नराच्या हातीं देशांतील सर्व अधिकाराचीं सूत्रें आहेत. युनायटेड पार्टी व पीपल्स प्रोग्रेसिव्ह पार्टी ह्या दोन पक्षांच्या नेतृत्वाखालीं जनतेनें स्वातंत्र्याचा लढा चालविला आहे. १९६० मध्यें सार्वत्रिक मतदानाच्या हक्काची मागणी मान्य होऊन देशांतील पहिल्या सार्वत्रिक निवडणुका झाल्या. ह्या निवडणुकांत बहुसंख्येनें पीपल्स प्रोग्रेसिव्ह पार्टीचे उमेदवार निवडून आले आणि जमात-प्रमुखांच्या आग्रहामुळें एन् जाय यांना मुख्य मंत्रीपद मिळालें. त्यानंतर लंडन परिषदेंत करार होऊन १९६२ मध्यें गॅंबियाला साम्राज्यांतर्गत स्वराज्य देण्याचें ब्रिटिशांनीं मान्य केलें. १९६२ मध्यें निवडणुका होऊन पीपल्स प्रोग्रेसिव्ह पार्टीनें युनायटेड पार्टीचा पराभव केला आणि **जवारा** हे स्वराज्यांतील पहिले मुख्य मंत्री झाले. त्यानंतर झालेल्या वाटाघाटींनुसार १९६५ सालीं गॅंबियाला स्वातंत्र्य मिळणार आहे. म्हणजे हा प्रदेश आतां स्वातंत्र्याच्या उंबरठ्यावर उभा असून लौकरच त्याची स्वतंत्र राष्ट्र म्हणून वाटचाल सुरू होईल व तेथील प्रश्नांची व परिस्थितीची अधिक स्पष्ट कल्पना येईल. सध्यां आर्थिक परिस्थिति तुटीची असल्यामुळें सेनेगालबरोबर फेडरेशन करावें कीं नाहीं हा प्रश्न उभय राष्ट्रांकडून अनिर्णितच आहे. सेनेगालमध्ये सागरावरील पुलासारखा घुसलेला हा प्रदेश सेनेगालशीं संलग्न झाला पाहिजे, हेंच नैसर्गिक आहे.

● ● ●

# ३३. मौरितानिया

**लोकसंख्या** – ७ लक्ष, २७ हजार.

**राजधानी** – नौआकचोट.

**राज्य** – स्वतंत्र प्रजासत्ताक.

**मुख्य धंदे** – अविकासित.

१

माली प्रजासत्ताक व सेनेगाल यांना लागून मौरितानियाचें प्रजासत्ताक आहे. त्याची लोकसंख्या ७ लक्ष २७ हजार असून **नौआकचोट** ही राजधानी आहे.

ह्या प्रदेशांत प्रारंभीं पोर्तुगीजांनीं गुलामांच्या व्यापारासाठीं हल्ले केले. पुढें १९०२ ते १९१४ च्या दरम्यान फ्रेंच फौजांनीं हा प्रदेश व्यापून टाकला. पण येथील लोकांनीं भीषण युद्धें केलीं. १९०८ मध्यें फ्रेंच सैनिकांबरोबर त्यांनीं १२५ लढाया केल्या. हा प्रदेश फ्रेंचांच्या ताब्यांत अखेरीस १९२० मध्यें गेला. १९५८ मध्यें इतर फ्रेंच वसाहतींप्रमाणें येथें सार्वत्रिक निवडणुका होऊन विधिमंडळ स्थापन झालें. ह्या विधिमंडळानें ठराव करून **मौरितानियाचें इस्लामिक प्रजासत्ताक** हें नांव धारण केलें.

ह्या प्रदेशाचे मूळचे रहिवाशी मूर लोक होते. पुढें अरब, निग्रो व मूर यांच्या मिश्रणांतून येथील प्रजा निर्माण झाली. ह्या प्रदेशाचा बराचसा भाग वाळवंट आहे.

शेळया व मेंढ्यांचें पालन करणें हा ह्या प्रदेशांतील मुख्य व्यवसाय आहे. कांहीं लोक उंट व गाढवें पाळतात. अनेक लोक डिंक व गोंद गोळा करून पोटापुरतें मिळवितात. नदीच्या व ओॲसिसच्या प्रदेशांत मका पिकविला जातो.

उद्योगधंदे जवळजवळ नाहींतच. फोर्ट गौरौदजवळ लोखंड व अकजौत-जवळ तांबें सांपडलें असून युरोपियन साम्राज्यवादी त्या खाणी ताब्यांत घेण्याच्या मार्गावर आहेत.

**मौरितानियन रॅली** हा येथील मुख्य राजकीय पक्ष असून विधिमंडळांतील सर्व ४० जागा त्यांनीं जिंकल्या आहेत. रॅलीचे एक पुढारी **मुक्तार ओल्ड दादा** राज्याचे मुख्य प्रधान आहेत. १९६० च्या नोव्हेंबर-मध्यें मौरितानियाला स्वातंत्र्य मिळालें. हें राज्य फ्रेंच राष्ट्रकुटुंबाचें सदस्य आहे. स्वाभाविकपणेंच, परराष्ट्रीय धोरण व संरक्षण यांचें सर्वोच्च अधिकार फ्रान्सकडे आहेत.

# प. आफ्रिकेंतील अवशिष्ट प्रदेश

## प्रास्ताविक

आफ्रिकेच्या ह्या पश्चिम भागांत वर वर्णन केलेल्या भूतपूर्व फ्रेंच वसाहतींखेरीज **नायगेरिया व घाना** ह्या ब्रिटिशांच्या दोन मोठ्या वसाहती, **कॅमेरून्स व टोगोलँडचे** संरक्षणाखालील विभाग आणि **सिएरा लिओन व गॅंबियाची** छोटी वसाहत होती. याशिवाय **लायबेरियाचें** स्वतंत्र राज्य व **पोर्तुगीज गिनी** मिळून ह्या प्रदेशाचा साम्राज्य-वाद्यांनीं बनविलेला वेडावांकडा नकाशा तयार झालेला होता. त्यांतील गॅंबिया व पोर्तुगीज गिनी सोडून बाकीचे सर्व प्रदेश आतां स्वतंत्र झाले आहेत.

घाना व नायगेरियाच्या मोठ्या राष्ट्रांच्या परिचयापूर्वी सिएरा लिओन व लायबेरिया यांची माहिती करून घेणें इष्ट ठरेल.

• • •

# ३४. सिएरा लिओन

**लोकसंख्या** – ४० लक्ष.

**राजधानी** – फ्री टाऊन.

**राज्य** – स्वतंत्र.

**मुख्य धंदे** – हिऱ्यांच्या खाणी; व पाम तेलाचा व्यापार.

१

पश्चिम आफ्रिकेच्या मध्यावर, पश्चिमेस गिनी व पूर्वेस लायबेरिया यांच्यामध्यें सिएरा लिओनचें राज्य आहे. ब्रिटनमध्यें औद्योगिक भांडवलशाहीचा विकास झाल्यानंतर गुलामांचा व्यापार फायदेशीर राहिला नाहीं. तेव्हां गुलामांना स्वातंत्र्य देण्याची मोहीम सुरू झाली. अशा रीतीनें स्वतंत्र करण्यांत आलेल्या कांहीं गुलामांची व युरोपियन बायकांची वसाहत १७८७ मध्यें किनाऱ्यावर करण्यांत आली व त्या गांवाला फ्री टाऊन हें नांव देण्यांत आलें. त्यानंतर तेथें हजारों गुलामांना आणून सोडण्यांत आलें. तेथील मूळच्या लोकांचा आजूबाजूचा प्रदेश ब्रिटिशांनीं ताब्यांत घेतला, फ्री टाऊन येथें नाविक व व्यापारी तळ केला आणि सर्व प्रदेशाला सिएरा लिओन (सिंहाची टेकडी) हें नांव दिलें. युरोपियन व स्वतंत्र गुलामांच्या संमिश्र प्रजेला क्रिओली जमात म्हणतात. त्यांना प्रथमपासूनच स्वातंत्र्य बऱ्याच प्रमाणांत मिळालें. पण मूळचे रहिवाशी मात्र परतंत्र झाले. क्रिओलींची संख्या सुमारें १० लक्ष असून बाकी आफ्रिकन लोकांची संख्या सुमारें ३९ लक्ष आहे.

हा प्रदेश मुख्यतः हिऱ्यांचा प्रदेश आहे. ताडांच्या फळांपासून काढण्यांत येणारें तेल, सुंठ, भुईमूग व तांदूळ हीं तेथील मुख्य पिकें आहेत.

ब्रिटिशांच्या अमदानींत सिएरा लिओनमधील सर्व सत्ता व संपत्ति सत्ताधाऱ्यांच्या व त्यांना सर्व प्रकारें मदत करणाऱ्या क्रिओलींच्या हातांत होती; बहुसंख्य आफ्रिकी लोकांचें उत्पन्न फार कमी होतें. जगांतील हिऱ्यांपैकीं $\frac{1}{8}$ हिरे निर्माण करणाऱ्या ह्या प्रदेशांतील जनतेचें राहणीमान आफ्रिका खंडांतहि सर्वांत निकृष्ट होतें.

आजूबाजूच्या प्रदेशांतील ब्रिटिश वसाहतींत विशेषतः घानामध्यें जागृति होऊन तें राष्ट्र स्वराज्याच्या मार्गें लागलेलें पाहून सिएरा लिओनमध्येंहि स्वातंत्र्याचें वारे वाहूं लागले. १९५१ व १९५७ मध्यें ब्रिटिश सत्ताधाऱ्यांनीं देशांत घटनात्मक सुधारणा घडवून आणल्या. विधिमंडळापैकीं प्रतिनिधि-सभागृहाला स्वतःचे प्रतिनिधि निवडून देण्याचा अधिकार १९५७ मध्यें मिळाला.

१९५७ च्या मेमध्यें देशांतील पहिली सार्वत्रिक निवडणूक झाली आणि स्वातंत्र्याची मागणी करणाऱ्या **पीपल्स पार्टीला** ३९ पैकीं २६ जागा मिळाल्या. निवडून आलेले ७ स्वतंत्र सभासद पीपल्स पार्टीला मिळाले आणि प्रतिनिधि सभेमध्यें पीपल्स पार्टीचें निर्विवाद बहुमत झालें. पीपल्स पार्टीचे पुढारी **मिल्टन मार्गाइ** यांच्या नेतृत्वाखालीं पहिलें आफ्रिकन सरकार १९५८ सालीं स्थापन झालें. गव्हर्नराला सर्वोच्च अधिकार देण्यांत आले होते तरी मार्गाइचें सरकार हें स्वराज्याच्या मार्गावरील पहिलें पाऊल होतें.

त्यानंतरहि संपूर्ण स्वातंत्र्याच्या मागणीचा लढा चालूंच राहिला आणि अखेर ब्रिटिश सरकारनें लंडनमध्यें १९६० च्या एप्रिलमध्यें नवी घटना-परिषद बोलाविली. ह्या परिषदेंत आफ्रिकन प्रतिनिधींनीं ताबडतोब स्वातंत्र्य देण्याची मागणी मांडली. ती मागणी साम्राज्य सरकारला मान्य करावी लागली. पण मागणी मान्य करतांना त्या सरकारनें सिएरा लिओन सरकारला अनेक करार मान्य करायला लावले. ह्या करारानुसार फ्री टाऊनमध्यें नाविक तळ ठेवण्याचा हक्क ब्रिटिश सरकारनें मिळविला आणि देशांतील भांडवलाला संपूर्ण संरक्षण दिलें पाहिजे अशी अट घातली. ह्या अटींना मान्यता देण्याला पीपल्स पार्टीचे जनरल सेक्रेटरी **सिएका**

**प्रोविन स्टिव्हन्स** यांनींच फक्त सक्त विरोध केला पण मार्गाइनीं व इतर पुढाऱ्यांनीं त्या मान्य केल्या.

ह्या देशहिताला बाधा आणणाऱ्या अटींना विरोध करण्यासाठीं स्टिव्हन्स यांनीं देशांत आंदोलन उभारलें आणि १९६० च्या जुलैमध्यें **ऑल पीपल्स कॉंग्रेस** पक्षाची स्थापना केली. ह्या पक्षानें स्वातंत्र्यपूर्व निवडणुकांची मागणी केली; ह्या निवडणुका झाल्यास स्वातंत्र्योत्तरकाळांत येणारें पहिलें सरकार अधिक खंबीर साम्राज्यविरोधी धोरणानें कार्य करणारें असें सत्तेवर असेल, अशी या पक्षाची खात्री होती. परंतु मार्गाइ सरकारनें व ब्रिटिश सरकारनें ही मागणी धुडकावून लावली.

यामुळें देशांत ठिकठिकाणीं निदर्शनें सुरू झालीं. तेव्हां मार्गाइ सरकारनें देशांत आणीबाणीची परिस्थिति जाहीर करून ऑल पीपल्स कॉंग्रेसच्या २० नेत्यांना अटक करून तुरुंगांत टाकलें.

२७ एप्रिल १९६१ रोजीं सिएरा लिओनला स्वातंत्र्य मिळालें; त्या वेळीं तेथें असें वातावरण होतें.

आतां सिएरा लिओनमधील आर्थिक ढाच्याचा व जनतेच्या परिस्थितीचा थोडासा अभ्यास करूं या.

ब्रिटिश अमदानींत फ्री टाऊन शहर व किनारपट्टीच्या विभागाला क्राऊन कॉलनी म्हणत असत आणि सिएरा लिओनच्या बाकीच्या प्रदेशाला संरक्षक विभाग ( प्रोटेक्टोरेट ) म्हणत. कॉलनीचा विभाग अधिक विकसित होता. फ्री टाऊन हें उत्कृष्ट बंदर होतें आणि राज्यकारभार चालविणारे सर्व युरोपियन अधिकारी तेथें राहात असत आणि त्यांना साहाय्य करणारे वरिष्ठ थरांतील क्रिओलीहि ह्याच भागांत राहात. संरक्षित विभाग आर्थिकदृष्ट्या मागासलेला होता आणि साम्राज्यविरोधी लढ्याचा तो पुढें बालेकिल्ला बनला. स्वातंत्र्याच्या मागणीच्या बरोबरच देशाची ही प्रादेशिक विभागणी रद्द होऊन सबंध देशाचा समान विकास व्हावा ह्यासाठींहि येथील लोकांनीं लढा उभारला. कॉलनींतून ब्रिटिश सरकारनें नेमणुका केलेल्या राष्ट्रीय कौन्सिलमधील सभासदांचा भरणा होई, तर संरक्षक विभागांतून पीपल्स पार्टीचे प्रतिनिधि निवडून येत. आतां स्वातंत्र्यानंतर कॉलनीला " मध्य विभाग " व **संरक्षक प्रदेशाला** " प्रांत " म्हणतात

आणि दोन्ही प्रदेशांना समान पातळीवर आणण्यासाठीं रस्ते व वाहतुकीची सोय वाढविण्याचा व प्रांतांतून आधुनिक पद्धतीनें आर्थिक देवाणघेवाण सुरू करण्याची योजना सरकारनें आंखली आहे. तोंपर्यंत तेथें वस्तूंची देवाण-घेवाण " बार्टर " पद्धतीनेंच होत असे. प्रांतांतून शाळा, हॉस्पिटलें व शेती-केंद्रेंहि स्वराज्य सरकारनें सुरू केलीं आहेत.

देशांतील मुख्य धंदे म्हणजे खाणींतून कच्चा माल काढणें. पण हे धंदे परकीय कंपन्यांच्या मालकीचे असून स्वराज्य आल्यानंतर राज्यव्यवस्थेच्या यंत्रणेमधून होणारें शोषण पुष्कळच कमी झालें असलें तरी वसाहतींचें शोषण ह्या कंपन्यांकडून चालतें. **सिएरा लिओन डेव्हलपमेंट कंपनी** ( डेल्को ) हिच्याकडे लोखंडाच्या खाणीची मक्तेदारी आहे. ही कंपनी ब्रिटिश भांडवलदारांच्या मालकीची आहे. **मारांपा** हा एक लोखंडमिश्रित खडकांचा अद्वितीय पर्वत आहे. बुल्डोझरच्या साहाय्यानें पर्वत फोडून काढण्यांत येतो आणि जवळच असलेल्या कारखान्यांत लोखंड वितळविण्यांत येतें. अति स्वस्त मजुरीच्या दरामुळें कंपनीला अवाढव्य नफा मिळतो. **द ब्रिटिश सिएरा लिओन सिलेक्शन ट्रस्ट** ही हिऱ्यांच्या खाणींवर आधिपत्य चालविणारी कंपनीहि ब्रिटिश मालकीची आहे. **कोनो** विभागातील खाणींत उत्कृष्ट हिरे मिळतात. ३५ वर्षांपासून हिरे उत्खननाचें हें काम चालू आहे. १९४५ मध्यें सर्व जगांतील ३ नंबरचा, ७७० कॅरटचा हिरा येथें मिळाला. छोटे हिरे तर असंख्य मिळतात. लहान कॉन्ट्रॅक्टर्स खासगी-रीतीनें छोटे जमिनींचे तुकडे घेऊन हिरे खणण्याचा धंदा करतात पण त्यांत त्यांना फारसा फायदा मिळत नाहीं. मलेरिया, संधिवात किंवा निद्रारोगाला तेथील मजूर ( मालक ) बळी पडतात.

१९३० सालीं ह्या ट्रस्टनें सबंध देशांतील खाणींवर ९९ वर्षांसाठीं मक्ते-दारी हक्क मिळविले. अर्थात ब्रिटिश भांडवलदारांच्या नफासंवर्धनासाठींच असल्यामुळें हा करार अगदीं सहजासहजीं झाला. परंतु, जेव्हां ट्रस्टनें आफ्रिकी खासगी खननावर बंदी बसविण्याचा प्रयत्न केला, तेव्हां संघर्षाला प्रारंभ झाला. १९५५ मध्यें ट्रस्टनें सैन्य बोलावून अशा लोकांना अटक करविण्यास प्रारंभ केला. तावडतोब ह्या लढ्याला साम्राज्यविरोधी लढ्याचें स्वरूप आलें. अखेरीस ट्रस्टला माघार घ्यावी लागली आणि ९९ वर्षांचा

मक्तेदारी करार रद्द झाला. आतां त्याला फक्त १ लक्ष १४ हजार ५०० व्हेक्टर क्षेत्रफळमध्येंच खनन करण्याचा अधिकार आहे. तरीसुद्धां, अर्थातच, सवांत मोठी खाण-कंपनी म्हणजे हाच ट्रस्ट आहे.

बेल्जियम, जर्मन वगैरे व्यापाऱ्यांच्या चढाओढीमुळें हिऱ्यांचा बेकायदेशीर व्यापार ( स्मगलिंग ) कल्पनातीत वाढला. **१२ कॅरटच्या** हिऱ्याला साधारणपणें **२० ते २५ हजार पौंडां**पर्यंत किंमत मिळते हें लक्षांत घेतां असा व्यापार कायदेशीर व्यापाराच्या दुपटीपर्यंत कां चालतो याची वाचकांना कल्पना येईल; ह्या व्यापारांतून श्रीमंत व्यापाऱ्यांनीं—ज्यांना **अलहाजी** म्हणतात—अमाप पैसा कमावला.

पण ट्रस्टचें प्रकरण येथेंच संपलें नाहीं. देश स्वातंत्र्याच्या उंबरठ्यावर असतांना, सरकारी नियंत्रणाखालील संस्थेतर्फे हिरे विकण्याचा करार पुढें चालू ठेवण्यास ट्रस्टनें नकार दिला आणि अमेरिकेंतील हॅरी विन्स्टन वगैरे अनेक कंपन्यांबरोबर विक्रीचे करार परस्पर केले. त्यामुळें सरकारचें कोटयवधि पौंडांचें नुकसान होऊं लागलें. तेव्हां १९६१ मध्यें स्वराज्य सरकारनें हिऱ्यांची विक्री सरकारला ५ टक्के विक्री-किमतीइतका कर भरल्यानंतरच करतां येईल असें बंधन घातलें. ट्रस्टनें असहकार पुकारला. आफ्रिकन लोकांना हिऱ्यांना पैलू पाडण्याचें शिक्षण देण्याचें वचन मागें घेतलें आणि हिऱ्यांची विक्री बंद केली. ट्रस्टच्या येनगेमा येथील कचेरींत ६० लक्ष पौंड किमतीचे हिरे तिजोऱ्यांत पडून राहिले. अखेरीस, ह्या वेळींसुद्धां ट्रस्टलाच माघार घ्यावी लागली. तडजोडीच्या करारांत निम्मे हिरे सरकारी नियंत्रणाखालीं विकण्याचें ट्रस्टनें मान्य केलें. अर्थात् हा संघर्ष अद्यापहि चालूच आहे.

सिएरा लिओनच्या परदेशी व्यापारापैकीं $\frac{3}{4}$ निर्यात व्यापार हिऱ्यांचा आहे. सिएरा लिओनमध्यें दुसरें तिसरें कांहींच होत नाहीं., कांद्यांपासून बटणांपर्यंत सर्व वस्तु परदेशांतून आणाव्या लागतात. ही परिस्थिति बदलणें हें देशाच्या सरकारचें पहिलें कर्तव्य आहे. त्या दृष्टीनें मार्गाइ सरकारनें दरवार्षिक योजना आंखली आहे. त्यासाठीं १६ कोटी ४० लक्ष पौंड लागणार आहेत, ते कोठून आणायचे ?— हा प्रश्न सध्यां मंत्रिमंडळाला भेडसावीत आहे. परकीय भांडवल मिळविण्याचा प्रयत्न सरकारनें केला

पण फक्त १० लक्ष पौंड मदत मिळाली. तेव्हां परदेशी कंपन्यांच्या नफ्यावर नियंत्रण घालून हें भांडवल उभें करावें, ह्या ऑल पीपल्स कॉंग्रेसचे पुढारी मांडीत असलेल्या विचारांना जनतेचा वाढता पाठिंबा मिळत आहे.

• • •

# ३५. लायबेरिया

**लोकसंख्या** – २० लक्ष.

**राजधानी** – मनरोव्हिया.

**राज्य** – स्वतंत्र.

**मुख्य धंदे** – रबर कंपनी.

## १

सिएरा लिओनला लागून पूर्वेस लायबेरिया आहे. त्याचा इतिहास पुष्कळसा सिएरा लिओनप्रमाणें आहे. १८३१ मध्यें ह्या प्रदेशांत उत्तर अमेरिकेंतील स्वातंत्र्य देण्यांत आलेल्या २१ निग्रो गुलामांची वसाहत करण्यांत आली; पुढें तेथें आणखी स्वतंत्र गुलामांना आणून सोडण्यांत आलें, आणि १८४७ मध्यें त्या प्रदेशाला स्वतंत्र प्रजासत्ताकाचा दर्जा असल्याचें जाहीर करण्यांत आलें; तेव्हांपासून हें राज्य स्वतंत्र आहे. ह्या अमेरिकेंतून आलेल्या निग्रोंनीं स्वतःची जमात बनविली. त्यांचे वंशज स्वतःला **अमेरिको - लायबेरियन्स** म्हणवितात. येथील मूळच्या लोकांवर त्यांनीं वर्चस्व मिळविलें व सत्ता हातांत घेतली. त्यांची संख्या सुमारें ३० हजार असून राज्याची एकूण लोकसंख्या २० लक्ष आहे. मूळचे लायबेरियन लोक किनाऱ्यापासून दूरवर अंतर्गत भागांत राहतात आणि त्यांच्यांत अलीकडेच जागृति होऊं लागली आहे.

१९०८ मध्यें लायबेरियाच्या सरकारनें अमेरिकेचे अध्यक्ष रूझवेल्ट यांच्याकडे आर्थिक मदत मागितली. अमेरिकन सरकारनें एक कमिशन १९०९ मध्यें पाठविलें. तेव्हांपासून या देशांत अमेरिकन सल्लागार येऊन राहिले आहेत; व त्यांच्या जोडीनें अमेरिकन लष्करी अधिकारीहि आले आहेत. राज्यव्यवस्थेचीं सूत्रें व लष्कर-पोलिसांतील अधिकाराच्या जागा त्यांच्याच हातांत आहेत.

**फायरस्टोन रबर कंपनी** ह्या अमेरिकन मक्तेदारी कंपनीनें १९२५ मध्यें १० लक्ष एकर जमीन – म्हणजे संपूर्ण देशांतील ¼ जमीन लीजवर एका एकराला ६ सेंट भाड्यानें घेतली. तेव्हांपासून देशाच्या आर्थिक व राजकीय व्यवहारावर तिनें पकड ठेवली आहे.

देशांत आतांपर्यंत **टू व्हिग पार्टी** हा एकच राजकीय पक्ष होता; तो अमेरिको-लायबेरियन्सचा पक्ष आहे. १९५१ च्या निवडणुकांपर्यंत ह्या पक्षाचा एकच उमेदवार उभा राहात असे व तो निवडून येई. लायबेरियाचे सध्यांचे अध्यक्ष **विलियन टबमन** १९४३ मध्यें प्रथम अध्यक्ष म्हणून निवडून आले. त्यानंतर १९५१ मध्यें, घटनेप्रमाणें त्यांना परत अध्यक्ष म्हणून निवडून येण्याचा अधिकार नव्हता, परंतु सत्ता टिकविण्यासाठीं त्यांनीं घटना दुरुस्त करून घेतली. त्या वेळीं दिहवो त्वे यांनीं **रिफॉर्मेशन पार्टी** स्थापन करून त्यांना विरोध केला. त्यानंतर कामगारसंघटना स्थापन झाल्या व त्यांनींहि देशांतील दारिद्य, मक्तेदारी, लांचलुचपत व पिळणूक यांविरुद्ध आंदोलन करण्यास प्रारंभ केला आहे.

फायरस्टोन कंपनी ही जशी अमेरिकन मक्तेदारांची मिरासदारी आहे त्याप्रमाणें स्वीडिश मिनरल कंपनीनें लोखंड खणून निर्यात करण्यासाठीं २० कोटी डॉलर्सचें भांडवल गुंतविले आहे. १९६१ मध्यें १ कोटी ४० लक्ष पौंड किमतीचें लोखंड व १ कोटी २० लक्ष पौंड किमतीचा रबर या कंपन्यांनीं निर्यात केला. टबमन सरकारला त्यांतून कांहीं प्रमाणांत नफा व कर मिळत असले तरी कच्च्या मालाच्या ह्या निर्यातीमुळें देशाचें फार मोठें नुकसान होतें, तें थांबवून, स्वदेशी व स्वदेशांत उद्योगधंद्यांचा पाया घातला गेला पाहिजे, असे विचार व्यापक प्रमाणांत व्यक्त होऊं लागले आहेत.

• • •

# ३६. घाना

**लोकसंख्या** – ४६ लक्ष.

**राजधानी** – आक्रा.

**राज्य** – स्वतंत्र प्रजासत्ताक.

**मुख्य धंदे** – कोकोचे मळे.

१

आफ्रिकेच्या पश्चिम किनाऱ्यावरील राज्यांत घानाचें राज्य अनेक दृष्टीनें प्रसिद्ध आहे.

आफ्रिकेंतील स्वातंत्र्याचें प्रतीक म्हणून घानाच्या राज्याला जसा आफ्रिकेंत मान आहे त्याचप्रमाणें " आफ्रिका जागृत झाली आहे, " याची पहिली खूण युरोपियन साम्राज्यवाद्यांना घानांतील घडामोडींमुळें मिळाली. यामुळें घानाचें नांव गेल्या कांहीं वर्षांत सतत सगळीकडे गाजत आहे.

विषववृत्तावरील अति-उष्ण, अति-पावसाच्या व दाट जंगलांच्या प्रदेशांत घानाच्या किनाऱ्यावरील भागाचा समावेश होतो.

ह्या प्रदेशांतील लोक निग्रो असून ते खूप काळे आहेत. पण ते रुबाबदारहि आहेत.

" आफ्रिका खंडाला इतिहास आहे का ? " हा एक इतिहासतज्ज्ञांचा विवादाचा विषय आहे. युरोपियन साम्राज्यवाद्यांचें म्हणणें आहे कीं, १६ व्या शतकांत आम्हीं ह्या प्रदेशांत प्रवेश केला तेव्हां आम्हांला फक्त जंगली लोक भेटले. त्यांना संस्कृति नव्हती, इतिहास नव्हता, राज्य नव्हतें, ते अत्यंत मागासलेले होते, त्यांची शेती अगदींच प्राथमिक अवस्थेंत होती आणि त्यांना वस्त्रें विणतां येत नव्हतीं.

वसाहतकारांचा हा ग्रह खोटा असल्याबद्दलचे अनेक पुरावे नंतरच्या संशोधकांना मिळाले आणि त्यांतलि अनेक घानाशीं संबंधित असलेले आहेत, ही घानाची एक अपूर्वाई आहे.

घानाचे अध्यक्ष डॉ. नक्रुमा १९५३ सालीं केलेल्या एका भाषणांत म्हणाले, " खिस्ती शतकाच्या अगदीं प्रारंभीं इंग्लंडला कोणतेंहि महत्त्व प्राप्त होण्यापूर्वी किंबहुना इंग्लंड हें राष्ट्र बनण्याच्याहि अनेक वर्षांपूर्वी, आपल्या पूर्वजांनीं मोठें राज्य निर्माण केलें होतें आणि तें ११ व्या शतकापर्यंत अस्तित्वांत होतें. पुढें तें उत्तरेकडील मूर लोकांनीं उद्ध्वस्त केलें. त्याच्या भरभराटीच्या दिवसांत तें आफ्रिका खंडाच्या दोन्ही किनाऱ्यांपर्यंत पसरलेलें होतें. असें सांगतात कीं, त्या महान् साम्राज्यांत वकिलांना व विद्वानांना मोठा मान मिळत असे आणि घानाचे लोक लोंकर, कापूस, रेशीम व मखमलीचे कपडे वापरीत असत. ते कापड, सोनें व तांब्याचा व्यापार करीत, आणि त्यांच्याजवळ रत्नें आणि सोन्या-रुप्याचीं शस्त्रें असत......

" आणि म्हणून आपण घानाचें नांव ( आपल्या राष्ट्राला ) गौरवपूर्वक देत आहोंत. आपल्या भावी इतिहासाचें तें स्फूर्तिस्थान आहे. "

आफ्रिका खंड जगाच्या इतिहासांत दुसऱ्या महायुद्धानंतर जणूं कांहीं नव्यानेंच उदयास आलें; कारण वसाहतकारांनीं त्याचा " शोध " पूर्वींच लावला असला तरी या काळांत तेथील लोक जागृत होऊन स्वराज्याची मागणी करूं लागल्यामुळें त्यांतील देशांनीं जगाचें लक्ष वेधून घेतलें. त्यांच्या अस्मितेचा जगाला प्रत्यय येऊं लागला.

राष्ट्रीय जागृतीबरोबरच सांस्कृतिक परंपरेचा व इतिहासाचा अभ्यास होऊं लागला आणि त्यांतून अद्याप फारच थोडा प्राचीन काळ प्रकाशांत असला तरी तो चांगलाच चित्तवेधक आहे, असें आढळून आलें आहे.

एके काळीं आफ्रिकेच्या ह्या पश्चिम किनाऱ्यावर अनेक राज्यें भरभराटीला आलीं होतीं. त्यांतच घानाचें राज्य होतें.

९ व्या ते १३ व्या शतकांत घानाचें राज्य संपन्नतेनें विलसत होतें. मोठा व्यापार, सुंदर कला, बलिष्ठ व केंद्रित सत्ता, शिस्तबद्ध सैन्य हीं त्याचीं वैशिष्ट्यें होतीं. राजदरबाराचें वैभव पाहून भूमध्यसमुद्राजवळच्या प्रदेशांतून येणारे प्रवासी थक्क होत होते.

पण पुढें हें सर्व वैभव लयाला गेलें. कारण अरब, पोर्तुगीज, ब्रिटिश गुलाम-मालकांना गुलामांचा व्यापार करण्याची चटक लागली आणि त्यांनीं पश्चिम किनाऱ्यावरील ह्या सर्व राज्यांची धुळधाण करून टाकली.

गुलामांच्या मालकांनीं राजांशीं संधानें बांधून गुलाम विकत घेण्यास प्रारंभ केला. गुलाम जिंकण्यासाठीं एका टोळीचे (किंवा छोट्या, स्वतंत्र राज्याचे) सरदार दुसरीबरोबर युद्ध करून जिंकलेल्या लोकांना युरोपियन व्यापारांना विकीत असत. त्यामुळें आफ्रिकेच्या अंतर्गत भागांत हलकल्लोळ व अराजक माजले; संस्कृति विलयास गेली आणि शेतें ओस पडलीं. विकासाचा पुढचा टप्पा गांठण्याऐवजीं समाज अधिक रानटी अवस्थेला पोहोंचला. अशी दुर्दशा घानाच्या लोकांची १६ व्या शतकांत झाली होती.

पुढें युरोपमध्यें यंत्रयुग सुरू झालें. आफ्रिकेच्या पश्चिम किनाऱ्यावर प्रदेश जिंकण्यासाठीं फ्रेंच व ब्रिटिश यांची मोठी चुरस लागली होती. त्यांत ब्रिटिशांनीं जे प्रदेश मिळविले त्यांत घानाच्या प्रदेशाचा समावेश होतो. घानाला त्यांनीं नांव दिलें **गोल्ड कोस्ट**. कारण त्या किनाऱ्यावर सोनें असल्याचें त्यांना आढळून आलें होतें.

## २

ब्रिटिशांचा अंमल घानावर चालूं झाला आणि त्या देशाचें स्वरूप पार पालटून गेलें. देशाचीं सर्व सूत्रें तेथील लोकांच्या भरणपोषणासाठीं चालण्याऐवजीं तीं ब्रिटिश राज्यकर्त्यांच्या नफ्यासाठीं हालूं लागलीं.

पश्चिम किनाऱ्यावरील ह्या राज्याची हवा उष्ण व दमट असल्यामुळें, तेथें जंगल व दलदल असल्यामुळें आणि त्से-त्से माशीचा व इतर चिलटांचा उपद्रव असल्यामुळें ह्या भागांत इंग्रज लोक राहायला आले नाहींत. राज्यकारभारासाठीं लागणारे व मळे चालविणारे बडे नोकरशहा सोडल्यास इंग्रजांची वस्ती येथें झाली नाहीं. म्हणून ४६ लक्षांवर लोकसंख्या असलेल्या ह्या देशांत फक्त ६–७ हजार इंग्रज राहण्यास गेले. आफ्रिकेंत चांगल्या हवेच्या पूर्व किनाऱ्यावरील अगर दक्षिणेकडील देशांप्रमाणें येथें उत्तम पिकाऊ जमीन राज्यकर्त्यांनीं ताब्यांत घेण्याचा प्रकार झाला नाहीं, तरी जमीन-मालकीच्या संबंधांत फार मोठी उलथापालथ ब्रिटिश अमदानींत घडून आली.

ब्रिटिश राजवट सुरू होण्यापूर्वी येथील लोक आपल्याला लागणारे धान्य व इतर पिकें काढीत असत आणि आफ्रिकेंतील इतर सर्व देशांप्रमाणें

येथील जमीन समाजाच्या मालकीची होती, वैयक्तिक मालकीची नव्हती.

ब्रिटिशांनीं कोकोचें बीं नेऊन येथें पेरलें आणि तें फायदेशीर होतें हें पाहतांच कोकोचे मळे करून मोठ्या प्रमाणावर लागवड सुरू केली आणि संपूर्ण जमीन ही ह्या एकाच व्यापारी पिकाखालीं आणली. त्यासाठीं त्यांनीं कांहीं जमिनींचे तुकडे करून ती आफ्रिकन शेतकऱ्यांना वांटून दिली.

ब्रिटिश येण्यापूर्वीं जमिनीचा कस जाऊं नये म्हणून आलटून पालटून निरनिराळीं पिकें घानाचे शेतकरी लावीत असत, पण आतां वर्षानुवर्षें कोको हेंच एक पीक काढल्यामुळें जमिनीचा कस कमी झाला.

ह्या मळ्यांच्या लागवडीमुळें घानाच्या जंगलांतील हिरव्यागार वृक्ष-राजींची साफ नासाडी झाली. एका भागांत तर झाडें इतक्या प्रमाणावर तोडलीं गेलीं कीं थेट किनाऱ्यावरील विषुववृत्तीय जंगलांचा भेद करून पलीकडील गवताळ प्रदेशापर्यंतचें जंगल तोडलें गेलें, आणि पलीकडच्या सहारा वाळवंटांतील उष्ण वाऱ्यांचे झोत किनाऱ्यापर्यंत येऊं लागले. त्यामुळें खुद्द कोकोच्या पिकालाहि धोका निर्माण झाला.

व्यापारी पिकांच्या लागवडीमुळें जीवनास आवश्यक असलेल्या धान्यो-त्पादनाकडे दुर्लक्ष झालें आणि घानाच्या लोकांच्या उपासमारींत आणखीनच भर पडली.

याशिवाय एकाच प्रकारच्या उत्पादनावर म्हणजे कोकोवर, संपूर्ण देशाची उभारणी झाल्यामुळें ह्या पिकाच्या किमती आंतरराष्ट्रीय बाजार-पेठेंत पडल्या कीं संपूर्ण राष्ट्र व त्याचें संपूर्ण जीवन कोलमडून जाण्याचा धोका निर्माण होई. अशा तऱ्हेचे भयंकर धक्के घानाच्या शेतकऱ्यांना वारंवार सहन करावे लागले. उदाहरणार्थ, १९३० सालीं जागतिक मंदीच्या काळांत कोकोच्या किमती पडतांच घानावर राष्ट्रीय संकट आलें. उपासमार व कर्जबाजारीपणा यांच्या तडाख्यांतून सुटणें सधन शेतकऱ्यांनाहि अशक्य झालें. शेतें गहाण पडलीं आणि कर्जावर वसूल करण्यांत येणारें ३७½ टक्के व्याज भरण्याचें सामर्थ्य शेतकऱ्यांत उरलें नाहीं.

अंकित राष्ट्रांच्या अर्थव्यवस्थेचें दुसरें एक प्रमुख वैशिष्ट्य म्हणजे कच्च्या मालाची निर्यात आणि पक्का माल तयार करण्याच्या कारखान्यांचा संपूर्ण अभाव. ही परिस्थिति घानांतहि फार मोठ्या प्रमाणावर निर्माण झाली.

जगांतील कोकोच्या उत्पादनांतील ⅓ हिस्सा घानांत पिकतो. ब्रिटिश राज्यकर्ते तो सर्वच्या सर्व परदेशांत पाठवीत आणि त्याच्या बदल्यांत फारच कमी माल परदेशांतून घानांत येत असे. कारण पक्क्या मालाची किंमत कितीतरी पटीनें अधिक आणि सर्वांत मोठी गंमत म्हणजे कोको पिकविणाऱ्या ह्या देशाला चाकोलेट मात्र इंग्लंडहून आणावें लागत होतें – अर्थात घानाचे लोक त्याचा उपभोग घेण्यास असमर्थ होते, कारण तें फार महाग असल्यामुळें त्याची खरेदी करणें त्यांच्या आवाक्याच्या बाहेरचें होतें.

कोकोला ब्रिटिश लोक कौतुकानें "हिरवें सोनें" म्हणतात. हें हिरवें सोनें आणि शिवाय पिवळें सोनें, हिरे, मॅंगनीज व बॉक्सॉईट यांच्या खाणी घानांत आहेत. बॉक्सॉईटपासून ॲल्युमिनियन तयार करतात आणि अल्युमिनियमचा मुख्य उपयोग (युद्धोपयोगी) विमानें तयार करण्यासाठीं होतो. म्हणून हा प्रदेश ताब्यांत आल्यापासून ह्या सर्व दुर्मिळ व मौल्यवान पदार्थांची मनमुराद निर्यात ब्रिटिशांनीं आपल्या देशांत केली. आणि त्यांना अडविणारे कोण होतें? राज्य त्यांचें होतें, आणि म्हणून सर्व संपत्तीची मालकी त्यांच्याकडे होती.

घानाचे लोक मात्र अधिकाधिक दरिद्री व रोगग्रस्त बनत होते. १९५० सालीं एका "कोको गांवाची" पाहणी केली असतां ३५ टक्के लोकांना मलेरिया, ५२ टक्के लोकांना जंत, ७६ टक्क्यांना कृमि, ७५ टक्क्यांना नायटा असे रोग झाले असल्याचें आढळून आलें. अपुऱ्या अन्नपुरवठ्यामुळें बऱ्याच गुलाम देशांत होणारा रोग म्हणजे आंधळेपणा – घानाच्या एका विभागांत १ लक्ष लोकांपैकीं ७००० लोक अंध असल्याचें पाहणींत आढळून आलें.

घानाचें हें चित्र कोणत्याहि अंकित देशाच्या चौकटींत बसण्यासारखेंच आहे. पण त्यांतहि हळूंहळूं बदल होऊं लागला. कारण तेथील लोक जागे झाले.

## ३

१९४५ मध्यें दुसरें महायुद्ध संपलें आणि उभ्या आफ्रिका खंडांत जागृतीचें वारें वाहूं लागलें. राष्ट्रव्यापी राजकीय संघटना उभ्या राहिल्या

आणि स्वातंत्र्याची मागणी करूं लागल्या. चिमुकल्या घानानें त्यांत आघाडी मारली.

दुसऱ्या महायुद्धानें आफ्रिकेंतील लोकांना जगाच्या सान्निध्यांत आणलें; हुकूमशाहीविरोधी शक्ति, लोकशाही, व राष्ट्रीय-स्वातंत्र्य यांचा प्रत्यक्ष परिचय करून दिला. कारण आफ्रिकन शिपाई आफ्रिकेच्या व युरोपच्या रणांगणावर लढले आणि शिकले. सोविएत युनियननें फॅसिझमच्या पराभवासाठीं बजाविलेली कामगिरी त्यांनीं पाहिली आणि समाजवादाचा संदेश त्यांनीं ऐकला. आशिया खंडांतील भारत, चीन, ब्रह्मदेश, इंडोनेशिया इत्यादि राष्ट्रांचे स्वातंत्र्योत्सव त्यांनीं पाहिले आणि साम्राज्यवादापासून स्वतःला मुक्त करून घेण्याची त्यांना प्रेरणा मिळाली.

राष्ट्रीयत्वाची भावना घानामध्यें मात्र दुसऱ्या महायुद्धाच्याहि पूर्वीच निर्माण झाली होती, ही घानाची आणखी एक अपूर्वाई आहे. एकतर घानाची हवा ब्रिटिशांना मानवण्यासारखी नसल्यामुळें त्यांनीं तेथें वस्ती करून जमिनीवर ताबा मिळविला नव्हता. दुसरें म्हणजे कोकोची लागवड लहान लहान शेतांत करावी लागत असल्यामुळें मोठे मोठे मळे इंग्रजांच्या मालकीचे तयार झालेले नव्हते. त्यामुळें लहान लहान कोकोच्या शेतांचे मालक असलेले शेतकरी तेथें होते. आफ्रिकेच्या मानानें "श्रीमंत" असलेल्या ह्या मालक-शेतकऱ्यांपासून घानाचा मध्यम वर्ग व बुद्धिजीवी वर्ग तयार झाला. त्यांच्यांतील कांहीं परदेशांत जाऊन शिकून आले, वकील व व्यापारी बनले. ह्या लोकांनीं १९३० नंतरच्या काळांत राष्ट्रीय वर्तमानपत्रें काढलीं, स्वराज्याची भावना त्यांच्यांत रुजूं लागली. १९३७–३८ मध्यें ह्या मळे-मालकांनीं " कोको मार्केटिंग बोर्ड " ह्या ब्रिटिश भांडवलदारांच्या कंपनीविरुद्ध अधिक किमतीसाठीं लढा केला. मग त्या वेळच्या ब्रिटिश गव्हर्नरानें घानाला सुधारणेचा कायदा देऊं केला. कांहीं किरकोळ स्वरूपाचें प्रतिनिधित्व देऊं केलें. पण त्यामुळें घानाच्या उगवत्या देशभक्तांचें समाधान झालें नाहीं.

युद्धानंतरच्या काळांत ह्या स्वातंत्र्य-आंदोलनाला खूपच जोर चढला. १९४७ च्या ऑगस्टमध्यें " **युनायटेड गोल्ड कोस्ट कन्व्हेन्शन** " ही घानाची पहिली राष्ट्रव्यापी राजकीय संघटना स्थापन झाली. तिला

जनतेचा मोठ्या प्रमाणावर पाठिंबा मिळूं लागला. " लौकरांत लौकर स्वातंत्र्य मिळालें पाहिजे " ही घोषणा घेऊन ही संस्था संघटना करूं लागली.

घानाची राजधानी आक्रा. या ठिकाणीं २८ फेब्रुवारी १९४७ रोजीं माजी सैनिकांनीं निदर्शनें केलीं. " आमच्या गाऱ्हाणीं सांगण्यासाठीं गव्हर्नरांची मुलाखत पाहिजे " ही त्यांची घोषणा होती. पण हा निःशस्त्र जमाव राजवाड्यापासून ३०० यार्डांवर असतांनाच पोलिसांनीं गोळीबार केला. त्यांत आणि दुसऱ्या दिवशीं चाललेल्या निदर्शनांत मिळून २९ लोक ठार झाले आणि २३७ जखमी झाले. परिस्थिति गंभीर झाली. घानांतील ब्रिटिश-प्रणीत शांतता व सुव्यवस्था कोलमडून पडण्याचीं चिन्हें दिसूं लागलीं.

" गोल्ड कोस्ट कन्व्हेन्शन "नें गव्हर्नराच्या राजीनाम्याची व स्वराज्याची आणि राष्ट्रीय सरकारच्या स्थापनेची मागणी केली. त्याबरोबर कन्व्हेन्शनच्या सहा पुढाऱ्यांना अटक करण्यांत आली. घानाचे सध्यांचे अध्यक्ष **क्वामे नक्रुमा** हे कन्व्हेन्शनचे सरचिटणीस होते. अटक झालेल्यांत तेहि होते. पोलिसांनीं त्यांच्या घरावर छापा घातला असतां तेथें कम्युनिस्ट वाङ्मय मिळालें. ते कम्युनिस्ट असून परदेशी लोकांबरोबर संबंध ठेवून गोल्ड कोस्टमध्यें दंगेधोपे घडवून आणीत आहेत, असा सरकारनें त्यांच्यावर आरोप ठेवला आणि गव्हर्नराच्या आणीबाणीच्या परिस्थितींतील अधिकारांखालीं त्यांना २ महिने स्थानबद्ध केलें. पण पुढाऱ्यांच्या अटकेमुळें चळवळ अधिकच जोरानें वाढली. सबंध देशभर प्रक्षोभ निर्माण झाला. ह्या परिस्थितींत सरकारनें " वॅटसन कमिशन " नेमलें. त्यानें परिस्थितीची पाहणी करून सरकारला दोष दिला आणि आफ्रिकन लोकांना अधिक अधिकार देणाऱ्या घटनेची शिफारस केली. लोकांचा प्रक्षोभ शांत करण्यासाठीं, ह्या शिफारशींनुसार " घटना " तयार करण्यासाठीं ज्याचे सर्व सभासद आफ्रिकन आहेत अशा चौकशी मंडळाची " कॉसी कमिटीची " नेमणूक करण्यांत आली.

ब्रिटिश सरकारचा हा डाव तात्पुरता यशस्वी झाला. कन्व्हेन्शनच्या पुढाऱ्यांत मतभेद निर्माण झाले. डॉ. धनकाश यांच्या पुढाकाराखालील

मंडळी " घटनात्मक " मार्गाचा अवलंब करण्याचा आग्रह धरूं लागली. नक्रुमा यांनीं जनतेच्या तयारीचा अंदाज घेतला आणि खऱ्याखुऱ्या सवलती ताबडतोब मिळविण्याचें धोरण मांडलें. लौकरच मतभेद विकोपाला गेले आणि नक्रुमा यांनीं १९४९ मध्यें " **कन्व्हेन्शन पीपल्स पार्टी** " स्थापन केली. कॉसी कमिशनवर ह्या पक्षाला प्रतिनिधित्व देण्यांत आलें नाहीं. " ताबडतोब स्वराज्य " ही ह्या पक्षाची मुख्य घोषणा होती. राजकीय चळवळ व संघटना आणि आवश्यक होईल तेव्हां प्रत्यक्ष कृति यांच्या जोरावर स्वराज्य मिळविण्याचें ध्येय त्यानें जाहीर केलें. देशभर स्वराज्याचा मंत्र उच्चारला जाऊं लागला आणि हजारोंच्या सभा होऊं लागल्या.

कॉसी कमिटीचा निर्णय लौकर बाहेर येत नाहीं हें पाहून जनतेच्या आशा-आकांक्षा व्यक्त करणाऱ्या ह्या पक्षानें संप, बहिष्कार व असहकाराच्या चळवळीचा पुरस्कार करून सरकारी यंत्रणा बंद पाडण्याचा इरादा जाहीर केला. इतक्यांत कॉसी कमिटीनें नवीन घटना जाहीर केली. **परिषद जनता पक्षाने** तिचें वर्णन " सुधारलेली गुलामगिरी " असें केलें. नव्या घटनेंत गव्हर्नरला पसंत नसलेला कायदा रद्द करण्याचा त्याला अधिकार होता. परदेशचे व्यवहार, अर्थखातें, लष्कर व पोलिस यांवर ब्रिटिशांचाच अधिकार राहणार होता. त्यामुळें ह्या घटनेचा जनतेनें धिक्कार केला आणि प्रत्यक्ष कृतीचा कार्यक्रम चालू राहिला. " सार्वत्रिक संपाची " तयारी सुरू होतांच तो " बेकायदेशीर " असल्याचें जाहीर करण्यांत आलें. तरीसुद्धां संप प्रचंड प्रमाणावर यशस्वी झाला. खाणी, वाहतूक व लांकूड-धंद्यांत काम करणाऱ्या ३८ हजार कामगारांनीं त्यांत भाग घेतला. २ लक्ष कोको कामगारांनीं त्यांना पाठिंबा दिला. ३ लक्ष कोको-मळेवाल्यांनीं त्याला सहानुभूति दाखविली. सरकारनें नक्रुमा व इतर पुढाऱ्यांवर बेकायदेशीर संप संघटित केल्याबद्दल खटला भरला आणि दोन वर्षांची सजा ठोठावली. अशा रीतीनें १९४९ साल घानांत मावळलें !

अखेरीस कॉसी कमिटीनें जाहीर केलेल्या नवीन घटनेप्रमाणें १९५१ मध्यें निवडणुका झाल्या. जनता पक्षानें, " ताबडतोब स्वराज्य, " ह्या घोषणेवर निवडणुका लढविल्या आणि ३८ मतदारसंघांपैकीं ३५ मध्यें त्या

जिंकल्या. पुढाऱ्यांची मुक्तता निवडणुकांचे निकाल जाहीर झाल्यानंतर झाली आणि नक्रुमानें बहिष्कार टाकलेल्या घटनेनुसारहि ते घानाचे पंत-प्रधान झाले, इतका चळवळीचा जोर झंझावाती हातो.

६ वर्षेपर्यंत ही निम-वसाहती घटना राबविल्यानंतर ६ मार्च १९५७ रोजीं घानाला संपूर्ण स्वातंत्र्य दिल्याचें ब्रिटिश साम्राज्यवाद्यांनीं जाहीर केलें. १८४४ सालीं घानाच्या सरंजामदारी नायकांबरोबर करार करून ब्रिटिशांनीं त्यावर ताबा मिळविला होता. ११३ वर्षांनीं पुन्हा एकदां त्या प्रदेशावर स्वकीयांच्या राजवटीचा सूर्योदय झाला. घानाच्या आनंदी, हांसऱ्या, बोलक्या व उत्साही जनतेनें अभूतपूर्व हर्षानें हा दिवस साजरा केला.

## ४

स्वराज्याबरोबर नव्या समस्या निर्माण झाल्या. आफ्रिकेंतील बहुतेक सर्व राष्ट्रें ही साम्राज्यवाद्यांनीं आपापल्या सोईप्रमाणें वाटण्या करून एकत्र आणलेल्या प्रदेशांचे विभाग आहेत. घानामध्येंहि अनेक लहान मोठे जमातींचे नायक ( सरंजामदारी सरदार ) असून तेथें अनेक भाषा बोलल्या जातात. घानाच्या मध्यावरील प्रदेशाला अशान्ति म्हणतात. येथील सरदारांना वाटत होतें कीं ब्रिटिशांनंतर सत्ता आपल्या हातांत येईल. हा विभाग घानाचा अत्यंत संपन्न भाग आहे. अशान्तीच्या जोडीनें उत्तरेकडील सरदारांनींहि असहकाराची वृत्ति धारण करून घानांतून फुटून निघण्याची मागणी केली. परंतु साम्राज्यविरोधी व राष्ट्रीय ऐक्याच्या भावनेला जनतेनें जोरदार पाठिंबा दिला असल्यामुळें हा असंतोष आतां बऱ्याच प्रमाणावर शमला आहे.

घानाला संपूर्ण स्वातंत्र्य मिळण्यापूर्वी १९५५ मध्यें इंडोनेशियांतील बांडुग येथें झालेल्या आशिया–आफ्रिकेच्या परिषदेनें आफ्रिकेच्या स्वातंत्र्य-लढ्याला व स्वतंत्र जीवनला मोठा आत्मविश्वास व जोम प्राप्त करून दिला.

१९५७ मध्यें स्वतंत्र होतांच घानानें पुढाकार घेऊन १९५९ च्या जाने-वारींत आक्रा येथें आफ्रिकेंतील स्वतंत्र राष्ट्रांची परिषद घेतली. १९५९ मध्यें घाना, गिनी, लायबेरिया, ट्युनिशिया, मोरोक्को, लिबिया, इजिप्त, सुदान व इथिओपिया हीं ९ राष्ट्रें स्वतंत्र झालीं होतीं. म्हणजे आफ्रिकेचा $\frac{1}{3}$ भाग

स्वतंत्र झाला होता; त्यांतील लोकसंख्या ९ कोटी म्हणजे आफ्रिकेच्या लोकसंख्येच्या निम्मी होती. स्वातंत्र्याच्या लढ्यांना व तें सामर्थ्यशाली बनविण्याला ह्या परिषदेनें मोठी स्फूर्ति दिली. ह्या राष्ट्रांबरोबरच घानाची राष्ट्रीय विकासाच्या मार्गानें वाटचाल निश्चितपणें चालू झाली.

आफ्रिकेंतील इतर देशांच्या मानानें घानाचा विकास थोडा बरा आहे, कारण कोकोच्या शेतांची मालकी त्यांच्याकडे आहे. अर्थात् त्यांतील अगदीं लहान जमिनींचे मालक कर्जबाजारी गरीब शेतकरी असले तरी त्यांच्यांतील कांहीं श्रीमंत शेतकरीहि बनले आहेत. पण त्यांनाहि आपला कोको परदेशांत पाठविण्यासाठीं दलालांच्या मार्फत कोको मार्केटिंग बोर्डाला विकावा लागतो आणि त्या कंपनीनें ठरविलेल्या अनिश्चित किंमतीप्रमाणें भाव घ्यावा लागतो; म्हणजे त्यांना दलाली व साम्राज्यवादी अशा दोन्ही प्रकारच्या शोषणाखालीं दबावें लागतें.

दुसरें मोठें शोषण होतें वाहतुकीच्या धंद्यांतून. कोकोच्या शेतांतून फक्त किनाऱ्यापर्यंतची वाहतूक घानाच्या व्यापाऱ्यांच्या हातांत आहे. बाकी सर्व परदेशी कंपन्यांच्या घानाच्या आयात व्यापाराचीहि गत अशीच आहे. ८५ टक्के आयात व्यापार ब्रिटिशांच्या ताब्यांत आहे. १० टक्के आशियाई कंपन्यांच्या ताब्यांत आणि फक्त ५ टक्के घानाच्या रहिवाशांच्या हातांत आहे.

वासाहतिक मागासलेपणाचें वरदान घानालाहि मिळालेंच आहे. उद्योगधंदे जवळजवळ नाहींतच. नव्या सरकारनें हातांत घेतलेल्या, "व्होल्टा रिव्हर प्रॉजेक्ट" व्होल्टा नदी योजनेमुळें विजेचा पुरवठा होणार व अल्युमिनियमचा कारखाना सुरू होणार आहे. पण त्यांतहि अमेरिकन-ब्रिटिश भांडवलाचें व नियंत्रणाचें वर्चस्व राहणारच आहे.

घानाच्या आर्थिक जीवनाच्या नाड्या पूर्वापार ताबा मिळवून बसलेल्या, युनायटेड आफ्रिका कंपनी, ॲसोसिएशन ऑफ वेस्ट आफ्रिकन मर्चंट्स, अशान्ति गोल्ड फील्ड कॉर्पोरेशन ह्या परदेशी कंपन्यांच्या मुठींत आहेत. आज घानांतील राष्ट्रीय वृत्तीचा भांडवलदार स्वतंत्र अर्थ-व्यवस्थेचा विकास करण्याचीं स्वप्नें पाहात आहे. सध्यांच्या राज्यकर्त्यांचा मार्गहि भांडवलदारी विकासाचा आहे. घानांत कामगार वर्ग संघित असून स्वातंत्र्यलढ्याच्या काळापासून ट्रेड युनियन लढे लढवून तयार झालेला आहे. जनता पक्षाच्या,

" राष्ट्रीय स्वातंत्र्य ताबडतोब, " ह्या घोषणेला त्यानें फार जोराचा पाठिंबा दिला होता. एकूण सर्व जनतेंत उत्साह व एक प्रकारची विकासासाठीं अधीरता आहे. ह्या सर्व परिस्थितींतून तेथें राष्ट्रीय जीवनाची उभारणी व विकास होणार आहे. घाना-गिनी यांचा " युनियन " झाल्यापासून " बिगर भांडवलदारी आर्थिक विकासाचा मार्ग " कसा असूं शकतो, याबद्दलची चर्चाहि फार मोठ्या प्रमाणावर सुरू झाली आहे. पश्चिम आफ्रिका किनाऱ्यावरील सर्व राष्ट्रांच्या फेडरेशनच्या योजनाहि क्षितिजावर आहेत. ह्या सर्व नव्या घटनांचा घानावर काय परिणाम होतो आणि तेथील लोकशाहीचा, स्वातंत्र्याचा व समाजजीवनाचा विकास कसा होतो ह्यांकडे आतां सर्वांचें लक्ष लागून राहणें स्वाभाविकच आहे.

• • •

# ३७. नायगेरिया

**लोकसंख्या** – ३ कोटी २० लक्ष.

**राजधानी** – लागोस.

**राज्य** – स्वतंत्र प्रजासत्ताक.

**मुख्य धंदे** – कथिलाच्या खाणी.

१

आफ्रिकेच्या पश्चिम किनाऱ्यावरील सर्व वसाहतींत नायगेरिया सर्वांत मोठें आहे. नायगेरियाचें क्षेत्रफळ फ्रान्स व इटली ह्या दोन देशांच्या इतकें किंवा ग्रेट ब्रिटनच्या तिप्पट आहे. नायगेरियाची लोकसंख्या ३ कोटी २० लक्ष आहे.

किनाऱ्यावरच्या प्रदेशांत हवा उष्ण व दमट आहे. ताड, रबर, महागनी इत्यादि वृक्षांचें दाट जंगल आहे. उत्तरेकडे पावसाचें प्रमाण कमी कमी होत गेलें आहे. दाट जंगलाच्या प्रदेशाला लागून गवताचा प्रदेश आहे. येथें मका, गिनिया धान्य, भुईमूग, कापूस व ऊंस हीं पिकें होतात. उत्तर नायगेरियांत कथिलाच्या खाणी आहेत. किनाऱ्यावरील **लागोस** हें मुख्य बंदर नायगेरियाची राजधानी आहे.

कथिलाप्रमाणेंच कच्चें लोखंड, लिग्नाईट, कोळसा, सोनें इत्यादींचा नायगेरियांत सांठा असून इतर वसाहतींप्रमाणेंच ब्रिटिशांनीं हे खनिज पदार्थ जास्तींत जास्त प्रमाणावर आपल्या देशांत नेण्याचा सपाटा चालविला. वर उल्लेख केलेल्या युनायटेड आफ्रिकन कंपनीतर्फे नायगेरियाचा सर्व व्यापार चालतो.

घानापेक्षां नायगेरियाची लोकसंख्या बरीच मोठी असूनहि लोकांची परिस्थिति मात्र अधिकच खालावलेली आहे.

ब्रिटिश कारकीर्दीचा इतिहास हा ब्रिटिश भांडवलदारांच्या भाग्याचा व नायगेरियाच्या दरिद्रीकरणाचा इतिहास आहे.

घानाची शेती-व्यवस्था बदलून ब्रिटिशांनीं ज्याप्रमाणें कोकोचे मळे हे तेथील एकमेव उत्पादन बनविलें त्याप्रमाणें ताड-तेल व भुईमूग ह्या व्यापारी उत्पादनासाठीं त्यांनीं नायगेरियाची सर्व जमीन कामाला लावली. त्यामुळें जविनास आवश्यक असलेल्या धान्याचें उत्पादन कमी होऊन नायगेरियन लोकांची उपासमार होऊं लागली. म्हणूनच तयार मालाच्या जोडीला नायगेरियाला सर्व तऱ्हेचे खाद्यपदार्थ, विशेषतः गव्हाचें पीठ, तांदूळ व मासे बाहेरून आणावे लागतात आणि ते घेऊन खाणें बहुसंख्य स्थानिक लोकांना परवडत नाहीं. उपासमारीमुळें रोगराईचें प्रमाण भलतेंच वाढलें. आयुष्यांतील निम्मे दिवस प्रत्येक जण मलेरियानें आजारी असतो असें एका अहवालांत नमूद झालें आहे. नायगेरियाच्या कांहीं भागांत महारोगाचें प्रमाण ५० ते ६० टक्के असल्याचें आढळून आलें आहे. व्यापारी पिकांसाठीं उत्तर व पूर्व भागांतील हजारों मैल अरण्यें तोडून काढण्यांत आलीं. ह्यामुळें त्या देशाचें अतोनात नुकसान झालें.

१९१४ पासून १९३९ पर्यंतच्या २५ वर्षांत नायगेरियाच्या कथलाच्या खाणींवर ब्रिटिश कंपनीनें ३ कोटी ७० लक्ष पौंड नफा मिळविला आणि तो सर्व आपल्या देशांत नेला. दरवर्षीं नायगेरियांतून साम्राज्यवाद्यांनीं किती फायदा मिळविला याचें चित्र स्पष्ट करण्यासाठीं १९३७ सालचें उदाहरण घेऊं या. यावर्षीं १२ लक्ष ४९ हजार पौंड खाणींतून नफा मिळाला. ३००० गोऱ्या नोकरांना कंपनीनें १७ लक्ष रुपये पगार दिला. १९०० सालच्या करारानुसार युनायटेड आफ्रिका कंपनीला सरकारनें १ लक्ष पौंड दिले. अशा रीतीनें प्राप्तीचा मोठा वांटा ब्रिटिशांच्या हातांत गेल्यानंतर खाणींत काम करणाऱ्या मजुरांना काय मिळालें ? तेथें काम करणाऱ्या ३६ हजार आफ्रिकन लोकांना वर्षाला ९ पौं. २ शि. मजुरी मिळाली ! यामुळें नायगेरियांतील सर्वसामान्य जनता अत्यंत गरीब होत गेली. शिक्षणाची सोय अगदींच कमी. माध्यमिक शाळेंत जाणाऱ्यांची संख्या १ टक्क्यापेक्षां कमी. तेव्हां उच्च शिक्षणासंबंधीं बोलायलाच नको. उद्योगधंदे जवळजवळ नाहींतच. सिगारेट कंपन्या व लांकूड कापण्याच्या गिरण्या हे सर्वांत मोठे उद्योग-

धंदे; नाहीं म्हणायला एक कापड गिरणी आहे. कांहीं ब्रिटिश लेखक नायगेरियांत असलेल्या दोन सिमेंट कारखान्यांचा व कोळशाच्या खाणींचा समावेश मूलभूत उद्योगधंद्यांत करतात पण नायगेरियांत मूलभूत उद्योगधंदे बिल्कूल नाहींत हें त्यांना चांगलें माहीत आहे.

घानाप्रमाणेंच नायगेरियांतहि लहान लहान मालक व छोटे भांडवलदार निर्माण झाले आहेत, पण त्यांच्या वाढीला ब्रिटिश सत्ताधाऱ्यांचा नेहमींच विरोध होतो. त्याचें पुढें दिलेलें एक अगदीं ताजें उदाहरण १९५९ सालीं म्हणजे नायगेरिया स्वातंत्र्याच्या उंबरठ्यावर असतांना घडलेलें आहे.

इतर सर्व वसाहतींप्रमाणेंच नायगेरियांतहि परदेशांशीं होणाऱ्या जल-वाहतूक-व्यापार संपूर्णपणें ब्रिटिशांच्या ताब्यांत आहे. ब्रिटिश मालकीच्या वेस्ट आफ्रिका कॉन्फरन्स लाईन्सप्रमाणें आफ्रिकेच्या भांडवलदारांनीं स्वतःची नायगेरियन नॅशनल शिपिंग लाईन स्थापन केली होती पण थोड्याच काळांत ती कॉन्फरन्स लाईनमध्यें विलीन करून टाकली.

ह्या घटनेनें नायगेरियांत मोठी खळबळ उडाली. वेस्ट आफ्रिकन पायलट, डेली सर्व्हिस वैगरे वर्तमानपत्रांनीं ह्या प्रकरणावर कडक टीका केली आणि ब्रिटिश भांडवल मक्तेदारी स्थापन करण्याचा आणि आम्हाला कायमचे बाहेर टेवण्याचा डाव खेळत आहे, असा आरोप केला. दोन्ही कंपन्यांचा हा करार नायगेरियाच्या हिताच्या विरुद्ध आहे. कारण नव्या कंपनींत नायगेरियन कंपनीचा नफ्याचा हिस्सा फक्त २ टक्के राहणार आहे. म्हणूनच नायगेरियाचे लोक त्याला-" सिंह व कोंकरू न्यायाचा करार "—म्हणतात.

## २

ब्रिटिशांनीं नायगेरिया ताब्यांत घेतला त्या वेळीं तेथें जवळजवळ हजार सरंजामदारी सरदार किंवा जहागिरदार होते आणि त्यांना अमीर, ओबा, ओनी अशा पदव्या होत्या. ह्या प्रत्येक सरदाराची " प्रजा " निराळी, त्यांची भाषा निराळी, रीतिरिवाज निराळे. पण ब्रिटिश अमदानींत अनेक वर्षें हालअपेष्टा भोगल्यानंतर त्यांच्यांत साम्राज्यविरोधी भावना निर्माण होऊन ऐक्य निर्माण झालें.

खुद्द आफ्रिका खंडांतील आणि त्यांच्या अगदीं नजिक असलेलें घानाचें राष्ट्र स्वातंत्र्याकडे वाटचाल करीत असलेलें त्यांनीं पाहिलें. घानामध्यें १९५१ सालीं पहिला आफ्रिकन पंतप्रधान उदयास आल्यानें नायगेरियाच्या लोकांत फार मोठी उत्सुकता वाढली. १९५९ सालीं आक्रा येथें भरलेल्या आफ्रिकेंतील स्वतंत्र राष्ट्रांच्या परिषदेनें त्यांना भारून टाकलें. एका पाठोपाठ एक घडत गेलेल्या ह्या घटनेनें नायगेरियांतील निरनिराळ्या प्रादेशिक विभागांना एकत्र आणलें.

नायगेरियाचे तीन स्वाभाविक विभाग पडतात; पूर्व, पश्चिम व उत्तर. उत्तरेकडील विभागांत बहुसंख्येनें मुसलमान लोक असून त्यांची संस्कृति बरीचशी अरब राष्ट्रांसारखी आहे. हा विभाग सामाजिकदृष्ट्या सर्वांत अधिक मागासलेला, आर्थिकदृष्ट्या अविकसित व अमिरांच्या वर्चस्वाखालीं असलेला असा आहे. लोक निग्रो वंशांतील हुसा टोळींतील आहेत. नायगेरियाचा हा सर्वांत मोठा भाग असून निम्मी लोकसंख्या ह्या भागांत राहते. त्यांच्यांतील फुलानी टोळीच्या लोकांचा भरणा अमीर-उमरावांच्या घराण्यांत अधिक आहे. आपल्या राजवटीचा आधारस्तंभ म्हणून यांचा ब्रिटिशांनीं सर्वांत अधिक उपयोग करून घेतला.

पश्चिम विभागांत यारुबा लोकांची वस्ती असून ते विभागांतील लोकसंख्येच्या $\frac{2}{3}$ इतके म्हणजे जवळजवळ ३० लक्ष आहेत. १६ व्या शतकापर्यंत पश्चिम आफ्रिकेवर राज्यसत्ता गाजविणाऱ्या यारुबा साम्राज्याचा त्यांना अद्यापहि मोठा अभिमान वाटतो.

पूर्व विभागांत आयबो लोकांची वस्ती आहे. हे लोक अत्यंत उत्साही व पुढारलेले आहेत. राष्ट्रीय वृत्तीच्या वर्तमानपत्रांचें प्रमाण ह्याच भागांत सर्वांत अधिक आहे.

नायगेरियांतील ह्या निरनिराळ्या राष्ट्रगटांना व राष्ट्रीय जमातींना " स्वातंत्र्य " देऊन त्यांच्याकडून राज्यकारभार चालविण्याचें तंत्र नायगेरियाचा " शिल्पकार " म्हणून गाजलेला पहिला गव्हर्नर जनरल कॅप्टन लुगार्ड यानें अनेक वर्षें वापरलें. अर्थात् प्रत्येक स्वतंत्र जहागिरदाराला ब्रिटिश " सल्लागार " दिलेला असे आणि तो सर्व महत्त्वाचीं कामें पार

पार्डीत असे. व्यापाराचें संपूर्ण नियंत्रण व ब्रिटिश कंपन्यांचें संरक्षण हें त्याचें खास काम असें.

हळूंहळूं स्वातंत्र्याच्या व लोकशाहीच्या कल्पना ह्या अमीर-उमरावांच्या ब्रिटिश वसाहतींतहि जन्माला आल्या आणि नगरपालिका, लोकल बोर्ड वगैरे स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका होऊं लागल्या.

थोड्याच वर्षांत गव्हर्नर जनरलचा एकतंत्री कारभार बदलून निवडलेल्या प्रतिनिधींना हक्क देण्याची वेळ जवळ आलेली दिसूं लागली. तेव्हां १९४७ मध्यें, पूर्व, पश्चिम व उत्तर असे राजकीय शासकीय-विभाग करून प्रत्येक भागाला स्वतंत्र पार्लमेंट व मंत्रिमंडळ देण्यांत आलें. ह्या फेडरेशनची राजधानी लाओस येथें ठेवण्यांत आली.

अर्थात् ह्या काळांत ह्या विभागांतून राजकीय संस्था-संघटनांचाहि जन्म झाला.

पश्चिम विभागांत "**ॲक्शन ग्रुप**" ह्या राजकीय संघटनेच्या हातांत सत्ता आली. ही संस्था फेडरेशनच्या स्वरूपाचे संबंधच फक्त नायगेरियांत असावेत आणि जहागिरदारी प्रथा चालूं राहावी ह्या मताचा पुरस्कार पहिल्यापासून करीत होती. तिला ब्रिटिश राज्यकर्त्यांची प्रथमपासूनच आर्थिक व इतर मदत मिळत असे. परराष्ट्रीय संबंध पश्चिमात्य राष्ट्रांबरोबरच असावेत असेंहि तिचें मत होतें. तिच्यांत व्यापारी जमातींचें वर्चस्व होतें.

उत्तरेकडील उमरावांच्या वर्चस्वाखालील विभागांत सत्ता "**नॉर्दर्न पीपल्स कॉंग्रेस**" ह्या संस्थेच्या हातांत आहे. त्यांनीं प्रथमपासूनच सरंजामदारी टिकून राहावी आणि ब्रिटिश सत्ता कायम राहावी म्हणून आग्रह धरला होता. परराष्ट्रीय धोरण "तटस्थतेचें" असावें असें म्हणणारा गटहि आतां ह्या संस्थेंत निर्माण झाला आहे, पण त्याबद्दल अद्यापहि त्यांच्यांत मतभेद आहेत.

पूर्वेकडील विभागांत "**नॅशनल कौन्सिल ऑफ नायगेरिया ॲंड कॅमेरून**" ह्या पक्षाला जनतेचा प्रचंड पाठिंबा आहे. नायगेरियाच्या राष्ट्रीय एकात्मतेचा आग्रह आणि सुसंगत तटस्थतेचें परराष्ट्रीय धोरण हा तिचा कार्यक्रम आहे. सर्व राजकीय पक्षांत हा पक्ष पुढारलेला आहे.

१९५३ मध्यें ब्रिटिश राजकर्त्यांनीं लंडन येथें घटना-परिषद बोलाविली असतां वरील पक्षांनीं आपापल्या धोरणांचा पुरस्कार केला आणि नायगेरियाचें स्वराज्य एकीच्या पायावर स्थापन होण्याऐवजीं परस्परांतील दुराव्यामुळें दुफळीचीं व चढाओढीचीं बीजें घेऊनच निर्माण होणार असा सूर प्रमुख प्रतिनिधींच्या भाषणांत आढळून आला. पण हळूंहळूं हीहि परिस्थिति बदलली.

१९५८ सालीं लंडन येथें भरलेल्या दुसऱ्या घटना परिषदेच्या वेळीं ब्रिटिश साम्राज्यवाद्यांना निराळाच रंग दिसला. राष्ट्रीय ऐक्यावर जोर, मध्यवर्ति संघराज्याची स्थापना आणि त्वरित स्वराज्य ह्या मागण्या कमी-अधिक प्रामुख्यानें तीनहि विभागांच्या राजकीय पक्षांनीं मांडल्या आणि त्यांनीं स्वातंत्र्याची तारीख निश्चित करण्यासाठीं ब्रिटिश सरकारवर दडपण आणलें.

१९५९ च्या डिसेंबरमध्यें संघराज्याच्या सार्वत्रिक निवडणुका झाल्या. ह्या निवडणुकांत "पीपल्स कॉंग्रेस पार्टी"ला १४२ जागा मिळाल्या; "नॅशनल कौन्सिल ऑफ नायगेरिया अँड कॅमेरून"ला ९५ जागा मिळाल्या आणि ब्रिटिश साम्राज्यवाद्यांचा उघड पाठिंबा असलेल्या पश्चिम विभागाच्या "ॲक्शन ग्रुप"ला ७३ जागा मिळाल्या.

घटनेप्रमाणें ५० टक्के प्रतिनिधित्व असल्याशिवाय सरकार स्थापन होऊं शकत नाहीं, ही परिस्थिति पाहून पीपल्स कॉंग्रेसनें नॅशनल कौन्सिलबरोबर संयुक्त सरकार स्थापन करण्याची तयारी दाखविली. त्यामुळें नॉर्नर्द पीपल्स कॉंग्रेसचे पुढारी नमन्दी अझिकिरे (अध्यक्ष) व **अलाहाजी अबुबकर ताकावा बालेवा** (मुख्य मंत्री) यांच्या नेतृत्वाखालीं पीपल्स कॉंग्रेसचे १० मंत्री व नॅशनल कौन्सिलचे ७ मंत्री असे १७ जणांचें मंत्रिमंडळ स्थापन झालें.

१ ऑक्टोबर १९६० रोजीं नायगेरियाला स्वातंत्र्य मिळाल्याचें जाहीर करण्यांत आलें.

१९६२ सालीं सहा वर्षांची आर्थिक विकासाची योजना आंखून नायगेरियानें पुढचें पाऊल टाकलें. परंतु ब्रिटिशांची आर्थिक-राजकीय पकड कायम होती. ब्रिटिशांचे लष्करी तळ नायगेरियाच्या भूमीवर होते. या

पार्डीत असे. व्यापाराचें संपूर्ण नियंत्रण व ब्रिटिश कंपन्यांचें संरक्षण हें त्याचें खास काम असें.

हळूंहळूं स्वातंत्र्याच्या व लोकशाहीच्या कल्पना ह्या अमीर-उमरावांच्या ब्रिटिश वसाहतींतहि जन्माला आल्या आणि नगरपालिका, लोकल बोर्ड वगैरे स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका होऊं लागल्या.

थोड्याच वर्षांत गव्हर्नर जनरलचा एकतंत्री कारभार बदलून निवडलेल्या प्रतिनिधींना हक्क देण्याची वेळ जवळ आलेली दिसूं लागली. तेव्हां १९४७ मध्यें, पूर्व, पश्चिम व उत्तर असे राजकीय शासकीय-विभाग करून प्रत्येक भागाला स्वतंत्र पार्लमेंट व मंत्रिमंडळ देण्यांत आलें. ह्या फेडरेशनची राजधानी लाओस येथें ठेवण्यांत आली.

अर्थात् ह्या काळांत ह्या विभागांतून राजकीय संस्था-संघटनांचाहि जन्म झाला.

पश्चिम विभागांत "**ॲक्शन ग्रुप**" ह्या राजकीय संघटनेच्या हातांत सत्ता आली. ही संस्था फेडरेशनच्या स्वरूपाचे संबंधच फक्त नायगेरियांत असावेत आणि जहागिरदारी प्रथा चालूं राहावी ह्या मताचा पुरस्कार पहिल्या-पासून करीत होती. तिला ब्रिटिश राज्यकर्त्यांची प्रथमपासूनच आर्थिक व इतर मदत मिळत असे. परराष्ट्रीय संबंध पश्चिमात्य राष्ट्रांबरोबरच असावेत असेंहि तिचें मत होतें. तिच्यांत व्यापारी जमातींचें वर्चस्व होतें.

उत्तरेकडील उमरावांच्या वर्चस्वाखालील विभागांत सत्ता "**नॉर्दर्न पीपल्स कॉंग्रेस**" ह्या संस्थेच्या हातांत आहे. त्यांनीं प्रथमपासूनच सरंजाम-दारी टिकून राहावी आणि ब्रिटिश सत्ता कायम राहावी म्हणून आग्रह धरला होता. परराष्ट्रीय धोरण "तटस्थतेचें" असावें असें म्हणणारा गटहि आतां ह्या संस्थेंत निर्माण झाला आहे, पण त्याबद्दल अद्यापहि त्यांच्यांत मतभेद आहेत.

पूर्वेकडील विभागांत "**नॅशनल कौन्सिल ऑफ नायगेरिया ॲंड कॅमेरून**" ह्या पक्षाला जनतेचा प्रचंड पाठिंबा आहे. नायगेरियाच्या राष्ट्रीय एकात्मतेचा आग्रह आणि सुसंगत तटस्थतेचें परराष्ट्रीय धोरण हा तिचा कार्यक्रम आहे. सर्व राजकीय पक्षांत हा पक्ष पुढारलेला आहे.

१९५३ मध्यें ब्रिटिश राजकर्त्यांनीं लंडन येथें घटना-परिषद बोलाविली असतां वरील पक्षांनीं आपापल्या धोरणांचा पुरस्कार केला आणि नायगेरियाचें स्वराज्य एकीच्या पायावर स्थापन होण्याऐवजीं परस्परांतील दुराव्यामुळें दुफळीचीं व चढाओढीचीं बीजें घेऊनच निर्माण होणार असा सूर प्रमुख प्रतिनिधींच्या भाषणांत आढळून आला. पण हळूंहळूं हीहि परिस्थिति बदलली.

१९५८ सालीं लंडन येथें भरलेल्या दुसऱ्या घटना परिषदेच्या वेळीं ब्रिटिश साम्राज्यवाद्यांना निराळाच रंग दिसला. राष्ट्रीय ऐक्यावर जोर, मध्यवर्ति संघराज्याची स्थापना आणि त्वरित स्वराज्य ह्या मागण्या कमी-अधिक प्रामुख्यानें तीनहि विभागांच्या राजकीय पक्षांनीं मांडल्या आणि त्यांनीं स्वातंत्र्याची तारीख निश्चित करण्यासाठीं ब्रिटिश सरकारवर दडपण आणलें.

१९५९ च्या डिसेंबरमध्यें संघराज्याच्या सार्वत्रिक निवडणुका झाल्या. ह्या निवडणुकांत "पीपल्स काँग्रेस पार्टी"ला १४२ जागा मिळाल्या; "नॅशनल कौन्सिल ऑफ नायगेरिया अँड कॅमेरून"ला ९५ जागा मिळाल्या आणि ब्रिटिश साम्राज्यवाद्यांचा उघड पाठिंबा असलेल्या पश्चिम विभागाच्या "अॅक्शन ग्रुप"ला ७३ जागा मिळाल्या.

घटनेप्रमाणें ५० टक्के प्रतिनिधित्व असल्याशिवाय सरकार स्थापन होऊं शकत नाहीं, ही परिस्थिति पाहून पीपल्स काँग्रेसनें नॅशनल कौन्सिलबरोबर संयुक्त सरकार स्थापन करण्याची तयारी दाखविली. त्यामुळें नॉर्नर्द पीपल्स काँग्रेसचे पुढारी नमन्दी अझिकिरे (अध्यक्ष) व **अलाहाजी अबुबकर ताकावा बालेवा** (मुख्य मंत्री) यांच्या नेतृत्वाखालीं पीपल्स काँग्रेसचे १० मंत्री व नॅशनल कौन्सिलचे ७ मंत्री असे १७ जणांचें मंत्रिमंडळ स्थापन झालें.

१ ऑक्टोबर १९६० रोजीं नायगेरियाला स्वातंत्र्य मिळाल्याचें जाहीर करण्यांत आलें.

१९६२ सालीं सहा वर्षांची आर्थिक विकासाची योजना आंखून नायगेरियानें पुढचें पाऊल टाकलें. परंतु ब्रिटिशांची आर्थिक-राजकीय पकड कायम होती. ब्रिटिशांचे लष्करी तळ नायगेरियाच्या भूमीवर होते. या

सर्वांना जनतेनें विरोध केल्यामुळें सरकारनें १९६३ सालीं लष्करी सह-कार्यांचा करार रद्द केला आणि ब्रिटनची राणी राष्ट्राची प्रमुख राहील हें घटनेंतील कलम रद्द केलें.

अमेरिकन, प. जर्मन व जपान यांच्या मक्तेदार भांडवलदारांनीं नायगेरियांत खासगीरीत्या भांडवल गुंतविण्याचे प्रयत्न जोरानें चालविले आहेत. त्याचबरोबर सत्ताधारी पक्षांतील कांहीं व्यक्ति **बिगर भांडवलदारी मार्गानें** अर्थविकास करावा असें मत मांडीत आहेत. सोविएत युनियन व इतर समाजवादी देशांबरोबरचें सहकार्य वाढत असून, अधिक चांगल्या जीवनमानासाठीं जनतेचें संघटनहि वाढत आहे. ह्या शक्तींच्या संघर्षांतून सरकार कसा मार्ग काढणार यावरच नायगेरियाचा पुढील स्वतंत्र अर्थ-विकास अवलंबून आहे. देशाचा स्वतंत्र व भक्कम पायावर अर्थविकास झाला पाहिजे ह्या प्रश्नावर सर्वांचें संपूर्ण मतैक्य आहे.

• • •

# ३८. सोमालियालँड

**लोकसंख्या** – १९ लक्ष ५० हजार.

**राजधानी** – मोगादिहा.

**राज्य** – स्वतंत्र प्रजासत्ताक.

**मुख्य धंदे** – अविकासित.

१

केनियाला लागून पूर्व बाजूला, आफ्रिकेचें " शिंग " या नांवानें ओळखल्या जाणाऱ्या प्रदेशापर्यंत, सोमालिया प्रजासत्ताकाची चिंचोळी पट्टी आहे. " शिंगा "च्या वरच्या अंगाची पट्टीसुद्धां प्रजासत्ताकाचाच भाग आहे. **मोगादिशू** बंदर ही राजधानी आहे.

सोमालिया प्रजासत्ताकाचा जन्म १९६० मध्यें झाला. पूर्वीचें ब्रिटिश सोमालिलँड ( संरक्षित प्रदेश ) व इटालीची वसाहत सोमालिया यांचें एकीकरण होऊन हें प्रजासत्ताक उदयास आल्यामुळें सोमाली लोकांचें अनेक वर्षांचें स्वप्न साकार झालें आहे. अद्यापहि शेजारच्या इथिओपियांत ४ लक्ष, केनियाच्या पूर्वेकडच्या प्रदेशांत ७० हजार व फ्रेंच सोमालिलँडमध्यें ७० हजार सोमाली लोक राहतात. साम्राज्यवाद्यांनीं सोमाली लोकांना निरनिराळ्या राज्यांत विभागल्यामुळें त्यांच्या एकीचा प्रश्न आजहि बराच बिकट होऊन बसला आहे. सध्यांच्या सोमालिया प्रजासत्ताकांत ब्रिटिश अमलाखालील **६ लक्ष ५० हजार** व इटालियन अमलाखालील **१३ लक्ष** सोमाली पुन्हा एकत्र आले आहेत.

हा प्रदेश म्हणजे मोठें गवताळ पठार आहे; मधून मधून कांटेरी झुडपें उगवलेलीं दृष्टीस पडतात. बराचसा भाग वाळवंटाचा आहे. वेबी शेबेली व जुबा नदीच्या खोऱ्यांत अकासिआ, पाम, केळीं व ऊंस यांचे

मळे आहेत. नद्यांच्या खोऱ्यांत जिराफ, सिंह, वाघ, हरणें इत्यादि प्राणी कळप करून हिंडत असतात.

हें ' शिंग ' पूर्वी ' सुगंधी ' देश म्हणून ओळखलें जात असे; कारण ह्या प्रदेशांत ऊद, धूप वगैरेंसारखे सुगंधी चीक येणारीं झाडें आहेत. हें चीक मिळविण्यासाठीं इजिप्त, ग्रीक वगैरे देशांचे व्यापारी येथें प्राचीन काळापासून येत होते.

बहुतेक सोमाली लोक मेंढपाळ आहेत. उंट, शेळया, बकरें, गाई हीं त्यांची संपत्ति. दूध-दुभतें, मांस व कातड्यांचे पोशाख ह्या सर्व दृष्टीनें तीं त्यांच्या उपयोगी पडतात. शिवाय अफाट व निर्जल प्रदेशांत हिंडायला उंटासारखें दुसरें साधन नाहीं.

हिंदी महासागरांत प्रवेश मिळविण्याच्या दृष्टीनें मोक्याच्या असलेल्या ह्या तांबड्या समुद्रावरील प्रदेशांत १९ व्या शतकांत ब्रिटिश, इटालियन व फ्रेंच साम्राज्यवादी घुसले आणि त्यांनीं जमलें तसे तुकडे घशांत घातले. सर्वांत मोठा भाग इटालियन लोकांना व सर्वांत छोटा फ्रेंचांना मिळाला.

१९४१ मध्यें दुसऱ्या महायुद्धाच्या काळांत, ब्रिटिश फौजांनीं इटालीच्या ताब्यांतील सोमाली प्रदेश व्यापला होता. युद्धानंतर अमेरिका, ब्रिटन, फ्रान्स व सोविएत युनियन यांचें कमिशन इटलीच्या वसाहतींचा विचार करण्यासाठीं नेमण्यांत आलें. इटालियन सोमाली लँडला ताबडतोब स्वातंत्र्य द्यावें, असें मत रशियाच्या प्रतिनिधीनें मांडलें; पण इतर साम्राज्यवादी राष्ट्रांनीं त्याला विरोध केला. १९४९ मध्यें यूनोंत ठराव करून त्यांनीं तो प्रदेश विश्वस्त प्रदेश म्हणून इटालीच्या ताब्यांत दिला.

ह्या दहा वर्षांच्या काळांत इटालियन मक्तेदारांनीं आपलें आसन सोमालींत पुन्हा स्थिर केलें. नद्यांच्या खोऱ्यांत ४८ हजार हेक्टर सुपीक जमिनींत त्यांनीं केळ्यांचे मळे लावले आणि तितकीच जमीन इटालियन कंपन्यांनीं उंसाच्या लागवडीसाठीं ताब्यांत घेतली.

हा प्रदेश स्वातंत्र्याच्या उंबरठ्यावर असतांना राज्यकर्त्यांनीं ३०० कंपन्यांना सवलती दिल्या. इतकेंच नव्हे तर अमेरिकन मक्तेदारांबरोबर भागीदारी करण्याची इटालियन भांडवलदारांना संधि दिली. परिणामीं २००० अमेरिकन कंपन्यांना देशाच्या उद्योगधंद्यांत शिरकाव मिळाला. अमेरिके-

बरोबर " संयुक्त संरक्षण कायद्या "च्या नांवानें केलेल्या करारामुळें देशावर अमेरिकन लष्करी गोटांत जाण्याची आपत्ति ओढवण्याचाहि धोका ह्या ' विश्वस्त सरकार'नें निर्माण करून ठेवला.

ह्या सर्व परिस्थितीमुळें त्रस्त झालेली जनता स्वातंत्र्याचा संग्राम निकरानें करूं लागली. फॅसिस्टविरोधी युद्धाच्या काळांत स्थापन झालेल्या **सोमाली यूथ लीग** ह्या राजकीय पक्षानें स्वातंत्र्यलढ्याचें पुढारीपण हातांत घेतलें. त्याच्या दबावाखालीं १९५६ मध्यें सोमाली प्रदेशांत सार्वत्रिक निवडणुका झाल्या, विधिमंडळ व मंत्रिमंडळाची स्थापना झाली. पण ह्या सरकारचे अधिकार अत्यंत मर्यादित होते. परराष्ट्रीय धोरण, संरक्षण व आर्थिक खातें इटालियन राज्यकर्त्यांच्याच ताब्यांत राहिले. याशिवाय त्यांनीं नेमलेल्या " सल्लागारां "च्या हातांत मंत्रिमंडळावर देखरेख करण्याचें काम राहिलें. थोडक्यांत हें मंत्रिमंडळ नांवालाच स्वतंत्र होतें.

तरीसुद्धां युवक मंडळाचे जनरल सेक्रेटरी **अब्दुल्लाही इसा** यांच्या पुढाकाराखालील ह्या मंत्रिमंडळानें जनतेच्या हिताचे अनेक कायदे केले. त्यानंतर झालेल्या १९५९ च्या निवडणुकांत युवक मंडळानें ९० पैकीं ८३ जागा जिंकल्या. ह्या नव्या विधिमंडळानें ताबडतोब संपूर्ण स्वातंत्र्य मिळालें पाहिजे, ही मागणी केली आणि जनतेनें निदर्शनें करून पाठिंबा व्यक्त केला. ह्या वातावरणांत अखेरीस इटालियन सत्ताधाऱ्यांनीं १ जुलै १९६० रोजीं सोमालीला स्वातंत्र्य देण्याचें मान्य केलें.

इटालियन सोमालीलँडच्या ह्या स्वातंत्र्य-लढ्यामुळें फ्रेंच व ब्रिटिश सोमालीलँडमधील जनतेलाहि स्फूर्ति मिळाली. विशेषतः अनेक वर्षें स्वातंत्र्यासाठीं झगडणाऱ्या ब्रिटिश अमलाखालील सोमाली लोकांनीं त्यांचा लढा तीव्र केला. १९६० पर्यंत तेथें गव्हर्नर-जनरलची अनियंत्रित सत्ता होती. १९६० च्या प्रारंभीं निवडणुका होऊन सल्लागार मंडळ म्हणून विधान-परिषदेची स्थापना झाली. एप्रिलमध्यें परिषदेनें स्वातंत्र्याची व इटालियन विभागाबरोबर संयुक्त होण्याची मागणी केली. वसाहत खात्यानें वाटाघाटी करून जूनमध्यें स्वातंत्र्य देण्याचें मान्य केलें.

थोड्याच दिवसांत दोन्ही प्रदेशांच्या स्वातंत्र्यलढ्याच्या पुढाऱ्यांनीं एकत्र येऊन एक राष्ट्र निर्माण करण्याचा आणि दोन्ही विधान परिषदा

एक करून राष्ट्रीय विधानसभा स्थापन करण्याचा निर्णय घेतला. अशा रीतीनें स्वतंत्र सोमाली प्रजासत्ताकाचा जन्म झाला.

अद्यापहि " बृहन्सोमालिया " स्थापन करण्याच्या निमित्तानें ब्रिटिश राष्ट्रकुलांत सोमालीला ठेवण्याचे प्रयत्न साम्राज्यवादी करीत आहेत. परंतु सोमाली सरकारचे नेते तटस्थ व स्वतंत्र धोरणाचा पुरस्कार करीत असून वसाहती-अवशेष नष्ट करण्याचा प्रयत्न करीत आहेत. त्यामुळें साम्राज्यवाद्यांच्या योजना फलद्रूप न होतां सोमाली प्रजासत्ताकाचा स्वतंत्र आर्थिक विकास चालू राहील अशी अपेक्षा करणें योग्य ठरेल.

## फ्रेंच सोमालीलँड

सोमालीलँडची लहानशी किनारपट्टी अद्यापहि फ्रेंचांनीं ताव्यांत ठेवली आहे. **जिबोनी** बंदर हें त्याचें मुख्य शहर आहे. लोकसंख्या ८० हजार आहे. प्रदेशाचा हा बंदराचा विभाग सोडला तर बाकीचा भाग वालुकामय आहे.

सोमाली लोकशाही संघाच्या ( डेमोक्रॅटिक युनियन ऑफ सोमाली ) नेतृत्वाखालीं ह्या प्रदेशांतील जनतेनें स्वातंत्र्य-आंदोलनाला प्रारंभ केला. पण फ्रेंच गव्हर्नरानें सर्व नेत्यांना तुरुंगांत घातलें आहे. १९६३ मध्यें कायदा करून, फ्रेंच वसाहत सत्तेला विरोध करणें हाच राजद्रोहाचा गुन्हा ठरविण्यांत आला आहे. परंतु जनतेचा लढा आतां अधिक तीव्र स्वरूपांत चालू आहे.

● ● ●

# ३९. इथिओपिया

**लोकसंख्या** – २ कोटी २० लक्ष.

**राजधानी** – आदिसअबाबा.

**राज्य** – राजेशाही.

**मुख्य धंदे** – कॉफीचे मळे, हस्तिदंताचा व्यापार.

१

केनियाच्या उत्तरेस आणि सुदान व सोमाली प्रदेशानें वेढलेला इथिओपिया आहे. यासच पूर्वी ॲबिसिनिया म्हणत असत आणि तेथून आपल्या देशांत आलेल्या लोकांना आपण **हबशी** म्हणतों. **आदिस-अबाबा** हें उंचावर वसलेलें शहर ह्या देशाची राजधानी आहे.

हा देश म्हणजे एक उंच पठार आहे. डोंगर, नद्या व खोरीं यांनीं तो व्यापिला आहे. त्यांतून नील, नाईल व आनबारा ह्या नद्या वाहतात. येथें उन्हाळ्यांत मोसमी वाऱ्यांपासून पाऊस पडतो. येथील लोक कुरणांत शेळ्या-मेंढ्या चारतात. डोंगरांच्या उतरणीवर कॉफीचे मळे आहेत. हत्तींचे कळप ह्या भागांत खूप आहेत. त्यामुळें, हस्तिदंत व कॉफी यांची येथून निर्यात होते.

ह्या देशाची लोकसंख्या **२ कोटी २० लक्ष** असून त्यांतील सुमारें $\frac{1}{3}$ लोकवस्ती मुसलमानांची आहे. १९३६ मध्यें इटलीनें हा देश जिंकला आणि १९४१ मध्यें ब्रिटिश फौजांनीं तो इटलीच्या दास्यांतून मुक्त केला. तेथें आतांपर्यंत अनियंत्रित राजेशाहीची राजवट चालू आहे. त्याच्या सभोंतालच्या उंच पर्वतश्रेणींनीं १९३६ पर्यंत त्याला युरोपियन सत्तांपासून संरक्षण दिल्यामुळेंच त्यांच्या देश जिंकण्याच्या चढाओढींतून तो सुटूं शकला.

१९४१ मध्यें इटलीचा पराभव झाल्यानंतर राजा हेले सिलासी किंवा **रास ताफारी** पुन्हा गादीवर बसला.

१९५० मध्यें जवळच्या **इरिट्रिआ राज्याचें व इथिओपिआचें** संघराज्य अस्तित्वांत आलें. त्यामुळें इथिओपिआला समुद्रकिनारा व **मासावा व आसाब** हीं दोन बंदरें मिळालीं. पण लागूनच असलेल्या फ्रेंच सोमालीलँडचें मुख्य बंदर **जिबूती** येथूनच राज्याचा मुख्य व्यापार चालतो.

देश अद्यापहि अविकसित असून सोविएत मदतीनें शाळा व हॉस्पिटलें सुरू झालीं आहेत. इथिओपियांतील पहिला तेल-शुद्धीकरणाचा कारखाना आसाब येथें सोविएत युनियनच्या मदतीनें बांधला जात असून, तो चालू झाल्यावर देश पेट्रोल व इतर जळाऊ तेलाच्या बाबतींत स्वयंपूर्ण होईल. शेजारच्या देशांना कांहीं प्रमाणांत तेल निर्यातहि होऊं लागेल. देशाच्या आर्थिक विकासाला नुकतीच सुरुवात होत असल्यामुळें ह्या कारखान्याबद्दल व त्यासाठीं बांधल्या जात असलेल्या समुद्रांतर्गत धक्क्याबद्दल जनतेंत फार कुतूहल आहे.

● ● ●

# ४०. सुदान

**लोकसंख्या** – ८३ लक्ष.

**राजधानी** – खार्टुम.

**राज्य** – स्वतंत्र - लष्करी हुकूमशाहीची राजवट.

**मुख्य धंदे** – अविकसित देश.

१

इथिओपियाला लागून पश्चिमेस सुदान आहे. सुदान ( म्हणजे ' काळे लोक ' ) हें नांव अरब लोकांनीं दिलेलें आहे. अरब लोक सहारा वाळवंटाच्या दक्षिणेकडील पूर्वपश्चिम पट्ट्याला, म्हणजे सेनेगालपासून इथिओपियाच्या सरहद्दीपर्यंतच्या प्रदेशाला, सुदान म्हणत असत. ह्या विभागांतील भूतपूर्व फ्रेंच विभाग म्हणजे फ्रेंच सुदान – आतां माली प्रजासत्ताक म्हणून ओळखला जातो. राहिलेल्या भागाला सुदान प्रजासत्ताक म्हणतात. ह्या राज्याची राजधानी **खार्टुम** नाईल व नील नाईल या नद्यांच्या संगमावर वसलेली आहे.

सुदानला लागून उत्तरेस असलेला इजिप्त नाईल नदीच्या पाण्यावर अवलंबून आहे आणि टांगानिकांत व्हिक्टोरिया सरोवरांतून उगम पावलेली ही नदी युगांडा ओलांडून संपूर्ण सुदानमधून वाहते. त्यामुळें इजिप्तच्या राज्यांनीं अनेक वर्षेंपर्यंत सुदान ताब्यांत घेऊन तेथें राज्य केलें.

१८८० मध्यें **महादी महमद अहमद** ह्या सुदानच्या धर्मगुरूच्या प्रेरणेनें सुदानी लोकांनीं इजिप्तपासून स्वातंत्र्य मिळविलें. पण गुलामांचा व्यापार करणाऱ्या ब्रिटिशांनीं इजिप्त ताब्यांत घेऊन सुदानवर हल्ला केला आणि महादीच्या अनुयायांचा पराभव करून १८९८ मध्यें सुदान काबीज केला. त्या ठिकाणीं ब्रिटिश व इजिप्शियन लोकांची सत्ता चालू झाली. अर्थातच खरी सत्ता ब्रिटिशांचीच होती.

पुढें इजिप्तमध्यें राष्ट्रवादाचा उदय झाला आणि इजिप्तच्या लोकांनीं ब्रिटिश वर्चस्व धुडकावून लावून १९५१ मध्यें **राजा फरुक** यास इजिप्त व सुदानचें राज्यपद दिलें. पुढें १९५३ मध्यें सुदानचा स्वातंत्र्याचा हक्क मान्य करण्यांत आला. स्वातंत्र्य-पूर्व व स्वातंत्र्यानंतरच्या काळांत इजिप्तबरोबर संयुक्त राज्य असावें कां नसावें ह्या प्रश्नावर राजकीय पक्षांत तट पडले. **खातमा** पक्षाचें मत संयुक्त राज्याच्या बाजूनें आणि महादीचे अनुयायी अन्सारांच्या **उम्मा** पक्षाचें मत संयुक्त राजवटीच्या विरुद्ध होतें. ह्याच गोंधळांत १९५८ मध्यें, जनरल **अबौद** यांनीं राज्यसत्ता काबीज केली आणि सुदानमध्यें लष्करी राजवट चालू झाली. ह्या राजवटींत सध्यां मार्शल लॉ आहे; सभा, मिरवणुका, निदर्शनें, संप, संघटना सर्वांवर बंदी आहे. स्वतंत्र विचारांचीं वर्तमानपत्रें बेकायदेशीर ठरविण्यांत आलेलीं आहेत. १९६१ मध्यें तर पोलिसांनीं एका धार्मिक मिरवणुकीवरच गोळीबार केला. त्यांत ३१ लोक ठार झाले. सरकारविरुद्ध वंड केल्याच्या आरोपावरून सैन्यांतील ५ अधिकाऱ्यांना फांसावर देण्यांत आलें. त्यानंतर अनेक ट्रेड युनियन कार्यकर्त्यांना कम्युनिस्ट असल्याच्या आरोपाखालीं दीर्घ मुदतीच्या कारागृहाच्या शिक्षा देण्यांत आल्या. त्यामुळें जनतेच्या असंतोषाला अधिकाधिक स्पष्ट स्वरूप आलें. १९५९ ते ६३ ह्या ५ वर्षांत रेल्वेचा सार्वत्रिक संप, शेतकऱ्यांचे उठाव व विद्यार्थ्यांचीं निदर्शनें झालीं. आजहि तेथें "लष्करी राजवट बरखास्त करा," ह्या मागणीसाठीं उग्र निदर्शनें चालू असून, रणगाडे व लष्कर यांच्या पोलादी ताकदीविरुद्ध जनता संघर्ष करीत आहे.

● ● ●

# ४१. इजिप्त

**लोकसंख्या** – २ कोटी ६० लक्ष.

**राजधानी** – कैरो.

**राज्य** – स्वतंत्र.

**मुख्य धंदे** – कापसाची लागवड, तेलाच्या व फॉस्फेटच्या खाणी, सुएझमधून होणारी वाहतूक.

१

सुदानच्या उत्तरेस इजिप्त आहे. इजिप्तच्या ओसाड प्रदेशांतून नाईल नदी वाहते; त्यामुळें तिच्या कांठचा प्रदेश सुपीक बनला आहे. इजिप्त देश म्हणजे नाईल नदीची देणगी होय. नाईल नदी नसती तर इजिप्त देश ओसाड बनला असता. ६००० वर्षांपूर्वी नाईलच्या कांठीं इजिप्तच्या प्राचीन संस्कृतीचा उत्कर्ष झाला होता.

नाईल नदीला बाराहि महिने पाणी असतें. जून ते सप्टेंबर महिन्यांत या नदीला मोठमोठे पूर येतात. नाईलची उपनदी **श्वेत नाईल** ही विषुववृत्तीय प्रदेशांत उगम पावते. या प्रदेशांत बाराहि महिने पाऊस पडतो म्हणून तिच्यापासून नाईल नदीला सतत पाण्याचा पुरवठा होतो. नाईलची दुसरी उपनदी **नील नाईल**. ही इथिओपियाच्या पठारावर उगम पावते. ह्या प्रदेशांत उन्हाळी पाऊस पडतो म्हणून नाईल नदीला जून ते सप्टेंबरमध्यें पूर येतात.

हे पूर ओसरले म्हणजे तिच्या कांठावर गाळ सांचतो. ह्या गाळाच्या सुपीक प्रदेशांत शेतकरी गहूं, बार्ली, वैरणीचा चारा व भाजीपाला पिकवतात. हिंवाळ्याच्या थंड हवेंत हीं पिकें तेथें उत्तम होतात.

उन्हाळ्यांत कालव्याच्या पाण्यावर तांदूळ, ऊंस व कापूस हीं पिकें

होतात. नंतर पावसाळा सुरू झाला म्हणजे मका, ज्वारी व बाजरी हीं पिकें पेरतात. अशा रीतीनें तिन्ही ऋतूंत इजिप्तचा शेतकरी पिकें काढतो.

नाईलच्या कालव्यांना सतत पाणीपुरवठा होत राहावा म्हणून नाईल नदीला **आस्वान** येथें मोठें धरण बांधलें आहे. पावसाळा संपून नाईलचा पूर ओसरला म्हणजे ह्या धरणाचें पाणी उत्तर भागास चांगलें उपयोगी पडतें.

नाईलच्या कांठीं पूर्वीं बांध घालून शेतांत पाणी सांठवून ठेवीत. पूर ओसरल्यावर शेतांत गाळ पसरे व तेथें उत्तम शेती तयार होई. त्यामुळें पूर्वींपासून नाईलच्या कांठावर अनेक खेडीं व शहरें वसलीं आहेत. येथें लोकवस्ती अत्यंत दाट आहे. दर चौरस मैलास १००० माणसें असें प्रमाण पडतें.

इजिप्तमध्यें कापूस चांगला पिकतो व ह्या कापसाला परदेशांत फार मागणी असते; कारण तो मऊ व लांब धाग्याचा असतो.

नाईलच्या मुखाजवळ त्रिभुज प्रदेश आहे. या ठिकाणीं इजिप्तची राजधानी **कैरो** हें शहर वसलें आहे. ह्या शहराची वस्ती १० लक्षांवर असून तें व्यापार व रेल्वे यांचें केंद्र आहे. हा प्रदेश कापूस, तांदूळ, ऊंस इत्यादि पिकांनीं समृद्ध आहे. नदीच्या मुखाशीं **ॲलेक्झांड्रिया** हें प्रमुख बंदर आहे. या बंदरांतून परदेशांबरोबर व्यापार चालतो.

इजिप्तमध्यें सिगारेट् व सिमेंटचे कारखाने आहेत. खनिज तेलाच्या खाणी आहेत. फॉस्फेटच्या खाणीहि आहेत. फॉस्फेटचा खतासाठीं उपयोग होतो.

इजिप्तला जगाच्या राजकारणांत महत्त्व प्राप्त झालें तें **सुएझच्या** कालव्यामुळें. हा कालवा भूमध्य समुद्र व तांबडा समुद्र यांना जोडतो. ह्या कालव्यामुळें युरोप व पूर्वेकडील भारत वगैरे देशांतील अंतर ४४०० मैलांनीं कमी झालें आहे; म्हणून त्यावर ताबा ठेवण्याचे प्रयत्न ब्रिटिश साम्राज्य-वाद्यांनीं अखेरपर्यंत केले. इजिप्तची लोकसंख्या २ कोटी ६० लक्ष असून बहुसंख्य मुसलमान आहेत. इजिप्तची राष्ट्रभाषा **अरबी** आहे.

## २

१८८२ मध्यें ब्रिटिशांनीं इजिप्त जिंकले त्या वेळीं त्याच्यावरची तुर्की सत्ता अगदींच दुबळी होती. १९१४ मध्यें त्यांनीं इजिप्त ' विश्वस्त मुलूख ' असल्याचें जाहीर केलें. इजिप्तच्या जनतेनें राष्ट्रीय स्वातंत्र्याच्या मागणीचा सतत पाठपुरावा केल्यामुळें १९३६ मध्यें ब्रिटिशांनीं कांहीं प्रमाणांत इजिप्तला स्वातंत्र्य दिलें. पण तें नाममात्रच होतें. पुढें दुसऱ्या महायुद्धाच्या काळांत ब्रिटिश फौजांनीं पुन्हा इजिप्तवर तावा मिळविला. दुसऱ्या महायुद्धाच्या नंतरच्या काळांत भारताला स्वातंत्र्य देणें ब्रिटिशांना भाग पडल्यामुळें इजिप्तमधील स्वातंत्र्याच्या लढ्यांना अधिकच धार चढली. त्यामुळें ब्रिटिशांनीं इजिप्तचें ' स्वातंत्र्य ' पुन्हा मान्य केलें; पण सुएझच्या कालव्याचें संपूर्ण नियंत्रण स्वतःच्या हातांत ठेवलें, इतकेंच नव्हे तर तेथें **नाविक-तळ** उभारला.

ह्या काळांत राजा फरुक गादीवर होता. त्याच्या लहरी परधार्जिण्या व नांवालाच लोकशाहीचा बुरखा असलेल्या कारकीर्दीला जनता अगदीं कंटाळून गेली होती. त्यामुळें १९५४ मध्यें तरुण क्रांतिकारकांचे पुढारी **कर्नल गमाल अब्दुल नासर** यांनीं क्रांति करून फरुक राजाला सत्तेवरून काढून टाकलें. इजिप्तच्या प्रजासत्ताक राज्याच्या अधिकारपदाचीं व अध्यक्षपदाचीं सूत्रें नासर यांनीं आपल्या हातांत घेतलीं.

अध्यक्ष नासर यांच्या राजवटींत इजिप्तच्या राजकारणांत व सामाजिक जीवनांत महत्त्वाचे बदल घडून आले. राष्ट्रीय स्वातंत्र्य दृढ करण्याच्या आणि देशाचा आर्थिक विकास करण्याच्या कामास नासर यांनीं प्रारंभ केला. त्यामुळें अमेरिका, फ्रान्स, ब्रिटन वगैरे साम्राज्यवादी राष्ट्रांचे व इजिप्तचे संबंध दुरावले. उलट, नवस्वतंत्र राष्ट्रांना अडचणीच्या काळांत मदत देण्याच्या सोविएत युनियनच्या धोरणामुळें समाजवादी राष्ट्रांबरोबरचे इजिप्तचे संबंध सुधारले. त्याचप्रमाणें नव-स्वतंत्र व तटस्थ राष्ट्रांबरोबर त्याच धोरणानें वागणाऱ्या इजिप्तचे भ्रातृभावाचे संबंध जुळून आले.

इजिप्तचा मुख्य प्रश्न पाणीपुरवठ्याचा आणि नवी जमीन लागवडीखालीं आणण्याचा असल्यामुळें इजिप्तच्या सरकारनें पूर्वीच्या आस्वान धरणाचा

वरच्या बाजूला "**वरचें मोठें आस्वान धरण**" बांधण्याचें ठरविलें. ह्या धरणासाठीं मदत देण्याचें प्रथम अमेरिका व ब्रिटन यांनीं मान्य केलें. परंतु ऐनवेळीं, एकाएकीं त्यांनीं मदत देण्याचें नाकारलें. त्यामुळें इजिप्तच्या स्वाभिमानाला मोठा धक्का बसला.

वास्तविक इजिप्तचाच भाग असलेला सुएझचा कालवा इजिप्तच्या मालकीचा नव्हता. त्या कालव्यांत चालणाऱ्या व्यापाराची जकात इजिप्तला संपूर्णपणें मिळत नव्हती. **३५ कोटी** पौंड नफा दरवर्षी सुएझ कॅनाल कंपनी कमावीत असतांना आस्वान धरणासाठीं इजिप्तनें अमेरिका-ब्रिटनचे पाय धरावेत ही हास्यापद परिस्थिति बदलून टाकण्याचा निश्चय इजिप्तच्या सरकारनें केला. १९५५ च्या जुलैमध्यें सुएझ कालवा इजिप्तच्या मालकीचा झाला असल्याचें कायदा करून जाहीर केलें. ब्रिटन व फ्रान्सनें कालव्यावरचे अधिकारी व बोटींचे कप्तान ताबडतोब काढून घेतले; पण इजिप्तच्या सरकारनें वाहतूक चालवून दाखविली. तेव्हां मग इस्राएल राष्ट्राला पुढें घालून फ्रान्स व ब्रिटन यांनीं इजिप्तवर ३१ ऑक्टोबर रोजीं हल्ला केला. पण त्यांच्या फौजांना पोर्ट सैद जिंकतां आलें नाहीं. ५ नोव्हेंबर रोजीं सोविएत युनियनचे अध्यक्ष ख्रुश्चोव्ह यांनीं इजिप्तवरील आक्रमण ताबडतोब थांबलें नाहीं तर आम्हीं इजिप्तच्या स्वातंत्र्याच्या रक्षणासाठीं उभे राहूं, असा इशारा दिला. ६ नोव्हेंबरला हल्लेखोरांनीं युद्धतहकुबी जाहीर केली. इजिप्तच्या स्वातंत्र्याचें रक्षण झालें. सुएझचा कालवा इजिप्तला मिळाला आणि वसाहत व नवस्वतंत्र राष्ट्रांत इजिप्तचा मान वाढला.

पुढें आस्वान धरणाच्या बांधणीसाठीं आर्थिक व तांत्रिक मदत देण्याची तयारी सोविएत युनियननें दाखविली आणि नासर सरकारनें तिचा स्वीकार केला.

आस्वान व सुएझच्या प्रकरणापासून धडा घेऊन इजिप्तचे अध्यक्ष नासर यांनीं स्वतंत्र अर्थ-विकासाचा जो मार्ग पत्करला आहे तो **बिगर-भांडवलदारी अर्थविकासाचा मार्ग** असून त्याचा व्याप इतका सर्वांगीण आहे कीं थोड्याच कालावधींत समाजवादी अर्थरचनेचा पाया घालण्याचें कार्य इजिप्तमध्यें पूर्ण होईल अशी स्पष्ट चिन्हें दिसत आहेत.

कोणत्याहि अविकसित देशाप्रमाणें इजिप्तमध्येंहि मुख्य प्रश्न होता तो

शेती व जमीन-संबंध सुधारण्याचा. मूलतः इजिप्तमधील फारच थोडी जमीन शेतीला उपयुक्त होती. १० लक्ष चौ. कि. मीटरपैकीं फक्त ४० ह. चौ. कि. मी. म्हणजे ४ टक्के जमीन पिकाऊ होती आणि उत्कृष्ट व जास्त जमीन पाशांनीं – इजिप्तच्या सरंजामदारांनीं – स्वतःच्या ताब्यांत घेतली होती. **२० लक्ष** शेतकऱ्यांजवळ **८ लक्ष** फेरा ( एकर ) जमीन होती तर **२१३६** सरंजामदारांजवळ **१२ लक्ष** एकर जमीन होती. जमीनदार पैशांत लोळत होते अन् शेतकरी दरिद्री होते.

नासर सरकारनें १९५२ मध्यें सत्तेवर आल्यानंतर पहिला जमीन-कायदा करून कोणालाहि २०० एकरपेक्षां अधिक जमीन ताब्यांत ठेवतां येणार नाहीं असें जाहीर केलें. ह्या कायद्यानंतर ५ लक्ष एकर जमीन जमीनदारांकडून काढून घेण्यांत आली आणि १ लक्ष ६२ हजार शेतकरी कुटुंबांना वांटण्यांत आली.

१९६१ मध्यें जमीनसुधारणा कायद्यांत आणखी प्रगतिकारक बदल घडवून आणण्यांत आला. १०० एकरपेक्षां अधिक जमीन वैयक्तिकरीत्या व ३०० एकरपेक्षां अधिक कौटुंबिकरीत्या धारण करतां येणार नाहीं असें जाहीर करण्यांत आलें. ह्यामुळें वांटपाकारितां ३ लक्ष एकर जमीन मोकळी झाली.

१९६२ मध्यें परकीयाची शेतजमीन काढून घेण्यांत आली. त्यामुळें १ लक्ष ४१ हजार एकर जमीन मोकळी झाली व इजिप्तच्या शेतकऱ्यांना मिळाली. त्याच वर्षीं जमीन-धारणेची कौटुंबिक मर्यादा ३०० एकरांवरून १०० एकरांवर आणण्यात आली; त्यामुळें जमीनदारीप्रथा जवळजवळ नष्ट झाली.

१९६४ मध्यें जमिनीबद्दल जमीनमालकांना देण्यांत येणारी नुकसान-भरपाई रद्द ठरविण्यांत आली. अशा रीतीनें पाशांचें वर्चस्व नष्ट होऊन शेतमजूर व गरीब शेतकरी यांना ५ एकरांपर्यंत जमीन मिळाली आणि सुमारें १ लक्ष ग्रामीण जनतेचा फायदा झाला. त्यांचें वार्षिक उत्पन्न २७ इजिप्शिअन पौंडांवरून २५० इ. पौं. पर्यंत वाढलें. कुळांचा हिस्सा वाढवून देण्यांत आल्यामुळें ५ को. ६० ल. इ. पौंड इतकी भर कुळांच्या वार्षिक उत्पन्नांत पडली.

३ लक्ष शेतमजुरांचाहि मोठ्या प्रमाणांत फायदा झाला आहे. त्यांना कामगारांइतकें दिवसाचें वेतन मिळतें, व ७ च तास काम करावें लागतें. त्यांच्यासाठीं सामाजिक विम्याचीहि योजना आंखण्यांत आली आहे. पिण्याच्या पाण्याची सोय प्रत्येक खेड्यांत झाली आहे. प्राथमिक शिक्षण मोफत करण्यांत आलें आहे. आज ग्रामीण विभागांतील ८० टक्के मुलें शिक्षण घेऊं शकतात.

क्रांतिपूर्व काळांतील २० वर्षांत ४५ हजार एकर नवीन जमीन लागवडीखालीं आणण्यांत आली होती. १९६२ मध्यें १ लक्ष १९ हजार एकर व १९६३ सालीं १ लक्ष ८९ हजार एकर जमीन नव्यानें शेतीसाठीं तयार करण्यांत आली. आतां आस्वानच्या मोठ्या धरणाच्या बांधणीनंतर तर १३ लक्ष एकर नव्या जमिनीला पाणीपुरवठा होणार आहे; म्हणजे देशांतील शेतजमीन ३३ टक्क्यांनीं वाढणार आहे.

याशिवाय शेतकऱ्यांना कर्ज देण्यासाठीं व खरेदी-विक्रीसाठीं सहकारी संस्था काढण्यांत आल्या असून लांचलुचपत हा गुन्हा ठरविण्यांत आला आहे. सामुदायिक सहकारी शेतीच्या योजनाहि हातांत घेण्याची सरकारनें तयारी चालविली आहे. अशा रीतीनें, सरंजामदारी-जमीनदारीप्रथा नष्ट करून नासर सरकारनें कसणाऱ्या शेतकऱ्यांना सुखाचा मार्ग मोकळा करून दिला आहे.

इजिप्तमधील **सरकारी मालकीचा आर्थिक विभाग** सुएझ कालव्याच्या राष्ट्रीयीकरणानें अस्तित्वांत आला. सुएझ कालवा कुशलतेनें व कर्तबगारीनें चालवून इजिप्तच्या कर्मचाऱ्यांनीं त्याचें उत्पन्न दुप्पट केलें आहे, आज ७० कोटी पौंडांपेक्षां अधिक नफा ह्या कालव्यामुळें जकातीच्या रूपानें मिळतो. सुएझ वर ब्रिटिश-फ्रेंचांनीं केलेल्या आक्रमणाच्या निषेधार्थ नासरनें ब्रिटिशांची व फ्रेंचांची मालमत्ता गोठवली—जप्त केली—त्यांत बँकांचा व विमा कंपन्यांचाहि समावेश होता. कांगोमध्यें साम्राज्यवाद्यांनीं पंतप्रधान पॅट्रिस लुमुंबांचा खून घडवून आणल्याच्या निषेधार्थ इजिप्त सरकारनें १९६० च्या डिसेंबरांत बेल्जियम भांडवलदारांची मालमत्ता ताब्यांत घेतली.

१९६१ मध्यें सर्व बँका, विमा कंपन्या व ४२ मोठ्या औद्योगिक कंपन्यांचें इजिप्त सरकारनें राष्ट्रीयीकरण केलें. इतर मोठ्या धंद्यांतील ५० टक्के शेअर्स

सरकारी असले पाहिजेत असा कायदा करण्यांत आला. दुसऱ्या एका कायद्यानें १४८ कंपन्यांवर १० हजार इ. पौं. पेक्षां अधिक शेअर्स ठेवण्यावर निर्बंध बसविण्यांत आला. त्यानंतर सर्व आयात व्यापार सरकारी अगर निम-सरकारी कंपन्यांच्या ताब्यांत देण्यांत आला. १९६१-६२ च्या दरम्यान सुमारें १०० कोटी पौंडांची मालमत्ता सरकारनें ताब्यांत घेतली.

ही जप्त झालेली मालमत्ता नुकसानभरपाई न देतांच सरकार कायमची घेणार आहे का? — असा एक प्रश्न अद्याप अनिर्णीत आहे. त्याचा निर्णय बड्या मक्तेदारांच्या व परकीय भांडवलदारांच्या विरुद्धच लागणार हें निश्चितच.

उद्योगधंद्यांचा सरकारी विभाग अस्तित्वांत आल्यानंतर कामगारांचे हक्कहि वाढत गेले. कारण न देतां बडतर्फी बंद करण्यांत आली; ७ तासांचा दिवस, पेन्शन, व बेकारभत्ता ह्या सवलती सर्व कामगारांना नव्यानें मिळाल्या. डायरेक्टर बोर्डावर कामगारांच्या ४ प्रतिनिधींना जागा देणें व नफ्याचा ४ था हिस्सा वांटणें ह्या गोष्टींची प्रत्येक कारखान्यावर सक्ति करण्यांत आली.

नव्या घटनेनें विधिमंडळांत व लोकसभेंत ५० टक्के प्रतिनिधित्व श्रमिक जनतेला देण्यांत आलें आहे. नासर सरकारचें खंबीर साम्राज्यविरोधी व समाजवादाकडे जाणारें धोरण पाहून, पूर्वी लष्करी हुकूमशाहीला विरोध करण्याचा पवित्रा घेणारी व नासरनें बेकायदेशीर ठरविलेली इजिप्तची कम्युनिस्ट पार्टी, आतां सरकारबरोबर सहकार्य करीत आहे. अरबी देशांचें ऐक्य उभारण्यासाठीं, सीरियाच्या जनतेची संमति न घेतां, संयुक्त राज्य निर्माण करण्याचा नासरनें प्रयत्न केला, त्यावर प्रथमतः मतभेदांना प्रारंभ झाला होता. पुढें हें संघराज्य नासरला सीरियांतील प्रतिगाम्यांच्या जोरामुळें मोडावें लागलें. इजिप्तमधील कारभारांत त्यानें फारच मूलभूतपणें क्रांतिकारक धोरणांचा स्वीकार केला. आतां, नियोजन, प्रसिद्धि यांसारख्या महत्त्वाच्या खात्यांत कम्युनिस्ट पुढारी नेतृत्वाच्या जागांवर काम करीत असून, पुढील काळांत हें सहकार्य अधिक वाढून इजिप्त समाजवादी राष्ट्रांच्या मालिकेंत बसूं लागेल असा निरीक्षकांचा अंदाज आहे.

● ● ●

# ४२. लिबिया

**लोकसंख्या** – १२ लक्ष.

**राजधानी** – त्रिपोली.

**राज्य** – स्वतंत्र–राजेशाही राजवट.

**मुख्य धंदे** – चामड्याचे व ऑलिव्ह तेलाचे कांहीं कारखाने.

१

इजिप्तला लागून पश्चिमेस लिबिया आहे. ह्या राज्याच्या बहुतेक भागाचा सहाराच्या वाळवंटांत समावेश होतो. त्यांतील ओलाव्याचे भाग ( ओॲसिस ) व किनारपट्टी एवढाच काय तो सुपीक प्रदेश आहे. किनाऱ्यावर हिंवाळ्यांत पाऊस पडतो पण त्याचें प्रमाण फारच कमी असल्यामुळें पाटाचें पाणी उपयोगांत आणावें लागतें. तेथें गहूं, द्राक्षें ऑलिव्ह व तुतीचीं फळें होतात. ओसाड प्रदेशाला लागून खुरट्या गवताचा प्रदेश आहे. तेथें भटके अरब लोक शेळ्या, मेंढ्या, व उंट चारतात. **त्रिपोली** हें बंदर लिबियाची राजधानी आहे. त्रिपोली व बेंगाझी हीं उंटांच्या काफिल्यांचीं केंद्रें आहेत. येथून सहाराच्या वाळवंटांत उंटांचे वाहतुकीचे मार्ग जातात. ह्या विभागांत खजुराचें उत्पादन होतें.

लिबियाच्या प्रदेशांत फक्त एक टक्का भागांत पिकें होतात. येथील अरब व बर्बर लोकांची लोकसंख्या **१२ लक्ष** आहे. ते एकमेकांपासून अलग असलेल्या तीन विभागांत राहतात. **त्रिपोली** व **सिरेनिकाच्या** किनारपट्टींत अनुक्रमें ८ लक्ष व ३ लक्ष भटक्या लोकांचें निवासस्थान आणि **फेझन** ओलाव्याच्या ठिकाणीं ६० हजार लोकांचें निवासस्थान आहे. किनारपट्टी अधिकांत अधिक ५० मैल रुंद आहे आणि समुद्रापर्यंत आलेल्या वाळवंटानें वसतिस्थानें ३०० मैल विभक्त झालीं आहेत.

१६ व्या शतकापासून १९११ पर्यंत लिबिया तुर्कस्तानच्या साम्राज्याचा भाग होता; १९११ मध्यें इटलीनें तो जिंकला आणि तेथें वसाहत करण्याचा प्रयत्न केला; म्हणून लिबियांत आजसुद्धां ५० **हजार** इटालियन लोक राहतात. दुसऱ्या महायुद्धाच्या काळांत, इटालियन व जर्मन लोकांविरुद्ध लिबियाचे लोक शौर्यानें लढले. त्यानंतर स्वातंत्र्यासाठीं लिबियांत झालेल्या चळवळींमुळें अखेर **१९५१ च्या डिसेंबरांत** लिबियाला संयुक्त राष्ट्र-संघाच्या मान्यतेनें स्वातंत्र्य मिळालें. लिबियांत राजसत्ता असून **राजे इद्रिस** हे राज्याचे मुख्य आहेत. राज्यांतील पुरुष मतदारांनाच फक्त मतदानाचा हक्क असून त्यांनीं निवडून दिलेल्या ५५ सभासदांची लोकसभा आहे.

देशांत अद्याप सरंजामशाही स्वरूपाची समाजव्यवस्था असून जमातींचे प्रमुख शेख यांची ग्रामीण विभागांत सत्ता आहे. शेतकऱ्यांना उत्पन्नाचा मोठा भाग ह्या सरंजामदारांना द्यावा लागतो.

त्रिपोलींत एक कागद गिरणी व चामड्याच्या वस्तु तयार करण्याचे कांहीं कारखाने आहेत; ऑलिव्ह तेलाचेहि थोडे कारखाने आहेत. याशिवाय इतर कोणतेहि उद्योगधंदे लिबियांत नाहींत.

तेल, लोखंड, फॉस्फरस, तांबें, टिन, मॅंगनीझ व बॉक्साईट इत्यादि खनिज पदार्थांचे येथें सांठे आहेत, पण अद्यापपर्यंत त्यांचें खनन चालूं झालेलें नाहीं.

तेलाच्या खाणींचें अस्तित्व समजून आल्यापासून आंग्लो-अमेरिकन कंपन्यांचें लक्ष ह्या वाळवंटानें आकर्षित केलें आहे. त्यांना अनेक सवलती देण्यांत आल्या असून १४ कंपन्या तेल काढण्यासाठीं स्थापन झाल्या असून त्यांनीं देशाच्या $\frac{1}{3}$ विभागावर हक्क मिळविले आहेत. त्यांत अमेरिकेच्या **इस्सो** कंपनीनें व ब्रिटनच्या **शेल** कंपनीनें सर्वांत अधिक हक्क मिळविले आहेत. ह्या तेल कंपन्यांच्या कामगारांना अत्यंत अपुरा पगार मिळतो आणि त्यांची कामाची परिस्थिति अत्यंत खराब आहे.

लिबियाचें सरकार सध्यां सुपीक प्रदेशावर होणारें वाळवंटाचें आक्रमण थोपवून धरण्याच्या कामाला लागलें आहे. त्यासाठीं पाण्याचे सांठे व धरणें बांधण्याचें आणि मोठ-मोठे वृक्ष, विशेषतः निलगिरी व ॲकाशिअसचीं झाडें लावण्याचें काम हातीं घेण्यांत आलें आहे.

१९५३ सालीं लिबियानें ब्रिटनबरोबर केलेल्या कराराप्रमाणें, दुसऱ्या महायुद्धाच्या काळांत बेंगाझी, तोब्रुक, एल आदम येथें ब्रिटननें बांधलेले लष्करी-तळ कायम ठेवण्यांत आले आहेत. त्याचप्रमाणें अमेरिकेचा वैमानिक तळ उभारण्यास सरकारनें परवानगी दिली आहे. परकीय लष्कराचें अस्तित्व आपल्या सार्वभौमत्वाला बाधा आणणारें आहे, अशी जाणीव लिबियन जनतेंत वाढत असून त्याविरुद्ध येथें वारंवार निषेध–निदर्शनें करण्यांत येतात.

या आंदोलनामुळें १९६४ च्या मार्चमध्यें लिबियाच्या पार्लमेंटमध्यें ब्रिटनबरोबरचा लष्करी-करार रद्द करण्याचा ठराव केला. त्यानुसार लिबियांत लष्करी–तळ ठेवण्याचा ब्रिटनचा हक्कहि काढून घेण्यांत आला. त्यामुळें नाइलाजानें ब्रिटनला लिबियाच्या सरकारबरोबर ह्या प्रश्नासंबंधीं बोलणीं सुरू करणें भाग पडलें आहे.

## भूमध्य समुद्राजवळचे प्रदेश

**( प्रास्ताविक )**

ट्युनिशिया, अल्जेरिया, मोरोक्को व स्पॅनिश सहारा हे आफ्रिकेंतील भूमध्य समुद्राला लागून असलेले प्रदेश हवामान व युरोपचें सान्निध्य यांमुळें बरेच निराळे वाटतात. ह्या प्रदेशाला ' मार्घेब ' म्हणतात. ह्या तीन राष्ट्रांतील लोकांत घनिष्ट सलोखा व बंधुभाव आहे. ह्या देशांत बर्बर व अरब लोकांची वस्ती आहे.

• • •

७५३८२ - ९१५।७१
८८१ १८।३।

# ४३. ट्युनिशिआ

**लोकसंख्या** – ४० लक्ष.

**राजधानी** – ट्युनिस

**राज्य** – स्वतंत्र प्रजासत्ताक.

**मुख्य धंदे** – लोखंड व फॉस्फेटच्या खाणी.

१

ट्युनिशियाची राजधानी **ट्युनिस**, हें शहर प्राचीन काळच्या कार्थेज ह्या प्रसिद्ध शहराजवळ वसलेलें आहे. ह्या चिमुकल्या देशाची लोकसंख्या ४० लक्ष असून त्यांपैकीं, स्वातंत्र्यपूर्व काळांत, ४ लक्ष युरोपियन लोक होते.

ह्या देशांत खनिज संपत्ति भरपूर आहे. लोखंड व फॉस्फेट येथें विपुल प्रमाणांत सांपडतें. गहूं, बार्ली, द्राक्षें, ऑलिव्ह, लिंबें, नारिंगें हीं भूमध्य सागरिक फळें ह्या देशांत पुष्कळ होतात.

१८८१ पासून हा देश फ्रेंच साम्राज्यवाद्यांनीं आपला ' संरक्षित प्रदेश ' बनविला होता. येथें पूर्वापार राज्य करणाऱ्या सुलतानांना ' बे ' म्हणत असत. फ्रेंच साम्राज्यवाद्यांच्या पिळवणुकीविरुद्ध व ' बे 'च्या राजेशाहीविरुद्ध ट्युनिसच्या जनतेनें लढा केला. ह्या लढयाचें हत्यार म्हणून १९३४ मध्यें **निओ-दस्तुर पार्टीची** स्थापना झाली. चळवळीचा जोर पाहून १९५६ मध्यें फ्रान्सनें ट्युनिशियाला स्वातंत्र्य दिलें. १९५७ मध्यें राजेशाही उलथून पाडून ट्युनिशियाचें प्रजासत्ताक जाहीर करण्यांत आलें. निओ-दस्तुर पक्षाचे पुढारी **हबिब बोरबुवा** हे प्रजासत्ताकाचे अध्यक्ष आहेत.

अल्जेरियाचा स्वातंत्र्यलढा फ्रेंच साम्राज्यवाद्यांच्या निर्घृण दडपशाहीला तोंड देत असतांना ट्युनिसच्या स्वतंत्र सरकारनें लढणाऱ्या देशभक्तांना

आश्रय दिला. इतकेंच नव्हे तर अल्जेरियाच्या क्रान्तिकारकांनीं त्यांचें ' तात्पुरतें सरकार ' ट्युनिस येथेंच स्थापन केलें. पण त्यामुळें चिडलेल्या फ्रेंचांनीं **साकेत** ह्या सीमेवरील खेड्यावर १९५८ मध्यें बॉंबफेंक केली. मात्र त्यामुळें ट्युनिसमधील मवाळ देशभक्तांना फारच महत्त्वाचे धडे मिळाले.

**बिझेर्टा** व इतर ठिकाणचे नाविक-तळ, स्वातंत्र्य देतांनाहि फ्रान्सनें आपल्याच ताब्यांत ठेवले होते. त्या ठिकाणीं वैमानिक-तळहि उभारण्यांत आलेला आहे. त्याची लांबी जवळजवळ ५ मैल आहे. तेथून ८ मैलांवर दुसरा मोठा नाविक-तळ आहे आणि तो अल्जेरियाच्या परिसरांत येतो. १९५६ मध्यें स्वातंत्र्य मान्य करतांना फ्रान्सनें हा तळ उठविण्यासंबंधीं बोलणीं करण्याचें आश्वासन दिलें होतें. १९५८ मध्यें त्यासंबंधीं बोलणीं सुरू झालीं. पण साम्राज्यवाद्यांनीं आपलें सैन्य काढून घेण्यास नकार दिला. १९६१ मध्यें निओ-दस्तुर पक्षाच्या परिषदेंत फ्रेंच राजवटीच्या ह्या अवशेषांचा शेवट करण्याचा ठराव पास झाला, पण फ्रेंचांनीं लढाऊ विमानें आणण्यासाठीं तयारी चालविली. अखेर ह्या प्रश्नावर युद्ध पेटलें आणि साम्राज्यवाद्यांच्या अमानुष बॉंबफेंकीमुळें भीषण हत्याकांड झालें. अखेर संयुक्त राष्ट्रसंघाच्या मध्यस्थीनें प्रत्यक्ष लढाई बंद झाली पण अद्याप साम्राज्यवाद्यांनीं बस्तान उठवलेलें नाहीं.

नाटोचा सदस्य असलेल्या फ्रान्सचें हें लष्कर संपूर्ण आफ्रिकेला धोकादायक आहे हें जाणून आफ्रिकेंतील सर्व स्वतंत्र राष्ट्रांनीं, आशियांतील भारतादि राष्ट्रांनीं व समाजवादी राष्ट्रांनीं ह्या स्वातंत्र्यलढ्याला पाठिंबा व्यक्त केला.

ह्या प्रसंगापासून सत्ताधारी पक्षाचें फ्रान्सशीं सलोखा राखण्याचें धोरण बदललें असून ट्युनिशियाचें सरकार आतां अलिप्ततावादी धोरण स्वीकारीत आहे. सोविएत युनियन व इतर समाजवादी देशांबरोबर संबंध बांधून हा देश आपला आर्थिक विकास करून घेत आहे.

अल्जेरियानें परकीय व स्वकीय बड्या भांडवलदारांच्या मालमत्तेचें राष्ट्रीयीकरण केल्यानंतर त्याचे पडसाद लागून असलेल्या ट्युनिशियांत अपरिहार्यपणें उमटले. १९६४ च्या मेमध्यें ट्युनिशियाच्या सरकारनें

कायदा करून फ्रेंच व इतर वसाहतकारांची सर्व जमीन ताब्यांत घेतली. ट्युनिशियाचे शेतकरी अगर त्यांच्या सहकारी संस्था यांखेरीज आतां कोणालाहि जमीन-मालक होण्याची तेथें परवानगी नाहीं. ह्या कायद्यामुळें **३ लक्ष** हेक्टर्स फ्रेंच जमीनदारांच्या मालकीचा व **१ लक्ष ५० हजार** हेक्टर्स इटालियन जमीनदारांच्या मालकीची सुपीक जमीन आणि त्यावर मिळणारा अफाट नफा देशाच्या हातांत येणार आहे आणि ट्युनिशियाच्या पुढील विकासाला त्याचें फार साहाय्य मिळणार आहे.

• • •

# ४४. अल्जेरिया

**लोकसंख्या** – १ कोटी.

**राजधानी** – अल्जिअर्स.

**राज्य** – स्वतंत्र प्रजासत्ताक.

**मुख्य धंदे** – नैसर्गिक गॅस व तेलाच्या खाणी.

१

देदीप्यमान स्वातंत्र्य-लढ्यानें व अपूर्व स्वार्थत्यागानें गेल्या २५ वर्षांत सर्व जगांत मान्यता पावलेला अल्जेरिया उत्तर आफ्रिकेच्या भूमध्य सागरी प्रदेशांतील सर्वांत मोठा देश आहे. त्याच्या एका बाजूला मोरोक्को व दुसऱ्या बाजूला ट्युनिशिया आहे.

समुद्रकांठचा भाग सुपीक आहे. किनाऱ्याकडून दक्षिणेकडे जातांना माळरानें, मग छोट्या झुडपांनीं भरलेले डोंगर व खोरीं आणि त्यानंतर अफाट सहारा वाळवंट लागतें.

अल्जेरियाची लोकसंख्या १ कोटी असून, १२ लक्ष फ्रेंच वसाहतकार अल्जेरियांत राहात असत. **अल्जिअर्स** हें बंदर राजधानीचें शहर असून **ओरा कॉन्स्टंटाईन** हीं दुसरीं मोठीं शहरें आहेत.

किनाऱ्यापासून ८० ते १०० मैल आंतपर्यंत पसरलेला सुपीक प्रदेश आहे; त्याला ‘ टेल ’ म्हणतात. ह्या प्रदेशांत, टेकड्या, दऱ्याखोरीं व मैदानें आहेत. टेकड्यांवर हिरवींगार जंगलें आहेत, मैदानावर गहूं व बार्ली यांचीं डौलदार शेतें आणि टेकड्यांच्या उतरणीवर द्राक्षें, ऑलिव्ह, संत्रीं व लिंबें यांचे सुंदर मांडव दिसतात. ‘ टेल ’च्या दक्षिणेस गवताळ प्रदेश आहे आणि त्यांत लक्षावधि मेंढ्या व बोकड चरत असतात. त्यापलीकडे बर्फाच्छादित ॲटलास पर्वताच्या रांगा असून पलीकडे सहारा वाळवंट आहे.

सहारा वाळवंटांत नैसर्गिक गॅस व तेल यांचे अमाप सांठे आहेत; त्यामुळें आफ्रिकेच्या संपन्न राष्ट्रांत अल्जेरियाचा क्रमांक एकदम वर चढला आहे.

## २

१८३० मध्यें फ्रेंचांनीं अल्जेरिया जिंकण्यासाठीं युद्ध सुरू केलें आणि अखेरीस १९४८ मध्यें अल्जेरिया जिंकून घेतला. हवा व साधनसंपत्तीच्या अनुकूलतेमुळें फ्रेंच व इतर वसाहतकार मोठ्या संख्येनें ह्या देशांत शिरले आणि त्यांनीं तेथील अरब व काबील जमातींच्या लोकांना रानटी ठरवून स्वतःच्या देशांत त्यांना परके बनविले. ४५ हजार युरोपियन लोकांनीं सुंदर सुपीक जमीन स्वतःच्या ताब्यांत घेतली आणि अरब लोकांना माळरानांत हांकलून लावलें.

वसाहतकारांनीं आधुनिक धर्तीचीं सुंदर नगरें वसविलीं आणि गली-बोळ व घाण यांनीं गजबजलेल्या जुन्या कसबा अरब (मुसलमानांच्या) वस्त्या बनल्या. त्यांच्या शिक्षणाकडे अगर प्रगतीकडे लक्ष देण्याची गरज साम्राज्यवाद्यांनाहि वाटली नाहीं अगर वसाहतकारांनाही वाटली नाहीं. शहरांतलि मोलमजुरी अगर फ्रेंच लोकांच्या मळ्यांवरील कष्टाचीं कामें हेंच त्यांचें संपूर्ण जीवन बनलें.

दुसऱ्या महायुद्धानंतर जग बदललें. आशिया-आफ्रिका खंडांत स्वातंत्र्य-लढ्यांचें विजयी पर्व सुरू झालें. ह्या महायुद्धांत ६५ हजार अल्जेरियन्स मारले गेले आणि १। लक्ष जखमी झाले. फॅसिझमपासून फ्रान्सचें रक्षण करण्यासाठीं इतक्या अल्जेरियन सुपुत्रांचा बळी पडला हें लक्षांत घेऊन आपल्या स्वातंत्र्याला लवकर मान्यता देण्यांत येईल, असें अल्जेरियाच्या देशभक्तांना वाटत होतें, पण तें खरें ठरलें नाहीं.

पण अल्जेरियाच्या स्वातंत्र्य-संग्रामाचा प्रारंभ यापूर्वीं बरींच वर्षें आधीं झाला होता. पहिलें असंघटित उठाव दडपले गेल्यानंतर फ्रान्समध्यें स्वातंत्र्य-लढ्याच्या संघटनेची स्थापना झाली. तिचें नांव '**उत्तर आफ्रिकेचा तारा.**' संघटनेचें नेतृत्व मोटार कंपनींतल्या एका कामगाराकडे होतें. त्याचें नांव **मेसाली हाजी**. ह्या नांवांना अल्जेरियाच्या स्वातंत्र्यलढ्यांत मानाचें स्थान

प्राप्त झालें आहे. ह्या पक्षानें संपूर्ण स्वातंत्र्य, फ्रेंच लष्कराचें निर्गमन आणि राष्ट्रीय फौजांची उभारणी हीं सूत्रें घेऊन चळवळीला प्रारंभ केला.

लवकरच फ्रान्सच्या सरकारनें हा पक्ष बेकायदेशीर ठरविला. तावडतोब हार्जींच्या नेतृत्वाखालीं " गौरवशाली तारा ' या नांवाचा नवा पक्ष स्थापन झाला. १९३४-३७ च्या दरम्यान फ्रान्समध्यें होणारा फॅसिझम-शिरकाव थोपवून धरण्याच्या कामांत ह्या पक्षानें फार मोठी कामगिरी केली. पण त्या लढ्यांच्या आधारावर स्थापन झालेल्या ' पाप्युलर गव्हर्मेंट 'नें अल्जेरियन देशभक्तांवर दडपशाही करण्यास प्रारंभ केला.

ह्या सर्व आपत्तींना तोंड देऊन हार्जींनीं अल्जेरियांत नवी संघटना उभारली — अल्जेरियन जनता पार्टी ह्या पक्षानें १९३७-३९ ह्या दोन वर्षांत प्रखर लढा केला; हार्जी तुरुंगांत गेले पण स्थानिक निवडणुकींत पहिल्या क्रमांकाचीं मतें मिळवून विजयी झाले. १९३९ मध्यें जनता पक्षावर बंदी घालण्यांत आली पण त्यांचें भूमिगत कार्य चालू राहिलें. हिटलरसमोर मान तुकवणाऱ्या फ्रेंच सरकारनें अल्जेरियांतील दडपशाही आणखी वाढविली.

१९४१ मध्यें मेसालींना अटक करून १६ वर्षांची शिक्षा ठोठावण्यांत आली. १९४५ मध्यें युद्धसमाप्तीनंतर विजय-दिनाची मिरवणूक काढून स्वातंत्र्याची मागणी करणाऱ्या अल्जेरियन जनतेवर पोलिसांनीं गोळीबार केला. त्यानंतर कांहीं लोकांनीं पोलिसांवर हल्ला करून दिलेल्या उत्तराचा सूड म्हणून पुढील तीन दिवसांत फ्रेंच फौजांनीं **४० हजार अल्जेरियन लोकांना ठार मारलें.** तरीसुद्धां मुक्त होऊन आलेल्या मेसालींच्या अध्यक्षतेखालीं स्थापन झालेल्या ' लोकशाही हक्कांच्या विजयासाठीं चळवळ ' ह्या संघटनेनें कायदेशीर लढा देण्याचा निर्धार केला.

ह्या संघटेनत स्वातंत्र्य-लढ्याच्या मार्गाबद्दल मतभेद होऊन १९५० मध्यें तिचीं दोन छकलें झालीं : मेसालींच्या गटानें असहकाराचें धोरण स्वीकारलें तर ' मधल्या गटानें ' फ्रेंचांबरोबर सहकार करून हक्क मिळविण्याचा मार्ग पत्करला. फ्रेंचांनीं मेसालींना पकडून हद्दपार केलें.

दरम्यानच्या काळांत क्रांतिकारकांचा एक नवा गट उदयास आला. इंडोचायनाच्या लोकांनीं ९ वर्षें सशस्त्र लढा करून फ्रेंच साम्राज्यवाद्यांना

शरणांगति स्वीकारायला लावली. हा आदर्श डोळ्यांसमोर ठेवून १९५४ मध्यें ह्या गटानें लढ्यांना प्रारंभ केला. **महमद खिद्दर व अहमद बेनबेला** यांच्या नेतृत्वाखालीं ह्या लोकांनीं ‘ लढ्याच्या ऐक्यासाटीं क्रांतिकारक समिति ’ स्थापन केली.

१ नोव्हेंबर १९५४ रोजीं ह्या समितीनें अल्जेरियांतील सर्व पोलिस ठाण्यांवर अचानक हल्ले चढवून नव्या लढ्याची मुहूर्तमेढ रोवली. अल्जेरियन जनतेनें सशस्त्र क्रांतीच्या मार्गानें स्वातंत्र्य मिळविण्यासाठीं रणशिंग फुंकलें.

## ३

ह्याच वेळीं सहारा भागांत हसी मसूद ह्या ठिकाणीं खनिज तेलांचे सांठे सांपडले. आणि तांदूफ ह्या ठिकाणीं कच्चें लोखंड, तसेंच क्रोम-निकलच्या खनिजांचे प्रचंड डोंगर सांपडले. त्यामुळें युरोपच्या बाजार-पेठेंतून अँग्लो–अमेरिकन मक्तेदारांना हांकलून देण्याचीं स्वप्नें फ्रेंच मक्तेदारांना पडूं लागलीं आणि अल्जेरियावरील अंमल कायम टिकविण्याचा त्यांनीं निश्चय केला.

अल्जेरियन क्रांतिकारकांच्या गनिमी लढ्याच्या मुक्तिसेनेंत प्रारंभीं फक्त ३००० योद्धे आणि लहानसहान शस्त्रास्त्रें होतीं. ही सेना वाढत गेली. पूर्वीच्या सर्व राष्ट्रीय संघटनांचा तिला पाठिंबा मिळाला आणि तिच्यांतून अल्जेरियन जनतेची ‘ **राष्ट्रीय मुक्ति आघाडी** ’ अस्तित्वांत आली. आणि ह्या आघाडीच्या नेतृत्वाखालीं लढणाऱ्या मुक्ति-सेनेनें **६ लक्ष** फ्रेंच सैनिकांना सळो कीं पळो करून सोडलें. अल्जेरियाच्या प्रश्नावर फ्रेंच मंत्रिमंडळें गडगडूं लागलीं आणि अखेर १९५८ मध्यें जनरल द गॉलच्या हातांत सत्ता आली.

अरब राष्ट्रांनीं, समाजवादी राष्ट्रांनीं विशेषतः सोविएत युनियन व पूर्व जर्मनीच्या सरकारांनीं मुक्तिफौजेला उत्कृष्ट तोफा, बंदुका दिल्या आणि १० लक्ष क्रांतिकारकांनीं प्राणांची आहुति देऊन साम्राज्यवाद्यांना शरण

आणलें. १९५८ मध्यें आबाडीच्या नेतृत्वाखालीं ' **अल्जेरियन प्रजासत्ताकाचें तात्पुरतें सरकार** ' स्थापन झालें आणि त्याला २५ देशांनीं मान्यता दिली.

१९५८ पासून १९६० पर्यंत दोन वर्षांत द गॉल सरकारनें क्रांतिकारकांचा पराभव करण्याचे प्रयत्न केले पण त्यांत त्याला अपयशच आलें. अखेरीस क्रांतिकारकांच्या सरकारबरोबर तहाचीं बोलणीं करण्याची द गॉलसाहेबांनीं तयारी दाखविली, पण बोलणीं सुरू होण्यापूर्वीं त्यांना " युद्धबंदी " हवी होती, आणि तडजोडीच्या अटी त्यांनीं सांगितल्या त्या अशा :—

* अल्जेरियाची फाळणी करण्यांत यावी.

* किनाऱ्यावरचा संपूर्ण सुपीक प्रदेश फ्रेंच वसाहतकारांना द्यावा. तेथील अरबांनीं तो प्रदेश सोडून दुसरीकडे जावें.

* सहारामधील मुलूख अणु-चांचणीसाठीं फ्रेंचांना हवा आहे; शिवाय तेथील तेलाचा सांठाहि त्यांनाच द्यावा.

ही तडजोड क्रांतिकारकांनीं धुडकावून लावली आणि आपलें सतीचें वाण पुढें चालू ठेवलें त्यांत नवल कसलें !

चिडलेल्या वसाहतकारांनीं अनन्वित अत्याचार केले. नायाम ज्वालाग्राही द्रव टाकून मैलच्या मैल जमीन उद्ध्वस्त केली. पण पुन्हा एकदां फ्रेंच सरकारला माघार घ्यावी लागली. १९६१ च्या मार्चमध्यें **एव्हिअन** येथें फ्रेंच सरकारनें अल्जेरियाच्या तात्पुरत्या सरकारबरोबर बोलणीं सुरू केलीं. दोन वेळां तीं मोडलीं आणि पुन्हा सुरू झालीं. अखेरीस १९६२ च्या मार्चमध्यें तीं पूर्णपणें तडीस गेलीं आणि अल्जेरियन जनतेच्या स्वातंत्र्याचा व स्वयंनिर्णयाचा हक्क द गॉलला मान्य करावा लागला. मध्यंतरींच्या काळांत साम्राज्यवाद्यांच्या लष्करी गुंडांनीं देशांत जितकी मोडतोड करतां येईल तितकी केली. पण अल्जेरियाच्या जनतेनें आधुनिक जगांतला चमत्कार करून दाखविला. साम्राज्यवाद्यांच्या शस्त्रसज्ज फौजांना तोंड देऊन अल्जेरिया स्वतंत्र झाला.

## ४

स्वातंत्र्य मिळालें आणि नवे प्रश्न आव्हान देऊन पुढें आले. हजारों घरें उद्ध्वस्त झालेलीं होतीं. ३ लक्ष मुलें पोरकीं झालेलीं होतीं. फ्रेंच डॉक्टर्स, शिक्षक व इतर तज्ज्ञ अल्जेरिया सोडून निघून गेले. जवळजवळ ८ वर्षे चाललेल्या निघृण युद्धानें आधींच दुर्बळ असलेल्या अर्थव्यवस्थेला संपूर्ण-पणें खिळखिळी करून टाकली होती.

**बेनबेला** यांचें तात्पुरतें सरकार स्वतंत्र अल्जेरियाचें अधिकृत सरकार म्हणून सत्तेवर आल्यानंतर त्यांना आर्थिक पुनर्रचनेचा कार्यक्रम तांतडीनें पार पाडण्यासाठीं राष्ट्रीयीकरणाचा एकमेव मार्ग मोकळा होता आणि त्यांनीं त्याचा अंगीकार केला. ज्यासाठीं अल्जेरियाचे शेतकरी लढले ती जमीन त्यांना देण्यासाठीं फ्रेंच वसाहतकारांची जमीन ताब्यांत घेण्याची आवश्यकता होती. बेकारांना काम देण्यासाठीं उद्योगधंद्यांचें नियंत्रण करणें आवश्यक होतें. काळाबाजार नष्ट करण्यासाठीं व्यापार ताब्यांत घेणें जरुरीचें होतें. आणि त्या दृष्टीनेंच बेनबेला सरकारनें पावलें टाकलीं.

अल्जेरियांतून पळून गेलेल्या फ्रेंच वसाहतकारांच्या जमिनींची देखभाल करण्यासाठीं शेतकऱ्यांनीं स्वयंस्फूर्तीनें कमिट्या स्थापन केल्या होत्या. सत्तेवर आल्यावर पांचच दिवसांनीं अल्जेरियाच्या सरकारनें ३ ऑक्टोबर १९६२ रोजीं कायदा करून ह्या समित्यांना मान्यता दिली. कसणाऱ्या शेतकऱ्यांच्या नियंत्रणाखालील तीं सरकारी शेतें तयार झालीं. ही जमीन सर्वांत सुपीक होती आणि जवळजवळ **३० लक्ष** हेक्टर्स होती. ( आणि ८० लक्ष अल्जेरियन शेतकऱ्यांच्या मालकीची फक्त ४० लक्ष हेक्टर्स होती.) अशा रीतीनें शेत-जमिनीचा मोठा हिस्सा सरकारच्या ताब्यांत आला आणि आर्थिक विकासाचा पाया घातला गेला. अल्जेरियांत आपण मालकी हक्क कदाचित् टिकवूं अशीं स्वप्नें पाहणाऱ्या व पळून न गेलेल्या फ्रेंच वसाहतकारांच्या जमिनींचाहि पुढें यांतच समावेश केला गेला.

उद्योगधंद्यांच्या बाबतींतहि हीच पद्धत स्वीकारण्यात आली. सोडून गेलेल्या वसाहतकारांचे १००० कारखाने राष्ट्राच्या मालकीचे करण्यांत

आले आणि स्वयंशासित समित्यांकडे त्यांची व्यवस्था सोंपविण्यांत आली. त्यानंतर ओरानमधील कांच कारखाना, तंबाखू व काड्याच्या पेट्यांचे सर्व कारखाने, वाहतूक व लोखंडाचे कारखाने, मोटीं हॉटेल्स सरकारनें ताब्यांत घेतलीं.

नजिकच्या काळांत, अल्जेरियन जमीनदारांच्या जमिनीहि, जमीन-धारणेची कमाल मर्यादा ५ ते ५० किंवा कमी कसाच्या १०० हेक्टरांवर आणून, शेतमजूर ठेवण्यावर बंदी घालण्यांत येणार आहे.

अल्जेरियाच्या क्रांतिकारक सरकारचा राष्ट्रीय अर्थरचनेचा मार्ग हा असा, बिगर भांडवलदारी अर्थव्यवस्थेचा व समाजवादाकडे जाणारा आहे.

अर्थातच ह्या मार्गाला अडथळा करणाऱ्या शक्ति अल्जेरियांत होत्याच. विरोधाचा प्रारंभ झाला राष्ट्रीय मुक्ति-लढ्याच्या आघाडींतील पुढाऱ्यांतच. राष्ट्रीय मुक्ति-आघाडींत ( N. L. F. नॅशनल लिबरेशन फ्रंट–मध्यें ) असलेल्या जमीनदार–भांडवलदारांच्या पुढाऱ्यांनीं राष्ट्रीयीकरणाच्या कार्यक्रमाला १९६२ जूनमध्यें त्रिपोली ( लिबिया ) येथें भरलेल्या क्रांतिकारक समितीच्या बैठकींत विरोध केला. पण आघाडींत ८० टक्के सैनिक गरीब शेतकरी होते आणि त्यांनीं बेनबेला यांनीं मांडलेल्या शेती-विषयक धोरणाला संपूर्णपणें पाठिंबा दिला.

हें धोरण प्रत्यक्षपणें अमलांत येऊं लागतांच फ्रेंच व अल्जेरियन बड्या भांडवलदारांनीं हातमिळवणी केली. मोरोक्को व अल्जेरियाच्या सीमांबद्दल असलेल्या मतभेदांचा फायदा घेऊन मोरोक्कोच्या सरकारनें सीमेवर सशस्त्र हल्ले सुरू केले. फ्रेंच सरकारनें अल्जेरियन सरकारविरुद्ध चिथावणी दिली आणि हस्तक्षेपाची धमकी दिली. त्याच सहारांत अणु-चांचण्या करण्याची घोषणा केली. अशा रीतीनें अल्जेरिया सरकारला कोंडींत पकडण्याचे डाव सुरू झाले. मग अंतर्गत बंडाळीनेंहि डोकें वर काढलें. एका जमीनदाराचा मुलगा ऐत अहमद यानें काबील पर्वताच्या डोंगरांत आश्रय घेऊन बंडाचा झेंडा फडकवला. लष्कराच्या एका तुकडीनें त्याला पाठिंबा दिला. फ्रेंच वसाहतकारांनीं त्याला साहाय्य केलें.

पण प्रतिक्रांतीचा हा उठाव टिकला नाहीं. जनतेनें त्याला मुळींच पाठिंबा दिला नाहीं. सैन्याच्या विभागानें अंग काढून घेतलें आणि पश्चात्ताप

व्यक्त करून सरकारच्या बाजूनें प्रतिकारासाठीं ते सैनिकहि सज्ज झाले. जें कांगोंत जमलें तें अल्जेरियांत फसलें. अल्जेरियांतील क्रांतीचें संरक्षण झालें.

मग १९६३ च्या सप्टेंबरांत अल्जेरियाच्या सरकारनें जनतेच्या संमतीनें समाजवादी सरकारची स्थापना करण्याचें ध्येय घोषित करणारी राज्य-घटना तयार केली. त्यासाठीं समाजवादी पक्षाची उभारणी करण्याची आवश्यकता ध्यानांत घेऊन, १९६४ च्या मेमध्यें अल्जिअर्समध्यें राष्ट्रीय मुक्ति-आघाडीची कॉंग्रेस घेण्यांत आली. ह्या कॉंग्रेसनें निर्णय घेऊन त्याला समाजवादी ध्येयधोरणाच्या व कार्यपद्धतींच्या क्रांतिकारक पक्षाचें स्वरूप दिलें. मुक्ति-आघाडींत सहभागी असलेल्या कम्युनिस्ट पक्षानें ह्या पक्षाच्या बांधणीला मदत केली. कामगार-गरीब शेतकऱ्यांच्या बहुसंख्येवर आधार-लेल्या ह्या पक्षानें लोकशाही मध्यवर्तित्वाच्या तत्त्वानुसार कार्य करण्याचा निर्णय घेतला. १ लक्ष ५० हजार सभासद व ६ लक्ष सहानुभूतिदारांच्या १७०० सभासदांनीं ह्या परिषदेंत भाग घेतला होता.

अशा रीतीनें, समाजवादी ध्येयधोरण, समाजवादी रचना व कार्यपद्धति ह्या त्रिसूत्रीच्या प्रकाशांत क्रांतिकारक अल्जेरिया समाजवादाकडे वाटचाल करूं लागला आहे.

● ● ●

# ४५. मोरोक्को

**लोकसंख्या** – १ कोटी २५ लक्ष.

**राजधानी** – कासाब्लांका.

**राज्य** – स्वतंत्र.

**मुख्य धंदे** – फॉस्फेट व कोबाल्टच्या खाणी, फळांची व धान्याची शेती.

१

अल्जेरियाच्या उत्तर टोंकाला लागून मोरोक्को आहे. हें एक प्राचीन राष्ट्र आहे. मूळच्या बर्बर व मध्ययुगांत तेथें आलेल्या अरब लोकांची तेथें वस्ती आहे. लोकसंख्या १ कोटी २५ लक्ष असून त्यांपैकीं $\frac{1}{3}$ लोक बर्बर भाषा बोलतात.

आफ्रिकेच्या युरोपियन राष्ट्रांनीं परस्परांत वांटणी करून घेतल्यानंतर फार काळपर्यंत, म्हणजे १९१२ पर्यंत मोरोक्को स्वतंत्र होतें. पण साम्राज्य-वाद्यांना तें पाहिजेच होतें; कारण एक प्रकारें आफ्रिकेचें तें प्रवेशदार असून, भूमध्य समुद्रावरील लष्करीदृष्ट्या सर्वांत मोक्याचें आहे. त्यामुळें फ्रेंचांनीं सुलतानाला आपलें "संरक्षण" मान्य करायला लावलें आणि नंतर त्याच्या ईशान्येकडील छोट्या प्रदेशावर–**टॅन्जिअर्सवर**–आंतरराष्ट्रीय सत्ता स्थापन करण्यांत आली.

साम्राज्यवाद्यांच्या अमलखालीं मोरोक्कोचा औद्योगिक विकास झालाच नाहीं. तेथील फॉस्फेट व कोबाल्ट खणून नेण्यासाठींच फक्त त्यांनीं खाणी चालविल्या. मोरोक्कोंत लोखंड, तेल व मॅंगनीजचेहि सांठे आहेत. परंतु त्यांचें उत्खनन होत नाहीं. लोखंडाचे किंवा अन्य कोणत्याहि धातूचे कारखाने अद्याप निघालेले नाहींत.

गहूं, बार्ली, बटाटे, द्राक्षें, टोमॅटो व ऑलिव्ह फळें हीं भूमध्य सामुद्रिक प्रदेशांतील पिकें हेंच तेथील मुख्य उत्पादन आहे. अलीकडे सोविएत युनियनबरोबर व्यापार वाढविण्याचें व उद्योगधंद्यासाठीं मदत घेण्याचें धोरण सरकारनें स्वीकारलें आहे.

मोरोक्कोची राजधानी आहे **कासाब्लांका** – त्याचा अर्थ होतो–" शुभ्र घर " आणि खरोखरीच कासाब्लांकांतील घरें पांढरीं शुभ्र आहेत. स्वच्छ उन्हांत व निळ्या आकाशाच्या व निळ्या समुद्राच्या पार्श्वभूमीवर तीं फारच सुंदर दिसतात.

मोरोक्कोवर ९ व्या शतकापासून अलौनी ह्या अरब राजघराण्याचें राज्य चालतें. घराण्यांतील राजपुत्रच नव्हे तर सुलतानाचा कोणीहि नातेवाईक राजा ( सुलतान ) होऊं शकतो; त्यामुळें राजघराण्याची परंपरा अखंड चालू राहिली. परंपरेचा फायदा घेऊन फ्रेंचांनीं आपल्या हातांतील बाहुलें बनून कारभार करील अशांनाच सुलतानपद देण्याचा यत्न करून पाहिला पण त्यांना त्यांत यश आलें नाहीं. १९२७ मध्यें सिद्दी महमद बेन युसुफ गादीवर बसला तेव्हां तो केवळ १७ वर्षांचा होता व फ्रेंच राज्यकर्त्यांना त्याच्यापासून कोठल्याच प्रकारची भीति वाटत नव्हती, आपली निरंकुश सत्ता अधिकच बळकट करतां येईल, अशी खात्री वाटत होती.

परंतु १९३० पासून सुलतानानें स्वामित्वाचे अधिकार दाखवायला प्रारंभ केला. त्यानें " रीजन्सी " ( राजप्रतिनिधीचा अंमल ) बरखास्त करून स्वतःला अधिकार देण्याची मागणी केली. राज्यांत मुलींना स्वातंत्र्य दिलें. त्याचा मुलगा स्वतःला " युवराज " म्हणवून घेऊं लागला. फ्रेंचांच्या हातांत परराष्ट्रीय संबंधांचीं सर्व सूत्रें असल्यामुळें त्यांनीं अमेरिकेला प्रचंड लष्करी व वैमानिक तळ उभारण्यास परवानगी दिली होती. ह्या तळावर कोणीहि मोरोक्कन जाऊं शकत नसे. एके दिवशीं युवराज राबात विमानतळावर जाऊन पोहोंचला आणि आपल्या भूमीवर कोठेंहि हिंडण्याचा आम्हांला अधिकार आहे, असें सांगूं लागला. ह्या सर्व प्रकारामुळें फ्रेंचांना राग आला आणि हा राष्ट्रवादी कट आहे आणि त्यांत

राष्ट्रीय स्वातंत्र्यासाठीं लढणाऱ्या **इस्तिकलाल पार्टीचा** हात आहे, असे त्यांनीं आरोप करण्यास प्रारंभ केला.

दरम्यान दुसऱ्या महायुद्धाच्या प्रारंभीं जर्मनीनें फ्रेंचांचा पाडाव केला आणि १९४० मध्यें जर्मनीनें मोरोक्कोवर तावा मिळवला. त्या वेळीं दोस्तांच्यावतीनें उत्तर आफ्रिकेंत अमेरिकन लष्कर येऊन उतरलें व कबजा करून बसलें. १९४३ मध्यें, अमेरिकेचे अध्यक्ष रूझवेल्ट व ब्रिटनचे पंतप्रधान चर्चिल कासाब्लांका येथें परिषदेसाठीं आले असतां सुलतान सिद्दी महमद यांनीं त्यांची भेट घेतली आणि युद्धानंतर मोरोक्कोला स्वातंत्र्य मिळेल, असें आश्वासन मागितलें तें स्पष्टपणें न मिळाल्यामुळें त्याला चीड आली. त्या वेळीं राष्ट्रीय स्वातंत्र्याच्या भावना जोमदार बनल्या होत्या. राष्ट्रवादी पुढाऱ्यांनीं **इस्तिकलाल पक्षाच्या** वतीनें " संरक्षक प्रदेशाचा दर्जा " रद्द करण्याची व स्वातंत्र्याचा हक्क मान्य करण्याची मागणी केली. १९४७ मध्यें सुलतानानें टँजिअर्स येथें राज्यारोहण दिनाच्या भाषणांत अरब राष्ट्रांबरोबर मोरोक्कोचे बंधुभावाचे संबंध आहेत, व आम्हांला ताबडतोब स्वातंत्र्य मिळालें पाहिजे अशी मागणी करून इस्तिकलाल पक्षाच्या घोषणेला पाठिंबा दिला. ह्यामुळें इस्तिकलाल पक्षावर बंदी घालण्याचे फ्रेंच वसाहतकारांचे मनसुबे धुळीला मिळाले व ते चिडले. राष्ट्रीय स्वातंत्र्य चळवळीची व्याप्ति राजापासून शेतकऱ्यापर्यंत सर्व थरांत पसरली. राष्ट्रीय स्वातंत्र्यचळवळ चिरडून टाकण्यासाठीं आधीं ह्या सुलतानाला पदच्युत केला पाहिजे, हें स्पष्ट दिसून येतांच फ्रेंच राज्यकर्त्यांनीं त्या दिशेनें हालचाली सुरू केल्या.

थामी एल् – ग्लाओइ हा एक जमात-प्रमुख फ्रेंचांचा हस्तक होता. त्याला हाताशीं धरून अनेक जमात-प्रमुखांचा सशस्त्र ताफा उभा करण्यांत आला आणि त्यांनीं सुलतानाला सिंहासनावरून काढून टाकण्याची मागणी केली. तिचें निमित्त करून फ्रेंच सत्ताधाऱ्यांनीं सुलतान सिद्दी महमद याला २० ऑगस्ट १९५३ रोजीं रातोरात बडतर्फ केलें आणि कुटुंबांतील सर्व माणसांसह त्याला प्रथम स्पेनमधील कोर्सिका येथें हद्दपार केलें; तेथून पुढें मादागास्कर येथें नेऊन ठेवलें. फ्रेंचांच्या ह्या कृतीमुळें स्वातंत्र्याची भावना दबली नाहीं; उलट उफाळून आली. रस्त्यारस्त्यांतून चिलखती रणगाडे फिरत होते; सार्वत्रिक धरपकडीचें सत्र चालू होतें, पण जनतेचे

उठाव वाढतच होते. यांतूनच, थोड्याच काळांत " **मुक्तिसेना** " स्थापन झाली आणि तिनें फ्रेंचांचें आसन खिळखिळें केलें. हा संघर्ष २॥ वर्षें सतत चालू राहिला. सर्व प्रमुख पुढाऱ्यांना सहारामध्यें लष्करी तुरुंगांत ठेवण्यांत आलें. शहरांवर विमानांतून बॉंबवर्षाव करण्यांत आला; त्यांत शेंकडों लोक ठार झाले पण देशभक्तांनीं लढा चालूच ठेवला. अखेरीस राज्यकर्त्यांनीं माघार घेतली. १९५५ च्या नोव्हेंबरमध्यें सुलतानाला परत सिंहासनावर बसविणें आणि देशाचा स्वातंत्र्याचा हक्क मान्य करणें त्यांना भाग पडलें. इस्तिकलाल पक्ष व स्वातंत्र्यवादी लोकशाही पक्ष यांच्या प्रतिनिधींचा समावेश असलेलें सरकार सी बेकायी ह्या स्वातंत्र्यवादी लष्करी अधिकाऱ्यांच्या पुढाकाराखालीं स्थापन करण्यांत आलें. हें सरकार संपूर्ण स्वातंत्र्याचें सरकार नव्हतें कारण परराष्ट्रीय संबंध व संरक्षण ह्या खात्यांवर फ्रेंचांनीं नियंत्रण कायम ठेवलें होतें.

संपूर्ण स्वातंत्र्याच्या मागणीसंबंधीं १९५६ च्या प्रारंभीं बोलणीं सुरू झालीं आणि २ मार्च १९५६ मध्यें मोरोक्कोला स्वातंत्र्य मिळालें. परराष्ट्रीय धोरण ठरविण्याचा व राष्ट्रीय सैन्य उभारण्याचा हक्क देशाला मिळाला. परंतु, फ्रेंच वसाहतकारांच्या संरक्षणासाठीं फ्रान्सनें आपले लष्करी-तळ तेथें कायम ठेवले.

स्वातंत्र्य मिळाल्यानंतर, मोरोक्कोंतील सरकार व राजकीय पक्ष यांच्यापुढें नवे प्रश्न उभे राहिले. राजेशाही व सरंजामशाही-समाजाची चौकट ढिली करून आत्यंतिक दारिद्र्यांत राहणाऱ्या शेतकऱ्यांना जमीन मिळवून देण्याचा प्रश्न हा सर्वांत मोठा व महत्त्वाचा प्रश्न पुढें आला. त्याच वेळीं, मोरोक्कोंतील कामगारसंघटना व फ्रेंच सरकारनें १९५२ पासून बेकायदेशीर ठरविलेल्या मोरोक्कन कम्युनिस्ट पक्षाच्या वजनाखालीं साम्राज्यविरोधी, सरंजामविरोधी व औद्योगिक विकास यांबद्दलचा कार्यक्रम जनतेंत लोकप्रिय होऊं लागला होता. त्यामुळें अहमद बालफ्रेज यांच्या नेतृत्वाखालीं १९५८ मध्यें स्थापन झालेल्या इस्तिकलाल पक्षाच्या मंत्रिमंडळापुढें धोरणाबद्दलचे अत्यंत मूलभूत व तीव्र स्वरूपाचे प्रश्न उभे राहिले.

खुद्द इस्तिकलाल पक्षांतच ह्या प्रश्नावर मतभेद निर्माण झाले. मंत्रिमंडळांतील मतभेदामुळें बालफ्रेज मंत्रिमंडळ १९५८ च्या डिसेंबरमध्यें गडगडले. त्यानंतर, इस्तिकलाल पक्षांतील डाव्या गटाचे नेते अबदुल्ला इब्राहिम यांच्या नेतृत्वाखालीं नवें, " काळजीवाहू " मंत्रिमंडळ तयार झालें आणि त्यांनीं सार्वत्रिक निवडणुका घडवून आणाव्यात असें ठरलें. तोंपर्यंत निवडणुका होऊन विधानसभा अस्तित्वांत आलेली नव्हती; त्यामुळें ह्या निवडणुका अत्यंत महत्त्वाच्या होत्या.

देशाच्या भावी उत्कर्षाच्या कार्यक्रमाबद्दल इस्तिककाल पक्षांत सुरू झालेल्या मतभेदामुळें बाहेर पडलेल्या डाव्या पुढाऱ्यांनीं अखेरीस १९५९ च्या सप्टेंबरमध्यें आपला नवा पक्ष स्थापन केला, त्याचें नांव – **लोकमान्य शक्तींचा राष्ट्रीय संघ** ( नॅशनल युनियन ऑफ पॉप्युलर फोर्सेस ). **बेन बार्का** हे ह्या पक्षाचे पुढारी असून लहान व्यापारी व सुशिक्षित मध्यम वर्ग यांचा या पक्षाला पाठिंबा आहे.

१९६० च्या मे महिन्यांत सुलतानानें इब्राहिम मंत्रिमंडळावर बेन बार्काच्या क्रांतिकारक कार्यक्रमांना पाठिंबा दिल्याचा आरोप ठेवला आणि तें बरखास्त केलें. आपण स्वतः राष्ट्राचे अध्यक्ष, युवराज हसन हा उपाध्यक्ष असल्याचें जाहीर केलें आणि त्याच महिन्यांत निवडणुका घेतल्या. राष्ट्रीय लोकमान्य संघाला स्थानिक अधिकाऱ्यांच्या निवडणुकांत मोठ्या शहरांतून बहुमत मिळालें आणि राजाच्या नियंत्रणाखालीं त्या पक्षाचें मंत्रिमंडळ स्थापन झालें. राजेशाही – सरंजामशाही हक्काच्या दडपणाखालीं ह्या मंत्रिमंडळानें स्वातंत्र्योत्तर काळांत कायदेशीर झालेल्या कम्युनिस्ट पक्षावर बंदी घालण्यास संमति दिली आणि जमीन-विषयक सुधारणा घडवून सरंजामदारांच्या जमिनी शेतकऱ्यांना द्या, परकीय भांडवलाचें राष्ट्रीयीकरण करा ह्या मागण्यांना आळा घालण्याचा प्रयत्न केला. सुलतान सिद्दी अहमद यांचें राष्ट्रीय धोरण अशा रीतीनें अधिकाधिक प्रतिगामी होत असतांनाच, अल्जेरियाच्या मुक्तिसंग्रामाला पाठिंबा देऊन आणि घाना, माली, गिनी, इजिप्त ह्या पुरोगामी आफ्रिकी स्वतंत्र राष्ट्रांशीं मैत्रीचे संबंध बांधून देशांतील असंतोषाला बांध घालण्याचा त्यानें प्रयत्न केला. हा संघर्ष चालू

असतांनाच सुलतान सिद्दी अहमद १९६१ ज्या फेब्रुवारींत मरण पावले. आणि त्यांचा मुलगा ( २ रा ) हसन सुलतान राष्ट्राध्यक्ष झाला.

राजाला घटनात्मक हक्क देऊन देशांत लोकशाही स्थापन करावी, व शेतकऱ्यांना जमीन द्यावी ह्या मागण्यांचा जोर राष्ट्रीय लोकमान्य संघाच्या नेतृत्वाखालीं वाढत आहे. ह्या संघाच्या घोषणांत व विचारांत तात्त्विक गोंधळ असला तरी " शास्त्रोक्त समाजवाद " हें त्याचें धोरण असल्याचें पक्षानें जाहीर केलें आहे. सरंजामदारांचा " सोशल डेमोक्रॅटिक पक्ष ", राष्ट्रीय भांडवलदारांचा " इस्तिकलाल पक्ष ", छोट्या भांडवल-दारांचा " लोकमान्य शक्तींचा राष्ट्रीय संघ " आणि कम्युनिस्ट पक्ष असे पक्ष आज मोरोक्कोंत कार्य करीत आहेत. हे सर्व पक्ष " समाजवादाची स्थापना करणें " हें आपलें ध्येय आहे असें जाहीर करतात; पण समाज-वादाबद्दलच्या त्यांच्या कल्पना अर्थातच भिन्न भिन्न आहेत.

सध्यां सुलतान हसन यांनीं पुष्कळशी सत्ता हातांत घेतली असून लष्कराच्या साहाय्यानें कांहीं तांतडीचे कार्यक्रम हातांत घेतले आहेत. शिक्षणाचा प्रसार आणि सहकारी शेती ह्या क्षेत्रांत मर्यादित प्रमाणावर पुढें पाऊल टाकलें आहे. शेजारच्या अल्जेरिया व इजिप्त ह्या देशांत चाललेल्या झपाट्याच्या प्रगतीचा मोरोक्कोच्या जनमतावर परिणाम होत असल्यामुळें राजेशाही व सरंजामशाही शोषण नष्ट करण्यासाठीं आणि सामान्य माणसांचें दारिद्र्य दूर करून राहणीमान वाढविण्यासाठीं देशांतील शक्ति संघटित होत आहेत.

मोरोक्कोचा एक भाग स्पेननें जिंकला होता. १९५६ मध्यें मोरोक्कोला स्वातंत्र्य मिळाल्यानंतर स्पेननें आपल्या ताब्यांतील भाग मोरोक्कोंत सामील करून दिला; अशा रीतीनें, १९५७ मध्यें टँजिअर्सवरील आंतरराष्ट्रीय सत्ता बरखास्त करून तें शहर मोरोक्को राज्यांत समाविष्ट करण्यांत आलें. तरीसुद्धां " **स्पॅनिश सहारा** " या नांवानें ओळखला जाणारा प्रदेश अद्यापहि स्पेनच्या ताब्यांत आहे. **सागुइआ एल् हामरा, रिओ डी ओरो व इफ्नी** या प्रदेशांचा त्यांत समावेश आहे. त्याचप्रमाणें सीउटा व मेलिला शहरें व कांहीं लहान बेटें उत्तरेस स्पेनच्या ताब्यांत आहेत. ह्या प्रदेशाचा

उपयोग साम्राज्यवाद्यांच्या लष्करी सामुग्रीचा सांठा करण्यासाठीं होत असल्यामुळें आफ्रिकन राष्ट्रांच्या सार्वभौमत्वाला त्यांच्यामुळें धोका निर्माण होतो. म्हणून त्यांच्यावरील स्पेनचा अंमल नष्ट होऊन त्यांचा समावेश मोरोक्कोंत झाला पाहिजे; अशी मागणी तेथील जनता करीत आहे.

सीउटा व मेलिला हीं भूमध्य समुद्रावरील किनाऱ्यावरचीं शहरें स्पेनचा हुकूमशहा फ्रँको यानें नाटो ह्या लष्करी संघटनेच्या वापरासाठीं दिलीं आहेत. तेथील स्थानिक लोकसंख्या १,५०,००० असून शहरांतील लष्करी अधिकाऱ्यांबरोबर त्यांचे नेहमीं खटके उडतात. सर्व अधिकार व नागरिक प्रशासनसुद्धां लष्कराच्याच हातांत आहे.

इफनी द्वीपकल्प १८६० सालीं स्पेननें जिंकून घेतलेलें आहे. तेथील लोकसंख्या ५२,००० असून गहूं, बार्ली यांची शेती व मासे पकडणें हे त्यांचे व्यवसाय आहेत.

स्पॅनिश सहारा प्रदेशाचा बराच भाग वाळवंटाचा आहे. लोकसंख्या ६० हजार आहे. उत्तरेस गहूं, बार्ली हीं धान्यें पिकतात आणि वाळवंटांत खजुराचीं झाडें होतात. अमेरिकन तेलकंपन्या तेलासाठीं संशोधन करीत आहेत. स्पॅनिश प्रदेशांत २० हजार स्पॅनिश लष्कर असून सर्व सत्ता लष्कराच्याच हातांत आहे. १९५८ सालीं येथील जनतेनें स्वातंत्र्यासाठीं उठाव केला होता, तो लष्करानें अमानुष क्रूरतेनें दडपून टाकला.

हे प्रदेश छोटे असल्यामुळें जगापुढें त्यांचा प्रश्न प्रखरतेनें येत नाहीं. परंतु स्वतंत्र होऊन मायभूमीबरोबर–मोरोक्कोबरोबर–संलग्न होण्याचें त्यांचें स्वप्न लौकरच साकार झाल्याशिवाय राहणार नाहीं.

• • •

# उपसंहार

आफ्रिकेंतील ४५ राष्ट्रांतील परिस्थिति कशी आहे याचा आपण आतांपर्यंत परिचय करून घेतला. गेल्या वर्षभरांत यांपैकीं कांहीं राष्ट्रांत महत्त्वाचे बदल झाले आहेत; त्यांच्या स्वरूपांचें दिग्दर्शन अर्थातच पूर्वपरिचयांत आलेलें आहेच; त्या घडामोडींचा परामर्श आतां जातां-जातां घेणें इष्ट ठरेल.

**द. आफ्रिका, नैर्ऋत्य आफ्रिका, द. र्‍होडेशिया, मोझांबिक, अंगोला, पोर्तुगीज गिनी** ह्या राष्ट्रांतील हुकूमशाहीविरुद्धचे स्वातंत्र्य-संग्राम सशस्त्र-क्रांतीच्या मार्गांनीं वाटचाल करीत असून सर्व आफ्रिकेंतील स्वतंत्र राष्ट्रांचा त्यांना बंधुभावपूर्वक पाठिंबा आहे. साम्राज्यवादी सत्ता ह्या देशांत अमाप लष्करी-साहित्याचा उपयोग करीत असल्या तरी जनतेचें शौर्य व त्याग अखेरीस फलद्रूप होणार आहेत. सत्य व न्याय ह्यांचा विजय होऊन ह्या देशांना लवकरच स्वराज्याची व स्वातंत्र्याची प्राप्ति झाल्याशिवाय राहाणार नाहीं.

ह्या देशांच्याच मालिकेंत **कांगो** ( लिओपोल्डव्हिला )चा समावेश केला पाहिजे. शोंबेनें कांगोंत पुनरागमन केल्यानंतर गोर्‍या मिशनर्‍यांना वांचविण्याच्या भूतदयावादी कामगिरीच्या नांवाखालीं तेथील सशस्त्र क्रांतिकारकांविरुद्ध अमेरिकन-बेल्जियन लष्करी सामुग्रीच्या व गोर्‍या सैनिकांच्या साहाय्यानें युद्ध पुकारलें आहे. ह्या आक्रमणाचा पाडाव हें आफ्रिकेंतील जनतेचें जिव्हाळ्याचें ध्येय झालें आहे. कांगोमधून दक्षिण आफ्रिका, दक्षिण र्‍होडेशिया, अंगोला व मोझांबिकच्या स्वातंत्र्य-योद्धयांविरुद्धहि कारवाई चालू असून तो प्रतिक्रांतीचा बालेकिल्ला बनला आहे.

त्यानंतरची उल्लेखनीय घटना म्हणजे २४ ऑक्टोबर १९६४ रोजीं **उत्तर र्‍होडेशियांतील** ब्रिटिश सत्तेची अखेर होऊन तो देश स्वतंत्र

झाला आणि १८ फेब्रुवारी १९६५ रोजीं **गॅंबियांतील** ३०० वर्षांच्या ब्रिटिश सत्तेचा शेवट होऊन तोहि देश स्वतंत्र झाला आहे. उत्तर ऱ्होडेशियानें **झांबिया** हें नांव धारण केलें असून डॉ. केनेथ कौंडा हे झांबिया प्रजासत्ताकाचे अध्यक्ष झाले आहेत. गॅंबिया प्रजासत्ताकाचे स्वराज्यांतील मुख्यमंत्रीपद पूर्वींचे पंतप्रधान श्री. डेव्हिड जावाहा यांच्याकडेच आहे. हीं दोन्ही राष्ट्रें आतां स्वातंत्र्योत्तर काळांतील औद्योगिकरणाचे व इतर प्रश्न सोडविण्याचे प्रयत्न करीत आहेत.

अशा या लढवय्या व नवोदित आफ्रिकन राष्ट्रांना सुयश चिंतून आपलें परिचयाचें कार्य संपवूं या.

• • •

दा. क्र. 94082

REFBK-0015042

**सौ. सरला कारखानीस** : ( पूर्वाश्रमींच्या पाटणकर ) एक क्रियाशील समाज कार्यकर्त्या आणि लेखिका. तर्कशास्त्र आणि राजकारण हे विषय घेऊन बी. ए. झाल्यावर कांहीं काळ वृत्तपत्रकाराचा पेशा पत्करून त्यांनीं पुढें राजकीय चळवळींत पदार्पण केलें. त्या निमित्तानें त्यांना तुरुंगवासही घडला. 'संयुक्त महाराष्ट्राच्या हुतात्म्यांची कहाणी', 'मार्क्सवाद म्हणजे काय ?', 'स्त्रिया आणि कम्युनिझम', 'मार्क्स एंगल्स' चरित्र, 'आफ्रिका' आदि त्यांचें साहित्य प्रसिद्ध आहे. साधार आणि अचुक माहितीच्या आधारें विषय प्रतिपादन करण्याची त्यांची हातोटी विशेष उल्लेखनीय आहे. 'जागृत आफ्रिका' हें प्रस्तुत पुस्तक वाचतांना वाचकांना याचा प्रत्यय येईल.